# INTER RELATIONSHIP BETWEEN SUGAR CO-OPERATIVE INDUSTRIES IN MAHARASHTRA AND RURAL DEVELOPMENT : A CASE STUDY OF BHOGAWATI SAHAKARI SAKHAR KARKHANA

[महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी आणि ग्रामीण विकास यातील आंतर संबंधाचा अभ्यास : श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याचे व्यष्टी अध्ययन]

**A THESIS SUBMITTED TO THE**

TILAK MAHARASHTRA VIDYAPEETH, PUNE
FOR THE AWARD OF DEGREE OF
PH. D. (VIDYAVACHASPATI)

**INTER DISCIPLINARY-ECONOMICS**
FACULTY OF MORAL AND SOCIAL SCIENCES


Submitted By
**SAMBHAJI NARAYAN PATIL**

Under the Guidance of
**DR. ASHOK V. JAIN**


**FEBRUARY 2011**

## DECLARATIONS

I here by declare that the thesis entitled **"INTER RELATIONSHIP BETWEEN SUGAR CO-OPERATIVE INDUSTRIES IN MAHARASHTRA AND RURAL DEVELOPMENT A CASE STUDY OF BHOGAWATI SAHAKARI SAKHAR KARKHANA" महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी आणि ग्रामीण विकास यांतील आंतरसंबंधाचा अभ्यास : श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याचे व्यष्टी अध्ययन)** Completed and written by me has not previously formed the basis for the award of any Degree or other similar title of this or any other University or examining body.

**Place : Kankavli**
**Date : 26th February, 2011**

**SAMBHAJI NARAYAN PATIL**
**Research Student**

# CERTIFICATE

This is to certify that the thesis entitled **"INTER RELATIONSHIP BETWEEN SUGAR CO-OPERATIVE INDUSTRIES IN MAHARASHTRA AND RURAL DEVELOPMENT A CASE STUDY OF BHOGAWATI SAHAKARI SAKHAR KARKHANA" महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी आणि ग्रामीण विकास यांतील आंतरसंबंधाचा अभ्यास : श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याचे व्यष्टी अध्ययन)** which is being submitted herewith for the award of the Degree of Vidyavachaspati (Ph. D.) in SOCIAL SCIENCES of Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune is the result of original research work completed by SHRI SAMBHAJI NARAYAN PATIL under my supervision and guidance. To the best of my knowledge and belief the work incorporated in this thesis has not formed the basis for the award of any Degree or similar title of this or any other University or examining body.

**Place : THANE**
**Date : 26th February, 2011**

**(DR. ASHOK V. JAIN)**
**Research Guide**

# ऋणनिर्देश

**''महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी आणि ग्रामीण विकास यातील आंतरसंबंधाचा अभ्यास : श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याचे व्यष्टी अध्ययन''**

या विषयाचे संशोधन कार्य पूर्ण करण्याकरिता अनेक मान्यवर, व्यक्ती, संस्था, पदाधिकारी, हितचिंतक व सहकारी या सर्वांचे सहकार्य लाभले. त्यांचे ऋण व्यक्त करणे माझे कर्तव्य ठरते.

सदर संशोधन प्रबंध पूर्ण करण्याकरिता मार्गदर्शक म्हणून डॉ. अे. व्ही. जैन. संशोधक मार्गदर्शक माजी ग्रामीण विकास विभागप्रमुख कीर्ती महाविद्यालय दादर, मुंबई, यांनी विषयाच्या निवडीपासून ते संशोधन कार्य पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी अमूल्य मार्गदर्शन करून योग्य त्यां सूचना केल्या. संशोधनकामी प्रेरणा दिली. त्यामुळे प्रस्तुत संशोधन कार्य पूर्णत्वास गेले त्यासाठी त्यांचे मन:पूर्वक ऋण व्यक्त करतो.

सदर संशोधन प्रकल्पाकरिता माहिती संकलन करतेवेळी अभ्यासासाठी निवडलेल्या कारखान्याचे चेअरमन श्री. दिपक राजाराम पाटील (सडोलीकर), कार्यकारी संचालक श्री. व्ही. एम्. माने, ऑफिस सुपरिटेंडेंट श्री. यु. एम् मोरे, चीफ अकौटंट श्री. एस्. बी. झांजगे, लेबर अँड वेल्फेअर ऑफिसर श्री. एम्. एम्. पाटील, परचेस ऑफिसर के. एस्. कोगेकर, चीफ इंजिनिअर श्री. जी. आर्. किल्लेदार, मुख्य शेती अधिकारी श्री. एस्. डी. कुंभार, एस्. डी. पाटील, एस्. के. बिरंजे, ए. ए. लिंग्रस, बी. पी. सरुडकर, व्ही. बी. पाटील, एस्. ए. पाटील, आर्. एस्. चव्हाण तसेच कारखान्याच्या विविध विभाग प्रमुखांनी संशोधनकामी आवश्यक ती माहिती उपलब्ध करून देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य केले. त्यामुळे संशोधन कार्य पूर्ण करता आले. या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

संशोधन कार्य पूर्ण करताना ग्रंथालयाचा आधार घेतला. ग्रंथपाल टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, कणकवली महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. माळी यांनी ग्रंथालय सुविधा उपलब्ध करून दिल्या, त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार.

शिक्षण प्रसारक मंडळाचे दिवगंत चेअरमन कै. केशवरावजी राणे, विद्यमान चेअरमन मा. सुरेशराव कामत, सचिव बाळासाहेब वळंजु, प्राचार्य संभाजीराव शिंदे यांच्या प्रेरणेमुळे संशोधनाचे काम पूर्णत्वास गेले त्यामुळे त्यांचेही मन:पूर्वक आभार.

माझे वरिष्ठ सहकारी डॉ. शिवाजीराव अकोळकर यांची प्रेरणा, प्रोत्साहन व संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी त्यांनी सतत केलेली मदत यामुळेच हे कार्य पूर्णत्वास जाऊ शकले, त्यामुळे त्यांचेही मन:पूर्वक आभार.

संशोधन कार्यासाठी प्रेरणा देणारे व मदत करणारे प्रा. मारूती कुंभार, प्रा. डॉ. बी. एस्. नौकुडकर, प्रा. डॉ. राजेंद्र मुंबरकर, प्रा. डॉ. लालासाहेब घोरपडे, प्रा. पी. सी. वाघमारे, प्रा. डॉ. राजाराम पाटील आणि महाविद्यालयातील सर्व सहकारी यांचे मन:पूर्वक आभार.

संशोधन काय पूर्णत्वास नेण्यासाठी प्रेरणा देणारे माजी प्राचार्य राजा माने, सौ. मंगल माने, श्री. संभाजी शेवाळे, प्रा. डॉ. दत्ता पवार प्रबंधाची मांडणी व टाईप सेट करणारे श्री. विनायक जाधव, संतोष राणे माझ्या घरातील सर्व वडिलधारी मंडळी, स्वाती, नितीन माने, श्री. एच्. एन्. पाटील, विलास पाटील, माझी पत्नी सौ. सुनिता, मुलगा आदित्य, मुलगी श्रेया यांच्या मोलाच्या सहकार्याचाही अंत:करणपूर्वक उल्लेख करतो.

**प्रा. संभाजी नारायण पाटील**
**संशोधक**

# प्रास्ताविक

सहकारी चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण विकास या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील भोगावती सहकारी साखर कारखाना या सहकारी संस्थेच्या कार्य आणि योगदानाचा अभ्यास करणे हा सदर संशोधनाचा विषय आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण समुदायातील दुर्बल घटकांना संघटित करणे त्यांच्या संयुक्त प्रयत्नाद्वारे त्याचा आर्थिक विकास साध्य करणे. यासाठी शासनाने सहकारी चळवळीस प्रोत्साहन दिले. कोरडवाहू क्षेत्रात जलसिंचनाची साधने उपलब्ध करून दिल्याने, पश्चिम महाराष्ट्रातील 'साखर टापू'तील सुपीक जमिनीत ऊसाची लागवड आणि या ऊसावर प्रक्रिया करून साखरेचे उत्पादन करणारे सहकारी साखर कारखाने स्थापन करणे ही प्रक्रिया व्यापक प्रमाणात हाती घेण्यात आली. 'साखर टापू'त सहकारी साखर कारखानदारीचा प्रसार झाल्याने, विकासाची गंगोत्री या भागात अवतीर्ण झाली. याच प्रक्रियेचा एक घटक असलेल्या कोल्हापूर जिल्हातील करवीर तालुक्यातील परीते येथे कार्यरत असणाऱ्या भोगावती सहकारी साखर कारखान्याचा संस्थात्मक अभ्यास करण्याच्या उद्देशाने सदर संशोधन कार्य हाती घेतले.

कोल्हापूर जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थिती ऊस-उत्पादनाला आणि उसाच्या गुळापासून साखरेच्या उत्पादनाला पोषक असल्याने, उसाचे उत्पादन सर्वसामान्य शेतकरी कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीस पोषक ठरेल अशी त्यांची धारणा होती. या धारणेपोटी जिल्ह्यातील समाजधुरीणांनी आणि राजकीय अभिजन वर्गाने शेतकरी वर्गाला उसाचे उत्पादन घेण्यास प्रवृत्त केले आणि या ऊस-उत्पादक शेतकऱ्यांची मोट बांधून, सहकारी साखर कारखाने स्थापन करण्याच्या प्रक्रियेस सुरवात केली. यशवंतराव चव्हाण आणि त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांनी सहकारी साखर कारखाने उभारण्यास सर्वोतोपरी सहकार्य केले. अल्पावधीत दक्षिण महाराष्ट्र म्हणजेच कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यात स्थानिक नेत्यांच्या पुढाकाराने सहकारी साखर कारखाने स्थापन झाले. १९७० च्या दशकात दक्षिण महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलून गेला.

नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने मी जरी कोकणात गेलो असलो, तरी आमच्या गावात आणि त्याच्या परिसरात समृद्धीची गंगा अवतीर्ण झाल्याचे मला जाणवले. सामान्य शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या माझ्यासारख्या व्यक्तीला अलिबाबाच्या या जादुच्या गुहेचा शोध घेण्याची म्हणजेच सहकारी साखर उद्योगाविषयीचे संशोधन करण्याची प्रबल इच्छा असणे ओघानेच आले

सहकारी साखर कारखानदारीत निर्माण झालेल्या त्रुटी मान्य करूनही, त्याने ग्रामीण भागात घडवून आणलेले परिवर्तन सार्वत्रिकरित्या मान्य केले जाते. भोगावती सहकारी साखर कारखाना आजही उर्जितावस्थेत असल्याने, त्याची यशोगाथा सर्वांनाच प्रेरणादायी ठरेल अशी रास्त अपेक्षा बाळगणे गैर ठरणार नाही.

**प्रा. संभाजी नारायण पाटील**

## प्रकरण १

# सहकार आणि ग्रामीण विकास

**१.१ प्रास्ताविक**

**१.२ संशोधन विषयाचे स्पष्टीकरण**

१.२.१ सहकार

१.२.२ सहकाराची वैशिष्ट्ये

१.२.३ सहकाराची तत्वे

१.२.४ सहकारी साखर कारखानदारी

१.२.५ ग्रामीण विकास

१.२.७ **सहकारी साखर कारखानदारी आणि ग्रामीण विकास यांचे आंतरसंबंध :**

१.२.७ सहकारी साखर कारखानदारीच्या संदर्भात क्रिस्टलरची मध्यवर्ती ठिकाणाची उत्पत्ती

**१.३ संशोधन उद्दिष्टे**

**१.४ शोध प्रबंधाची गृहितके**

**१.५ संशोधन पद्धती**

**प्रकरण २**

# महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योग


**२.१ प्रास्ताविक**

**२.२ ऐतिहासिक पार्श्वभूमी**

**२.३ भारतातील साखर उद्योग**

**२.४ महाराष्ट्रातील साखर उद्योग**

**२.५ महाराष्ट्रातील साखर कारखानदारीचे स्वरूप व प्रगती**
महाराष्ट्रातील साखर उद्योगाची उत्पादन क्षमता

**२.६. महाराष्ट्रातील साखर उद्योगाची कामगिरी**
- २.६.१ महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या आधीचा कालखंड
- २.६.२ सहकारी साखर कारखान्याचा सुवर्ण कालखंड
- २.६.३ साखर कारखानदारी प्रगती व अवनतीचा संमिश्र कालखंड
- २.६.४ उदारीकरणानंतरचा कालखंड

**२.७ साखर उद्योगातील दोष व समस्या**

**२.८ महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ**

**२.९ महाराष्ट्रातील साखर कारखानदारीची सद्यःस्थिती**

**२.१० कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारी**

## प्रकरण ३

# श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., शाहूनगर, परिते, ता. करवीर, जि. कोल्हापूर – वाटचालीचा आढावा

३.१ प्रास्ताविक

३.२ श्री भोगावती सहकारी साखर कारखाना

३.३ गळीत हंगामानिहाय साखर उत्पादन

३.४ कारखान्याची ठळक वैशिष्ट्ये

३.५ ग्रामीण विकासार्थ कारखान्याचे विविध उपक्रम

## प्रकरण ४

# भोगावती सहकारी साखर कारखान्याचे व्यवस्थापन

४.१ प्रस्तावना

४.२ व्यवस्थापनाच्या मूलभूत तत्वांचे भोगावती सहकारी साखर कारखाना या संस्थेच्या संदर्भात विश्लेषण

४.३ भोगावती साखर कारखान्याचे व्यवस्थापन

४.४ कारखान्याच्या विविध विभागांचा परिचय

संदर्भ सूची

## प्रकरण ५

# श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याचे परिसर विकासाचे विविध आर्थिक उपक्रम

५.१ प्रस्तावना

५.२ ऊस संवर्धन / ऊस बियाणे मळा

५.३ वृक्षारोपण आणि फळझाड लागवड

५.४ कंपोस्ट व प्रेसमड विक्री

५.५ उपसा जलसिंचन योजना

५.६ कारखान्याच्या पाणीपुरवठा योजना

५.७ शेती उपयुक्त अवजारे व साधने वाटप योजना

५.८ ऊस वाहतूक व रस्ते दुरूस्ती

५.९ गोबरगॅस सयंत्र योजना

संदर्भ सूची

## प्रकरण ६

# श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याच्या आर्थिक क्षमतेचे व परिसर विकासातील योगदानाचे मूल्यमापन


६.१ प्रस्तावना

६.२ अर्थिक क्षमतेचे मूल्यमापन

६.३ स्थूल आर्थिक मूल्यमापनातील महत्वाच्या बाबी

६.४ लेखा परीक्षण अहवाल

६.५ परिसर विकासातील विविध उपक्रमांचे मूल्यमापन

६.६ इतर बाबींचे मूल्यमापन

६.७ कामगार निवड

६.८ कारखान्याविषयी तक्रारी

६.९ कर्मचाऱ्यांचे समाधान

६.१० सन १९९५-९६ ते सन २००४-०५ मधील संप

६.११ ऊसाची तोड

६.१२ कारखाना कार्यक्षेत्रामध्ये घडून आलेले परिवर्तन

संदर्भ सूची

## प्रकरण ७

# महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगांचे मूल्यमापन, निष्कर्ष आणि शिफारसी

**७.१ प्रस्तावना**

**७.२ महाराष्ट्रातील साखर कारखानदारीचे समग्रस्तरीय मूल्यमापन**

**७.३ ग्रामीण विकासातील साखर कारखान्याचे योगदान**

**७.४ सहकारी साखर उद्योगाच्या मर्यादा**

**७.५ सहकारी साखर उद्योगाच्या समस्या**

**७.६ शिफारसी**

७.६.१ राज्य शासनाकडे करण्यात आलेल्या मागण्या

७.६.२ केंद्र शासनाकडे करण्यात आलेल्या मागण्या

७.६.३ अन्य शिफारसी

**७.७ महाराष्ट्रातील साखर कारखानदारीचे सूक्ष्मस्तरीय मूल्यमापन**

**७.८ शिफारसी**

**संदर्भ सूची**

# अनुक्रमणिका



| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | विषय प्रवेश : सहकार आणि ग्रामीण विकास | १ |
| २ | महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाची वाटचाल | २२ |
| | तक्ता क्र. २.१ महाराष्ट्रातील साखर उद्योगाची प्रगती | २४ |
| | तक्ता क्र. २.२ भारतातील राज्यवार साखर कारखाने | २५ |
| | तक्ता क्र. २.३ महाराष्ट्रातील साखर कारखान्यांची संख्यात्मक वाढ | २६ |
| | तक्ता क्र. २.४ महाराष्ट्रातील जिल्ह्यानिहाय साखर कारखाने | २९ |
| | तक्ता क्र. २.५ महाराष्ट्रातील साखर कारखान्यांची प्रतिदिवशी ऊस गाळप क्षमता | ३१ |
| | तक्ता क्र. २.६ महाराष्ट्रातील राज्य – उत्पादनातील साखर कारखाने– ऊस क्षेत्र व ऊस उत्पादन | ३४ |
| | तक्ता क्र. २,७ महाराष्ट्र राज्य – साखर उत्पादन, सरासरी साखर उतारा, क्षमता वापर, हंगामाचे दिवस (१९५१–१९५२ ते १९५९ ते १९६०) | ३५ |
| | तक्ता क्रमांक २.८ महाराष्ट्र राज्य उत्पादनाखालील साखर कारखाने, ऊस क्षेत्र व ऊस उत्पादन (१९६०–६१ ते १९७०–८०) | ३६ |
| | तक्ता क्र. २.९ महाराष्ट्र राज्य–साखर उत्पादन, सरासरी साखर उतारा, क्षमता वापर आणि हंगामाचे दिवस (१९६०–६१ ते १९७०–८०) | ३७ |
| | तक्ता क्रमांक २.१० महाराष्ट्र राज्य उत्पादना खालील साखर कारखाने, ऊस क्षेत्र व ऊस उत्पादन (१९८०–८१ ते १९९७–९८) | ३८ |
| | तक्ता क्र. २.११ महाराष्ट्र राज्य–साखर उत्पादन, सरासरी साखर उतारा, क्षमता वापर आणि हंगामाचे दिवस (१९८०–८१ ते १९९७–९८) | ३९ |
| | तक्ता क्र. तक्ता क्रमांक २.१२ महाराष्ट्र राज्य उत्पादनाखालील साखर कारखाने, ऊस क्षेत्र व ऊस उत्पादन (१९९८–९९ ते २००८–०९) | ४० |
| | तक्ता क्र. २.१३ महाराष्ट्र राज्य–साखर उत्पादन, सरासरी साखर उतारा, क्षमता वापर आणि हंगामाचे दिवस (१९९८–९९ ते २००८–०९) | ४१ |
| | तक्ता क्रमांक २.१४ महाराष्ट्रातील साखर कारखानदारीची सद्य स्थिती (२००८–०९) | ५१ |
| | तक्ता क्रमांक २.१५ महाराष्ट्रातील साखर कारखान्यांची जिल्हानिहाय स्थिती (२००८–०९) | ५२ |

| | | |
|---|---|---|
| | तक्ता क्रमांक २.१६ ऊस गाळपाचे दिवस–विभागवार (साखर वर्ष २००८–०९) | ५३ |
| | तक्ता क्रमांक २.१६ ऊस गाळपाचे दिवस–विभागवार (साखर वर्ष २००८–०९) | ५३ |
| | तक्ता क्रमांक २.१६ (A) महाराष्ट्र साखर कारखान्यांची सद्य स्थिती | ५४ |
| | तक्ता क्रमांक २.१७ कोल्हापूर जिल्हातील साखर कारखानदारी (साखर वर्ष २००८–०९) | ५५ |
| ३ | **श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., गाहूनगर परिते, ता. करवीर, जि. कोल्हापूर, वाटचालीचा आढावा** | ५८ |
| | तक्ता क्रमांक ३.१ ऊस पुरवठा करणारी करवीर व राधानगरी तालुक्यातील गांवे | ६० |
| | तक्ता क्रमांक ३.२ सन १९९५–९६ ते २००४–०५ या कालावधीतील साखर उत्पादन तपील | ६२ |
| | श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते गळित हंगानिहाय साखर उत्पादन–वार्षिक तुलनात्मक तक्ता १९५८–५९ ते २००४–०५ | ६५ |
| ४ | **भोगावती सहकारी साखर कारखान्याचे व्यवस्थापन** | ७० |
| | तक्ता क्रमांक ४.१ श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमनपद भूषविणाऱ्या सन्माननीय व्यक्ती | ८१ |
| | तक्ता क्रमांक ४.२ तालुकानिहाय गावांची संख्या | ८७ |
| | तक्ता क्र. ४.३ कारखान्यातील विविध विभागनिहाय कामगारांची संख्या | १०८ |
| ५ | **श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याचे परिसर विकासाचे विविध उपक्रम** | ११० |
| | तक्ता क्र. ५.१ गळीत लायक ऊस आणि ऊस बेणे यांची तुलना | ११४ |
| | तक्ता क्र. ५.२ ऊस बियाणे – क्षेत्र – खर्च – सबसिडी | ११५ |
| | तक्ता क्र. ५.३ निवड केली जाणारी रोपे | १२१ |
| | तक्ता क्र. ५.४ वृक्ष व फळझाडे वितरण यंत्रणा (व्यवस्था) | १२२ |
| | तक्ता क्रमांक ५.५ सभासदांना वाटप करण्यात आलेल्या रोपांची संख्या | १२३ |
| | तक्ता क्रमांक ५.६ सन १९९५–९६ ते सन २००४–०५ मध्ये सभासदांना पुरविलेली रोपे | १२५ |
| | तक्ता क्रमांक ५.७ वृक्ष व फळझाडे योजनेचा लाभ/फायदा मिळालेले सभासद | १२६ |

| | | |
|---|---|---|
| | तक्ता क्रमांक ५.८ फळबागेपासून मिळणारे वार्षिक उत्पन्न | १२८ |
| | तक्ता क्रमांक ५.९ फळबागेपासून मिळणारे वार्षिक उत्पन्न | १२९ |
| | तक्ता क्रमांक ५.१० फळबागेपासून मिळणारे वार्षिक उत्पन्न | १३० |
| | तक्ता क्रमांक ५.११ फळबागेपासून मिळणारे वार्षिक उत्पन्न | १३१ |
| | तक्ता क्रमांक ५.१२ श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याच्या उपसा जलसिंचन योजना | १३७ |
| | तक्ता क्रमांक ५.१३ सन १९९५-९६ ते २००४-०५ मधील अनुदानपात्र गोबर गॅस संयत्रे | १४१ |
| ६ | **श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याच्या अर्थक्षमतेचे व परिसर विकासातील योगदानाचे मूल्यमापन** | १५१ |
| | तक्ता क्रमांक ६.१ कारखान्याच्या उत्पादक क्षमतेचे मूल्यमापन | १५३ |
| | तक्ता क्रमांक ६.२ कारखान्याच्या उत्पादक क्षमतेचे मूल्यमापन | १५४ |
| | तक्ता क्रमांक ६.३ भागभांडवल | १५५ |
| | तक्ता क्रमांक ६.४ कारखाना सभासद संख्या | १५६ |
| | तक्ता क्रमांक ६.५ ऊस गळित (टन) | १५७ |
| | तक्ता क्रमांक ६.६ साखर उत्पादन | १५८ |
| | तक्ता क्रमांक ६.७ साखर उतारा | १५९ |
| | तक्ता क्रमांक ६.८ महाराष्ट्रातील साखर कारखान्यांचा साखर उतारा | १६० |
| | तक्ता क्रमांक ६.९ ऊस गळीत हंगाम कालावधी | १६० |
| | तक्ता क्रमांक ६.१० सभासदांना दिलेली ऊस रक्कम | १६१ |
| | तक्ता क्रमांक ६.११ सभासदांना माफक दरामध्ये पुरवलेली साखर | १६२ |
| | तक्ता क्रमांक ६.१२ ऊस उत्पादक सभासदांना वर्षभर माफक दरामध्ये पुरवली जाणारी साखर | १६३ |
| | तक्ता क्रमांक ६.१३ मोलॅसिस व इतर उपपदार्थ | १६४ |
| | तक्ता क्रमांक ६.१४ कारखान्याचे स्थूल आर्थिक मूल्यमापन | १६५ |
| | तक्ता क्रमांक ६.१५ कारखान्याचे स्थूल आर्थिक मूल्यमापन | १६६ |
| | तक्ता क्रमांक ६.१६ लेखापरिक्षण वर्ग | १७३ |

| | | |
|---|---|---|
| | तक्ता क्रमांक ६.१७ कारखान्याचे समानाभिमुख प्रकल्पांचे स्थूल आर्थिक मूल्यमापन | १७५ |
| | तक्ता क्रमांक ६.१८ कारखान्याचे समानाभिमुख प्रकल्पांचे स्थूल आर्थिक मूल्यमापन | १७६ |
| **७** | **महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाचे मूल्यमापन, निष्कर्ष आणि शिफारशी** | १८८ |

# आलेखांची यादी


| | |
|---|---|
| भारतातील साखर उत्पादन (लाख टना मध्ये) | २४ |
| महाराष्ट्रातील साखर कारखानदारीची वाढ | २६ |
| महाराष्ट्रातील जिल्हानिहाय साखर कारखाने | ३१ |
| महाराष्ट्र राज्य ऊस क्षेत्र (लक्ष एकर) | ३४ |
| महाराष्ट्र राज्य ऊस उत्पादन (लक्ष मे.टन) | ३४ |
| महाराष्ट्र राज्य गळीत हंगामाचे दिवस | ३७ |
| महाराष्ट्र राज्य ऊस क्षेत्र (लक्ष एकर) | ४० |
| महाराष्ट्र राज्य ऊस उत्पादन (लक्ष मे.टन) | ४० |
| महाराष्ट्रातील साखर कारखान्यांची सद्यस्थिती | ५४ |
| श्री भोगावती साखर कारखान्यातील कामगारांची संख्या | १०८ |
| श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते<br>ऊस बियाणे सबसिडी (रूपये) | ११५ |
| श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते -<br>सभासदांना वाटप केलेली रोपे (१९९५-९६ ते २००३-०४) | १२३ |
| श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते -<br>सभासदांना पुरविलेली रोपे (१९९५-९६) | १२५ |
| श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते -<br>सभासदांना पुरविलेली रोपे (२००२-०३) | १२५ |
| श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते -<br>वृक्ष व फळझाड योजनेचा लाभ मिळालेले सभासद | १२६ |
| श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते -<br>अनुदानपात्र गोबरगॅस सयंत्रे | १४९ |
| श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते - भागभांडवल रूपये | १५५ |
| श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते - एकूण गाळप<br>(मे.टन) | १५७ |
| श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते - साखर उतारा | १५९ |

| | |
|---|---|
| महाराष्ट्र साखर उतारा (२००२-०३) | १६० |
| श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते - ऊस गळीत हंगाम कालावधी | १६० |
| श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते सभासदांना दिलेली ऊस रक्कम | १६१ |
| श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते - सभासद संख्या | १६३ |
| श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते सभासदांना माफक दरामध्ये पुरविलेली साखर (किलोमध्ये) | १६३ |
| श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते - साखर उत्पादन (पोती) | १६४ |
| श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते - मोलॅसिस व इतर उपपदार्थ उत्पन्न | १६४ |

# महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी आणि ग्रामीण विकास यातील आंतरसंबंधाचा अभ्यास : श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याचे व्यष्ठी अध्ययन

## प्रकरण १ : विषय प्रवेश
## सहकार आणि ग्रामीण विकास

### १.१ प्रास्ताविक

सहकार ही व्यापक चळवळ असून, यामध्ये समान गरजा असलेल्या व्यक्ती समान आर्थिक उद्‌दिष्टांच्या पूर्ततेसाठी स्वेच्छेने संघटीत झालेल्या असतात. सहकार समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासाचे प्रभावी माध्यम आहे. सहकार म्हणजे संयुक्तपणे करावयाचे कार्य होय. सहकारी संस्थेचे सदस्यत्व ही ऐच्छिक बाब असते. सभासदांचे सर्वांगीण कल्याण करणे हा सहकारी संस्थेचा प्रधान हेतु असला तरी सहकारी संस्था ही व्यावसायिक संस्था आहे. ती धर्मदाय संस्था आहे. ती धर्मदाय संस्था नाही. विविध प्रकारच्या सेवा उपलब्ध करून देणे आणि उत्पादन कार्य हाती घेणे ही कार्ये सहकारी संस्था पार पाडत असल्याने, त्याचे स्वरूप व्यावसायिक किंवा आर्थिक संघटनसारखे असते. नफा-प्राप्ती हा सहकारी संस्थांचा प्राथमिक उद्‌देश नसला, तरी तोट्यात चालणाऱ्या सहकारी संस्था समाजावर भाररूप ठरत असतात. त्यामुळे सहकारी संस्थांचे, विशेषतः उत्पादन कार्य हाती घेणाऱ्या सहकारी साखर कारखान्यांचे व्यवस्थापन व्यावसायिक पद्‌धतीने व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. आर्थिकदृष्ट्या सक्षम सहकारी संस्थाच आपल्या लाभार्थी गटाच्या हितसंबंधांची जोपासना करू शकतात, याची प्रचिती सहकारी साखर उद्योगात आढळते. तोट्यात चालणाऱ्या साखर कारखान्यांनी ऊस-उत्पादक शेतकऱ्यांची, कामगारांची आणि वित्तीय संस्थांची देणी थकवली असल्याने त्यांची प्रतिष्ठा व उपयुक्तता कमी झाल्याचे दिसून येते.

सहकारी संस्थांचे व्यवस्थापन लोकशाहीच्या तत्त्वावर आधारित असते. एक व्यक्ती एक मत या तत्वानुसार संस्थेचा कारभार चालतो. जात, लिंग, शिक्षण या कारणास्तव भेदभाव केला जात नाही. सामाजिक समता हा सहकारी संघटनांचा पाया आहे. सभासद एकत्र येण्यासाठी त्यांच्या गरजा समान असाव्या लागतात. सहकारी संघटनामध्ये एकत्र येणारे सभासद हा आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटक असल्याने त्यांच्याकडे साधनसामुग्री मर्यादित असते. जेव्हा अशा दुर्बल व्यक्ती एकत्र येतात तेव्हा त्यांच्या सबलीकरणाची

प्रक्रिया सुरू होते. संस्थेच्या आर्थिक व्यवहारापासून मिळणारा नफा, सभासदांनी संस्थेबरोबर केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात वाटला जातो. उत्पादक व ग्राहक यांच्यामधील मध्यस्थांचे उच्चाटन करण्यास सहकारी संस्था हातभार लावताना दिसतात. सहकारी संस्थांमुळे ग्रामीण भागाचा कायापालट झाल्याचे चित्र आज आपल्या दृष्टीस पडते.

सहकाराची कास धरणे ही काळाची गरज आहे. 'एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ' या उक्तीप्रमाणे व्यक्तिने आपल्या उद्योग-व्यवसायांत सहकारी तत्वांचे पालन करणे आवश्यक ठरते. सहकारात सामर्थ्य आहे. मानवी इतिहासाच्या प्रारंभीच्या काळात धार्मिक कल्पना, धार्मिक परंपरा, धार्मिक संस्था, समाजातील चालीरिती व परंपरा या सर्वांमध्ये सहकाराची बीजे रोवली गेली आहेत.

मानवजातीच्या सर्वांगीण विकासाला सहकाराने मोठा हातभार लावला आहे. श्री. ए. ई इमर्सन यांनी म्हटले आहे की, जीवसृष्टीच्या उत्क्रांतीत मानवाचा विकास घडवून आणण्यात आणि स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी मानवाने केलेल्या संघर्षापेक्षा त्याची सहकारी प्रवृत्तीच बलवान ठरली आहे. मानवाने संकटांना तोंड देत नैसर्गिक साधनसामुग्रीचा शोध घेत सर्वांच्या सहकार्याने प्रगती केलेली आढळते. म्हणूनच सहकार हे मानवी संस्कृतिचे फळ नसून मूळ आहे असे म्हटले जाते.

सहकार, सहकार संघटन आणि सहकार चळवळ या संबंधी केली जाणारी सैद्धांतिक मांडणी आणि वास्तव परिस्थिती यांत मोठी तफावत आढळून येते. लोकशाही पद्धतीने व्यवस्थापन हे सहकाराचे मूलभूत तत्व असले तरी, प्रत्यक्षात ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या प्रभावी व्यक्ती/समुदायाचे सहकारी संस्थांवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. लोकशाही पद्धतीने निवडणुका होत असल्या तरी दोन तुल्यबळ गटांमध्ये सत्तासंपादनाची स्पर्धा असते आणि त्यामुळे सामान्य सभासद नगण्य ठरतात. सहकार ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनी एकत्र येऊन स्थापन केलेली संस्था असते, हा तात्विक विचार आहे. प्रत्यक्षात सहकारी साखर कारखाना स्थापन करण्यात पुढाकार घेणारी व्यक्ती-मुख्य प्रवर्तक-हा आर्थिकदृष्ट्या संपन्न आणि राजकीयदृष्ट्या प्रभावी असतो. त्यातूनच 'आश्रयदाता' व 'आश्रीत संबंध' ही वास्तव परिस्थिती आहे. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीचा सर्वाधिक फायदा-श्रीमंत बागायितदार शेतकरी वर्गाला झाला आहे.

सहकाराचे तात्विक अधिष्ठान आणि महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीतील वास्तव परिस्थिती याचे चिकित्सक मूल्यमापन करण्याच्या उद्देशाने सदर संशोधन हाती

घेण्यात आले आहे. त्या अंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील भोगावती सहकारी साखर कारखान्याचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे.

## १.२ संशोधन विषयाचे स्पष्टीकरणः

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी आणि महाराष्ट्रातील ग्रामीण विकासाची प्रक्रिया यांतील आंतरसंबंधाचा अभ्यास करणे हा सदर संशोधनाचा विषय आहे. सहकारी साखर कारखानदारीचा विकास हा ग्रामीण औद्योगिकीकरणाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. उद्योगाच्या स्थानिकीकरणाच्या संदर्भात असे प्रतिपादन करण्यात येते की उत्पादित मालासाठी आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालाची उपलब्धता विचारात घेऊनच उद्योजकांनी स्थानिकीकरणासंबंधीचे निर्णय घेणे गरजेचे आहे. त्याच्याशी निगडित असणाऱ्या सहकार, सहकारी साखर कारखानदारी, ग्रामीण विकास आणि सहकारी साखर कारखानदारी व ग्रामीण विकास या बाबींचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे करण्यात आले आहे

**१.२.१ सहकार :** सहकारी साखर कारखानदारीचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी त्यात आधारभूत असणाऱ्या सहकार म्हणजेच इंग्रजी भाषेतील (co-operation)चे स्पष्टीकरण सर्वप्रथम करण्यात आले आहे.

को-ऑपरेशन (co-operation) हा इंग्रजी शब्द मूळ लॅटिन शब्द को-ऑपररी (co-operari)यापासून अस्तित्वात आला. यातील (co)को याचा अर्थ सह (एकत्र) आणि (operari)ऑपरेरी म्हणजे काम करणे. एकत्रितपणे काम करणे किंवा परस्पर सहकार्याने काम करणे असा सहकार या संकल्पनेचा शब्दशः अर्थ आहे. सहकाराची प्रवृत्ती या नैसर्गिक भावनेमुळेच व्यक्ती एकत्र येतात. एकत्र राहतात. एकत्र काम करतात आणि अडी-अडचणीच्या वेळी एकमेकांना मदत करतात. एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होतात.[१]

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात सहकार शब्दाला तांत्रिक अर्थ प्राप्त झाला. त्यानुसार सहकार म्हणजे सहकारी पद्धतीने व्यवसाय करण्याचा प्रकार.

जॉन स्टुअर्ट मिल या १९ व्या शतकातील उदारमतवादी विचारवंतांने असे मत व्यक्त केले आहे की, सहकार हा अतिभव्य विचार असून त्याद्वारे विरोधी हेतूने वर्गसंघर्ष निर्माण करण्याऐवजी सर्वांच्या सामुदायिक हितासाठी मित्रत्वाच्या नात्याने स्पर्धा करण्यास शिकवणारे तत्वज्ञान आहे.[२]

नामवंत अर्थशास्त्र प्रा. पॉल लॅम्बर्ट यांच्या मते, समाजघटकांनी स्वतःच्या उपयोगासाठी स्थापन केलेली आणि दिग्दर्शित केलेली, लोकशाही नियमानुसार चालवली जाणारी आणि सभासदांच्या व एकूण समाजाच्या सेवेसाठी स्थापन झालेली व्यवसाय संस्था

म्हणजे सहकारी संस्था होय. या व्याख्येत 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हा सहकाराचा मूलमंत्र सांगितलेला आहे.[३]

नामवंत भारतीय सहकार तज्ज्ञ कै. वैकुंठलाल मेहता यांच्यामते, सहकार ही एक व्यापक चळवळ असून यामध्ये समान गरजा असलेल्या व्यक्ती, समान आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी स्वेच्छेने संघटित झालेल्या असतात.

**१.२.२ सहकाराची वैशिष्ट्ये :**

प्रत्येकाने सर्वांसाठी व सर्वांनी सर्वांसाठी स्वेच्छेने परिश्रम करणे हा सहकाराचा मूलमंत्र आहे. एम. एल. डार्लिग यांच्यामते सहकार म्हणजे स्वावलंबन प्राप्त करून मानवी मनाला व हृदयाला भिडणारा संघटन प्रकार आहे. डॉ. एल. पी. जॅक्सन यांनी सहकाराला जगातील अत्यंत अवघड आणि सौंदर्य संपन्न कला मानली आहे.[४] तत्ववेत्यांच्या विचारधारेच्या आधारे काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**(१) व्यक्तींचे संघटन :** सहकार ही व्यक्तीची संघटना असते. आपल्या आर्थिक उन्नतीसाठी अनेक व्यक्ती एकत्र येऊन सहकारी संस्था स्थापन करतात.

**(२) सहकार हा एक आर्थिक व्यवहार :** सहकार हा एक उद्योग किंवा व्यवसाय आहे. काटकसर, सभासदांचे कल्याण साधण्यासाठी सहकारी संस्था स्थापन झालेली असते.

**(३) ऐच्छिक संघटन :** समान हेतू व समान निष्ठा असणारे लोक स्वेच्छेने एकत्र येतात. कोणत्याही व्यक्तीवर सभासद होण्यासाठी सक्ती केली जात नाही. सहकारी संस्थेची उद्दिष्ट्ये व नियम मान्य असतील त्या व्यक्ती संस्थेचे सभासद होतात.

**(४) लोकशाही कार्यप्रणाली :** सहकारी संस्थेचा कारभारही लोकशाही तत्त्वानुसार चालविला जातो. भांडवल, धर्म, वंश, लिंग, जात यावर आधारित कोणत्याही प्रकारची असमानता अथवा भेद केला जात नाही, एक व्यक्ती एक मत हे तत्व अंमलात आणले जाते.

**(५) नफ्याची वाटणी :** सहकारी संस्था नफा प्राप्तीच्या हेतूने स्थापन झालेल्या नसल्या तरी सेवेनंतर नफा हे त्यांचे उद्दिष्ट असतेच. सहकारी संस्थेच्या नफ्याची वाटणी सभासदांनी संस्थेच्या केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात केली जाते.

**(६) समता हा सहकाराचा पाया :** समता हा सहकाराचा पाया असल्याने सभासदांची सामाजिक सभासदांची सामाजिक प्रतिष्ठा, भांडवल, जात, धर्म, वंश, वर्ण, लिंग वय भिन्नता यांना सहकारात स्थान नसते.

**(७) आर्थिकदृष्ट्या दुर्बलांचे संघटन :** आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ती समान उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी सहकारी संस्थांची स्थापना करतात. एकी हेच बळ या तत्त्वाच्या आधारे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक सहकारी संस्थांची स्थापना करतात. त्यामुळेच सहकार हे

आर्थिकदृष्ट्या दुर्बलांचे संघटन आहे. सहकारी संस्थेत सभासदांच्या परस्पर सहकार्याला अधिक महत्वाचे स्थान असते. अशा संस्थेत एकत्र आलेले सभासद एकमेकांच्या सहकार्याने सर्वांची उन्नती साधण्याचा प्रयत्न करतात. त्यांचे आपापसातील सहकार्य जेवढे चांगले असेल, तेवढी त्यांच्या उद्धिष्टांची पुर्तता लवकर होते.

**(८) स्वावलंबनाचा प्रयत्न :** सहकार हे स्वावलंबन प्राप्त करण्याचे एक महत्त्वाचे साधन होय. उत्तम शेती, उत्तम व्यापार आणि उत्तम राहणीमान यासाठी संघटित प्रयत्न म्हणजे सहकारी संस्था होय.

**(९) नैतिकतेवर भर :** रॉश्डेल पायोनिअर्स पहिल्या सहकारी ग्राहक भांडाराची सुरवात करताना ग्राहकांना दर्जेदार उपभोग्य वस्तूंचा पुरवठा करणे, रास्त दराने वस्तूंचा पुरवठा करणे इत्यादी उद्धिष्ट्ये समोर ठेवण्यात आली होती. सहकारी चळवळीत नैतिक मूल्ये जोपासण्याचा प्रयत्न केला जातो.

**(१०) खर्चात काटकसर :** सहकार ही दुर्बलाची संघटना असल्यामुळे सर्व व्यवहारामध्ये काटकसरीच्या मार्गाचा अवलंब केला जातो. अनावश्यक खर्च आणि उधळपट्टी टाळली जाणे अपेक्षित आहे.

**(११) विधायक स्पर्धेचे माध्यम :** भांडवलशाही व्यवस्थेतील अनिष्ट स्पर्धा टाळण्यासाठी सहकाराचा उदय झाला असला तरी, सहकारातील स्पर्धा विधायक स्वरूपाची असते. त्यामुळे सर्वांचे कल्याण होते. जेव्हा ही स्पर्धा अनिष्ट स्वरूप धारण करते, तेव्हा सहकाराचा लोप होतो.

**(१२) सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचे माध्यम :** सहकारी चळवळ ही आर्थिक शोषणाला पर्याय म्हणून जन्माला आली. त्यामुळे आधुनिक सहकारी चळवळीकडे सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणण्याचे माध्यम म्हणून पाहिले जाते. आर्थिक उन्नती, समतेवर आधारित समाजरचना, विषमता विरहित समाजनिर्मिती ही काळाची गरज आहे. सहकारी चळवळ ही आर्थिक व सामाजिक रचनेत शांततामय मार्गाने क्रांतीकारक परिवर्तन घडवून आणते.

**(१३) विश्वव्यापी स्वरूप :** भांडवलशाहीतील अन्याय व विषमता हे दोष सहकारी चळवळीमुळे दूर करता येतील असे लोकांना वाटले. त्यामुळे ही चळवळ जगातील सर्व राष्ट्रांमध्ये फोफावली. इंग्लंड, आणि अमेरिकेसारख्या औद्योगिकदृष्ट्या प्रगत देशांबरोबर भारतासारख्या विकसनशील देशातही सहकारी चळवळ रुजली आहे.

**(१४) सहकार एक सुवर्ण-मध्य :**भांडवलशाहीमध्ये खाजगी मालकी, मक्तेदारी, संपत्ती व सत्तेचे केंद्रीकरण कामगारांची पिळवणूक गरीब व श्रीमंत वर्ग संघर्ष यासारख्या समस्या निर्माण होतात.

समाजवादी अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादन वाढीच्या प्रेरणेचा अभाव, नोकरशाहीचा वरचष्मा, नियंत्रणाचा अतिरेक, लालफितीचा कारभार या समस्या उद्‌भवतात. सहकारामध्ये भांडवलशाही अर्थव्यवस्था साम्यवादी अर्थव्यवस्था या दोन्हींचे फायदे एकत्रित मिळतात. त्यामुळे दोन्ही प्रणालीचा सुवर्णमध्य साधला जातो. [५]

### १.२.३ सहकाराची तत्त्वे :

सहकार हा एक संघटन प्रकार आहे. संस्थेचे संघटन, तिचे व्यवहार, व्यवस्थापन, प्रशासन, सभासदाचे हक्क आणि कर्तव्य, अंतर्गत स्वरूप, हिशेब ठेवण्याची पद्‌धती इ. बाबत केलेले नियम म्हणजे सहकार तत्वे होत. अर्थात विविध तत्वांवरून सहकारी संस्थांच्या कार्यपद्धतीची स्पष्ट कल्पना येते. म्हणूनच एम्. जॉर्ज डेव्हिड म्हतोसहकारी संघटनेचे अस्तित्व व कार्यपद्‌धती ठरविणाया नियमांचा संच म्हणजे सहकार तत्वे.[६]

**१. ऐच्छिक व खुले सभासदत्व :** खुल्या सभासदत्वाचा अर्थ संस्थेचे सभासदत्व स्वीकारल्याने लाभ होणार आहे. अशा कोणत्याही व्यक्तिला सभासदत्व प्राप्त करण्याचा अधिकार आहे. कोणत्याही प्रकारचे कृत्रिम अडथळे आणता येत नाहीत. परंतु या तत्वाचा अर्थ असा नव्हे की, कोणसही कसाही अनिर्बंध प्रवेश दिला जातो. ज्या व्यक्ति दिवाळखोर, वेड्या, मुर्ख आहेत. ज्यांचा व्यवसाय, संघटन प्रकाराशी स्पर्धा करणारा आहे. ज्यांचा सहकारावर विश्वास, निष्ठा नाही, अशा व्यक्तिना सभासदत्व नाकारण्याचा अधिकार संस्थेला असतो.

**२. लोकशाही नियंत्रण :** सहकारी संस्था लोकशाही व समतेच्या तत्वावर स्थापन केल्या जातात. सहकारात समता, स्वातंत्र्य, बंधुभाव, जोपासण्यासाठी हे तत्व महत्त्वाची भूमिका बजावते. या तत्वानुसार एक व्यक्ति एक मत हे तत्व स्वीकारले जाते. संस्थेवर सभासदांचे पूर्ण नियंत्रण असते. सर्वसाधारण सभा, संस्थेचे धोरण ठरविणे, उद्धिष्टे, व्यवस्थापन, प्रशासन, गुंतवणूक, नफा वाटप इत्यादी बाबींसंबंधी निर्णय घेते. संस्थेचा कारभार सभासदांनी निवडून दिलेल्या संचालक मंडळाद्‌वारे करण्यात येतो. प्रत्येक सभासदास संस्थेच्या कार्याची माहिती पुरवण्याची जबाबदारी संचालकांची असते.

**३. आधिक्याचे वाटप :** वास्तविक पाहता सहकारी संस्था नफ्याच्या हेतूने आर्थिक व्यवहार करीत नाहीत. परंतु वर्षाच्या शेवटी सर्व खर्च वजा जाता जी शिल्लक राहते, त्यास आधिक्य म्हणतात. त्याचे वाटप रॉश्डेलच्या मतानुसार, सभासदांनी संस्थेशी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात केले जाते.

**४. भांडवलावर मर्यादित व्याज :** सहकारात समता व लोकशाही तत्वाचे पालन करण्यासाठी भांडवलावर नियंत्रण असणे गरजेचे असते. आधुनिक काळात व्याज देणे

अयोग्य मानले जात नाही. आय. सी. ए.च्या मते सहकारी संस्थांनी भांडवलावर व्याज द्यावे.मात्र त्याचा दर मर्यादित असावा, स्पर्धात्मक नव्हे.[७]

**५. सहकार शिक्षण :** या तत्त्वानुसार सहकार चळवळ प्रभावी होण्यासाठी सभासद, व्यवस्थापन, कर्मचारी व सर्व समाजाला शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. रॉश्डेल प्रणेत्यांनी संस्थेच्या एकूण नफ्याच्या २.५ एवढा भाग सहकार शिक्षणासाठी खर्च करावा, असे प्रतिपादन केले. संस्थेच्या सभासदांना आपले हक्क, कर्तव्य व संस्थेशी बांधिलकी, सहकारी कायदे, व्यवस्थापन, कार्यप्रणाली आणि सहकाराच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व पटवून देऊन त्यांचा सहभाग वाढवण्यासाठी सहकार शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. ICA व मिर्धा समितीने सहकार चळवळ सामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी सहकार शिक्षण, प्रशिक्षण व्यवस्था व यंत्रणेची गरज प्रतिपादन केली.

**६. सहकारांतर्गत सहकार :** ICA ने १९६६ मध्ये या तत्त्वाचा पुरस्कार केला. यालाच विकासाचे तत्त्व म्हणतात. या तत्त्वानुसार सभासदांचे आणि सर्व समाजाच्याहितसंबंधाचे संरक्षण परिणामकारकरित्या होण्यासाठी सर्व सहकारी संस्थांनी स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्य करावे. विकसित राष्ट्रातील सहकार चळवळीचा लाभ विकसनशील राषडट्रातील चळवळींना प्राप्त करून घेतला पाहिजे. डॉ. लॉडला यांनी या तत्वाला सहकार क्षेत्र निर्माण करण्याचे तत्व म्हटले आहे.[८] अलिकडील काळातील जागतिकीकरणाच्या युगात मोठ्या भांडवलाच्या उद्योगाशी सक्षम स्पर्धा करण्यासाठी हे तत्व उपयुक्त ठरेल.

**७. परस्पर सहकार्यातून परस्परावलंबन :** स्वावलंबन आणि परस्पर साहाय्य हा सहकाराचा गाभा आहे. सहकारात परस्पर सहाय्यातून स्वावलंबन साध्य करता येते. परस्पर सहाय्यातून मोठ्या प्रमाणावरील भांडवल संच, स्वबलता, आर्थिक हित, संसाधनांचा पर्यटन वापर शक्य होऊ शकतो. सर्वांकरिता एक व एकाकरिता सर्व हे सहकारी चळवळीचे ध्येय आहे.

**८. रोख व्यवहाराचे तत्व :** या तत्त्वानुसार सहकारी संस्थांनी आपले सर्व व्यवहार रोखीने पूर्ण करावेत. कारण अनेक संस्था उधारीच्या व्यवहारामुळे बुडीत निघाल्या उदाहरणे आहेत. याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी हे तत्व महत्त्वपूर्ण आहे.

सहकारी संस्थांचे भांडवल मर्यादित असल्याने त्यांची आर्थिक कुवत मर्यादित असते. आर्थिक व्यवहार उधारीचे केले तर भांडवल अडकून पडण्याची शक्यता असते. ज्यामुळे संस्था आर्थिक अडचणीत येऊ शकतात. स्वीडन आणि फिनलँड इ. देशातील संस्थांनी या तत्वाचे काटेकोर पालन करून संस्था कार्यक्षम केल्या आहेत.

**९. राजकीय व धार्मिक तटस्थता :** सहकारी संघटन हे आर्थिक संघटन आहे. परस्पर सहकार्यातून दुर्बलांचा विकास त्याचा मूळ हेतू आहे. त्यांनी अनेक घटकांपासून तटस्थ राहून निरपेक्ष विकास साधावा असे हे तत्व सूचविते. संस्थेत राजकारण अथवा धार्मिक तत्वावरील भेदभावाला थारा देऊ नये. अन्यथा संस्था राजकारणाचे केंद्र बनतील व सहकाराचा मूळ हेतू बाजूला राहील. तसेच धर्माच्या बाबतीत सांगितले जाते. समता, बंधुभाव इ. तत्वाला बाधा पोहचू द्यावयाची नसेल, तर धार्मिक तटस्थता आवश्यक बाब आहे. अन्यथा जातीभेद, धर्मभेद निर्माण होऊन परस्पर सहकार्य राहणार नाही.

**१०. काटकसरीचे तत्व :** सहकारी संस्थांचे भांडवल व उत्पन्न मर्यादित असते. संचालक मंडळ, आणि कर्मचाऱ्यांनी काटकसरीचा अवलंब केला तर, साधनांचा पर्याप्त वापर शक्य होतो. अनावश्यक खर्च व उधळपट्टी टाळली तर, सभासदांना कमीत कमी खर्चात सेवा-सुविधा पुरविता येते.

**११. सेवा तत्व :** सहकारी संस्थांचा उद्देश अधिकाधिक लोकांना रास्त दरात सेवा पुरविणे हा असतो, सहकारी सस्थांनी नफा आवश्यक मिळवावा, परंतु सेवेलाच अग्रक्रम द्यावा. या तत्वाचे पालन करून वाढावा निर्माण करणे, शक्य झाल्यास नफा मिळवावा.

**१२. समतेचे तत्व :** भांडवलशाहीतील पिळवणूक, अन्याय, आर्थिक विषमता इ. विरुद्धची प्रतिक्रिया म्हणून या तत्वाचा उगम झाला संस्थेची निर्मिती समतेच्या पायावर झाली पाहिजे. सहकाराच्या छत्राखाली सर्वांना समान न्याय या तत्वाने संस्थांनी कार्य केले पाहिजे. लिंगभेद, जातीभेद, धर्मभेद, आर्थिक भेदाला या तत्वानुसार सहकारात किंचितही स्थान नाही.

**१.२.४. सहकारी साखर कारखानदारी :** सहकारी साखर कारखानदारीची सुरुवात जरी विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात झाली असली तरी, ऊसापासून साखर व तत्सम उत्पादनांची निर्मिती भारतात सुरुवातीच्या काळात ग्रामोद्योग आणि नंतरच्या काळात खाजगी साखर कारखान्यात केली जात असे.

भारताच्या इतिहासाएवढाच ऊसाचा इतिहास प्राचीन आहे. भारत हेच ऊसाचे माहेरघर असावे असे बरेच पुरावे आढळतात. संस्कृतमध्ये इक्ष किंवा इक्षूदंड, इक्षवून इत्यादी शब्द रूढ आहेत. ऊसाचे उत्पादन उष्ण किंवा उपउष्ण कटिबंधामध्येचे प्रामुख्यान होते. ऊसाच्या वाढीला व विकासाला लागणारे हवामान व पाणी ह्याबाबतीत भारतामध्ये अनुकूलता असल्याने ऊसाची नैसर्गिक वाढ व लागवड भारतामध्येच झाली असावी असे म्हटले आहे. वनस्पतिशास्त्रदृष्ट्या भारत हेच ऊसाचे आद्यस्थान असावे व तेथूनच ऊसाचा प्रसार इतरत्र झाला असावा असे बऱ्याच विद्वानांचे मत आहे. तथापि हवामानाच्या दृष्टीने अनुकूलता असलेल्या इतर ठिकाणीही ऊसाची उत्पत्ति झाली असणे शक्य आहे. ऊसाची लागवड

करणे व तयार झालेला ऊस दगडावर वाटून किंवा चरकात घालून त्याचा रस काढणे यापुढे काकवी, गुळ, साखर तयार करणे हा उद्योग भारतामध्येच विकसित झाला असावा. ऊसाचा प्रसार भारतामधून पूर्वेकडे इंडोचायनामध्ये व पश्चिमेकडे अरब देशामध्ये झाला. खिस्त सन सुरू होऊन काही शतके लोटल्यावर भूमध्य समुद्राच्या लगतच्या देशामध्ये ऊसाची लागवड व साखरेचे उत्पादन ह्यांची सुरुवात झाली असावी, परंतु युरोपमध्ये साखर जाऊन पोचली नव्हती. अरब लोकांनी स्पेन पादाक्रांत केला व आपले साम्राज्य युरोपपर्यंत पोचविले. तेंव्हा त्यांच्या बरोबर ऊस व साखर ह्यांचा युरोपमध्ये प्रवेश झाला. स्पेन, दक्षिण फ्रान्स, व्हेनिस वगैरे ठिकाणी ऊसाची लागवड होऊन साखरेच्या निर्मितीला सुरुवात झाली. सिरिया, इजिप्त या देशांतून साखर युरोपमध्ये आयात होत होती. इजिप्तमध्ये साखर शुद्धीकरणाचे तंत्र बरेच विकसित झाले असल्याने इजिप्तच्या साखरेला चांगली मागणी असे. १५४४ मध्ये कच्ची साखर शुद्ध करण्याचे कारखाने लंडनमध्ये सुरू झाले. तर १६८९ मध्ये प्रथमच न्युयॉर्कमध्ये साखर शुद्धीकरणाचा कारखाना सुरू झाला.

ईस्ट इंडिया कंपनीने भारतात पाय ठेवल्यापासून अनेक प्रतिकूल गोष्टी घडू लागल्या. बीटपासून साखर तयार करण्याचे तंत्र गवसले. जावा, सुमात्रा व मॉरिशस येथे अन्य आधुनिक यंत्राच्या सहाय्याने प्रचंड प्रमाणात साखर निर्माण होऊ लागली. त्यामुळे भारतात तयार होणाया साखरेचा भाव जास्त असल्यामुळे अनेक बाजार पेठेतून तिची मागणी कमी होऊ लागली होती. १८६३ सालापासून भारतात साखर आयात होऊ लागली होती. जावा, सुमात्रा व मॉरिशस बेटातील स्वस्त साखर भारतीय साखरेशी नेहमी स्पर्धा करीत होती.

ऊसापासून गूळ, खांडसरी व साखर बनविण्याची प्रक्रिया भारतीयांनी शोधून काढली. तिचा प्रसार प्रथम मलेशिया, चीन व इराणमध्ये झाला. तेराव्या शतकात या प्रक्रियेचा प्रसार भूमध्य समुद्रानजीकच्या देशात झाला. सोळाव्या शतकानंतर ब्राझील, क्युबा व मेक्सिकोमध्ये साखर तयार होऊ लागली. या देशातील व युरोपमधील व्यापारात साखर ही महत्वाची वस्तू होती. अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत जगातील अनेक देशात ऊसाची लागवड होऊ लागली. साखर उद्योग सुरू झाले. अठराव्या शतकाच्या अखेरीस भारत व जावा हे जगातील महत्त्वाचे साखर उत्पादक देश होते. त्यावेळी युरोपात साखरेचे उत्पादन होत नसल्याने साखरेची निर्यात युरोपात होत असे. आसामधून चीनमध्ये ऊस नेण्यात आला. चिनी लोकांनी तेथून ऊस फार्मोसा, फिलीपाईन्स व जावा या देशांमध्ये नेला. सध्या हे देश साखरेच्या उत्पादनात आघाडीवर आहेत.

ऊस हे उष्ण कटीबंधातील महत्त्वाचे पीक आहे. मध्य अमेरिकेतील क्युबा, जमैका, पोटोरिको, बार्बाडोस, त्रिनीदाद व मेक्सिकोदेशात दक्षिण अमेरिकेतील ब्राझील व अर्जेंटिना देशात, आशियातील भारत, जावा, फार्मोसा (ताईवान) चीन या देशात, अफ्रिकेतील दक्षिण

अफ्रिका (नाताळ), ईजिप्त, मॉरिशस या देशात ओसिनियाची हवाई, ऑस्ट्रेलिया व फिजी या देशात ऊसाची लागवड व साखरेचे उत्पादन होते.

भारतामध्ये आधुनिक साखरेच्या कारखानदारीची सुरुवात १९व्या शतकामध्ये झाली. काही इंग्रज व डच कारखानदारांनी कलकत्ता, बिहार व मद्रास येथे मोलॅसिसपासून मद्य तयार करणे या उद्देशाने साखर कारखाने स्थापन केले. हे उपक्रम अल्पजीवी ठरले. वास्तव अर्थाने साखर कारखानदारी २० व्या शतकात सुरू झाली. १९०९ साली बिहार व उत्तर प्रदेश या प्रांतात अल्प प्रमाणात कारखानदारीचा आरंभ झाला. १९२० साली भारतामध्ये अवघे ९ साखर कारखाने होते. त्यामधून होणारे साखरेचे उत्पादन स्थानिक गरजेच्या तुलनेने अपुरे असल्याने साखरेची आयात करावी लागे.

तत्कालीन मुंबई राज्यात कोपरगाव, श्रीरामपूर, फलटण, माळीनगर या परिसरात उद्योजक श्री. सोमय्या, डहाणूकर व काही प्रगतीशील शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन खाजगी साखर कारखान्यांची उभारणी करून सुरुवातीच्या काळात यशस्वी वाटचाल केल्याचे दिसून येते. त्यासाठी राज्य शासनाने शेती महामंडळाची सिंचनाखालील जमीन ऊस उत्पादनासाठी उपलब्ध करून खाजगी कारखान्यास भरीव मदत केली आहे. असे असले तरी ऊस उत्पादकांना अपेक्षित ऊसाची किंमत मिळत नसे. तसेच ऊस उत्पादनासाठी कर्ज व इतर सवलती उपलब्ध होत नव्हत्या. ही उणिव भरून काढण्यासाठी राज्य सहकारी बँकेने जिल्हा बँकेच्या व सेवा संस्थेच्या सक्रिय सहभागातून पीक कर्ज मध्यम मुदत कर्ज उपलब्ध करून दिल्याने ऊसाच्या क्षेत्रात सतत वाढ होत गेली. मात्र त्या प्रमाणात साखर कारखान्यांची संख्या वाढत नव्हती. त्यामुळणे ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी संघटित होऊन त्यांच्या मालकीचा कारखाना उभारण्याचा निर्णय घेऊन सहकारी साखर कारखान्याची मुहुर्तमेढ रोवली, प्रवराकाठच्या पद्मश्री विखे पाटलांनी डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली ''प्रवरा'' सहकारी साखर कारखाना सन १९४९ साली स्थापन करून सहकारी साखर उद्योगाचा शुभारंभ केला.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या कृषि औद्योगिक विकासाचा कार्यक्रम राबवायला सुरूवात केली. शेती, सहकार, वीज, पाटबंधारे, यांचा विकास करून ग्रामीण भागात शेतमालावर प्रक्रिया करणारे कारखाने उभे करावेत असे त्यांचे मत होते राज्य व केंद्र सरकारांना ग्रामीण भागामध्ये विकास संस्थांचे जाळे निर्माण करावयाचे होते. त्यासाठी त्यांना लोकांचा पाठिंबा हवा होता. ग्रामीण भागातील लोकांची व कार्यकर्त्यांची कर्तृत्वशक्ती जागृत करून विकास प्रक्रिया त्यांना गतिमान करावयाच्या होत्या. त्यांची अशी धारणा होती की सहकारी प्रक्रिया संस्थांच्या साह्याने लोकांच्या मनात विकास प्रक्रियेबाबत

जागृती निर्माण करता येईल आणि विकास कार्यासाठी ग्रामीण भागातील लोकांचा पाठिंबाही मिळविता येईल. त्याचप्रमाणे या संस्थांना लोकशाही स्वरूप देऊन ग्रामीण भागात मजबूत राजकीय पाया तयार करणेही शक्य होईल. त्यामुळे त्यांनी अनेक काँग्रेस पुढाऱ्यांना सहकारी क्षेत्रात सामील व्हावयास प्रवृत्त केले. सहकारी क्षेत्रातील लोकांना त्यांनी काँग्रेस पक्षात सामावून घेतले. विरोधी पक्षांतून काँग्रेसमध्ये आलेल्या अनेक पुढाऱ्यांना त्यांनी सहकारी संस्थात अधिकारपदे दिली. अनेकांना त्यांनी सहकारी साखर कारखाने काढावयास प्रवृत्त केले. थोडक्यात १९६० नंतर यशवतरावांनी राजकीय सत्ता आणि प्रभाव संपादन करण्याचा एक नवा मार्ग या पुढाऱ्यांच्या पुढे खुला केला.

सहकारी प्रक्रिया उद्योग विधायक कार्यकर्त्यांसाठी ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात कार्य करण्याचे आणि त्याद्वारा ग्रामीण भागात आपले प्रभावक्षेत्र निर्माण करण्याचे प्रभावी माध्यम आहे. त्याद्वारा ते पाठीराख्यांचे व समर्थकांचे एक जाळे ते निर्माण करू शकत होते. त्यासाठी ते या समर्थकांमध्ये सत्ता व साधने यांचे वितरण करीत होते. शिवाय सहाकरी संस्थांच्या जवळ जी साधनसामुगी असे. त्या साधनांचा ते निवडणुकीत वापर करू शकत होते. सहकारी साखर कारखान्यांच्याजवळ साधनांची विपुलता होती. त्यामुळे बहुतेक पुढाऱ्यांना सहकारी साखर कारखाने स्थापन करण्यात जास्त रस होता. महाराष्ट्राच्या राजकारणाच्या संदर्भात सहकारी साखर कारखान्यांना सर्वाधिक महत्व प्राप्त झाले असून, ग्रामीण राजकारणातील ती सत्तेची केंद्रे आहेत. त्यामुळे प्रत्येक साखर कारखान्याच्या अध्यक्षाला आमदार खासदार किंवा मंत्री व्हावयाचे असते किंवा प्रत्येक आमदार, खासदार व मंत्री आपला स्वतःचा असा कारखाना स्थापन करण्याची इच्छा बाळगून असतो. पश्चिम महाराष्ट्रात प्रत्येक महत्वाकांक्षी पुढाऱ्यांच्या नियंत्रणाखाली एक किंवा अधिक कारखाने असल्याचे दिसून येते. राज्य स्तरावरील राजकारणात 'शुगर लॉबीचा' प्रभाव सर्वज्ञात आहे. त्याचप्रमाणे स्थानिक स्तरावरील राजकारणात सहकारी साखर कारखानदार निर्णायक भूमिका पार पाडतात.

महाराष्ट्रात सहकारी साखर कारखानदारी विकसित करण्याचे श्रेय राज्याचे पहिले मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांना दिले जाते. या कार्यात त्यांना केंद्रीय पातळीवर सहकार्य करणारे कै. अण्णासाहेब शिंदे व कृषि उद्योगाची पायाभरणी करणारे डॉ. पंजाबराव देशमुख यांचा सुद्धा मोलाचा वाटा आहे. राज्य पातळीवर सहकारी साखर कारखानदारीचा प्रसार करण्यात कै. वसतंदादा पाटील यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. सहकारी कारखाना उद्योगाच्या जडणघडणीमध्ये राज्य सहकारी बँकेचा सिंहाचा वाटा असून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनीही दिलेले योगदान महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे वसंतदादा शुगर इन्स्टिट्युटच्या साखर उद्योगाच्या उन्नतीसाठी केलेले संशोधन हे ग्रामीण

शेतकऱ्यांपर्यंत पोहचवून साखर कारखानदारीच्या यशात मोलाची भर घातली आहे. गेली पाच दशके महाराष्ट्र शासनाने सहकारी साखर उद्योगाची पाठराखण केली आहे. आजही संकटग्रस्त साखर उद्योगाला वेळोवेळी 'पॅकेज'देऊन, त्यास संकटातून बाहेर पडण्यास महाराष्ट्र शासन साहाय्य करते.

**१.२.५ ग्रामीण विकास :**

ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचे दारिद्र्य, बेकारी, निरक्षरता व रोगराई यांचे निर्मूलन करणे आणि त्यांच्या राहणीमानाची पातळी उंचावणे आणि त्याकरिता ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासावर भर देणे म्हणजे ग्रामीण विकास होय.[९]

ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील उपलब्ध साधनसामुग्रीचा वापर करून समृद्ध जीवन बनवणारी व्यवस्था निर्माण करण्यास ग्रामीण जनतेला देणारी प्रक्रिया होय. [१०]

ग्रामीण विकास म्हणजे समुदायाचा विकास होय. जागतिक बँकेचे माजी अध्यक्ष श्री रॉबर्ट मॅकनामारा यांच्या मते, ग्रामीण भागातील दुर्बल घटक म्हणजे छोटे शेतकरी, भूमिहिन शेतमजूर आणि ग्रामीण कारागीर यांच्या विकासावर भर देऊन ग्रामीण भागाचा विकास करणे म्हणजे ग्रामीण विकास होय. [११]

याचाच अर्थ ग्रामीण विकास ही ग्रामीण भागातील आर्थिकदृट्या दुर्बल घटकांचा विचार करणारी प्रक्रिया आहे. त्यासाठी दारिद्र्य निर्मुलन व रोजगार निर्मितीचे कार्यक्रम हाती घेणे गरजेचे आहे. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या मते, ग्रामीण भागातील अकुशल श्रमिकांचे कुशल श्रमिकांमध्ये रूपांतर करणे म्हणजे ग्रामीण विकास होय.[१२]

त्यासाठी ग्रामीण भागात उपलब्ध नैसर्गिक साधनसामुग्रीचा जास्तीत जास्त वापर करून ग्रामीण जनतेला विविध प्रकारच्या सेवा पुरविणे व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे होय. ग्रामीण विकास ही परिवर्तनाची प्रक्रिया आहे. हे परिवर्तन ग्रामीण समाजाच्या पारंपरिक मार्गातून राहणीमानाच्या प्रागतिक मार्गात करण्याची प्रक्रिया आहे. हे परिवर्तन होण्याकरिता ग्रामीण जनतेला स्वतःच्या क्षमतेने संसाधनांनी स्वतःचा विकास करण्याकरिता सहाय्य करायचे आहे. ग्रामीण विकास हा ग्रामीण जनतेच्या कल्याणाशी संबंधित अशा क्षेत्रातील काही उपक्रमांच्या पुतर्तचा कार्यक्रम आहे. [१३]

**१.२.६ सहकारी साखर कारखानदारी आणि ग्रामीण विकास यांचे आंतरसंबंध :** कृषिप्रधान अर्थव्यवस्था असलेला ग्रामीण भाग आर्थिक विकासाच्या निकषावर मागासलेला किंवा अविकसित आहे. शेती आणि तत्सम व्यवसाय ग्रामीण लोकसंख्येच्या उपजीविकेची प्रमुख साधने आहेत. अतिरिक्त लोकसंख्येच्या दबावामुळे आणि रोजगाराची पर्यायी संधी उपलब्ध नसल्याने कृषी क्षेत्रात व्यापक स्वरूपाची बेरोजगारी अस्तित्वात आहे. तसेच

कोरडवाहू क्षेत्रात केवळ शेतीच्या हंगामातच रोजगार उपलब्ध असल्याने, रोजगाराच्या शोधात ग्रामीण भाातील लोकसंख्येचे शहरी भागात स्थलांतर होत असते. ब्रिटिश राजवटीत शेतकऱ्यांचे अपरिमित शोषण झाल्याने व्यापक स्वरूपाचे दारिद्र्य आणि कर्जबाजारीपणाची समस्या अस्तित्वात आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण भागाचे मागासलेपण दूर करण्यासाठी ग्रामीण औद्योगिकीकरणाच्या धोरणाच्या अंतर्गत कृषी मालावर प्रक्रिया करणारे उद्योग ग्रामीण भागात तत्परतेने स्थापन करण्यास शासनाने प्रोत्साहन दिले.

१९ व्या शतकात ब्रिटिश राज्यकर्त्यांनी इंग्लंडमधील कारखानदारीसाठी लागणारा कच्चा माल स्वस्त दराने उपलब्ध व्हावा या उद्देशाने नगदी पिकांच्या लागवडीस प्रोत्साहन दिले होते. कापूस, ताग, निळ अणि तंबाखुच्या बरोबरच ऊसाच्या लागवडीस प्रोत्साहन देण्यात आले होते. यातून खाजगी क्षेत्रात साखर उद्योगाचा विकास झाला. स्वातंत्र्योत्तर कालखंडात ऊस उत्पादक शेतकऱ्याला त्याच्या परिसरातच सुविधा आणि प्रगत शास्त्रीय तंत्र उपलब्ध झाले. खाजगी साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रगतिशील बनविण्याचे कार्य केले. खाजगी कारखान्यामध्ये भागधारक व ऊस उत्पादक हे भिन्न होते. परंतु सुजाण प्रगतीशील शेतकरी वर्गाची अस्मिता जागृत झाली आणि साखर उत्पादक कारखान्याचे भागधारक होण्याच्या त्यांच्या महत्वाकांक्षेतून सहकारी साखर कारखान्याची बीजे रोविली गेली. ऊस बागायतीतून मिळणारा पैसा साखर व इतर उद्योगांमध्ये गुंतविण्याचे महत्व शेतकऱ्यांना पटले.

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी असे प्रतिपादन केले की, शेतकरी हा फक्त शेतकरी राहून उपयोगी नाही तर तो व्यापारी व कारखानदार झाला पाहिजे त्याशिवाय त्याचा सर्वांगीण विकास होणार नाही. सहकारी चळवळ केवळ सुखवस्तूंच्या मालकांची न होता ती दीनदुबळ्यांच्या मालकीची झाली पाहिजे. बाळासाहेब देसाई यांनी असे प्रतिपादन केले की, भांडवलशाही आणि साम्यवाद यातील सुवर्णमध्य म्हणजे सहकार होय. तो जर आपण यशस्वी केला तर सर्वांना सुखी करू शकू. सहकारी साखर कारखानदारांनी यापुढे देशविकासात मदत करणारे विधायक कार्यक्रम हाती घेतले पाहिजेत. स्वराज्य हे सर्वांच्या सुखासाठी व स्वास्थ्यासाठी आहे. सर्वांना त्याचा लाभ व्हावा म्हणून आपण प्रयत्न करीत आहोत. आजच्या युगात शेतकरी कारखानदार झाला पाहिजे. सहकार महर्षी वसंतदादा पाटील यांनीही असे ठामपणे म्हटले आहे की, सहकारी चळवळीतून शेती उद्योगाचा विकास झाला तर उत्पादक व ग्राहक यांचा फायदाच होईल. सहकारी उद्योगक्षेत्र हे राष्ट्रव्यापी झाले पाहिजे व त्यासाठी सर्व जिल्ह्यात सांगलीसारखे नियोजन व्हावे. केंद्रीय अन्नमंत्री अण्णासाहेब शिंदे यांनी असे मत व्यक्त केले की, सहकारी कारखानदारीने जागृत केलेली जनतेची खरीखुरी शक्ती हीच खरी जनतेची व

गरीबांच्या जीवनाची आर्थिक व सामाजिक उत्क्रांती घडविणारी प्रेरक शक्ती बनेल आणि महाराष्ट्राचा व भारताचा काया पालट घडवून आणील असा मला आत्मविश्वास वाटत आहे. मात्र सामान्य माणूस हाच आपल्या कार्याचा केंद्रबिंदू समजून सहकारी चळवळीने वाटलचाल केली तरच हे साध्य होऊ शकेल. म्हणून आपसांत वाद करण्यापेक्षा सहकारी चळवळीच्या अनुभवावरून निष्कर्ष काढून सहकारी चळवळीतील दोष कमी करण्यच्या कामी व ही चळवळ अधिक सर्वंकष व प्रभावी करण्यासाठी आपण नेटाने प्रयत्न करूया. १७ वी सहकारी चळवळ ही लोकशाही समाजवाद आणावयाची नवी शक्ती आहे. नामवंत अर्थशास्त्रज्ञ आणि प्रवरानगर सहकारी साखर कारखान्याचे प्रवर्तक श्री. धनंजयराव गाडगीळ यांनी असे मत प्रतिपादन केले आहे की -

असमर्थास समर्थ करणे सहकारितेचे प्रमुख कार्य समजले जाते. समर्थ होण्याकरिता सहकारितेत असमर्थास अनेक पथ्ये पाळावी लागतात. स्वार्थास मुरड घालण्याची तयारी, सामूहिक हिताबाबत जागरुकता, संयमी वर्तन ही यांतील प्रमुख समजली जातात. परंतु सहकाराची कास धरून जे समर्थ होतात त्यांनीही पथ्यपालन चालू ठेवावे की नाही, तसेच आपण सर्वच समाज सहकारी बनवण्याची भाषा बोलू लागलो म्हणजे या पथ्यकर, संयमी वर्तनाची व्याप्ती किती वाढवावी लागते? अशा प्रश्नांचा आजवर आपण फारसा विचार केला नाही. गेल्या दहा वर्षात सहकारितेने जी झपट्याने प्रगती केली अनेकांस समर्थ बनविले त्यामुळे हे नवे प्रश्न महत्त्वाचे ठरू लागले आहेत. सहकारी कारखानदारी हे महाराष्ट्राचे भूषण आहे. या समर्थ कारखानदारांनीही सहकारी कार्यक्षेत्र विभागणीच्या योग्य सीमा पाळल्या पाहिजेत. नहून सर्व व्यवस्थेचा तोल बिघडेल. सहकारितेचे सामर्थ्य संघशक्तीत आहे आणि ज्यांमुळे सांघिक एकोपा भंगेल वा दुरावेल असे वर्तन सहकारी पुढाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी त्याज्य गणले पाहिजे. त्यांनी असे ही प्रतिपादन केले की, स्थानिक कार्यकर्त्याचा पुढाकार, नवीन क्षेत्रात नवे नवे प्रयोग करण्यांत त्यांनी दाखविलेली उत्सुकता व एकमेकांना पोषक व पूरक असे आखलेले धोरण यामुळे महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा एकसंघपणा टिकून राहिला हेच महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे वैशिष्ट्ये म्हणता येईल. यशवंतराव चव्हाण यांनी असे मत व्यक्त केले आहे की, सहकारी चळवळ ही मूलतः जनतेच्या प्रयत्नांवर आधारलेली आहे. सहकारी तत्त्वावर चालू असलेल्या सहकारी प्रक्रिया करणाऱ्या धंद्याना आर्थिक बाजूपेक्षा एक वेगळी अशी महत्वाची सामाजिक बाजूही आहे. शेतकऱ्याला उद्योगधंद्यात पैसे गुंतविण्यात लावण्याचा जवळ जवळ हाच एक मार्ग आहे. ग्रामीण भागांतील स्थानिक साधन सामुग्रीचा उपयोग करण्याच्या निमित्ताने बाहेरून येणाऱ्या भांडवलामुळे त्या भागात जे प्रश्न निर्माण होतात ते ह्यामुळे टाळता येतात. शिवाय त्याने ग्रामीण व शहरी मूल्यांत असलेले अंतर नष्ट होऊन

शहरांतील व खेड्यांतील लोक एका पातळीवर येतात. ग्रामीण व शहरी हा भेद साहजिकच नष्ट होतो. याशिवाय महत्वाची गोष्ट म्हणजे अशा प्रकारे वाढलेले उत्पन्न सहकारी संघटनेमुळे शक्य तितक्या जास्त क्षेत्रात वाटले जाते जेणेकरून खऱ्या अर्थाने समाजवादी समाजरचनेचा उद्देश साध्य होतो.[२०]

महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यातून केवळ साखर उत्पादन वाढले, एवढेच नव्हे तर ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेला चालना मिळाली. शेतकरी वर्गाला एक नवीन दृष्टी व दिशा मिळाली. समाजाच्या या अस्मितेचा प्रभाव साखर कारखान्यांच्या परिसरात दिसू लागला. नवीन नवीन उद्योगधंदे, शिक्षण संस्था, वैद्यकीय सुखसोयी यांची मोठ्या प्रमाणात निर्मिती झाली. रस्त्यांच्या सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्या. वाहतूक व्यवस्था सुधारली. सहाकरी साखर कारखान्यांच्या असाधारण यशामुळे सहकारी चळवळीला प्रतिष्ठा प्राप्त झाली.

ग्रामीण भागातील दीनदुबळ्या शेतकयांकडे सुपीक आणि संपन्न जमिनी असून देखील अशा जमिनींची मशागत करण्यासाठी त्यांच्याकडे एकेकाळी पैसा नव्हता. आज स्थानिक पातळीवर सहकारी साखर कारखान्यांचे जाळे विणले गेले. त्यातूनच शेतीचा विकास साध्य करता आला.

ग्रामीण भागाच्या उन्नतीसाठी आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी आपल्या देशातील पहिला साखर कारखाना कै. पद्‌मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि राज्य सहकारी संघ यांच्या प्रयत्नांतून प्रवरानगर येथे सुरू करण्यात आला. त्यानंतर महाराष्ट्रात अनेक सहकारी साखर कारखाने सुरू झाले. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांमुळे ग्रामीण समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये फार मोठे परिवर्तन घडून आलेले आहे. ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाचा, कष्टकरी समाजाचा तसेच मोलमजुरीरोजंदारी करणाऱ्या गरीब जनतेला आशेचा किरण म्हणून सहकारी साखर कारखान्यांकडे पाहिले जात आहे.[२१]

राज्यातील सहकारी साखर उद्योगांमध्ये अंदाजे ५००० कोटी रूपयांची गुंतवणूक झाली असून वार्षिक उलाढाल सुमारे १२००० कोटी रूपयांची आहे. उत्पादन शुल्क कर व इतर अनुशांगिक अधिभाराचे एकूण उत्पन्न शासनाकडे जमा होत आहे. प्रत्येक साखर कारखान्यातून सरासरी १००० कर्मचाऱ्यांना कायम वा हंगामी रोजगार उपलब्ध करून दिला जातो. राज्यातील एकंदर सहकारी साखर उद्योगामुळे लक्षावधी ऊस-उत्पादक, शेतमजुर व ऊस तोडणी कामगारांना प्रत्यक्ष रोजगाराची संधी उपलब्ध झालेली आहे.[२२]

'एकासाठी सर्व सर्वांसाठी एक' या तत्त्वाने ग्रामीण समाजातील सर्व घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी कै. वसंतदादा पाटील, कै. तात्यासाहेब कोरे, कै. रत्नाप्पा कुंभार,

वैकुंठभाई मेहता या सहकार प्रनेत्यांनी वेळोवेळी उल्लेखनीय साथ देऊन सहकार ग्रामीण उपजिवीकेचे व उन्नतीचे एकमेव साधन म्हणून नावारूपास आणण्यामध्ये मोलाचे योगदान दिलेले आहे.[२३]

**१.२.७. सहकारी साखर कारखानदारीच्या संदर्भात क्रिस्टलरची 'मध्यवर्ती ठिकाणची उपपत्ती'** (Central Place Hypothesis) :

जर्मन अर्थशास्त्रज्ञ क्रिस्टलर याने एकूण ग्रामीण व शहरी लोकवस्तीच्या वितरणाचा अभ्यास केला असून त्या वितरणामुळे झालेल्या आकृतिबंधाचा प्रादेशिक नियोजनाशी असलेला संबंध स्पष्ट करण्यासाठी एक नवीन उपपत्ती मांडली आहे. त्याचा अभ्यास विशेषतः भारतीय पर्यावरणाशी संबंध जोडून करणे आवश्यक आहे. वाढत्या प्रादेशिक विषमतेच्या विरुद्ध भारतामध्ये उपाययोजना चालू असल्यामुळे ग्रामीण औद्योगिकीकरण आणि महाराष्ट्रातील सहकारी कारखानदारीच्या संदर्भात क्रिस्टलरच्या मध्यवर्ती ठिकाणाची उपपत्तीचे स्पष्टीकरण उपयुक्त ठरेल. या सिद्धांतानुसार ज्या ठिकाणी उद्योग उभारले जातील, त्या मध्यवर्ती ठिकाणी उद्योग उभारणे उपयुक्त ठरेल, कोणत्या मध्यवर्ती ठिकाणी उद्योग उभारावे, हे खालील बाबींवर अवलंबून असेल :

(१) त्या त्या प्रदेशाच्या गरजा,

(२) त्या त्या सेवाक्षेत्रातील उपलब्ध कच्चा माल,

(३) इतर भौगोलिक व आर्थिक घटक,

(४) कमीत कमी लोकांचे कमीत कमी स्थलांतर,

(५) मध्यवर्ती ठिकाणांची बाजारपेठ होण्याची क्षमता,

(६) दळणवळणाचा एकूण आकृतिबंध.

(७) विशिष्ट उद्योधंद्यासाठी उपलब्ध असलेला विशिष्ट भौगोलिक घटक.

मध्यवर्ती ठिकाणी उद्योगांची उभारणी केल्याने, त्याचा सेवाक्षेत्राचा कक्षेतील प्रदेशाचाही विकास करता येतो. याची प्रचिती महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांद्वारा घडून आलेल्या ग्रामीण विकासाद्वारा येते. प्रत्येक सहकारी साखर कारखान्याचे ऊसक्षेत्र साधारणतः १५ कि.मी.च्या परिघात असते. त्या क्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे भागधारक असतात. त्यांच्याद्वारा उत्पादित ऊस त्या कारखान्यात गाळपासाठी आणि साखर उत्पादनासाठी उपलब्ध करून दिला जातोआणि ऊस उत्पादक शेतकरी सभासदांना त्या ऊसाची किंमत दिली जाते. ऊस या कच्च्या मालाचे साखर व अन्य सह-उत्पादनांमध्ये रूपांतर केल्याने मूल्यवर्धन होत असते. त्याद्वारा प्राप्त होणारे उत्पन्न हे पारंपारिक अन्नधान्याच्या उत्पनापेक्षा कितीतरी पटीने अधिक असते. या व्यतिरिक्त शेती क्षेत्रातील अतिरिक्त श्रमशक्तीला साखर कारखान्यात

रोजगार उपलब्ध होत असतो. स्थानिक व बाहेरच्या भूमीहिन शेतमजूरांना ऊस तोडणीचा रोजगार उपलब्ध होत असतो. साखर उद्योगाच्या उत्पन्नाचा काही हिस्सा त्या भागात शिक्षण व आरोग्य विषयक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी खर्च केला जातो. कारखानदारीच्या विकासाबरोबरच संरचनात्मक साधनांचा विकास होत असतो. सहकारी साखर कारखाने त्यांच्या सभासदांना शेतीचे जोड व्यवसाय हाती घेण्यास प्रोत्साहन देतात. तसेच ऊसाचे उत्पादन वाढवण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतात. जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शेतकऱ्यांना उपसा सिंचन व तत्सम सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन देतात. अशा प्रकारच्या परस्परांवलंबना मुळे मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या सहकारी साखर कारखान्याची प्रगती होत असतानाच, त्याचा ऊस क्षेत्रातील ग्रामीण भागाचा आणि त्यातील भूधारकांचा विकास होत असतो. याची प्रचिती महाराष्ट्रातील 'साखर टापू'त आली आहे. सहकारी साखर कारखानदारीचा प्रसार झाल्याने, महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाला चालना मिळाली आहे. सहकारी साखर कारखानदारीचे दोष मान्य करूनही, त्याद्वारा साखर कारखानदारीच्या ग्रामीण क्षेत्राचा विकास झाला आहे. ही वास्तव परिस्थिती सार्वत्रिकरित्या मान्य करण्यात आली आहे.

### १.३ संशोधनाची उद्दिष्टे :

संशोधनाची ठळक उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

(१) सहकार आणि ग्रामीण विकास यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करणे.

(२) महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीच्या कामगिरीचा अभ्यास करणे.

(३) महाराष्ट्रातील ग्रामीण विकास प्रक्रियेत सहकारी साखर उद्योगाच्या योगदानाचा अभ्यास करणे.

(४) २१ व्या शतकात साखर उद्योगात उद्भवलेल्या त्रुटींचे निवारण करण्यासाठी उपाययोजना सूचविणे.

(५) सहकारी साखर उद्योगात उद्भवलेल्या त्रुटींचे निवारण करण्यासाठी उपाययोजना सूचवणे.

### १.४ शोध-प्रबंधाची गृहितके:

सदर शोध-प्रबंधाची काही महत्वपूर्ण गृहितके खालीलप्रमाणे आहेतः

(१) सहकार ग्रामीण विकासाचे प्रभावी माध्यम आहे.

(२) सहकारी साखर कारखाने साखर उत्पादना व्यतिरिक्त सहउत्पादने आणि संलग्न व्यवसायांद्वारा आर्थिक समृद्धी निर्माण करतात.

(३) सहकारी साखर कारखानदारीमुळे ग्रामीण बेरोजगारीच्या समस्येची तीव्रता कमी झाली आहे.

(४) साखर टापूत अतिरिक्त रोजगार उपलब्ध असल्याने राज्यातील मागास जिल्ह्यातील स्थलांतरित शेतमजूरांना हंगामी रोजगार उपलब्ध करून देऊन साखर उदयोगाने दारिद्रय निर्मूलनास हातभार लावला आहे.

(५) सहकारी साखर कारखानदारी 'राजकारणग्रस्त' झाली आहे. सहकाराचे राजकारण होणे अनिष्ट आहे.

**१.५ संशोधन पद्धती** (Research Methodology) :

सदर संशोधन महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीचा समग्रवर्ती अभ्यास (Microlevel stydy) आहे. त्यासाठी संपूर्ण गणना किंवा राशी पद्धतीचा (Census Method) अवलंब करण्यात आला आहे. सूक्ष्म-स्तरीय अभ्यासासाठी सदर संशोधन प्रबंधाच्या अंतर्गत भोगावती सहकारी साखर कारखाना या सहकारी संस्थेचा सखोल (Intensive) अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याने संशोधन पद्धतीच्या परिभाषेत सदर संशोधन अभ्यास संस्थात्मक स्वरूपाचा (Institutional study) आहे. सदर संस्थेच्या विविध उपक्रमांद्वारे करवीर तालुक्यातील ग्रामीण सामुदायाच्या दारिद्र्याचे निर्मुलन आणि त्यानंतर समृद्धीकडे वाटचाल झाली. म्हणजेच सदर प्रबंधात भोगावती सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थींवर झालेल्या परिणामाचे विवेचन करण्यात आल्याने, संशोधन पद्धतीच्या परिभाषेत हा अभ्यास कामगिरी आलेख (Impact Analysis) स्वरूपाचा आहे. संस्थेचा सखोल अभ्यास करण्यासाठी संस्थेच्या मागील दहा वर्षांतील वार्षिक अहवाल आणि लेखा परिक्षण अहवालाचे विश्लेषण करण्यात आले आहे. संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी, सेवकवर्ग आणि लाभार्थिशी अनौपचारिक पद्धतीने चर्चा करण्यात आली. संस्थेच्या विविध उपक्रमांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचे निरीक्षण करण्यात आले या अर्थाने सदर अभ्यास सर्वसमावेशक स्वरूपाचा (In-depth Analysis) आहे.

सामाजिक शास्त्रातील संस्थात्मक अभ्यासाला वैचारिक किंवा तात्विक अधिष्ठान नसेल, तर संशोधनास केवल यशोगाथा किंवा अहवालाचे स्वरूप प्राप्त होत असते. हा व्यापक स्वरूपात आढळून येणारा दोष सदर संशोधनात उद्भवू नये, यासाठी संशोधनाशी निगडित असणाऱ्या ग्रामीण विकास, ग्रामीण दारिद्र्य, सहकारी संस्थांचा विकास प्रक्रियेतील कार्यभाग, शासन आणि सहकारी संस्था यांतील आंतर-संबंध इत्यादी संबंधीच्या वैचारिक लिखाणाचे त्यात मांडण्यात आलेल्या सैद्धांतिक बाबींच्या आधारे संस्थात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्याद्वारा संशोधन प्रबंधाला सदर संशोधकाने सैद्धांतिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला आहे.

सदर संशोधन सहकारी साखर कारखानदारी आणि ग्रामीण विकास या प्रक्रियाशी निगडित आशययुक्त अध्ययन (Thematic stydy) असल्याने त्या विषयीची माहिती

महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, अर्थ व सांख्यिकी संचलनालय, महाराष्ट्र शासन, सहकार आयुक्त, महाराष्ट्र शासन आणि भोगावती सहकारी साखर कारखाना यांच्या वार्षिक अहवालातून संकलीत करण्यात आली आहे. सदर अभ्यासातील अन्य काही दुय्यम साधनांचाही उपयोग करण्यात आला. महाराष्ट्राचे राजकारण, महाराष्ट्राचे अर्थकारण, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ, महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योग यासंबंधी उपलब्ध असलेल्या प्रकाशित लेखांतूनही माहिती संपादन करण्यात आली. सहकारी कारखानदारीच्या कामगिरीचे मूल्यमापन करताना ही माहिती उपयुक्त ठरली.

दुय्यम साधनांद्वारा प्राप्त माहितीची पडताळणी करण्यासाठी भोगावती सहकारी साखर कारखान्यांस प्रत्यक्ष भेट दिली. त्यातील उत्पादन प्रक्रिया, संलग्न उपक्रम, समाजोपयोगी उपक्रमांचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात आले. ही निरीक्षणे संशोधनात नमूद करण्यात आली आहेत.

प्रकाशित माहिती आणि प्रत्यक्ष निरीक्षण यावर आधारीत माहितीची चिकित्सक पडताळणी करण्यासाठी, सहकारी साखर उद्योगावर घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांबाबात या उद्योगातील अग्रगण्य व्यक्तींची भूमका समजावून घेण्यासाठी त्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यांच्याशी या विषयाची चर्चावरून 'दूसरी बाजू' समजावून घेतली. अशा प्रकारे अतिरंजीत टिका आणि चूकीचे समर्थन ही व्यक्तीनिष्ठ सरूपाची भूमिका आणि त्यातून उद्‌भवणारे दोष टाळण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्यात आला आहे. सामाजिक शास्त्रातील संशोधन चौकटीत राहून सहकारी साखर कारखानदारीचे वस्तूनिष्ठ मूल्यमापन करण्याचा प्रयत्न सदर संशोधकाने केला आहे.

☆☆☆

## सदंर्भसूची:

१. **भोसले के. एम, आणि काटे के. बी.** सहकाराचा विकास
फडके प्रकाशन, कोल्हापूर– प्रथम आवृत्ती:जुलै २००२
पृ. क्र. १, २, ३.

२. तत्रैव-पृ. क्र. १

३. **सराफ मोहन आणि आचार्य ना. मा.**
ग्रामीण अर्थव्यवस्था व सहकार
प्रकाशक-मुंजे श्रीपाद
विद्याप्रकाशन, रुईकर पथ, नागपूर-४४०००२
प्रथमावृत्ती जून १९९१
पृ. क्र. ५६.

४. तत्रैव-पृ. क्र. ६०

५. भोसले के. एम, आणि काटे के. बी. - सहकाराचा विकास
पृ. क्र. ७.

६. तत्रैव-पृ. क्र. १६

७. तत्रैव-पृ. क्र. १९

८. तत्रैव-पृ. क्र. ३०

९. **वाघमारे रघुनाथ आणि वझे अरविंद**
ग्रामीण विकास
प्राची प्रकाशन-मुंबई २००१.
पृ. क्र. १

१०. **Sundaram S.** Rural Development,
Himalaya, Mumbai, 2000, P.1

११. **Mcnamara R,** Assault on World Poverty,
World Bank, Newyork, 1975, P.10

१२. **जैन अशोक,** महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण
शेठ प्रकाशन, मुंबई २००२, पृष्ठ क्रमांक ५३

१३. तत्रैव-पृ. क्र. ५८

१४. महाराष्ट्र सहकार दर्शन सुवर्ण महोत्सव स्मृति ग्रंथ १९६१-६२
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई संपादक–गणेश स. शेंदुर्णीकर
या पुस्तकातून पृ. क्र. १२८.

**१५.** पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सुवर्ण महोत्सवी स्मृतीग्रंथ, १९६७
संपादक– गणेश स. शेंदुर्णीकर

**१६.** तत्रैव-पृ. क्र. २९

**१७.** तत्रैव-पृ. क्र. ४२

**१८.** तत्रैव-पृ. क्र. ६२

**१९.** महाराष्ट्र राज्य सहकारी बैंक लि. मुंबई संपादक गणेश स. शेंदुर्णीकर

**२०.** महाराष्ट्र सहकार दर्शन, उ. नि. प्र. क्र. ४०

**२१. अपराध विक्रमसिंह,** सहकारी साखर कारखाने एक सिंहावलोकन (लेख) राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे सहकारी महाराष्ट्र, परिषद विशेषांका नोव्हेंबर-डिसेंबर २००१ पृ. क्र. ५९

**२२. सहकारी महाराष्ट्र,** महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योग स्वरूप व प्रश्न, सहकारी साखर उद्योग
संकट निवारण परिषद, सांगली २२-०१-२००४ पृष्ठधारा साहित्य पृ. क्र. ६१ ते ६४

**२३.** ५१ वा अखिल भारतीय सहकारी सप्ताह, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मयादित, पुणे १९७७ पृ.क्र. ११ ते १४.

---

# प्रकरण २ : महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाची वाटचाल

## २.१ प्रास्ताविकः

महाराष्ट्र भारतातील 'साखरेचे कोठार' मानले जाते. उष्ण कटिबंधातील १६.४ अंश उत्तर व २२.१ अंश उत्तर अक्षांशाच्या पट्ट्यामध्ये महाराष्ट्र राज्य येते. ह्याच पट्ट्यामध्ये जगातील हवाई, तैवान, वेस्ट इंडिज बेटे, क्युबा, मेक्सिको, ब्राझिल, मॉरिशस व क्विन्सलँड हे ऊस उत्पादनात अग्रेसर असणारे देश येतात.

महाराष्ट्रातील हवामान हे ऊस शेतीला मानवणारे आहे. महाराष्ट्र राज्याचे सरासरी हेक्टरी ऊस उत्पादन सुमारे ८० मे. टन सरासरी साखर उतारा ११ टक्के आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे देशातील सर्वाधिक सहकारी साखर कारखाने महाराष्ट्र राज्यात आहेत. सन २००९-१० मध्ये महाराष्ट्र राज्यात २०१ साखर कारखाने होते. त्यातील १६८ कारखाने सहकारी क्षेत्रात, तर ३३ कारखाने खाजगी क्षेत्रात होते. या सहकारी साखर कारखान्यांचे ९४ भागधारक हे ऊस-उत्पादक शेतकरी आहेत. मात्र कारखानदारीचे नेतृत्व श्रीमंत बागायतदार शेतकरी असलेल्या आणि राज्य व स्थानिक स्तरावरील राजकारणात सक्रिय असणाऱ्या 'अभीजन' वर्गाकडे आहे. या 'अभीजन' वर्गांचे त्यांच्या सहकारी साखर कारखान्यांवर निर्विवाद वर्चस्व आहेच आणि त्याहूनही अधिक महत्वाची बाब म्हणजे या सहकारी साखरकारखनदारांचा महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ राज्यातील सर्वांत प्रभावी दबाव गट आहे. हा संघ 'शुगर लॉबी' या नावाने ओळखला जातो.

या प्रकरणात महाराष्ट्रातील साखर कारखानदारी आणि विशेषत्वाने सहकारी साखर कारखानदारीच्या विविध पैलूंचे विकरण करण्यात आले आहे.

## २.२ ऐतिहासिक पार्श्वभूमी :

भारतात साखर कारखानदारीचा प्रयत्न इंग्रज व डच व्यापारी कंपन्यांनी १९व्या शतकात सुरुवातीला केला. कलकत्ता, मद्रास, बिहार येथे व्यक्तीगत पातळीवर हे प्रयत्न झाले मात्र यामध्ये साखरेपेक्षा मोलॅसिस पासून मिळणारे मद्य तयार करणे हा मुख्य उद्‌देश असे. कारण त्याकाळात ईस्ट इंडिया कंपनीकडून मद्याला मागणी होती. १९०९ च्या सुमारास बिहार व उत्तरप्रदेश या राज्यात अल्प प्रमाणात साखर कारखानदारीस सुरुवात झाली.

भारतामध्ये साखर कारखानदारी वाढण्यासाठी दोन घटना महत्त्वाच्या ठरल्या. भारतातील हवामान व कृषीविकषयक परिस्थिती लक्षात घेऊन ऊसाच्या योग्य अशा जाती शोधून काढणे व त्याचा प्रसार करणे यासाठी १९१२ साली कोईमतूर तामिळनाडू येथे ऊस

संशोधन संस्थेची स्थापना करण्यात आली. दुसरे म्हणजे पहिल्या जागतिक महायुद्धामुळे साखरेची नाकेबंदी झाली. साखर टंचाई टाळण्यासाठी देशातच साखरेचे उत्पादन वाढवणे गरजेचे झाले. यामधूनच भारतात साखर उद्योग वाढवण्यावर भर देण्यात आला.

१९२० साली देशात फक्त ९ साखर कारखाने होते. उत्पादन गरजेच्या तुलनेत खूपच अपुरे होते. या कालावधीत मोठ्या प्रमाणात साखरेची आयात करावी लागे. भारतात साखर कारखानदारीचा विकास १९३० नंतर झालेला आढळतो. १९३०-३१ मध्य देशात फक्त २९ साखर कारखाने होते. १९७० मध्ये २१५ कारखाने होते. १९७० ते १९८० या दशकात १०० नवीन साखर कारखान्यांची भर पडली. १९९६-९७ मध्ये ४१२ साखर कारखाने होते. तर २००३ पर्यंत ५२७ साखर कारखाने देशात निर्माण झाले होते. देशात १९५०-५१ मध्ये साखरेचे उत्पादन ११ लाख टन होते. २०००-२००१ मध्ये ते १८५ लाख टन झाले होते. १९३०-३१ मध्ये दरदिवशीची गाळप क्षमता ६६४ टन होती. सद्य स्थितीत ती २६५५ टन इतकी झाली.

तत्कालीन मुंबई प्रांतात म्हणजेच इ. स. १९०९ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील हरेगाव येथे पहिला साखर कारखाना ब्रिटीश कंपनीने सुरू केला.

ब्रिटीश सरकारने साखर कारखान्यास कर विषयक सवलती दिल्याने कारखान्यांच्या संख्येत भर पडत गेली. १९१२ मध्ये आर. एन. हिरेमठ आणि जी. ए. सहस्त्रबुद्धे या दोघांनी सहकारी तत्वावर साखर कारखानदारी सुरू करावी असे सुचविले. श्री. लल्लुभाई समळदास यांनी १९१८ मध्ये पुणे जिल्ह्यातील बारामती येथे दी नीरा व्हॅली सहकारी साखर कारखाना सुरू केला आणि सहकारी तत्वावर कारखान्याची मुहूर्त मेढ रोवली गेली. मात्र ऊसाच्या कमतरतेमुळे १९२४ मध्ये तो बंद पडला. महाराष्ट्रात १९३३ पर्यंत ६ साखर कारखाने तर १९४१ पर्यंत १२ साखर कारखाने सुरू झाले होते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात सन १९४९ मध्ये धनंजयराव गाडगीळ आणि विठ्ठलराव विखे पाटील यांनी अहमदनगर जिल्ह्यात लोणी येथे प्रवरा सहकारी साखर कारखाना सुरू केला. सहकारी साखर कारखानदारीचा हा प्रयोग यशस्वी झाल्याने महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा, सांगली, पुणे, अहमदनगर आणि नाशिक या जिल्ह्यामध्ये साखर कारखानदारीच्या विकासास सुरुवात झाली. १९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली तेव्हा राज्यात सहकारी क्षेत्रात १४ आणि खाजगी क्षेत्रात १३ असे एकूण २७ साखर कारखोने कार्यरत होते.

### २.३ भारतातील साखर उद्योगः

हवामान व पाऊसपाणी यांच्या आधारे भारतातील साखर उद्योगाचे दक्षिण व उत्तर असे विभाग पाडतात. दक्षिण भारतामध्ये गुजरात, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ व तमिळनाडू या राज्यांचा समावेश करण्यात येतो. उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल,

हरियाणा, पंजाब, राजस्थान इत्यादी राज्यांचा उत्तर भागात समावेश करण्यात येतो. हवामानाच्या दृष्टीने दक्षिण भारत उष्ण कटिबंधीय क्षेत्रात मोडतो. उत्तर भारत मात्र उप उष्ण कटिबंधीय भाग म्हणून गणला जातो. ऊसाचे पीक वास्तव अर्थान उष्ण कटिबंधीय आहे. हवा, पाणी या कटिबंधामध्ये ऊसाच्या लागवडीला अनुकूल असते. मात्र भारतामध्ये ऊसाची लागवड व साखरेची निर्मिती उत्तर प्रदेश व बिहार या दोन राज्यांमध्ये प्रथमतः झाली. हवामान प्रतिकूल असूनही या राज्यांमध्ये साखरेचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते.

देशातील साखर उद्योगाच्या प्रगतीचे आलेखन खालील तक्ता क्र. २.१ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता क्र. २.१:**

**भारतातील साखर उद्योगाची प्रगती:**

| **वर्ष** | **उत्पादनातील साखर कारखाने** | | **साखर उत्पादन लाख टनामध्ये** | | **सहकारी क्षेत्राचा वाटा** |
|---|---|---|---|---|---|
| | **सहकारी** | **एकूण** | **सहकारी** | **एकूण** | **(टक्केवारी)** |
| १९५०-१९५१ | २ | १३९ | ०.०५ | ११.०० | ०.४५ |
| १९६०-१९६१ | ३० | १७४ | ४.५० | ३०.२१ | १४.९० |
| १९७०-१९७१ | ७३ | २१५ | १२.६२ | ३७.४० | ३३.८० |
| १९८०-१९८१ | १४९ | ३१५ | २९.०३ | ५१.५८ | ०.४५ |
| १९९०-१९९१ | २२० | ३८५ | ७२.७४ | १२०.४७ | ०.४५ |
| २०००-२००१ | २८१ | ५०४ | ९१.८२ | १८५.१९ | ०.४५ |

स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतातील साखर उद्योगाने लांबचा पल्ला गाठला आहे. १९५०-५१ साली साखरेचे उत्पादन ११ लाख टन होते. आणि देशातील साखरेची गरज भागवण्यासाठी साखरेची आयात करावी लागत असे. हे उत्पादन उत्तरोत्तर वाढत जाऊन २०००-०१ साली ते १८५.१९ लाख टन झाले. साखरेची आयात करणारा देश आता साखरेची निर्यात करतो.

साखर व्यवसायाचा प्रसार भारतातील १८ राज्यांमध्ये झाला आहे. त्याचे विवरण खालील तक्ता क्र. २.२ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक २.२ भारतातील राज्यवार साखर कारखाने**

**एकूण स्थापन झालेले कारखाने**

| अ. क्र. | राज्याचे नाव | पब्लिक लि. | खाजगी | सहकारी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | आंध्र प्रदेश | ०६ | १७ | १८ | ४१ |
| २. | आसाम | - | ०१ | ०२ | ०३ |
| ३. | बिहार | १५ | १३ | - | २८ |
| ४. | गोवा | - | - | ०१ | ०१ |
| ५. | गुजरात | - | - | २२ | २२ |
| ६. | हरियाणा | - | ०३ | १२ | १५ |
| ७. | कर्नाटक | ०३ | १८ | १९ | ४० |
| ८. | मध्य प्रदेश | ०२ | ०४ | ०५ | ११ |
| ९. | महाराष्ट्र | - | २८ | १६६ | १९४ |
| १०. | नागालँड | ०१ | - | - | ००१ |
| ११. | ओरिसा | - | ०४ | ००४ | ००८ |
| १२. | पाँडेचरी | - | ०१ | ००१ | ००२ |
| १३. | पंजाब | - | ०६ | ०१७ | ०२३ |
| १४. | राजस्थान | ०१ | ०१ | ००१ | ००३ |
| १५. | तमिळनाडू | ०३ | १९ | ०१६ | ०३८ |
| १६. | उत्तरांचल | ०२ | ०४ | ००४ | ०१० |
| १७. | उत्तर प्रदेश | ३३ | ५८ | ०२८ | ११९ |
| १८. | पश्चिम बंगाल | ०१ | ०१ | - | ००२ |
| **एकूण** | | **६७** | **१७९** | **३१७** | **५६३** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, देशातील ३१७ सहकारी साखर कारखान्यांपैकी सर्वाधिक १६६ सहकारी साखर कारखाने महाराष्ट्र राज्यात होते. त्याचप्रमाणे देशातील ५६३ साखर कारखान्यांपैकी सर्वाधिक १९४ साखर कारखाने महाराष्ट्र राज्यात होते.

## २.४ महाराष्ट्रातील साखर उद्योग

मागील भागात नमूद केल्या प्रमाणे, नियोजन युगाच्या प्रारंभी, म्हणजेच इ. स. १९४९-५० अखेर राज्यात बारा साखर कारखाने होते. हे सर्व कारखाने खाजगी क्षेत्रात होते.

१९४९ साली नामवतं अर्थशास्त्रज्ञ कै. धनंजयराव गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कै. विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या पुढाकाराने अहमदनगर जिल्ह्यात प्रवरानगर येथे देशामधील पहिला साखर कारखाना स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला. १९५१-५२ च्या साखर हंगामात या कारखान्यात साखरेचे उत्पादन यशस्वीरीत्या हाती घेण्यात आले. त्यापासून प्रेरणा घेऊन, १९५९-६० अखेर राज्यात आणखी बारा सहकारी साखर कारखाने स्थापन करण्यात आले. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळी राज्यात २६ साखर कारखाने होते. त्यातील प्रत्येकी १३ कारखाने सहकारी आणि खाजगी क्षेत्रात होते.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर साखर उद्योगाच्या वाटचालीचे सांख्यिकी विवरण खालील तक्ता क्र. २.३ मध्ये करण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक २.३**

**महाराष्ट्रातील साखर कारखान्यांची संख्यात्मक वाढ**

**साखर कारखान्यांची संख्या**

| साखर वर्ष | सहकारी | खाजगी | एकूण |
|---|---|---|---|
| १९५१-५२ | ००१ | ०१२ | ०१३ |
| १९५९-६० | ०१३ | ०१३ | ०२६ |
| १९६९-७० | ०३० | ०१२ | ०४२ |
| १९७९-८० | ०६० | ०१० | ०७० |
| १९८९-९० | ०९२ | ००९ | १०१ |
| १९९७-९८ | ११७ | ००४ | १२१ |
| १९९८-९९ | १२५ | ००३ | १२८ |
| १९९९-२००० | 129 | ००४ | १३३ |
| २०००-२००१ | १३४ | ००९ | १४३ |
| २००१-२००२ | १४७ | ०१३ | १६० |
| २००२-२००३ | १६३ | ०१५ | १७८ |
| २००३-२००४ | १६६ | ०१८ | १८४ |
| २००४-२००५ | १६६ | ०१९ | १८५ |
| २००५-२००६ | १६६ | ०२० | १८६ |
| २००६-२००७ | १६५ | ०२३ | १८८ |
| २००७-२००८ | १६५ | ०२८ | १९३ |
| २००८-२००९ | १६६ | ०२८ | १९४ |
| २००९-२०१० | १६८ | ०३३ | २०१ |

**स्त्रोत :** महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, सांख्यिकी, २०१०

वरील तक्त्यावरून खालील बाबी स्पष्ट होतातः

(१) १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांनी ग्रामीण औद्योगिकीकरण आणि त्या अंतर्गत कृषी उत्पादनांवर प्रक्रिया करणाऱ्या सहकारी क्षेत्रातील उद्योगांना प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले. त्या मागचा उद्देश विधायक कार्य करण्यास उत्सुक असलेल्या कार्यकर्त्यांना नेतृत्वाची संधी उपलब्ध करून देणे आणि त्याद्वारा ग्रामीण विकासाला चालना देणे हे होते. सहकारी साखर कारखान्यांविषयीचा हा विधायक दृष्टिकोन सन १९८० पर्यंत कायम होता. या कालखंडात राज्यातील ऊसाच्या लागवडी खालील क्षेत्रात उत्तरोत्तर वाढ होत गेली आणि सन १९७९-८० अखेर राज्यात सहकारी क्षेत्रात ६० आणि खाजगी क्षेत्रात १० साखर कारखाने, असे एकूण ७० साखर कारखाने कार्यान्वित होते. या कालखंडात खाजगी क्षेत्रातील ३ कारखाने बंद पडले.

(२) सहकारी साखर कारखानदारीचे राजकीय फायदे स्पष्ट झाल्याने, राज्यकर्ते वर्गात आपापल्या मतदार संघात सहकारी साखर कारखाना स्थापन करण्याची व तो आपल्या नियंत्रणाखाली असावा यासाठीच स्पर्धा सुरू झाली. सन १९९८ मध्ये साखर उद्योगांचे नियंत्रीकरण करण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला. त्या दरम्यान राज्यातील साखर कारखान्यांची संख्या १२१ झाली. त्यातील ११७ कारखाने सहकारी क्षेत्रात होते. खाजगी क्षेत्रातील कारखान्यात एकाची भर १९८०-८१ सालात पडली. मात्र या कालखंडात खाजगी क्षेत्रातील सात कारखाने बंद पडले. सहकारी साखर उद्योगाच्या अवनतीची सुरुवात याच कालखंडात झाली. अकार्यक्षम कारभारामुळे सहकारी साखर उद्योगाची परिस्थिती बिकट होत गेली. राज्यकर्त्यांचा राज्याश्रय देखील १९९५ साली संपुष्टात आला. शिवसेना-भाजपा शासनाचे प्रतिकूल धोरण उद्योगाला मारक ठरले.

(३) भारत सरकारने १९९८ साली साखर उद्योगाचे नियंत्रण करण्याचा निर्णय घेतला. खाजगी क्षेत्रातील साखर कारखान्यांची संख्या वाढत असतानां, राज्यकर्त्या वर्गातही सहकारी साखर कारखाने स्थापन करण्याची स्पर्धा वाढत गेली. त्याचा परिणाम म्हणजे सन २००९-१० अखेर राज्यात २०१ साखर कारखाने खाजगी क्षेत्रात होते. त्यातील ५० सहकारी कारखान्यात उत्पादन कार्य थांबले होते आणि आणखी ४३ सहकारी साखर कारखाने बंद पडण्याच्या मार्गावर होते. बंद कारखाने भाडे तत्त्वावर चालवण्यास देण्याचा किंवा त्यांचे खाजगीकरण करण्याचा पर्याय संचालकभाग घटकांककडे होता. आज सहकारी साखर उद्योग बिकट अवस्थेत आहेत.

**२.५ महाराष्टातील साखर कारखानदारीचे स्वरूप प्रगती :**

महाराष्ट्रातील साखर कारखानदारीचे भौगोलिकदृष्ट्या खालील तीन विभाग आहेतः

(१) दक्षिण महाराष्ट्र विभाग - सांगली, सातारा, कोल्हापूर

(२) मध्य महाराष्ट्र विभाग - पुणे, सोलापूर, नगर, नाशिक

(३) उत्तर महाराष्ट्र विभाग - मराठवाडा, विदर्भ, खानदेश

या तीन विभागांची वैशिष्ट्ये वेगवेगळी असून दक्षिण महाराष्ट्रातील साखर कारखान्यांचा साखर उतारा हा साधारणतः ११.५० ते १३.०० टक्क्यांच्या दरम्यान असतो. तर मध्य महाराष्ट्राचा साखर उतारा हा ११.०० ते १२.०० टक्क्याच्या दरम्यान व उत्तर महाराष्ट्राचा साखर उतारा हा १०.५० टक्क्याच्या दरम्यान असतो. अलिकडे मात्र मराठवाडा विभागातील काही कारखान्यांनी साखर उतारा वाढीसाठी जाणीवपूर्व केलेले प्रयत्न लक्षात घेता साखर उतारा जवळजवळ १३ टक्क्यापर्यंत पोहोचला आहे. राज्यातील भौगोलिक परिस्थितीचा परिणाम म्हणजे, महाराष्ट्रातील साखर उत्पादन करणाऱ्या कारखान्यांपैकी दक्षिण व मध्य महाराष्ट्रातील कारखान्यात राज्यातील एकूण साखर उत्पादनातील ७५ टक्के उत्पादन घेतले जाते. उत्तर विभागातील मराठवाड्यात २० आणि विदर्भ व खानदेशातील कारखान्यात ५ साखरेचे उत्पादन होते. या अर्थाने दक्षिण व मध्य महाराष्ट्राचा समावेश असलेला पश्चिम महाराष्ट्र साखर कारखानदारीत आघाडीवर आहे. राज्यातील १६८ सहकारी साखर कारखान्यातील १०० हून अधिक साखर कारखाने दक्षिण व मध्य महाराष्ट्रात आहेतः

महाराष्ट्र राज्यातील ३५ जिल्ह्यांपैकी २५ जिल्ह्यांत साखरेचे उत्पादन घेतले जाते. त्याचे विवरण खालील तक्ता क्र. २४ मध्ये देण्यात आले आहे.

## तक्ता क्र. २४

## महाराष्ट्रातील जिल्हानिहाय साखर कारखाने (२००९-२०१०)

| विभाग | अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | साखर कारखाने | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | **सहकारी** | **खाजगी** | **एकूण** |
| I. दक्षिण महाराष्ट्र | १. | कोल्हापूर | १८ | ०२ | २० |
| | २. | सांगली | १४ | ०१ | १५ |
| | ३. | सातारा | ०९ (४१) | ०१ (०४) | १० (४५) |
| II. मध्य महाराष्ट्र | ४. | पुणे | १२ | ०४ | १६ |
| | ५. | सोलापूर | १६ | ०४ | २० |
| | ६. | अहमदनगर | १७ | ०१ | १८ |
| | ७. | नाशिक | ०५ (५०) | ०२ (११) | ०७ (६१) |
| III. खानदेश | ८. | धुळे | ०२ | - | ०२ |
| | ९. | नंदुरबार | ०३ | - | ०३ |
| | १०. | जळगाव | ०७ (१२) | ०१ (०१) | ०८ (१३) |
| IV. मराठवाडा | ११. | औरंगाबाद | ०७ | ०२ | ०९ |
| | १२. | जालना | ०५ | - | ०५ |
| | १३. | बीड | ०८ | ०१ | ०९ |
| | १४. | परभणी | ०२ | ०२ | ०४ |
| | १५. | हिंगोली | ०३ | - | ०३ |
| | १६. | नांदेड | ०७ | - | ०७ |
| | १७. | उस्मानाबाद | ०९ | ०५ | १४ |
| | १८. | लातूर | ०९ (५०) | ०२ (१२) | ११ (६२) |
| V. विदर्भ | १९. | बुलढाणा | ०२ | ०२ | ०४ |
| | २०. | यवतमाळ | ०४ | ०१ | ०५ |
| | २१. | अकोला | ०१ | - | ०१ |
| | २२. | अमरावती | ०२ | ०१ | ०३ |
| | २३. | वर्धा | ०२ | - | ०२ |
| | २४. | नागपूर | ०२ | ०१ | ०३ |
| | २५. | भंडारा | ०१ (१४) | - (०९) | ०१ (२३) |
| | | **एकूण** | **१६७** | **33** | **२०१** |

**स्त्रोत :** महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, सांख्यिकी, २०१०

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की :

(१) पश्चिम महाराष्ट्र, म्हणजेच दक्षिण व मध्य महाराष्ट्रात राज्यातील सर्वाधिक १०६ साखर कारखाने आहेत. त्यातील ९२ कारखाने सहकारी क्षेत्रात आणि १४ कारखाने खाजगी क्षेत्रात आहेत.

(२) उत्तर महाराष्ट्रातील खानदेश विभागात सर्वांत कमी म्हणजे १३ साखर कारखाने आहेत. त्यातील एक कारखाना खाजगी क्षेत्रात आहे.

(३) मराठवाडा विभागात ६२ साखर कारखाने असून, त्यातील ५० सहकारी आणि १२ खाजगी क्षेत्रात आहेत.

(४) विदर्भ विभागात सहकारी क्षेत्रात १४ आणि खाजगी क्षेत्रात ९ असे एकूण २३ साखर कारखाने आहेत.

(५) मुंबई शहर व उपनगरे, कोकण विभागातील चार जिल्हे आणि विदर्भातील चार, अशा एकूण दहा जिल्ह्यांमध्ये साखर कारखाने कार्यरत नाहीत. ठाणे आणि रत्नागीरी जिल्ह्यात करण्यात आलेले प्रयोग अयशस्वी ठरल्याने शहापूर आणि चिपळूण येथे नियोजित साखर कारखाने उभारता आले नाहीत.

**उत्पादन क्षमता :**

साखर उद्योगाची क्षमता साखरेच्या उत्पादनाशी निगडित आहे, तर साखरेचे उत्पादन साखर कारखान्याच्या ऊस गाळप क्षमतेशी निगडित आहे. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांची ऊस गाळप क्षमता देशातील इतर राज्यांतील कारखान्यांपेक्षा अधिक असली तरी जगातील अन्य साखर उत्पादक देशांच्या तुलनेत कमी आहे. ब्राझिल मधील साखर कारखान्यात प्रतिदिवशी किमान १०,००० टन कच्चा मालाचे गाळप केले जाते, तर महाराष्ट्रातील साखर कारखान्यांची कमाल प्रति दिवशी ऊस गाळप क्षमता ७,५०० टन आहे. महाराष्ट्रातील सांखर कारखान्यांच्या उत्पादन क्षमतेचे विवरण खालील तक्ता क्र. २.५ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक २.५**

**महाराष्ट्रातील साखर कारखान्यांची प्रति दिवशी ऊस गाळप क्षमता : विभागवार (२००८-२००९ मधील)**


| गाळप क्षमता (T. C. D.) | दक्षिण विभाग (कारखाने) | मध्य विभाग (कारखाने) | उत्तर विभाग (कारखाने) | महाराष्ट (कारखाने) | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| ७,५०० | १ | ० | ० | १ | |
| ७,२०० | १ | ० | ० | १ | उच्च क्षमता |
| ७,००० | २ | ० | ० | २ | |
| ६,५०० | १ | ० | ० | १ | |
| ५,००० | २ | ५ | १ | ८ | |
| ४,५०० | ० | १ | ० | १ | |
| ४,२५० | ० | १ | ० | १ | |
| ४,००० | ३ | २ | ० | ५ | |
| ३,५०० | ३ | ६ | १ | १० | मध्यम क्षमता |
| ३,००० | १ | ३ | ० | ४ | |
| २,७५० | १ | ० | ० | १ | |
| २,६०० | ० | १ | ० | १ | |
| २,५०० | १९ | २० | ४३ | ८२ | |
| २,२०० | २ | ५ | १ | ८ | |
| २,००० | ० | १ | ० | १ | |
| १,७५० | ० | १ | ० | १ | |
| १,५०० | ३ | २ | ० | ५ | |
| १,३०० | ३ | ६ | १ | १० | निम्न क्षमता |
| १,२५० | १ | ३ | ० | ४ | |
| १,००० | १ | ० | ० | १ | |
| ८०० | ० | १ | ० | १ | |
| ५०० | १९ | २० | ४३ | ८२ | |
| **एकूण** | **४५** | **५५** | **८७** | **१८७** | |

वरील तक्त्यावरून खालील बाबी स्पष्ट होतात.


(१) सन २००७-०८ वर अखेर राज्यात उच्च क्षमता, म्हणजेच प्रतिदिनी ५०० टनापेक्षा अधिक गाळप करण्याची क्षमता असणारे ५ साखर कारखाने होते. हे सर्व दक्षिण विभागात होते.

(२) सन २००७-०८ अखेर राज्यात मध्यम क्षमता, म्हणजेच प्रतिदिनी २५०० टन ते ५००० टन गाळप करण्याची क्षमता असणारे ११३ कारखाने राज्यात होते. त्यातील २९ कारखाने दक्षिण, ३९ मध्य आणि ४५ उत्तर विभागात होते.

(३) सन २००७-०८ अखेर २५०० टनापेक्षा कमी क्षमता असणारे ६८ साखर कारखाने होते. दक्षिण विभागात ११, मध्य विभागात १६ आणि उर्वरित ४१ साखर कारखाने उत्तर विभागात होते.



## महाराष्ट्रातील साखर कारखान्यांची संख्या



**महाराष्ट्रातील साखर उद्योगाची प्रगती :**

विवेचनाच्या सोयीसाठी महाराष्ट्रातील साखर उद्योगाच्या प्रगतीचे कालखंड सोयीसाठी खालीलप्रमाणे करण्यात आले आहेतः

(१) महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या आधीचा कालखंड (१९५०-५१ ते १९५९-६०)

## २.६ महाराष्ट्रातील साखर उद्योगाची कामगिरी :

### २.६.१ सहकारी साखर कारखानीचा सुवर्ण कालखंड

महाराष्ट्र राज्याची स्थापना जरी १९६० साली झाली असली, तरी मुंबई राज्यातील मराठी मानपत्र ५ देशात हा उद्योग स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून अस्तित्वात होता. १९५० साली मुंबई राज्यात बारा साखर कारखाने होते आणि हे सर्व खाजगी क्षेत्रात होते. सन १९४९ मध्ये नामवंत अर्थशास्त्रज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ यांच्या पुढाकाराने अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगर येथे सहकारी साखर कारखाना स्थापन करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करण्यात आला. शासकीय मंजूरी मिळाल्यानंतर या कारखान्याच्या ऊभारणीचे कार्य १९५१ साली पूर्ण करण्यात आले. १९५१-५२ या साखर वर्षात उत्पादनाचे कार्य सुरू झाले. त्यापासून प्रेरणा घेऊन राज्यात इतरत्र सहकारी साखर कारखाने स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू झाली. १९५९-६० साखर वर्षात राज्यात २६ साखर कारखाने होते. त्यातील प्रत्येकी १३ कारखाने सहकारी आणि खाजगी क्षेत्रात होते.

या कालखंडातील साखर उद्योगाच्या प्रगतीचा सांख्यिकी तपशील खालील तक्ता क्र २.६ आणि २.७ मध्ये आला आहे.

**तक्ता क्रमांक २.६**

**महाराष्ट्र राज्य - उत्पादनातील साखर कारखाने, ऊसक्षेत्र व ऊस उत्पादन**

**(१९५२-१९५३ ते १९५९ ते १९६०)**

| | उत्पादनात भाग घेणारे साखर कारखाने | | उसाखालील क्षेत्र (लक्ष एकर) | उस उत्पादन (लक्ष मे. टन) |
|---|---|---|---|---|
| साखर वर्ष | सहकारी | एकूण | | |
| १९५२-१९५३ | १ | १३ | २.०२ | ४४.६९ |
| १९५३-१९५४ | १ | १२ | १.९८ | ४८.३६ |
| १९५४-१९५५ | १ | १३ | २.१३ | ५५.९५ |
| १९५५-१९५६ | २ | १५ | २.१७ | ५४.२० |
| १९५६-१९५७ | ३ | १५ | २.४४ | ५८.७३ |
| १९५७-१९५८ | ८ | २० | २.८६ | ७६.७७ |
| १९५८-१९५९ | १२ | २५ | २.६४ | ६७.४२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९५९-१९६० | १३ | २६ | २.९५ | ७९.९१ |

**तक्ता क्रमांक २.७**

**महाराष्ट्र राज्य - साखर उत्पादन, सरासरी साखर उतारा, क्षमता वापर, हंगामाचे दिवस**

**(१९५१-१९५२ ते १९५९ ते १९६०)**

| साखर वर्ष | साखर कारखान्यांचे | | | | सरासरी साखर उतारा (टक्के) | वार्षिक ऊस गाळप क्षमता | हंगामाचे दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | उस गळीत (लक्ष मे. टन) | | साखर उत्पादन (लक्ष मे. टन) | | | | |
| | सहकारी | एकूण | सहकारी | एकूण | | | |
| १९५१-१९५२ | ०.६६ | १३.८० | ०.०७ | १.४७ | ११.१२ | १०३ | १५१ |
| १९५२-१९५३ | ०.६१ | ११.६८ | ०.०६ | १.३० | ११.५१ | ९५ | १२२ |
| १९५३-१९५४ | ०.७२ | १०.११ | ०.०८ | १.१९ | ११.७९ | ९० | ११२ |
| १९५४-१९५५ | ०.८६ | १४.०० | ०.०९ | १.६३ | ११.६८ | १०८ | १४५ |
| १९५५-१९५६ | १.३८ | १६.४७ | ०.१५ | १.९२ | ११.६८ | ६६ | १४६ |
| १९५६-१९५७ | ३.७६ | २०.१३ | ०.४२ | २.३५ | ११.६८ | ९० | १५८ |
| १९५७-१९५८ | १०.२२ | २७.६९ | १.११ | ३.१० | ११.२१ | ८६ | १६६ |
| १९५८-१९५९ | ११.४५ | २६.९८ | १.३२ | ३.११ | ११.५० | ६२ | १२३ |
| १९५९-१९६० | १६.२४ | ३२.८३ | १.९१ | ३.८६ | ११.७५ | ८० | १३४ |

वरील तक्त्यांवरून हे स्पष्ट होते की साखर कारखानदारीच्या विस्ताराबरोबरच तत्कालीन मुंबई राज्यातील ऊसाच्या लागवडीचे क्षेत्र आणि ऊस उत्पादनात वाढ होत गेली. ऊसाच्या लागवडी खालचे क्षेत्र १९५२-५३ साली २.०२ लक्ष एकर होते, ते १९५९-६० साली २.९५ लक्ष एकर झाले. ऊसाचे उत्पादन १९५२-५३ साली ४४६९ लक्ष मे. टन होते, ते उत्तरोत्तर वाढत जाऊन १९५९-६० साली ७९९१ लक्ष मे. टन वरून वाढत जाऊन ३३.८३ लक्ष मे. टन झाले. साखरेचे उत्पादन १.४७ लक्ष मे. टन वरून ३.८६ लक्ष मे. टन झाले. या कालखंडात साखरेचा सरासरी उतारा ११.१२ ते ११.७९ या दरम्यान, म्हणजेच समाधान कारक होता. साखर उत्पादन, म्हणजे हगामाचे दिवस ११२ ते १६३ दिवस होते. म्हणजेच साखर कारखानदारीची प्रगती समाधानकारक होती. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे सहकारी साखर कारखान्यांची प्रगती खाजगी कारखान्यांच्या बरोबरीने झाली होती. पाच कालखंडात महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीची पायाभरणी झाली.

**२.६.२ सहकारी साखर कारखानीचा सुवर्ण कालखंड (१९६०-६१ ते १९७९-८०)**

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. शेती आणि कारखानदारीची सांगड घालून, सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाचा मानस व्यक्त करण्यात आला. यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाने प्रेरीत झालेल्या ग्रामीण भागातील स्थानिक स्तरावरील नेते व कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांमुळे साखर उद्योगाची समाधानकारक प्रगती झाली. या कालखंडात ऊसाच्या लागवडीचे क्षेत्र आणि ऊसाचे उत्पादन उत्तरोत्तर वाढत गेले. त्याचप्रमाणे ऊसाचे गाळप आणि साखरेचे उत्पादन वाढत गेले. या कालखंडात साखरेचे सर्वाधिक उत्पादन १९७८-७९ साली २१.०५ लक्ष मे. टन झाले. प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळे १९७९-८० साली ऊसाच्या लागडीच्या क्षेत्रात, ऊसाच्या उत्पादनात, ऊसाच्या गाळपात आणि साखरेच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाली. साखरेच्या सरासरी उताऱ्यात घट होत गेली. या कालखंडात सन १९६८-६९ मध्ये साखरेचा हंगाम २०० दिवसांचा, तर १९७९-८० साली तोस १११ दिवसांचा होता.

या प्रगतीचे सांख्यिकी आलेखन खालील तक्ता क्र. २.८ आणि २.९ मध्ये करण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक २.८**

**महाराष्ट्र राज्य उत्पादनाखालील साखर कारखाने, ऊस क्षेत्र व ऊस उत्पादन**

**(१९६०-६१ ते १९७०-८०)**

| साखर वर्ष | उत्पादनात भाग घेणारे साखर कारखाने | | ऊसाखालील क्षेत्र (लक्ष एकर) | ऊस उत्पादन (लक्ष मे. टन) |
|---|---|---|---|---|
| | सहकारी | एकूण | | |
| १९६०-१९६१ | १४ | २७ | ३.८४ | १२०.९० |
| १९६१-१९६२ | १४ | २७ | ३.८० | १०९.९५ |
| १९६२-१९६३ | १४ | २७ | ३.८० | १०९.९५ |
| १९६३-१९६४ | २० | ३३ | ३.३९ | ११५.१३ |
| १९६४-१९६५ | २० | ३३ | ३.९२ | १०९.४३ |
| १९६६-१९६७ | २१ | ३३ | ३.९७ | ९९.७७ |
| १९६७-१९६८ | २३ | ३४ | ४.०८ | १०४.८८ |
| १९६८-१९६९ | २५ | ३६ | ४.७० | १०४.८८ |
| १९६९-१९७० | ३० | ४१ | ५.४९ | १४४.४४ |
| १९७०-१९७१ | ३० | ४१ | ५.३७ | १४७.७० |
| १९७१-१९७२ | ३२ | ४३ | ४.४९ | ११४.९४ |
| १९७२-१९७३ | ३७ | ४७ | ३.६१ | ११९.१८ |
| १९७३-१९७४ | ३५ | ४५ | ४.०७ | १२९.४३ |
| १९७४-१९७५ | ४२ | ५२ | ४.५८ | १७१.७८ |
| १९७५-१९७६ | ४५ | ५५ | ५.२३ | १७१.७८ |
| १९७६-१९७७ | ५० | ६० | ५.९६ | २१४.९९ |
| १९७७-१९७८ | ५६ | ६६ | ६.०८ | २३३.१९ |
| १९७८-१९७९ | ५९ | ६९ | ६.०३ | २२४.८२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९७९-१९८० | ६० | ७० | ५.४९ | १९८.१९ |

**तक्ता क्र. २.९**

**महाराष्ट्र राज्य-साखर उत्पादन, सरासरी साखर उतारा, क्षमता वापर आणि हंगामाचे दिवस (१९६०-६१ ते १९७०-८०)**

| साखर वर्ष | साखर कारखान्यांचे | | | | सरासरी साखर उतारा (टक्के) | वार्षिक ऊस गाळप क्षमता वापर | हंगामाचे दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ऊस गळीत (लक्ष मे. टन) | | साखर उत्पादन (लक्ष मे. टन) | | | | |
| | सहकारी | एकूण | सहकारी | एकूण | | | |
| १९६०-१९६१ | २२.५१ | ४४.९५ | २.६४ | ५.२३ | ११.६४ | १०३ | १६६ |
| १९६१-१९६२ | २२.२० | ४२.४१ | २.६९ | ५.०८ | ११.९८ | १०२ | १५७ |
| १९६२-१९६३ | २३.४१ | ४३.५४ | २.८८ | ५.३१ | १२.२० | १०७ | १५७ |
| १९६३-१९६४ | २७.८३ | ४५.२८ | ३.३९ | ५.४७ | १२.०७ | ८८ | १३६ |
| १९६४-१९६५ | ३५.३३ | ५४.५१ | ४.१५ | ६.३८ | ११.७० | ११० | १५५ |
| १९६५-१९६६ | ४४.२२ | ६८.७१ | ५.०४ | ७.८० | ११.३६ | १२४ | १४९ |
| १९६६-१९६७ | ३६.४३ | ५५.५१ | ४.२४ | ८.३८ | ११.४९ | ९४ | १४९ |
| १९६७-१९६८ | ३७.१३ | ५४.१८ | ४.३२ | ६.२० | ११.४५ | ८७ | १४४ |
| १९६८-१९६९ | ६३.४१ | ८८.६५ | ७.०० | ९.७९ | ११.०४ | ११८ | २०० |
| १९६९-१९७० | ६८.९५ | ९७.०० | ७.४४ | १०.४४ | १०.७६ | १०९ | १९४ |
| १९७०-१९७१ | ६८.२८ | ९३.५३ | ७.७३ | १०.५५ | ११.२८ | ९८ | १६७ |
| १९७१-१९७२ | ७०.२७ | ९०.३९ | ७.८२ | १०.०२ | ११.०८ | ८७ | १५४ |
| १९७२-१९७३ | ७८.७९ | १००.२७ | ८.४८ | १०.७४ | १०.६९ | ८४ | १५४ |
| १९७३-१९७४ | ७३.२६ | ८९.२८ | ७.८८ | ९.५६ | १०.६८ | ७२ | १४५ |
| १९७४-१९७५ | ११३.१७ | १३५.६६ | १२.७० | १५.१५ | ११.१७ | ९९ | १६० |
| १९७५-१९७६ | ११८.५७ | १४२.६१ | १३.४१ | १६.०६ | ११.२६ | १०० | १६१ |
| १९७६-१९७७ | १२६.८२ | १४३.८१ | १३.८७ | १५.५९ | १०.८४ | १०० | १४५ |
| १९७७-१९७८ | १६७.०५ | १९२.४५ | १८.२१ | २०.९५ | १०.८९ | १२१ | १८१ |
| १९७८-१९७९ | १६६.९७ | १९२.३६ | १८.३१ | २१.०५ | १०.९५ | ११६ | १७७ |
| १९७९-१९८० | ११८.२७ | १३१.५० | १२.६० | १३.९४ | १०.६० | ८१ | १११ |

## २.६.३ साखर कारखानदारीच्या प्रगती व अवनतीचा संमिश्र कालखंड (१९८०-८१ ते १९९७-९८)

१९८०-८१ ते १९९७-९८ या कालखंडात सहकारी साखर उद्योग राजकारणग्रस्त झाला. या कालखंडात कारखानदारीचा विस्तार होत असतानाच, त्यांच्या व्यवस्थापनात राजकीय नेत्यांचा हस्तक्षेप वाढत गेला. ऊसाच्या लागवडी खालील क्षेत्र, ऊसाचे उत्पादन व गाळीप आणि साखरेच्या उत्पादनात सातत्याने वाढ झाली. त्याचबरोबर राजकारणग्रस्त उद्योगात निधी व यंत्रणेचा गैरवापर व भ्रष्टाचार उत्तरोत्तर वाढत गेला. कारखान्यांच्या संचित तोट्यात वाढ होऊन ३६ सहकारी कारखान्यातील उत्पादन प्रक्रियेत खंड पडला. ५६ कारखान्यात ऊस उत्पादन सभासदांची देणी आणि कामगारांचे वेतन थकले. १९९५ साली सत्तेवर आलेल्या शिवसेना-भाजपा युतीने साखर कारखानदारी काबीज करण्याचा प्रयत्न अयशस्वी झाल्याने, त्याच्या प्रगतीला मारक ठरणारे निर्णय घेतले. १९९१ साली भारत सरकारने नवीन आर्थिक धोरण स्वीकारले. त्याचाही प्रतिकूल परिणाम सहकारी साखर कारखानदारीवर आले असे असले तरी ही, सहकारी कारखानदारीची पाळेमुळे खोलवर रूजली असल्याने बिकट परिस्थितीतही ती टिकून राहिली.

या कालखंडातील प्रगतीचे सांख्यकी विवरण खालील तक्ता क्र. २.१० आणि २.११ मध्ये करण्यात आले आहे:

**तक्ता क्रमांक २.१०**

**महाराष्ट्र राज्य उत्पादना खालील साखर कारखाने, ऊस क्षेत्र व ऊस उत्पादन (१९८०-८१ ते १९९७-९८)**

| साखर वर्ष | उत्पादनात भाग घेणारे साखर कारखाने | | ऊसाखालील क्षेत्र (लक्ष एकर) | ऊस उत्पादन (लक्ष मे. टन) |
|---|---|---|---|---|
| | सहकारी | एकूण | | |
| १९८०-१९८१ | ६७ | ७७ | २.१६ | २३५.९१ |
| १९८१-१९८२ | ६७ | ७८ | २.९७ | २८७.८० |
| १९८२-१९८३ | ६७ | ७८ | ३.२६ | ३१३.६० |
| १९८३-१९८४ | ६७ | ७८ | २.९४ | २६५.४९ |
| १९८४-१९८५ | ७७ | ८७ | २.९२ | २६३.६७ |
| १९८५-१९८६ | ८० | ८८ | २.६५ | २३७.०६ |
| १९८६-१९८७ | ८४ | ९१ | २.८० | २४०.९१ |
| १९८७-१९८८ | ८५ | ९० | २.९२ | २४९.८४ |
| १९८८-१९८९ | ९० | ९५ | ३.१४ | २५५.०० |
| १९८९-१९९० | ९२ | ९६ | ३.८३ | ३४०.०८ |
| १९९०-१९९१ | ९३ | ९७ | ४.४४ | ३८४.१६ |
| १९९१-१९९२ | ९४ | ९९ | ४.५३ | ३६१.१२ |
| १९९२-१९९३ | ९५ | ९९ | ४.०३ | ३०९.२३ |
| १९९३-१९९४ | ९४ | ९७ | ३.४४ | २७२.९९ |
| १९९४-१९९५ | १०४ | १०७ | ६.१२ | ४४२.६० |
| १९९५-१९९६ | १०६ | १०९ | ६.२२ | ४६६.५६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९९६-१९९७ | १०५ | ११७ | ५.४४ | ४११.५६ |
| १९९७-१९९८ | ९२ | ९५ | ४.६० | ३६३.४० |

**तक्ता क्र. २.११**

**महाराष्ट्र राज्य-साखर उत्पादन, सरासरी साखर उतारा, क्षमता वापर आणि हंगामाचे दिवस (१९८०-८१ ते १९९७-९८)**

| साखर वर्ष | साखर कारखान्यांचे ऊस गळीत (लक्ष मे. टन) | | साखर कारखान्यांचे साखर उत्पादन (लक्ष मे. टन) | | सरासरी साखर उतारा (टक्के) | वार्षिक ऊस गाळप क्षमतेचा वापर | हंगामाचे दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सहकारी | एकूण | सहकारी | एकूण | | | |
| १९८०-१९८१ | १६९.५१ | १८८.८३ | १८.७७ | २०.८५ | ११.०४ | ९२ | १४५ |
| १९८१-१९८२ | २५०.८८ | २८२.९२ | २६.८७ | ३०.२६ | १०.७० | १३० | २०३ |
| १९८२-१९८३ | २४५.६७ | २७६.२५ | २६.९६ | ३०.२५ | १०.९५ | १२७ | १८९ |
| १९८३-१९८४ | १६१.७० | १७९.०४ | १८.०३ | १९.९३ | ११.१३ | ८३ | १२२ |
| १९८४-१९८५ | १९०.६४ | २०८.५४ | २१.२१ | २३.११ | ११.०८ | ९० | १४२ |
| १९८५-१९८६ | १९६.७१ | २१३.१९ | २२.१० | २३.८९ | ११.२० | ९३ | १३२ |
| १९८६-१९८७ | २०६.३१ | २१७.५२ | २२.७० | २३.८८ | १०.९८ | ८६ | १२८ |
| १९८७-१९८८ | २४८.१० | २५८.२८ | २६.९१ | २७.९५ | १०.८२ | ९७ | १५६ |
| १९८८-१९८९ | २३०.४० | २३८.०३ | २५.५० | २६.२९ | ११.०५ | ८५ | १३३ |
| १९८९-१९९० | ३५५.२३ | ३६६.३८ | ३८.०८ | ३९.२३ | १०.७१ | १२१ | २०४ |
| १९९०-१९९१ | ३७२.३१ | ३८२.८२ | ४०.१० | ४१.१३ | १०.७६ | ११६ | १९३ |
| १९९१-१९९२ | ३६५.१८ | ३७६.५९ | ४०.९१ | ४२.१३ | ११.१९ | ११७ | १८० |
| १९९२-१९९३ | २९२.१० | २९७.२० | ३३.०६ | ३३.६० | ११.३२ | ८५ | १६१ |
| १९९३-१९९४ | २४२.२५ | २४६.६६ | २६.९८ | २७.४५ | ११.१४ | ६६ | १३७ |
| १९९४-१९९५ | ४५०.५१ | ४५९.९७ | ४९.२३ | ५०.२४ | १०.९२ | - | १७९ |
| १९९५-१९९६ | ५०२.४१ | ५१५.१३ | ५२.६६ | ५३.९७ | १०.४८ | १२८ | १९९ |
| १९९६-१९९७ | ३०२.३१ | ३१०.१७ | ३३.६० | ३४.४५ | ११.१० | - | १२३ |
| १९९७-१९९८ | ३३६.४२ | ३४५.८१ | ३७.४७ | ३८.४७ | ११.१२ | ७६ | १४९ |

### २.६.४ उदारीकरणानंतरचा कालखंड (१९९८-९९ नंतर)

१९९८ साली भारत सरकारने साखर उद्योगाचेही विनियंत्रण करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सहकार क्षेत्रासाठी राखीव असलेल्या साखर उद्योगात खाजगी क्षेत्रावरील

भांडवलदारांनी सहकारी क्षेत्रासमोर मोठे आव्हान उभे केले. १९९९ साली महाराष्ट्रात कॉंग्रेस-राष्ट्रवादी आघाडीचे सरकार असल्याने, सहकारी साखर उद्योगाला दिलासा मिळाला. या कालखंडात राज्य शासनाने वेळोवेळी 'पॅकेज' धोरण स्वीकारून सहकारी उद्योगास अर्थसाहाय्य उपलब्ध करून दिल्याने ती तग धरून आहे. बंद पडलेल्या आणि अवसायनाच गेलेल्या सहकारी साखर कारखान्यांची संख्या उत्तरोत्तर वाढत गेली आहे. अवसयानात गेलेल्या सहकारी साखर कारखान्यांची संख्या उत्तरोत्तर वाढत गेली. अवसयानत गेलेले काही सहकारी साखर कारखाने भाडे वाटपावर खाजगी किंवा अन्य सुस्थितीतील सहकारी साखर कारखान्यांना चालवण्यासाठी दिले आहेत.

या बिकट कालखंडातील प्रगतीचे आलेखन खालील तक्ता क्र. २.१२ आणि २.१३ मध्ये करण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक २.१२**

**महाराष्ट्र राज्य उत्पादनाखालील साखर कारखाने, ऊस क्षेत्र व ऊस उत्पादन (१९९८-९९ ते २००८-०९)**

| साखर वर्ष | उत्पादनात भाग घेणारे साखर कारखाने | | ऊसाखालील क्षेत्र (लक्ष एकर) | ऊस उत्पादन (लक्ष मे. टन) |
|---|---|---|---|---|
| | सहकारी | एकूण | | |
| १९९८-१९९९ | ११६ | ११९ | ७.९० | ५५१.४१ |
| १९९९-२००० | १२३ | १३३ | ९.९८ | ५७०.४९ |
| २०००-२००१ | १२८ | १३७ | ८.६७ | ५९०.०० |
| २००१-२००२ | १२२ | १३५ | ९.७४ | ५२६.९० |
| २००२-२००३ | १४४ | १५९ | ५.७८ | ४२६.१७ |
| २००३-२००४ | ११९ | १३५ | ५.७३ | २५६.६८ |
| २००४-२००५ | ८४ | १०१ | ४.४३ | २०४.७५ |
| २००५-२००६ | १२१ | १४२ | ३.२४ | ६७०.०० |
| २००६-२००७ | १४१ | १६३ | ६.२४ | ८३४.०० |
| २००७-२००८ | १४५ | १७३ | १०.१७ | ८८८.०० |
| २००८-२००९ | १६६ | १९४ | ७.८७ | ५२९.०० |

## तक्ता क्र. २.१३

## महाराष्ट्र राज्य-साखर उत्पादन, सरासरी साखर उतारा, क्षमता वापर आणि हंगामाचे दिवस (१९९८-९९ ते २००८-०९)

| साखर वर्ष | साखर कारखान्यांचे | | | | सरासरी साखर उतारा (टक्के) | वार्षिक ऊस गाळप क्षमतेचा वापर | हंगामाचे दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ऊस गळीत (लक्ष मे. टन) | | साखर उत्पादन (लक्ष मे. टन) | | | | |
| | सहकारी | एकूण | सहकारी | एकूण | | | |
| १९९८-१९९९ | ४६८.१२ | ४७९.४१ | ५२.१७ | ५३.४० | ११.१४ | ५९ | १७३ |
| १९९९-२००० | ५७०.४१ | ५७०.४१ | ६५.०० | ६५.०० | ११.४० | ९७ | १६६ |
| २०००-२००१ | ५५६.८२ | ५७६.५५ | ६४.७६ | ६७.०५ | ११.६३ | ८८ | १४४ |
| २००१-२००२ | ४५९.६१ | ४८३.८६ | ५३.४२ | ५६.१२ | ११.६० | ९८ | १२२ |
| २००२-२००३ | ५०५.७४ | ५३४.७३ | ५८.९५ | ६२.२१ | ११.६३ | ८६ | १०५ |
| २००३-२००४ | २७२.१८ | २९०.७६ | २९.७५ | ३१.७४ | १०.९२ | ८१ | ८४ |
| २००४-२००५ | १८०.६९ | १९४.२८ | २०.८७ | २२.३३ | ११.४९ | ६३ | ६७ |
| २००५-२००६ | ४१४.९६ | ४४५.७९ | ४८.५९ | ५१.९७ | ११.६६ | ८६ | १०४ |
| २००६-२००७ | ७३२.२८ | ७९८.३८ | ८३.५३ | ९०.९५ | ११.३९ | ९३ | १८४ |
| २००७-२००८ | ६९०.०१ | ७६१.९२ | ८२.१२ | ९०.५९ | ११.८९ | ८९ | १६९ |
| २००८-२००९ | ३६०.०० | ४००.२७ | ४१.४३ | ४५.८० | ११.४४ | ७८ | ९५ |

महाराष्ट्रातील साखर कारखानदारीचे गेल्या ५० वर्षाचे अवलोकन केल्यास साखर उद्योगाने अनेक चढ उतार पाहिले आहेत. तरी आपण अग्रस्थान टिकवून ठेवले आहे. मात्र आता खुल्या जागतिक अर्थव्यवस्थेत स्पर्धात्मक युगात टिकाव धरून राहण्यासाठी कसोशीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. सुरुवातीपासून ऊसाची उपलब्धता, कार्यक्षमता, काटकसर व आधुनिक तंत्रज्ञान या बाबीकडे लक्ष दिल्यास कारखाने टिकाव धरू शकतील. साखर उद्योगाच्या जडणघडणीत राज्य सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर केंद्र शासनाकडून मिळणारे पॅकेज, राज्य सरकारच्या सवलती वसंतदादा शुगर इंन्स्टिटयुटने केलेल्या संशोधन कार्याने साकर कारखानादारीच्या यशात मोलाची भर घातली आहे.

राज्यातील या प्रमुख व्यवसायाची आर्थिक उलाढाल सुमारे १२००० कोटी रुपयाची असून १ लाख लोकांना प्रत्यक्षात रोजगार मिळाला आहे. या उद्योगात शेतकयांना ऊस

किंमतीद्वारे सुमारे ५००० कोटी रुपये दिले जातात व ७०० कोटी रुपये कामगारांना पगारापोटी दिले जातात, तर ३५० कोटी रुपये ऊस तोडणी वाहतूक कामगारांना दिले जातात. या उद्योगामधून राज्य शासनाला २०१० कोटी रुपये व केंद्रशासनाला ४५८ कोटी रुपये महसूल मिळतो. शिवाय अनेक साखर कारखान्यांनी आज साखर शाखा निर्माण केल्या असून त्यांची संख्या सुमारे १०० आहे. ऊस तोडणी कामगारांच्या मुलांचे शैक्षणिक नुकसान यामुळे टाळले जाते. साखर कारखान्यांनी ग्रामीण भागाचा कायापालट केलेला असून या उद्योगाशी निगडीत सहकारातून दुग्धोत्पादन, कुक्कूटपालन, ग्राहक भांडार, शैक्षणिक संस्था आधुनिक सिंचन सुविधा, हॉस्पिटल, या स्वरूपाची सामाजिक कार्य निर्माण झाली आहेत.

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांची पुढाकार घेऊन शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था स्थापन केल्या असून त्या संस्थांच्या वतीने कारखाना परिसरात बहुसंख्य कारखान्यांनी शाळा, विद्यालये, महाविद्यालये स्थापन केली आहेत. सुमारे ५० कला, विज्ञान, वाणिज्य, महाविद्यालये, ५ तंत्रशाळा, १२ ओद्योगिक प्रशिक्षण संस्था, २० अभियांत्रिकी महाविद्यालये, ५ पब्लिक स्कूल, रेसिडेंशिअल इंग्लिश मिडियम स्कूल, २ वैद्यकीय महाविद्यालये इत्यादींची निर्मिती करण्यात आली आहे.

सहकारी साखर कारखान्यामुळे ऊसाची लागवड, रसायन उद्योग, वाहतूक व्यवसाय शेतीतील यंत्र सामुग्री, सहकारी बँका इत्यादी अनेक व्यवसायात सुमारे ५००० व्यक्तींना रोजगार उपलब्ध होतो. साखर उत्पादनाबरोबरच विविध प्रकल्पांना ग्रामीण भागात चालना मिळते. त्यामुळे विविध प्रकाराच्या सुविधा उपलब्ध झाल्या. रोजगार वाढले, ऊसाला योग्य भाव मिळाल्याने शेतकयांची आर्थिक स्थिती सुधारली. शेतीमध्ये यांत्रिकता आली. वारणानगर व प्रवरानगर ही या संदर्भातील उदाहरणे सांगता येतील. वारणानगर येथील एका सहकारी साखर कारखान्यामुळे ६६ गावांमध्ये ५०० कुक्कुटपालन केंद्रे सुरू केली आहेत. ६०,००० कुटूंबियांना वारणा दुग्धव्यवसायाने समृद्धी मिळवून दिली आहे. एका कारखान्याने ग्रामीण भागाचा एवढा कायापालट केला तर अशा अनेक साखर कारखान्यांमुळे किती पट प्रादेशिक विकास झालेला असेल याची कल्पना करता येते. आज प्रत्येक सहकारी साखर कारखान्यात गळीत हंगामात किमान ८००० ते १०,००० लोकांना रोजगार उपलब्ध होतो. ९४ सभासद हे ऊस उत्पादक शेतकरी आहेत. यावरून सहकारी साखर कारखानदारी शेतकऱ्यांच्या मालकीची आहे हे जाणवते.

सहकारी साखर उद्योगामुळे केवळ सभासद व कामगारांचीच आर्थिक प्रगती होते असे नाही तर कारखाना परिसरातील व कार्यक्षेत्रातील इतर बहुसंख्य शेतकरी, शेतमजूर, कारागीर, इतर व्यवसायिकांना देखील प्रत्यक्ष अप्रत्यक्ष लाभ मिळत असल्याने साखर

उद्योगाच्या विकासाकडे केंद्र व राज्य सरकार सतत लक्ष केंद्रीत करून आर्थिक पाया भक्कम करण्याचा प्रयत्न करीत आहे.

एक सहकारी साखर कारखाना हा त्या भागात प्रगतीचे जाळे निर्माण करतो. उदा., रस्ते, शाळा, ग्रामीण रुग्णालये, पाटबंधारे, सिंचन सुविधा, ग्रामीण सहकारी बँका, पतसंस्था, शैक्षणिक संकुल, ग्राहक बाजारपेठा, अशा अनेक बाबी निर्माण करू शकतो असे चित्र कोणताही खाजगी साखर कारखानदारीच्या परिसरात दिसून येत नाही.

गेल्या ५० वर्षात सहकारी साखर कारखानदारीने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात रुजला असून सहकारी चळवळीच्या माध्यमातून या उद्योगाचे रोपटे आज वटवृक्षामध्ये रूपांतरीत झाले आहे. साखर व्यवसाय हा आज ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा समजला जातो. परिसराचा संपूर्ण चेहरा मोहरा बदलत असताना रस्त्याच्या सुधारणेपासून ते उच्च शिक्षणापर्यंतच्या सर्व सुविधा या व्यवसायाने निर्माण केल्या आहेत.

आजमितीस भारतात सुमारे ५२७ साखर कारखाने आहेत. त्यापैकी २२७ सहकारी साखर कारखाने आहेत. त्यामध्ये महाराष्ट्राचा वाटा मोठा असून आज अखेर महाराष्ट्रात १६६ सहकारी कारखाने आहेत. त्यामधून ३० ते ३५ लाख टन साखरेचे उत्पादन अपेक्षित आहे.

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी ही ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय प्रक्रियेचा केंद्रबिंदू असून ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतमजूर, ऊस उत्पादक व कारागीरांचे आशास्थान आहे.

सहकारी साखर कारखान्यांची परिसरातील सिंचन क्षेत्र वाढवण्यासाठी, स्वतःच्या भांडवलामधून उपसा जलसिंचन योजना, पाझर तलाव, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, लिफ्ट इरिगेशन इ. सुविधा निर्माण केल्याने आज ऊसाखालील क्षेत्र वाढून ऊसाचे उत्पादनही मोठ्या प्रमाणात होताना आढळते.

शेती व ग्रामीण विकासाबरोबरच सहकारी साखर कारखान्यांनी औद्योगिक विकास साधन्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. साखर कारखान्याच्या सहकार्याने अनेक ठिकाणी मद्यार्क निर्मिती इथेनॉल निर्मिती प्रकल्प सुरू झाले आहेत. काही कारखान्यांनी कागद निर्मितीचे प्रकल्प हाती घेतले आहेत. ऊसाच्या प्रेसमडपासून बगॅस व मद्यार्क, कारखान्यांतून स्पेंटवॉशपासून पोटॅश बनविण्याचे प्रकल्प सुरू करण्याचे प्रयत्न आहेत. सहकारी साखर कारखान्यांनी नॅशनल हेवी इंजिनिअरींग को ऑप लिमिटेड नावाची संस्था स्थापन करून त्यांच्या मार्फत साखर कारखाने व इतर काही उद्योगासाठी लागणारी

यंत्रसामुग्री, वाहतुकीसाठी लोखंडी बैलगाड्या निर्मिती, सहवीज निर्मिती युनिट्स निर्मितीचे प्रयत्न ही साखर कारखानदारी मार्फत होतानां आढळतात.

सहकारी साखर कारखानदारीने कार्यक्षेत्रातील रस्ते तयार करण्याबरोबरच शाळा, हायस्कूलनां शैक्षणिक कार्यासाठी मदत देणे, वाचनालयांना मदत देणे, मंदिरांचा, हरिजन समाज मंदिरांचा जिर्णोद्धार करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मोफत आरोग्य शिबिरे, सामूदायिक विवाह सोहळा आयोजित करणे, युद्ध प्रसंगी तसेच दुष्काळी आपत्तीवेळी राष्ट्रीय कर्तव्य म्हणून सढळ हस्ते मदत करून आपला वाटा उचलला आहे. सहकारी साखर कारखान्याने परिसरात शाळा, महाविद्यालये, रुग्णालये निर्माण केल्याने कर्मचारी, शेतमजूर शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणाच्या हक्काच्या संधी मिळत आहेत. आज देशात १२ कोटी शेतकरी कुटुंबे आहेत. त्यापैकी १ कोटी कुटुंबे महाराष्ट्रातच आहेत. १२ कोटी लोकांची मालकी होऊ शकेल असा ऊस उद्योगाशिवाय इतर कोणताही उद्योग भारतात नाही. या व्यवसायामधून मोठ्या प्रमाणात भांडवल निर्माण होते. व्यवसायामध्ये रोजगाराच्या संधी आहेत. प्रदूषण विरहीत हा व्यवसाय असून ऊस उत्पादन वाढीमुळे कार्बन डाय ऑक्साईड वायू नियंत्रीत होण्यास मदत झाली आहे. ऊसाच्या मुळामुळे पाणी जमिनीत मुरविले जाते. मेलेल्या मुळामुळे जमीनीत जैविक खत निर्माण करणाऱ्या जीवाणूंची निर्मिती होते. आज या व्यवसायात ६ लाख शेतकरी असून २३०० ते २४०० सहकारी सोसायट्या व सुमारे ७ लाख जनावरे आहेत. राज्यातील रोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांनी मोठा हातभार लावला आहे. मध्यम आकाराचा एक सहकारी साखर कारखाना सुमारे पाच सहा हजार व्यक्तींना प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या रोजगार मिळवून देतो. साखर उत्पादनाबरोबरच मद्यार्क, रसायने, कागद निर्मिती प्रकल्पामध्येही रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. काही साखर कारखान्यांनी वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू केली आहेत. राज्यातील सहा कारखान्यांनी ऊसाच्या चिपाडापासून तर दोन कारखान्यांनी जैविक घटकांवर आधारित विजेची निर्मिती सुरू केली आहे. बायोगॅस संयत्रे बांधणे, विहिरी खोदणे, सुलभ शौचालये, पशुखाद्य तयार करणे, वराह व कुक्कूटपालन, फळझाड लागवड सामूदायिक विवाह सोहळे, मूल दत्तक योजना, खरेदी विक्री संस्था, सहकारी दूध योजना, सहकारी पतसंस्था, सहकारी पशुपालन संस्था इत्यादींच्या वाढीला सहकारी साखर कारखानदारीमुळे चालना मिळालेली आहे.

### २.७ साखर उद्योगातील दोष आणि समस्या :

'संकटे एकटी येत नसतात' या उक्तीचा अनुभव साखर उद्योगाने गेल्या दशकभराच्या काळात घेतला. नव्या आर्थिक धोरणातून साखर उद्योगाला मिळालेल्या

सवलती, फायदे कमी झाले, पण साखर उद्योगावरील नकारात्मक बंधने, नियंत्रणे यामध्ये फारसा बदल झाला नाही.

आज साखर कारखानदारीमध्ये अनेक दोष आहेत. ग्रामीण भागात या कारखानदारीला परवाना मिळत असतानां आज राजकीय वर्चस्वातून अनेक सहकारी साखर कारखाने आज कोणत्याही विशेष अटी नियमांचे पालन न करता निर्माण होत असल्याने आज अनेक दोष निर्माण होत आहेत.

(१) सहकारी साखर कारखान्यामुळे वातावरण दूषित झाले आहे. साखर कारखान्यामधून साखर उत्पादनाबरोबर निर्माण होणारी मळी व इतर पदार्थ यांची विल्हेवाट योग्य प्रकारे करण्याची सोय नाही. हे पदार्थ नदी-नाले यांच्यात सोडल्याने त्या भागात दुर्गंधी व प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

(२) सतत ऊसाचे उत्पादन घेतल्याने जमिनीचा कस कमी होत आहे.

(३) ऊस उत्पादनासाठी जमीन अधिक वापरल्याने इतर शेत वस्तूंचे उत्पादन कमी झाले आहे. त्याचा परिणाम इतर वस्तूंच्या किंमतीवर झाला आहे.

(४) सहकारी साखर कारखान्याचे नेतृत्व व पक्षीय राजकारण एकत्रित झाले आहेत. त्याचा परिणाम साखर कारखानदारीवर होत असून ती सहकार तत्वाच्या विरोधी बाब आहे.

(५) काही साखर कारखान्यांना पुरेसा ऊस मिळत नाही. त्यामुळे टंचाई निर्माण होते.

(६) सहकारी साखर कारखान्यामधून राजकीय हस्तक्षेप होत असताना वेळेचा व पैशाचा अपव्यय होत आहे. त्यामुळे प्रमुख उद्देशापासून कारखाने दूर जात आहेत.

(७) आज कारखान्यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार वाढला असून कारखान्यांची विश्वासर्हता घटत आहे.

**❖ सहकारी साखर कारखान्यांच्या समस्या :**

**(१) सदोष परवाना समस्या :-**

सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेला प्रामुख्याने राजकीय दृष्टीकोनातून परवाना दिला आहे. १९९८ पासून तर विना परवाना साखर कारखाना धोरण जाहीर झाले आहे. त्या भागातील ऊर्जा उत्पादन, पाणी पुरवठा व्यवस्था, नैसर्गिक अनुकूलता, दळवळणाच्या सोयी या सारख्या सुविधा, आवश्यक घटक विचारात घेतले जात नाहीत कारखान्यांमध्ये स्पर्धा निर्माण होते. याचा परिणाम म्हणजे कारखाना पूर्ण क्षमतेने गाळप करू शकत नाही.

**(२) अपुरा ऊस पुरवठा :-**

महाराष्ट्रातील काही साखर कारखान्यांच्या क्षेत्रात पुरेसे ऊस उत्पादन होत नाही. त्यामळे कारखाने १६५ दिवसापर्यंत पूर्ण क्षमतेने गाळप करू शकत नाहीत.

**(३) ऊस विकासाकडे दुर्लक्ष :-**

साखर कारखान्यांना ऊस क्षेत्राबाहेरील भागामधून ऊसाची उपलब्धता होत असल्याने कारखान्यांनी सभासदांच्या ऊस शेती विकासाकडे दुर्लक्ष केले आहे.

**(४) अकार्यक्षम ऊस वाहतूक :-**

ऊसातील साखरेचा उतारा जास्तीत जास्त मिळवण्यासाठी ऊसाची तोड झाल्यापासून आठ तासांच्या आता ऊस उत्पादन प्रक्रियेत घ्यावा लागतो. त्यामुळे साखरेचे उत्पादन व कार्यक्षमता वाढते. मात्र बऱ्याचशा कारखान्यांमध्ये ऊस वाहतुकीची व्यवस्था कार्यक्षम नसल्याने ऊसाच्या वजनात व उताऱ्यात घट होते.

**(५) गाळप क्षमतेचा अपुरा वापरः-**

सहकारी साखर कारखाने ऊसाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे ऊस गाळपाच्या क्षमतेचा पूर्ण वापर करू शकत नाहीत. ऊसाचे उत्पादन पावसावर अवलंबून असल्याने साखर कारखान्यांना सलग प्रत्येक वर्षी पुरेसा ऊस मिळू शकत नाही. त्यामुळे कारखाने पूर्ण क्षमतेने गाळप करू शकत नाहीत.

**(६) ऊसाखालील क्षेत्रात बदल :-**

नगदी पिके म्हणून साखर कारखाना क्षेत्रातील शेतकरी ऊस लावतात. मात्र ऊसाला बऱ्याच वेळा पुरेशी किंमत मिळत नाही. त्यामुळे शेतकरी नंतर ऊसाऐवजी अन्य पिकांकडे वळतो ऊसाची बिले कारखान्यांद्वारे वेळच्या वेळी दिली जात नाहीत. ऊस वेळच्या वेळी तोडला जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते.

**(७) ऊस लागवड खर्चात वाढ :-**

शेतीची मशागत, ऊस बियाणे, खते, जंतुनाशके, मजूरी यांचे दर सतत वाढत असल्याने ऊसाच्या लागवडीचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे शेतकारी ऊसा ऐवजी अन्य पिकांकडे वळताना आढळतो.

**(८) उत्पादन खर्चात वाढ :-**

साखर कारखान्यांचा उत्पादन खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. गाळप कमी झाल्यास उत्पादन खर्च आणखी वाढतो. त्यामुळे साखरेचा उत्पादन खर्च परवडत नाही.

**(९) कर्मचाऱ्यांची संख्या अधिक :-**

साखर कारखान्यांच्या गाळप क्षमतेवर कारखान्यास लागणाऱ्या कायम आणि हंगामी कामगारांची संख्या अवलंबून असते. मात्र जवळ जवळ सर्वच सहकारी साखर कारखान्यात सर्वच विभागात अधिक संख्येने कामगार नेमल्याचे दिसून येते. त्यामुळे कारखान्याच्या प्रशासकीय खर्चात मोठी वाढ होते. राजकीय व सामाजिक दबावामुळे कारखान्यात आवश्यकतेपेक्षा अधिक कामगारांची भरती केली जाते.

**(१०) अकार्यक्षम कामगार :-**

सहकारी साखर कारखान्यातील प्रशासकीय सेवक आणि सेवक वर्ग पुरेसा कार्यक्षम नसल्याबाबत टीका केली जाते. कर्मचारी राजकीय वजन वापरून नोकरीस लागल्याने राजकीय कारणापोटी अकार्यक्षम व चुकार कामगारावर कारवाई केली जात नाही. कामगारांच्या अकार्यक्षमतेचा परिणाम एकूण प्रशासनावर होतो.

**(११) आजारी साखर कारखाने :-**

आजारी साखर कारखान्यांसंदर्भात राज्य शासनाने १९८७ मध्ये शिवाजीराव पाटील समितीच्या अहवालावर अभ्यास करण्यासाठी मा. प्रधान सचीव यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती नेमली होती. त्यांच्या मते २८ कारखाने आजारी होते. त्यापैकी १३ अतिआजारी होते. १९९५ मध्ये ही संख्या ६० वर गेली. १९९६ मध्ये ९१ साखर कारखाने तोट्यात होते. २००४-०५ मध्ये ८४ कारखाने बंद होते. ऊसाचा अपुरा पुरवठा, अपुरे खेळते भांडवल, कर्जाचा बोजा, चुकीचे धोरण इत्यादी कारणाने कारखाने, आजारी आहेत. या कारखान्यांच्या पुर्नवसनाबाबत राज्य शासनाने कोणतेही ठोस धोरण स्वीकारले नाही.

**(१२) आयकाराचा प्रश्न :-**

आयकर खात्याने कारखान्यांनी दिलेला अंतिम ऊसभाव अमान्य करून ऊस भावापेक्षा जास्त दिलेली ऊस किंमत करपात्र करून आयकाराची आकारणी केलेली आहे. त्यामुळे अनेक कारखान्यांनी कोर्टात अपिल दाखल केलेले आहे.

**(१३) अपुरे भांडवल :-**

साखर कारखान्यांना पुरेसे कायमचे भांडवल गोळा करण्यात यश येत नसल्याने राज्य शासनाने सुरुवातीला स्थिर भांडवल पुरविले. मात्र बऱ्याच कारखान्यांनी स्थापनेस दशक होऊनही राज्य शासनाचे भांडवल परत केलेले नाही. शिवाय स्वतःचा निधी ऊभारून पुरेसे भांडवल कारखान्यांना निर्माण करता आलेले नाही. त्यामुळे दरवर्षी सरकारी बँकांच्या माध्यमातून त्यांना खेळते भांडवल पुरवावे लागते त्याचे व्याज वाढून कारखाने नुकसानीत येतात.

**(१४) अग्रिमावर अपुरे नियंत्रण :-**

कारखान्याद्वारे बिगर ऊस उत्पादक सभासदांना ऊस खरेदी, कर्मचारी व संचालकांच्या प्रवास भत्यापोटी तसेच सामुग्री खरेदीसाठी उचल रकमा दिल्या जातात. बऱ्याच वेळा अशा रकमा देताना नियम पाहिले जात नाहीत. अशा रकमा दीर्घकाळ येणे सदरात दाखवल्या जातात. अशा रकमा अडकून राहतात. त्यामुळे कारखान्यांचे नुकसान होते.

**(१५) अनावश्यक क्षमता वाढ :-**

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांमध्ये कार्यक्षेत्रातील उपलब्ध ऊसाचा विचार न करता गाळप क्षमता वाढवण्याची इर्षा निर्माण झाली आहे. त्यात कोट्यावधी रूपये भांडवल गुंतवले जाते आणि ऊस उपलब्ध न झाल्याने वाढीव क्षमतेचा वापर होत नाही. मात्र खर्च वाढून कारखाने नुकसानीत येण्याची शक्यता अधिक राहते.

**(१६) राजकारणाचा प्रभाव :-**

सहकारी साखर कारखान्यावर राजकीय प्रभाव असल्याचे दिसते. राजकीय नेतृत्व निर्माण होत असतानां प्रभाव पाडण्यासाठी साखर कारखान्यांचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. राजकीय सत्तेच्या चढाओढीत काळ्या बाजाराचे व्यवहार, गळेकापू स्पर्धा इत्यादींमुळे आजारी साखर कारखान्यांची संख्या वाढत आहे. पैसा व वेळेचा अपव्यय होत असनू कारखाने आपल्या उद्देशापासून दूर जात असल्याचे दिसून येते.

**(१७) उपपदार्थाचा किफायतशीर वापर करण्यात अपयश :-**

बहुतांशी साखर कारखान्यांनी वापरासाठी, डिस्टीलरीज, कागद कारखाने, प्लायवूड प्रकल्प, सहवीज निर्मिती इत्यादी प्रयत्न केले, मात्र यामधील बहुतांशी प्रकल्पांचा किफायतशीर वापर करून साखरेचा उत्पादन खर्च कमी करण्यात यश आले नाही. उपपदार्थ निर्मितीचे प्रकल्प नुकसानीत आहेत. किंवा त्यांचा नफा अतिशय कमी मिळतो.

## २.८ महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ :

महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, म्हणजेच 'शुगर लॉबी' महाराष्ट्राच्या राजकारण आणि अर्थकारणातील सर्वात प्रभावी दबाव गट समजला जातो. इ. स. १९५६ मध्ये कै. वसंतदादा पाटील आणि कै. धनंजयराव गाडगीळ यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ या सहकारी साखर कारखान्यांच्या शिखर संस्थेची मुंबई येथे स्थापना करण्यात आली. राज्यातील सर्व सहकारी आणि खाजगी साखर कारखाने संघाशी संलग्न आहेत. साखर कारखानदारीच्या प्रसारामध्ये व उत्कर्षामध्ये साखर संघाने अत्यंत मोलाची व निर्णायक भूमिका बजावली आहे. साखर हा केंद्र शासनाच्या अखत्यातरितील विषय असल्याने दिल्ली स्तरावर सततचा पाठपुरावा ठेवून त्याचवेळी राज्य शासनाशी संपर्कात राहून संघाने राज्यातील सहकारी साखर कारखानदारीला गेल्या सातत्याने देशातील साखर उद्योगाच्या अग्रभागी ठेवले असून नव्या शतकाला सामोरे जाताना साखर संघाने जागतिक स्तरावरील अत्याधुनिक ज्ञान, शोध यांची उपलब्धता राज्यातील ग्रामीण भागात विखुरलेल्या आपल्या सभासद कारखान्यांना त्वरित व परिणामकारकरित्या करून दिलेली आहे. ऊसतोडणी संयंत्र, कोजनरेशन, इथेनॉल, प्युचर

ट्रेडिंग, शुगर ट्रेड ऑनलाईन, इनव्हर्टशुगर इत्यादी तसेच संगणकीकरण व सभासद कारखान्यातील विभागप्रमुखांसाठी आखलेली अभ्यास-शिबिरे व सेमिनार यांचा विशेष उल्लेख करता येण्यासारखा आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ ही राज्यातील सहकारी साखर उद्योगाची प्रातिनिधिक स्वरूपाची शिखर संस्था आहे. संस्थेच्या संचालक मंडळावर राज्यातील सर्व सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष, संचालक, प्रशासक यांचा समावेश असतो. या व्यतिरिक्त संघाचे अध्यक्ष व माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष, स्वीकृतही सदस्य, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्षसंचालक, वसंतदादा शुगर टेक्नोलॉजी संस्थेचे महासंचालक, इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनचे महाप्रबंधक, महाराष्ट्र राज्य सहकारी विपणन महासंघाचे संचालक, कृषि आयुक्त आणि उद्योग आयुक्त इत्यादी संघाच्या संचालक मंडळावर असतात.

संचालक मंडळाच्या स्वरूप आणि कार्यपद्धती खालीलप्रमाणे आहे:

(१) सहकारी साखर उद्योगातील सर्वांत प्रभावाली व्यक्ती आपापल्या साखर कारखान्याचे संचालक मंडळावर प्रतिनिधित्व करतात. अध्यक्षपदावर असलेल्या आणि अध्यक्षपदावर नसलेल्या परंतु त्या कारखान्याशी निगडित 'सर्वेसर्वा' संचालक मंडळावर कारखान्याचे प्रतिनिधित्व करतात.

(२) काही सन्माननीय व्यक्ति आणि शासन व वित्तीय संस्थाच्या प्रतिनिधी यांचा अपवाद वगळता, महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय असलेल्या बहुसंख्य व्यक्ती संचालक मंडळाचे सदस्य आहेत.

(३) ज्या प्रमाणे भारताचे पंतप्रधान फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स आणि इंडिस्ट्रीजच्या वार्षिक सभेचे उद्घाटन करतात, त्याचप्रमाणे संघाच्या वार्षिक सभेचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री करतात. याचाच अर्थ साखर संघ आणि महाराष्ट्र शासन यांच्यातील घनिष्ठ संबंध ही वस्तुस्थिती जगजाहीर आहे. याच प्रत्यक्ष संबंधांमुळे सहकारी साखर उद्योग आपल्या समस्यांचे निवारण करण्यासाठी वार्षिक सर्वसाधारण सभेचा आणि दैनंदिन संपर्काचा उपयोग करतो. या प्रक्रियेस 'महाराष्ट्राच्या राजकारणाचे साखरीकरण' असे करता येईल. प्रा. रजनी कोठारी यांनी म्हटल्याप्रमाणे राजकारणाला संस्थात्मक पाया लाभतो आणि साखर उद्योगाचे राजकियीकरण घडून येते.

संघाच्या कार्यकारी मंडळाची औपचारिकरीत्या संचालक मंडळाद्वारे तीन वर्षांच्या कालावधीसाठी निवड करण्यात येते. त्यात अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष माजी अध्यक्ष (पदसिद्ध सदस्य) आणि ३८ सभासद असतात. शासन आणि वित्तीय संस्थाचे प्रतिनिधी त्यात समाविष्ट असतात. प्रभावी सदस्यातीलसर्वांत प्रभावी सदस्य, म्हणजेच महाराष्ट्राच्या राजकारणातील 'सत्ताकेंद्र' समजल्या जाणाऱ्या नेत्यांचा त्यात समावेश झालेला असतो.

कार्यकारी मंडळाची मासिक सभा आयोजित करण्यात येते आणि त्यात उद्योगाशी निगडित विविध बाबींची चर्चा कण्यात येते आणि कृती कार्यक्रमाविषयी निर्णय घेतले जातात.

संचालक मंडळ कार्यकारी मंडळाव्यतिरिक्त साखर उद्योगाशी निगडित विविध समस्या बाबींसंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार असलेल्या खालील विषय समित्यांची निवड करते.

**(१) खरेदी समिती :** साखर उद्योगासाठी लागणारी यंत्रसामुग्री आणि अन्य आदानांची मध्यवर्ती खरेदी. नवीन साखर कारखान्यात यंत्रसामुग्री संपादन करण्यात सहाय्य.

**(२) विपणन समिती :** साखरेची देशांतर्गत विक्री, निर्यात, लेव्ही व खुल्या बाजारात विक्रीसाठी असलेली साखर व तत्सम बाबींसंबंधी शासनाशी संपर्क व उद्योगाच्या हितसंबंधांची जोपासना.

**(३) आजारी कारखाने समिती :** आजारी कारखान्यांच्या समस्या आणि त्यांचे पुनर्वसन यासाठी विशेष प्रयत्न.

**(४) मजूर व कामगार व्यवस्थापन समिती :** साखर उद्योगात औद्योगिक शांतता नांदावी, साखर उद्योगातील कामगारांच्या कल्याणाचे उपक्रम आणि त्यांच्या समस्यांचे सामोपचाराने निवारण.

**(५) नवीन कारखाने समिती :** नवीन सहकारी साखर कारखाने स्थापन करण्याबाबत प्रवर्तकांना मार्गदर्शन व साहाय्य.

**(६) उपपदार्थ समिती :** साखर उद्योगात साखरेच्या उत्पादनांच्या बरोबरच जोड उत्पादने घेण्याबाबत उद्योगांना मार्गदर्शन व तांत्रिक साहाय्य.

वसंतदादा इन्सिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलॉजी तांत्रिक बाबतीत संघाला साहाय्य करते.

संघाची प्रादेशिक कार्यकालचे नागपूर, पुणे येथे स्थापन करण्यात आली आहेत.

महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाची संघटनात्मक रचना खालील आकृतीत क्रमांक २.१ मध्ये विशद करण्यात आली आहे :

**आकृती २.१ : महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ.**

**संघटनात्मक रचना**

**संचालक मंडळ (प्रतिनिधिक सभा)**

|

**कार्यकारी मंडळ**

| **विषय समित्या** | **प्रादेशिक कार्यालये** |
|---|---|
| (१) खरेदी समिती | (१) पुणे |
| (२) विपणन समिती | (२) नागपूर |
| (३) मजूर व कामगार व्यवस्थापन | (३) औरंगाबाद |
| (४) आजारी कारखाने समिती | |
| (५) नवीन कारखाने समिती | |
| (६) उपपदार्थ समिती | |

## २.९ महाराष्ट्रातील साखर कारखानदारीची सद्य स्थिती :

सन २००८-०९ अखेर महाराष्ट्रातील साखर कारखानदारीच्या सद्य स्थितीचे विवरण खालील तक्ता क्र. २.१४ मध्ये करण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक २.१४**

**महाराष्ट्रातील साखर कारखानदारीची सद्य स्थिती (२००८-०९)**

| अ. क्र. | तपशील | सांख्यिकी |
|---|---|---|
| १ | उभारण्यात आलेले साखर कारखाने<br>(अ) सहकारी साखर कारखाने १६६<br>(ब) खाजगी साखर कारखाने २८ | १९४ |
| २ | उत्पादन घेणारे कारखाने | १४४ |
| ३ | उत्पादन न घेणारे कारखाने | ५० |
| ४ | अवसयानात गेलेले कारखाने | २९ |
| ५ | भाडे तत्वावर चालवण्यास दिलेले कारखाने | २० |
| ६ | (अ) कारखान्यांची उत्पादन क्षमता (TCD)<br>(ब) प्रत्यक्षी वापर (TCD)<br>(क) उत्पादन क्षमतेच्या वापराची टक्केवारी | ४,७२,२००<br>३,७८,७६६<br>७८.१६ |
| ७ | सरासरी साखरेच्या उताऱ्याची टक्केवारी | ११.४४ |
| ८ | उत्पादन कार्याचे सरासरी दिवस | ९५ |
| ९ | साखरेचे उत्पादन (क्विंटल) | १,५४, ३५,१५६ |

**स्त्रोत :** महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, सांख्यिकी, २०१०.

वर निर्दिष्ट केलेल्या बाबींचे जिल्हानिहाय विवरण खालील तक्ता क्रमांक २.१५ मध्ये देण्यात आले आहे.

## तक्ता क्रमांक २.१५

## महाराष्ट्रातील साखर कारखान्यांची जिल्हानिहाय स्थिती (२००८-०९)

| जिल्हा | सुस्थितील ा कारखाने | बिकट अवस्थेतील कारखाने | | | | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अवसयनात* | भाडेतत्वार | अवसयनात | बंद असलेले | एकूण | |
| (१) कोल्हापूर | १८ | १ | १ | - | - | २ | २० |
| (२) सांगली | ११ | १ | - | - | ४ | ५ | १६ |
| (३) सातारा | ७ | ३ | - | - | - | ३ | १० |
| (४) पुणे | १५ | - | - | - | - | - | १५ |
| (५) सोलापूर | १५ | - | - | १ | ३ | ४ | १९ |
| (६) अहमदनगर | १४ | २ | - | - | २ | ४ | १८ |
| (७) नाशिक | ५ | १ | - | १ | - | २ | ७ |
| (८) धुळे | १ | - | - | २ | - | २ | ३ |
| (९) नंदुरबार | ३ | - | - | - | - | - | ३ |
| (१०) जळगाव | ३ | - | - | - | ४ | ४ | ७ |
| (११) औरंगाबाद | ४ | - | - | २ | २ | ४ | ८ |
| (१२) जालना | २ | - | - | १ | १ | २ | ४ |
| (१३) बीड | ४ | - | - | - | ४ | ४ | ८ |
| (१४) परभणी | १ | १ | - | १ | - | २ | ३ |
| (१५) हिंगोली | १ | २ | - | - | - | २ | ३ |
| (१६) नांदेड | ३ | १ | - | २ | १ | ४ | ७ |
| (१७) उस्मानाबाद | ८ | - | - | - | ३ | ३ | ११ |
| (१८) लातूर | ७ | १ | १ | - | २ | ४ | ११ |
| (१९) बुलढाणा | १ | - | - | २ | १ | ३ | ४ |
| (२०) यवतमाळ | २ | २ | - | - | - | २ | ४ |
| (२१) अकोला | - | - | - | १ | १ | २ | २ |
| (२२) वाशिम | - | - | - | १ | - | १ | १ |
| (२३) अमरावती | १ | - | - | - | ३ | ३ | ४ |
| (२४) वर्धा | १ | - | - | - | १ | १ | २ |
| (२५) नागपूर | १ | - | - | - | २ | २ | ३ |
| (२६) भंडारा | - | - | - | - | १ | १ | १ |
| | **१२९** | **१५** | **२** | **१६** | **३२** | **६५** | **१९४** |

***** अवसयनातील साखर कारखाने भाडे तत्वावर चालवण्यास दिली.

**स्त्रोत :** महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, सांख्यिकी -२०१०.

वरील तक्त्यावरून खालील बाबी स्पष्ट होतात :

(१) राज्यातील साखर कारखानदारीची परिस्थिती बिकट आहे.

(२) राज्यातील एक तृतीयांश साखर कारखाने बंद अवस्थेत किंवा अवसयानात गेले आहे.

(३) खानदेश, मराठवाडा आणि विदर्भातील साखर कारखानदारीची अवस्था चिंताजनक आहे.

(४) अवसयानात गेलेल्या काही कारखान्यांना उर्जितअवस्था प्राप्त व्हावी यासाठी ते सुस्थितीत असणाऱ्या कारखान्यांकडे भाडे तत्वाने चालवण्यास दिले आहे.

(५) सहकारी साखर कारखान्यांच्या तुलनेत खाजगी क्षेत्रातील कारखान्यांची परिस्थिती अधिक समाधानकारक आहे.

(६) या पुढच्या काळात खाजगी साखर कारखान्यांची स्पर्धा वाढणार आहे आणि त्यांच्याशी स्पर्धा करणे सहकारी साखर कारखान्यांना कठीण जाणार आहे.

सद्य स्थितीचे अधिक बारकाईने निरीक्षण करण्यासाठी सन २००८-०९च्या ऊस गाळप हंगामाचे विभागवार विश्लेषण खालील तक्ता क्रमांक २.१६ मध्ये करण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक २.१६**

**ऊस गाळपाचे दिवस-विभागवार**

**(साखर वर्ष २००८-०९)**

| **ऊस गाळपाचे दिवस** | **विभागवार कारखान्यांची संख्या** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **दक्षिण महाराष्ट्र** | **मध्य महाराष्ट्र** | **खानदेश** | **मराठवाडा** | **विदर्भ** | **एकूण** |
| ० दिवस | ०५ | ०६ | ०६ | २१ | १२ | ५० |
| १ ते २५ | ०२ | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०५ |
| २६ ते ५० | ०० | ०० | ०१ | ०३ | ०१ | ०५ |
| ५१ ते ७५ | ०० | ०२ | ०१ | ०९ | ०५ | १७ |
| ७६ ते १०० | १४ | १३ | ०४ | १४ | ०१ | ४६ |
| १०१ ते १२५ | १६ | १९ | ०० | ०५ | ०० | ४० |
| १२६ ते १५० | ०८ | ११ | ०० | ०२ | ०० | २१ |
| १५० पेक्षा अधिक | ०० | ०० | ०१ | ०३ | ०१ | ०५ |
| **एकूण** | ४६ | ६० | १३ | ५५ | २० | १९४ |

**स्त्रोत :** महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ सांख्यिकी, २०१०

**चिंताजनक परिस्थिती :** ० ते ५० दिवस – ६० साखर कारखाने

**असमाधानकारक परिस्थिती :** ५१ ते १०० दिवस – ६३ साखर कारखाने

**समाधानकारक परिस्थिती :** १०१ पेक्षा अधिक दिवस ५० दिवस – ७१ साखर कारखाने

**तक्ता क्रमांक २.१६ (A)**

**महाराष्ट्र साखर कारखान्यांची सद्य स्थिती**

| विभाग → | पश्चिम महाराष्ट्र | | उत्तर महाराष्ट्र | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| परिस्थिती ↓ | दक्षिण महाराष्ट्र | मध्य महाराष्ट्र | खानदेश | मराठवाडा | विदर्भ | एकूण |
| चिंताजनक | ०७ | ०६ | ०८ | २५ | १४ | ६० |
| असमाधानकारक | १४ | १५ | ०५ | २३ | ०६ | ६३ |
| समाधानकारक | २५ | ३९ | ०० | ०७ | ०० | ७१ |
| **एकूण** | ४६ | ६० | १३ | ५५ | २० | १९४ |

वरील तक्त्यांवरून खालील बाबी स्पष्ट होतात.

(१) राज्यातील १९४ पैकी १०६ साखर कारखाने असलेल्या पश्चिम महाराष्ट्रात ६४ कारखान्यांची परिस्थिती समाधानकारक, २९ कारखान्यांची परिस्थिती असमाधानकारक आणि १३ कारखान्यांची परिस्थिती चिंताजनक आहे.

(२) राज्यातील १९४ पैकी ८८ साखर कारखाने असलेल्या उत्तर महाराष्ट्रात फक्त मराठवाड्यातील ७ साखर कारखान्यांची परिस्थिती समाधानकारक आहे आणि उर्वरित ८१ कारखान्यांची परिस्थिती असमाधानकारक किंवा चिंताजनक आहे. खानदेशातील ५, मराठवाड्यातील २३ आणि विदर्भातील ६, म्हणजेच ३४ कारखान्यांची परिस्थिती असमाधानकारक आहे. या विभागात समाविष्ट खानदेशातील ८, मराठवाड्यातील २५ आणि विदर्भातील १४, म्हणजेच एकूण ४७ कारखान्यांची परिस्थिती चिंताजनक आहे.

## २.१० कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारी :


दक्षिण महाराष्ट्रात विभागातील कोल्हापूर जिल्हा राज्यातील साखर कारखानदारीत राज्यातील आघाडीचा जिल्हा आहे. या जिल्ह्यात १८ सहकारी आणि २ खाजगी साखर कारखाने आहेत. त्यातील आजरा सहकारी साखर कारखाना भाडे तत्वावर रेणुका शुगर या खाजगी क्षेत्रातील कारखान्यास चालवण्यासाठी देण्यात आला आहे, तर अवसयान गेलेला दत्त असुर्ले सहकारी साखर कारखाना भाडे तत्त्वावर तात्यासाहेब कोरे-वारणा सहकारी साखर कारखान्यास चालवण्यासाठी देण्यात आला आहे. उर्वरित अठरा पैकी सतरा साखर कारखाने सुस्थितीत आहेत. इंदिरा गांधी महिला साखर कारखान्यात या हंगाम गाळप क्षमतेच्या एक-चतुर्थांश क्षमतेचे उत्पादन घेण्यात आले होते

## तक्ता क्रमांक २.१७

## कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारी (साखर वर्ष २००८-०९)

| अ. क्र. | साखर कारखान्याचे नाव | गाळप क्षमता प्रतिदिनी (मे.टन) | उस गाळप (मे. टन) | साखर उत्पादन (क्विंटल) | साखर उतारा (टक्के) | एकूण गाळप दिवस | गाळप क्षमता वापर (टक्के) | मळी उत्पादन (क्विंटल) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आजरा | २५०० | २३७१२० | २८७१९८ | १२.११ | ९० | ९६.६१ | ९३८९१ |
| २. | भोगावती (परिते) | ४००० | ३७४०२१ | ४६७५६२ | १२.५० | १०८ | ८०.३६ | १४३६२९ |
| ३. | छत्रपती राजाराम | २२०० | २८६७०५ | ३३२६८१ | ११.६० | ९९ | १२१.२३ | १२१५९३ |
| ४. | छत्रपती शाहू | ३५०० | ७०५७५४ | ९०५६१९ | १२.८३ | १८० | १२६.०३ | २४५०५२ |
| ५. | ?. भ. रत्नाप्पा अण्णा कुंभार पंचगंगा | ५००० | ३४३९३७ | ४०४१९० | ११.७५ | ८५ | ७४.५१ | १२८९०८ |
| ६. | डी. वाय पाटील | २५०० | २२५०४६ | २७२२८७ | १२.१० | ८९ | ९३.४६ | ८४०१२ |
| ७. | दत्त (असुर्ले) | २५०० | २४२४०२ | २९८१५३ | १२.३० | ९८ | ९१.७० | ९४५०९ |
| ८. | दत्त (शिरोळ) | ७००० | ८७४९६० | १११४०९५ | १२.७३ | ११५ | १००.२९ | ३३३०५६ |
| ९. | दौलत शेतकरी | ३५०० | २६२१२६ | २८५६३१ | १०.९० | ९७ | ७१.९५ | १३००८६ |
| १०. | दूधगंगा वेदगंगा | ४५०० | ४७०८९६ | ६०९४८३ | १२.९४ | १०९ | ८८.८२ | २०९११३ |
| ११. | गडहिंग्लज | २००० | २५२४०४ | २९७८३५ | ११.८० | १०८ | १०७.९९ | ९५५०१ |
| १२. | इंदिरा गांधी भा. महिला | २५०० | ५४१६५ | ५८७७० | १०.८५ | ८३ | २४.२७ | २३६६५ |
| १३. | जवाहर | ७५०० | ८८२९७९ | १०७८७१९ | १२.२२ | १०८ | १००.६६ | ३५२१०५ |
| १४. | कुंभी कासारी | ३००० | ४५७९७० | ५९३७४१ | १२.९६ | ११७ | ११९.७८ | १५६६२५ |
| १५. | एस. एम. कागल तालुका | २५०० | ३७२५०० | ४८७५८६ | १३.०९ | ११९ | ११५.०६ | १५१८५२ |
| १६. | शरद | २५०० | ३०९३०३ | ३७८४६४ | १२.२४ | ९१ | १२५.२४ | १२०८३७ |
| १७. | श्री, गुरुदत्त (टकलीवाडी) (प्रा.) | २५०० | ३९०९०४ | ४८८८०१ | १२.५० | १०६ | १३५.६६ | १४८३३३ |
| १८. | तात्यासाहेब कोरे (वारणा) | ७५०० | १०७५४२१ | १३११५७२ | १२.२० | १३७ | ९६.३५ | ३५३२७४ |
| १९. | उदयसिंगराव गायकवाड | २५०० | २२३५४० | २६८१४० | १२.०० | १०६ | ८४.३५ | NA |
| २०. | नलावडे शुगर (प्रा.) | २५०० | १३७३८८ | १४८१५३ | १०.७८ | ९४ | ५३.८४ | ५१९०६ |
| २१. | **एकूण** | ७२२०० | ८१७९५३१ | १००८८६८० | १२.३३ | १०७ | ९५.४१ | ३०३७९२३२ |

**स्त्रोत :** महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ सांख्यिकी - २०१०




कोल्हापूर जिल्हा - साखर कारखाने

१) आजरा
२) भोगावती, परिते
३) छत्रपती राजाराम
४) छत्रपती शाहू
५) दत्त, आसुर्ले-पोर्ले
६) दत्त, शिरोळ
७) दौलत
८) दुधगंगा वेदगंगा
९) गडहिंग्लज
१०) जवाहर
११) स. मंडलिक कागल
१२) कुंभी - कासारी
१३) दे.भ.र.कुंभार पंचगंगा
१४) शरद
१५) तात्यासाहेब कोरे वारणा
१६) उदयसिंह गायकवाड
१७) इंदिरा गांधी महिला
१८) डी.वाय. पाटील
१९) गुरूदत्त
२०) नलावडे शुगर

वरील तक्त्यावरून खालील बाबी स्पष्ट होतात :

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारीची परिस्थिती समाधानकारक आहे. या जिल्ह्यातील साखर कारखान्यांची गाळप क्षमता राज्यात सर्वाधिक असून, तिचा २००८-०९ साखर वर्षात ९५.४१ वापर करण्यात आला होता.

(२) छत्रपती राजाराम स. सा. कारखान्याचा गाळप क्षमता हंगाम १८० दिवसांचा, तर इंदिरा गांधी भा. म. स. सा. कारखान्याचा गाळप हंगाम ८३ दिवसांचा होता. जिल्ह्याची गाळप हंगामाची सरासरी १०७ दिवसांची, म्हणजेच समाधानकारक होती.

(३) २००८-०९ साखर वर्षात ८१,७९,५३१ मे. टन ऊसाचे गाळप करून, १,००,८८,६८० क्विंटल साखरेचे उत्पादन घेण्यात आले.

(४) साखर उताऱ्याची सर्वाधिक १३.९ टक्केवारी सदाशिवराव मंडलिक स. सा. कारखान्याची, तर सर्वात कमी १०.७८ टक्केवारी नलावडे शुगरची होती. जिल्ह्याची साखर उताऱ्याची सरासरी टक्केवारी १२.३३ होती.

(५) सह उत्पादने घेण्यासाठी मळीचे उत्पादन ३,०३,७९,२३२ क्विंटल होते.

(६) व्यष्ठी अध्ययनासाठी निवडलेल्या श्री. भोगावती स. सा. कारखान्याची परिस्थिती समाधानकारक होती.

☆☆☆

# प्रकरण ३ : श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., शाहूनगर परिते, ता. करवीर, जि. कोल्हापूर, वाटचालीचा आढावा

## ३.१ प्रास्ताविकः

महाराष्ट्रामध्ये पहिला सहकारी साखर कारखाना पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी बेलापूर रेल्वे स्टेशन पासून २५ कि. मी. अंतरावर लोणी येथे 'प्रवरा सहकारी साखर कारखाना' सुरू केला. तो यशस्वी झाल्यामुळे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी सहकारी साखर कारखाने अस्तित्वात आले. पश्चिम महाराष्ट्रामध्ये पहिल्या चार सहकारी साखर कारखान्यांची नोंदणी करण्यात आली. श्री. भोगावती सहकारी साखर कारखाना हा त्यापैकी एक होय. या संस्थेची मुंबई राज्याच्या सहकारी संस्था कायदा १९२५ च्या तरतुदीखाली रजि. नं. जी २७३ अन्वय १८ ऑक्टो. १९५५ रोजी नोंदणी झाली. पहिली सभा कौलव घोटवडे येथील शाळेत ११ डिसेंबर १९५५ रोजी होऊन तीत मे रजिस्ट्रार सो. को. ऑ. सोसायटी पुणे यांनी मंजूर केलेल पोटनियम यातील दुरुस्तीसह स्वीकारले. 'श्री. भोगावती सहकारी साखर कारखाना लि. शाहूनगर परिते' असे त्याचे नामकरण करण्यात आले. पहिल्या पाच वर्षांकरिता डायरेक्टर बोर्ड, मे. रजिस्ट्रार को. ऑ. सोसायटी पुणे यांनी २९ मार्च १९५६ रोजी नियुक्त केले. त्यामध्ये मुंबई राज्य सहकारी बँकेचे प्रतिनिधी श्री. व्ही. पी. वर्दे यांची चेअरमन महणून नियुक्ती केली. दादासाहेब कृष्णराव पाटील यांची व्हा. चेअरमन म्हणून नियुक्ती झाली. कारखान्याचे मुख्य प्रवर्तक कै. दादासाहेब कृष्णराव पाटील कौलवकर हे असून, या सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीमध्ये संस्थापक संचालक असलेल्या मा. प्रतापराव जीवराव जाधव, कै. एकनाथ ज्ञानोबा पाटील, कै. दत्तात्रय रामजी पाटील, कै. गणपतराव आबाजी डोंगळे, कृष्णाजी शंकरराव चौगुले, काशिनाथ हरी कुलकर्णी, सदाशिव रावजी पाटील, माणिक हरी पाटील, रामचंद्र बाबुराव पाटील, सखाराम बाबाजी पाटील या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. कारखान्याच्या चेअरमन पदाची धुरा सुरुवातीला कै. दादासाहेब कृष्णराव पाटील (कौलवकर) यांनी सांभाळली.

## ३.२ श्री. भोगावती सहकारी साखर कारखानाः

कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण १२ तालुके यापैकी करवीर आणि राधानगर या दोन तालुक्यातील ग्रामीण जनतेचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दृष्ट्या सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशातून श्री. भोगावती सहकारी साखर कारखान्यांची उभारणी करण्यात आलेली आहे. कोल्हापूर शहराच्या नैऋत्य दिशेला कोल्हापूर राधानगर या रस्त्यालगत २४

कि. मी. अंतरावर मौजे परिते ता. करवीर या गावांच्या माळरानावर कारखान्याची स्थापना करण्यात आलेली आहे. हे ठिकाण करवीर राधानगर तालुक्यांच्या मध्यवर्ती असे आहे. या परिसरामध्ये कारखान्यालगतच उत्तरेच्या बाजूने पश्चिमेकडून पूर्वेकडे भोगावती नदी वाहत असल्याने कारखान्याचे 'श्री. भोगावती सहकारी साखर कारखाना' असे नामकरण करण्यात आले. सुरुवातीला कारखाना ज्या परिसरामध्ये स्थापन करण्यात आला त्या ठिकाणची सर्व जमीन पडीक, डोंगराळ, वरकस स्वरूपाची होती. तिच्या मध्ये भुईमूग, नाचणी, तूर, जनावरांना चारा अशी पिके घेतली जात असते.

कारखान्यांचे परिसर क्षेत्र १३० एकर इतके असून कारखान्याच्या मुख्य इमारतीशिवाय कारखान्याच्या परिसरात चालवल्या जाणाऱ्या शैक्षणिक संस्था, कर्मचाऱ्यांची निवासस्थाने, नारळ, आंबा, चिकू, पोफळी, फलोद्यान प्रकल्प, गाडी अड्डा, वाहनतळ, मोलॅसिसची विल्हेवाट इत्यादी साठी पुरेशी जमीन उपलब्ध आहे. या कारखान्याच्या उभारणीसाठी लागणारी जमीन ज्या ज्या जमीन मालकांनी दिलेली आहे त्यांना त्यावेळच्या शासकीय दराप्रमाणे रोख रक्कम तर देण्यात आलेली आहेच, शिवाय जमीन मालकांच्या नातेवाईकांना साखर कारखान्याच्या नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात आलेले आहे.

करवीर आणि राधानगर या दोन तालुक्यातील सुमारे ५३ गावांतील ३१/०३/२००५ अखेर अ वर्ग व ब वर्ग सभासदांची संख्या २८,९३५ इतकी आहे.* या सर्वांना कारखान्यांच्या वेगवेगळ्या सुविधांचा लाभ मिळालेला आहे. कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात ज्या गावांचा समावेश आढळतो. त्या गावांची तालुका निहाय स्थिती खालील तक्ता क्र. ३.१ मध्ये देण्यात आली आहे.

* यामध्ये ऊस उत्पादक सभासदांची संख्या १८,५२५ असून ब वर्ग सभासदांची संख्या १०,४१० इतकी आहे.

## तक्ता क्रमांक ३.१

## ऊस पुरवठा करणारी करवीर व राधानगरी तालुक्यातील गांवे

| करवीर तालुका | | | राधानगरी तालुका | | |
|---|---|---|---|---|---|
| गावाचे नांव | | सभासद संख्या (१९९४-९५) | गावाचे नांव | | सभासद संख्या (१९९४-९५) |
| १. | कुरूकली | ६७७ | २२. | राशिवडे (बु.) | ९१४ |
| २. | कोथळी | ५१९ | २३. | यळवडे | ४०१ |
| ३. | बेले | ४२४ | २४. | कोदवडे | १२६ |
| ४. | म्हाळुंगे | ५०१ | २५. | वाघवडे | १०० |
| ५. | हळदी | ४०० | २६. | मोहडे | १६५ |
| ६. | वाशी | ३०८ | २७. | कौलव | ८८० |
| ७. | शेळकेवाडी | ८० | २८. | घोटवडे | ४८८ |
| ८. | कांडगाव | ४०५ | २९. | ठिकपुर्ली | ४९४ |
| ९. | देवाळे | ३९९ | ३०. | शिरगाव | ५४८ |
| १०. | कुर्डू | ३६२ | ३१. | आवळीखुर्द | २४३ |
| ११. | सडोली खालसा | ७३२ | ३२. | पुंगाव | ३५७ |
| १२. | आरे | ६७४ | ३३. | राशिवडे खुर्द | ११६ |
| १३. | बाचणी | ५९९ | ३४. | मुसळवाडी | ५३ |
| १४. | हसूर | ५७० | ३५. | कांबळवाडी | १५१ |
| १५. | भाटणवाडी | १७० | ३६. | तरसंबळे | ११३ |
| १६. | सोनाळी | २४१ | ३७. | घुडेवाडी | १७४ |
| १७. | पाटेकरवाडी | १२० | ३८. | चाफोडी | १०० |
| १८. | कांचनवाडी | २४१ | ३९. | आवळी (बु.) | ४७२ |
| १९. | म्हालसवडे | ३५८ | ४०. | आम. व्हरवडे | १७७ |
| २०. | हिरवडे खालसा | ३५५ | ४१. | आणाजे | २८६ |
| २१. | परिते | ६२६ | ४२. | सिरसे | २४० |
| करवीर तालुका एकूण | | ८७६१ | ४३. | खिंडी व्हरवडे | २९६ |
| | | | ४४. | करंजफेण | १५६ |
| | | | ४५. | गुडाळ | ६५९ |
| | | | ४६. | कुडूत्री | २२४ |
| | | | ४७. | सो. शिरोली | २३४ |
| | | | ४८. | कसबा तारळे | ५९९ |
| | | | ४९. | कलंकवाडी | ४८ |
| | | | ५०. | तारळखुर्द कुंभारवाडी | ४२० |
| | | | ५१. | कुक्कडवाडी | ४१ |
| | | | ५२. | पिरळ | २६५ |
| | | | ५३. | कंथेवाडी | २१४ |
| करवीर तालुका एकूण | | ८७६१ | राधानगरी तालुका एकूण | | ९७६४ |
| करवीर व राधानगरी तालुका एकूण - १८५२५ | | | | | |

कारखान्याचा स्त्रोत : (४४ वा वार्षिक अहवाल)

वरील दोन तालुक्यांतील गावांचा आणि त्यांच्या संख्येचा अभ्यास केला असता तुलनात्मक दृष्ट्या या कारखान्याचा लाभ राधानगर तालुक्यातील गावांना सर्वांत अधिक झालेला दिसून येतो.

कारखाना कार्यक्षेत्रामध्ये सुरूवातीला राधानगर तालुक्यातील धामोड प्रकल्प अस्तित्वात येण्यापूर्वी करवीर आणि राधानगर तालुक्यातून या कारखान्याला पुरेसा ऊसपुरवठा होत नसे. नजीकच्या कर्नाटक राज्यातून व शिरोळ तालुक्यातून ऊसाची आवक केली जात असे. बाहेरच्या ठिकाणाहून आणल्या जाणाऱ्या ऊसाला कारखाना परिसरातील शेतकरी सभासदांना जे फायदे दिले जात असत ते फायदे दिले जात होते. आपल्या कारखान्याला आपल्याच परिसरातील ऊस पुरेशा प्रमाणात उपलब्ध व्हावा यासाठी अनुक्रमे राधानगरी, धामोड या दोन प्रकल्पांची निर्मिती फायदेशीर ठरली आहे. या प्रकल्पावर आधारित उपसा जलसिंचन योजना पूर्ण झाल्यापासून तालुक्यात ऊसाचे उत्पादन वाढले आहे. परिणामी इतर जिल्ह्यातून अथवा राज्यातून ऊसाची आवक करण्याचे प्रमाण घटले आहे. सध्या साडेपाच ते सहा लाख मे. टन ऊसाचे गाळप प्रतिवर्षी केले जाते. या दोन तालुक्यांपैकी गाळप केल्या जाणाऱ्या ऊसापासूनचा लाभ राधानगरी तालुक्यातील शेतकरी सभासदांना अधिक झालेला दिसून येतो.

**३.३ गळीत हंगामानिहाय साखर उत्पादनः**

श्री.भोगवती सहकारी कारखान्याचा पहिला गळीत हंगाम १६/०२/१९५९ ते २४/०३/१९५९ पर्यंत ट्रायल सिझन म्हणून ३७ दिवस चालला. ३७ दिवसाच्या कालावधीत १६२९८ टन ऊसाचे गाळप करून १८८१३ साखर पोत्याचे उत्पादन करण्यात आले. या नंतरच्या प्रत्येक गळीत हंगामामध्ये साखर उत्पादन तसेच साखर उतारा सातत्याने वाढत गेल्याचे दिसून येते.

कारखान्याच्या प्रधान कार्यालयामध्ये विविध हंगामनिहाय साखर उत्पादनाची माहिती उपलब्ध असली तरी संशोधकाने आपल्या संशोधनासाठी सन १९९५-९६ ते २००४-०५ या दशकातील प्रगतीचा आढावा घ्यावयाचे निश्चित केले असल्याने त्याने या दशकातील साखर उत्पादनाचा अभ्यास केलेला आहे.

## तक्ता क्रमांक ३.२

## सन १९९५-९६ ते २००४-०५ या कालावधीतील साखर उत्पादन तपशील

| अ. नं. | वर्ष | गळीत हंगाम चालू | गळीत हंगाम बंद | उपलब्ध ऊस क्षेत्र एकर | एकूण गाळप मे. टन | एकूण साखर उत्पादन – पोती | साखर उतारा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १९९५–९६ | ०१/११/१९९५ | २७/०५/१९९६ | १९१३१.३२ | ७,६८,००८.०९९ | ९,२६,९७५ | १२.०५ |
| २. | १९९६–९७ | ०५/११/१९९६ | २७/०४/१९९७ | १७१७८.२७ | ५,७१,७५६.४०७ | ७,०७,७५५ | १२.३६ |
| ३. | १९९७–९८ | १४/११/१९९७ | २१/०४/१९९८ | १६९३९.३९ | ६,३५,१४४ | ७,६२,६८५ | १२.०० |
| ४. | १९९८–९९ | ०४/११/१९९८ | १५/०५/१९९९ | २३०८१.०४ | ७,७२,१८२ | ८,९२,४३५ | ११.५२ |
| ५. | १९९९–२००० | १४/११/१९९९ | १९/०४/२००० | २१०४७.८७ | ६,४०,८६७ | ७,९२,५२५ | १२.३५ |
| ६. | २०००–२००१ | ११/११/२००० | १५/०४/२००१ | १७८८५.९१ | ५,८६,१८४ | ७,२९,३१५ | १२.४० |
| ७. | २००१–२००२ | ०९/११/२००१ | ०६/०३/२००२ | १८०६३.५० | ५,१७,९५३ | ६,८३,३०० | १३.१६ |
| ८. | २००२–२००३ | ३०/१०/२००२ | २७/०३/२००३ | २००२८.७९ | ५,८४,१७० | ७,४०,८५० | १२.६८ |
| ९. | २००३–२००४ | १२/११/२००३ | २७/०१/२००४ | १८१९४.३१ | २,७३,३३७ | २,९८,४०० | १०.८५ |
| १०. | २००४–२००५ | १५/११/२००४ | ०९/०२/२००५ | १३७३१.३१ | २,७९,५३९ | ३,३७,५२० | ११.७३ |

कारखाना - वार्षिक अहवाल

कारखाना कार्यक्षेत्रातील पाणी पुरवठा प्रकल्पांचे काम पूर्ण झाल्यामुळे पिकांना बारमाही पाणी पुरवठा केला जाऊ लागला आहे. पाणी पुरवठ्याचा प्रश्न कायमचा सुटला आहे. बारमाही पाण्याची सोय झाल्यामुळे कारखाना क्षेत्रातील ऊस बागायतदारांची संख्या वाढलेली आहे असे असून देखील बाहेरच्या जिल्ह्यातून तसेच राज्यातून ऊसाची आवक केली जात आहे. यामुळे गळीत हंगामाचे दिवस वाढले आहेत, पर्यायाने साखर उत्पादन देखील वाढले आहे. साखर उत्पादनामध्ये देखील गुणात्मक वाढ झालेली आहे. मात्र गेल्या दोन वर्षामध्ये ऊसावर लोकरी माव्याचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने ऊसाचे उत्पादन कमी झाल्याने गळीत हंगामाचे दिवसही कमी होऊ लागले आहेत. साखर उताऱ्यामध्ये मात्र फारसा फरक झालेला नाही. लोकरी मावा नियंत्रणासाठी कायम स्वरूपी उपाय योजना केल्या नाहीत  तर मात्र साखर उत्पादनावर त्याचा विपरित परिणाम होण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

### ३.४ कारखान्याची ठळक वैशिष्ट्येः

१. कारखान्याच्या गळीत हंगामाची सुरूवात सन १९५९ साली १६२१८ मे. टन या प्राथमिक गाळप क्षमतेनी झाली. सद्यःची विस्तारीत दैनंदिन ऊस गाळप क्षमता ५००० मे. टन इतकी आहे.

२. कारखान्यामध्ये करवीर राधानगर या दोन तालुक्यातील ५३ गावांच्या परिसरामध्ये कारखान्याचे कार्यक्षेत्र विस्तारीत झालेले आहे.

३. भोगावती खोऱ्यातील कृषि, औद्योगिक, शैक्षणिक विकासाचा केंद्रबिंदू व सहकारी चळवळीचे स्फूर्तीस्थान म्हणजेच भोगावती सहकारी साखर कारखाना.

४. पांढऱ्या शुभ्र दर्जेदार साखरेचे उत्पादन करून सभासदांना अधिकाअधिक फायदे देण्यात आलेले आहेत.

५. इंडस्ट्रियल व इथाईल अल्कोहोल बरोबरच देशी मद्याचे उत्पादन करण्यावर भर देण्यात आलेला आहे.

६. हायस्कूल महाविद्यालयाबरोबरच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून तांत्रिक शिक्षणाची सोय करण्यात आलेली आहे.

७. कारखाना साईटवर २०००-२००१ पासून शेतकऱ्यांच्या सोयीसाठी मोफत माती परिक्षण केंद्र कार्यान्वीत करण्यात आलेले आहे.

८. इयत्ता ५ वी पासून इंग्रजी माध्यमाचे निवासी पब्लिक स्कूल सुरू करण्यात आलेले आहे.

९. सर्व सोयींनी युक्त सुसज्ज हॉस्पीटलची उभारणी करण्यात आलेली आहे.

१०. व्यक्तिमत्व विकास, स्वच्छता अभियान, व्यसन मुक्ती या संदर्भात मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यामध्ये अग्रेसर.

११. सहवीज निर्मिती प्रकल्प उभारण्याचे विचाराधीन आहे.

१२. कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादनामध्ये वाढ व्हावी म्हणून ऊस विकासाच्या विविध योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

१३. सहकाराच्या माध्यमातून कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद ऊस उत्पादक सामान्य जनता या सर्वांच्या विकासासाठी कारखाना कटिबद्ध आहे.

१४. राज्य व देश पातळीवरील अनेक तांत्रिक कार्यक्षमतेच्या पारितोषिकाचा मानकरी ठरला आहे.

(अ) सन १९८८-८९ या वर्षातील ऊस विकास कामाबद्दलचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक कारखान्याला मिळाले आहे.

(ब) सन १९८९-९० उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमतेचे द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले आहे.

(क) सन १९९१-९२ या वर्षातील केंद्रशासनाचे तांत्रिक कार्यक्षमतेचे पारितोषिकास कारखाना पात्र ठरला आहे.

(ड) सन २००१-०२ मध्ये VSI पुणे तर्फे तांत्रिक कार्यक्षमतेचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले आहे.

## श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते गळित हंगामनिहाय साखर उत्पादन-वार्षिक तुलनात्मक तक्ता १९५८-५९ ते २००४-०५

| गाळप वर्ष | सभासद संख्या | गाळप सुरू तारीख | गाळप बंद तारीख | ऊस क्षेत्र एकर | ऊस गाळप मे. टन | साखर उत्पादन पोती | साखर उतारा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५८-५९ | १६५८ | १८/२/५९ | २४/०३/५९ | ६४८ | १६२९८ | १८३१३ | ११.१८ |
| १९५९-६० | १७०० | ०४/११/५९ | ११/०३/६० | ३८२२ | ६३३४० | १००७७६ | १०.८४ |
| १९६०-६१ | १८०४ | २२/१/६० | २२/०५/६१ | ४५३७ | १५२१३२.४५ | १६८८५५ | ११.०६ |
| १९६१-६२ | १९७१ | ०३/०२/६१ | ०५/०४/६२ | ४६३९ | ११५४१५.७८९ | १३७३४६ | ११.९२ |
| १९६२-६३ | २०७५ | ०४/११/६२ | ०८/०४/६३ | ४३९१ | १४४६२२.८५१ | १७४६३० | १२.०७ |
| १९६३-६४ | २५५२ | २१/१०/६३ | ०७/०४/६४ | ४७६० | १६११७३.४१० | ११४११८ | ११.४१ |
| १९६४-६५ | २६३५ | ०१/११/६४ | ०४/०५/६५ | ५६२७ | २१४२११ | २४१५११ | ११.६५ |
| १९६५-६६ | २७०३ | ३१/१०/६५ | ०३/०५/६६ | ६०१० | २११११८ | २४४०३७ | ११.५० |
| १९६६-६७ | २७४३ | ३१/१०/६६ | २४/०५/६७ | ५१८२ | १८२७१७ | २१५५०९ | ११.७९ |
| १९६७-६८ | २८१० | २६/१०/६७ | २२/०४/६८ | ५४२८ | २०१०१४ | २५२३०० | १२.०७ |
| १९६८-६९ | २८६२ | २८/१०/६८ | ०७/०६/६९ | ५७५४ | २५४०८३ | २९७६६० | ११.७१ |
| १९६९-७० | ४७०३ | २९/१०/६९ | ११/०५/७० | ६०३७ | २३३४५६ | २८१०९९ | १२.०५ |
| १९७०-७१ | ४८५४ | २१/१०/७० | ०१/०५/७१ | ५६१८ | २२०८०४ | २७७४०१ | १२.१२ |
| १९७१-७२ | ५५३५ | ०९/११/७१ | ०६/०५/७२ | ८१६८ | ३००६७१ | ३६६३०० | १२.१५ |
| १९७२-७३ | ६६५१ | २९/१०/७२ | २१/०४/७३ | १०७६५ | ३४९८०९ | ३९०१३० | ११.१५ |
| १९७३-७४ | ६७७० | ०२/११/७३ | ०८/०४/७४ | ९४५२.२० | ३०५६१३ | ३७४६८० | १२.२५ |
| १९७४-७५ | ६९८८ | ०२/११/७४ | २८/०४/७५ | ११७७८.२७ | ३६०५४९ | ४४३९२१ | १२.३२ |
| १९७५-७६ | | १०/११/७५ | २२/०४/७६ | ११५०१ | ३५२८३३.२०५ | ४३८५७७ | १२.४२ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७६–७७ | | २५/१०/७६ | १४/०४/७७ | १३५४० | ३७७७५०.८८३ | ४५४८७५ | १२.०४ |
| १९७७–७८ | ७३२९ | ०३/११/७७ | ०६/०६/७८ | १३०४७ | ४७५३०२.४६३ | ५७३७०० | १२.०७ |
| १९७८–७९ | | ०६/११/७८ | ०२/०६/७९ | १३६८० | ४०८८५९.७८९ | ४८३०९५ | ११.८३ |
| १९७९–८० | | ०८/११/७९ | ०६/०५/८० | १२३८३ | ३७६७०९.५९७ | ४४७६६५ | ११.८६ |
| १९८०–८१ | | ०९/११/८० | १३/०४/८१ | १२२७५ | ३७८१०९.९०० | ४५६७७५ | १२.१० |
| १९८१–८२ | | १५/११/८१ | २९/०४/८२ | १३३०६ | ४४७९५८.९२३ | ५५७१०० | १२.४३ |
| १९८२–८३ | | ०४/११/८२ | २३/०५/८३ | १४६०५ | ५०९४११.३८९ | ६२४४३४ | १२.२५ |
| १९८३–८४ | | १४/१०/८३ | २२/०४/८४ | १४७९३ | ३८२२५३.२७० | ४५४४२० | ११.८३ |
| १९८४–८५ | | १६/११/८४ | २५/०४/८५ | १३०५३ | ४२९०८४.०३६ | ५२८१५६ | १२.२९ |
| १९८५–८६ | | ०४/११/८५ | १०/०४/८६ | १४६८६ | ४३३३८६.२०४ | ५३८७६० | १२.४५ |
| १९८६–८७ | | ०९/११/८६ | २४/०४/८७ | १५१०४.२८ | ४६०६८७.३३१ | ५६४१८० | १२.२५ |
| १९८७–८८ | | ३०/१०/८७ | ०१/०५/८८ | १६०९३ | ४९७०१५.७९० | ५९४१०० | ११.९७ |
| १९८८–८९ | | ११/११/८८ | २४/०४/८९ | १६२२३ | ४३१५७५.५११ | ५१७९५० | ११.९२ |
| १९८९–९० | | २७/१०/८९ | २५/०३/९० | १३९२३ | ४२०२७८.४२८ | ५०७४१५ | १२.०४ |
| १९९०–९१ | | ०२/११/९० | २७/०४/९१ | १६९५६ | ४९५७११.८१८ | ६१११०० | १२.२५ |
| १९९१–९२ | | २८/१०/९१ | १०/०५/९२ | १७१६७ | ५२१३३४.८२८ | ६४३२०० | १२.०६ |
| १९९२–९३ | | १०/११/९२ | ०५/०५/९३ | १७७८४.१३ | ४,९१,१४३ | ६,१७,९२५ | १२.५६ |
| १९९३–९४ | | ०७/११/९३ | २३/०३/९४ | १७६६५.४० | ४,६७,२०९,७०७ | ५,७४,३४० | १२.२७ |
| १९९४–९५ | १८५२५ | ०७/११/९४ | १४/०४/९५ | १४३०३.१३ | ५,४२,९७९ | ६,७९,२०० | १२.५० |
| १९९५–९६ | १८५४० | ०१/११/९५ | २७/०५/९६ | ११९३१.३२ | ७,६८,००८.०९८ | ९,२६,९७५ | १२.०५ |
| १९९६–९७ | १८५२४ | ०५/११/९६ | ०७/०४/९७ | १७१७८.२७ | ५,७१,७५६.४०७ | ७,०७,७५५ | १२.३६ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९९७–९८ | १८५२६ | १४/११/९७ | २१/०४/९८ | १६९३९.३९ | ६,३५,१४४ | ७,६२,६८५ | १२.०० |
| १९९८–९९ | २८३७३ | ०४/११/९८ | १५/०५/९९ | २३०८१.०४ | ७,७२,१८२ | ८,९२,४३५ | ११.५२ |
| १९९९–२००० | २८३०८ | १४/११/९९ | १९/०४/२००० | २१०४७.८७ | ६,४०,८६७ | ७,९२,५२५ | १२.३५ |
| २०००–२००१ | २८३८७ | ११/११/२००० | १६/०४/२००१ | १७८८५.९१ | ५,८६,१८४ | ७,२९,३१५ | १२.४० |
| २००१–२००२ | २८५३४ | ०९/११/२००१ | ०६/०३/२००२ | १८०६३.५० | ५,१७,९५३ | ६,८३,३०० | १३.१६ |
| २००२–२००३ | २९०७१ | ३०/१०/२००२ | २७/०३/२००३ | २००२८.७९ | ५,८४,१७० | ७,४०,८५० | १२.६८ |
| २००३–२००४ | २९१३१ | १२/११/२००३ | २७/०१/२००४ | १८१९४.३१ | २,७३,३३७ | २,९८,४०० | १०.८५ |
| २००४–२००५ | २८९३५ | १५/११/२००४ | ०९/०२/२००५ | १३७३१.३१ | २,७९,५३९ | ३,३७,५२० | ११.७३ |

**(संदर्भ : साखर कारखाना वार्षिक अहवाल १९५८-५९ ते २००४-०५**

अ वर्ग उत्पादक सभासदांना कारखान्यामार्फत अनेक सुविधा पुरविल्या जातात. ऊस उत्पादक सभासदांना परतावा, विना परतावा ठेवीवर वर्षातून एक वेळा व्याज दिले जाते. विना परतावा ठेवीचा वापर कारखाना विकासासाठी केला जातो. पावसाच्या सुरूवातीला स्थानिक वर्तमानपत्रातून जाहिराती देऊन सभासदांना फळझाडांची मागणी करण्याविषयी आवाहन केले जाते. सुरूवातीला काही वर्षे २५ टक्के सबसिडी दरात सभासदांना नारळ, आंबा, चिकू, लिंबू, सिताफळ, साग इत्यादी रोपांचे वाटप केले जात असे. सद्य स्थितीत कोणत्याही प्रकारची सबसिडी न देता सभासदांना रोपांचे वाटप केले जात आहे. कारखाना परिसरातील जे सभासद बेणे प्लॉट योजना राबवितात त्यांना कारखान्यामार्फत खते, जंतूनाशके, बियाणी पुरविली जातात. काही शेती तज्ज्ञांच्या भेटी देखील सभासदांच्या प्लॉटवर घडवून आणल्या जातात. नाममात्र किंमतीमध्ये कारखाना सेंटर मार्फत सभासदांना त्यांच्या मागणी नुसार कंपोस्टखत व मळी पुरविली जाते. १५ कि. मी. अंतराच्या बाहेरील सभासद बिगर सभासदांचा ऊस कारखाना क्षेत्रामध्ये आणण्यासाठी बाहेरच्या जिल्ह्यातील ऊस तोडणी कामगारांना नेमले जाते. ऊस तोडणीसाठी कामगारांना कोयते, राहण्यासाठी तंबू उभारण्यासाठी बांबू, तट्टे पुरविले जातात. हे कामगार स्वतंत्र टोळीनी वास्तव्य करताना आढळतात. बीड, सोलापूर, उस्मानाबाद जिल्ह्यातील टोळ्या ऊस तोडणी कामगार म्हणून काम करतात. वेतन बोर्डाने ठरवून दिलेल्या दरानुसार ऊस तोडणी ओढणी कामगारांना वेतन दिले जाते. प्रतिटन सरासरी तोडणी ओढणीचा दर २१५ रुपये असा आहे. अंतरानुसार ओढणीचा दर बदलत राहतो.

१५ कि. मी. अंतराच्या आत ज्या सभासदांचा, बिगर सभासदांचा ऊस आहे त्याचा ऊस कारखाना क्षेत्रामध्ये आणण्यासाठी बैलगाड्यांचा वापर केला जातो. सामान्यतः यामध्ये कार्यक्षेत्रातील बैलगाडी धारकांचा समावेश आढळतो. बैलगाडी धारक कुटुबियांतील सदस्य ऊस तोडणीच्या कामामध्ये गुंतलेले आढळतात. गळीत हंगामामध्ये सरासरी ३५० बैलगाड्या ऊस वाहतूक करतात. साखर कारखान्याकडे बाहेरील जिल्ह्यातील ऊस तोडणीच्या कामी येणाऱ्या टोळ्यांना, बैलगाडी धारकांना काही रक्कम ॲडव्हान्स म्हणून दिली जाते.

सुरूवातीला श्री. भोगावती सहकारी साखर कारखाना, कुंभी कासारी साखर कारखाना, श्री. बिद्री सहकारी साखर कारखाना या तिन्ही कारखान्याच्या मोलॅशिस भोगावती सहकारी साखर कारखानामध्ये एकत्र करून त्या ठिकाणी मोलॅशिस वर प्रक्रिया घडवून आणली जात असे. मोलॅशिसपासून स्पिरीट व देशी दारूचे उत्पादन केले जाते. सद्यः हे उत्पादन या कारखान्यामध्ये स्वतंत्रपणे मोठ्या प्रमाणात केले जात आहे.

कारखाना पुरस्कृत एकूण १०५ पाणी पुरवठा योजना कार्यरत आहेत. १० लिफ्ट इरिगेशन योजना चालू स्थितीमध्ये आहेत. याशिवाय रस्ते बांधणी, क्रिडा विषयक विविध उपक्रम, कृषी संशोधन उपक्रम कारखाना क्षेत्रामध्ये राबविले जातात.

**३.५ ग्रामीण विकासार्थ कारखान्याचे विविध उपक्रमः**

कारखाना क्षेत्रातील खेडेगावांच्या सर्वांगीण विकासासाठी कारखान्यामार्फत विविध उपक्रम राबविण्यात आलेले आहेत. यापैकी काही उपक्रम ऊस उत्पादन वाढवण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहेत. तर काही उपक्रम समाजाभिमुख (समाज विकासाच्या दृष्टीने) महत्वाचे आहेत. श्री. भोगावती सहकारी साखर कारखान्यामार्फत राबविण्यात आलेले काही महत्वाचे उपक्रम पुढीलप्रमाणेः

१. ऊस संवर्धन बेणे प्लॉट विकास

२. कंपोस्ट खताची निर्मिती-खते, जंतुनाशकांचे सभासदांना वाटप

३. सामूदायिक विवाह सोहळा

४. फळझाडांचे माफक दरातमध्ये वाटप

५. सभासद प्रशिक्षण कार्यक्रम

६. नवीन रस्ते तयार करणे, जुने रस्ते दुरूस्ती करणे.

७. मागासवर्गीय कल्याणाचे विविध कार्यक्रम

८. शैक्षणिक उपक्रम

९. गोबर गॅस सयंत्र योजनेसाठी अनुदान वाटप

१०. वाहन खरेदीसाठी विशेष योजना

११. मोटरपंप खरेदी

१२. नळपाणी पुरवठा

१३. नारळ उत्पादन

१४. प्रेसमड मोलॅशिस उत्पादन

१५. ऊस वाहतूकदारांना टायर, बैलगाड्या पुरविणे.

१६. मल्लदत्तक योजना

१७. मेडिकल सुविधा

१८. शेतीसाठी अवजारांचा पुरवठा

१९. कारखाना क्षेत्रातील नवोदित शैक्षणिक संस्थाना आर्थिक मदत.

वरील उपक्रमाचे तपशीलवार विवरण प्रकरण नंबर ६ मध्ये करण्यात आलेले आहे.

☆☆☆

# प्रकरण ४ : भोगावती सहकारी साखर कारखान्याचे व्यवस्थापन

**४.१ प्रस्तावनाः**

ल्युथर गुलिक या व्यवस्थापनशास्त्रातील नामवंत विचारवंतांच्या मते व्यवस्थापन हा संघटनेचा आत्मा म्हणजेच सर्वांत महत्वपूर्ण घटक आहे. गुलिकने हे मत लोकप्रशासनाच्या संदर्भात व्यक्त केले असले तरी, ते सर्व प्रकारच्या संघटनांना लागू पडते. खाजगी क्षेत्रात आणि स्वयंसेवी क्षेत्रातील संघटनांचे यशापयश त्यांच्या व्यवस्थापनाच्या कौशल्याशीच निगडीत असते.

व्यवस्थापन ही संस्थेची उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या हेतूने विविध कार्यक्रमांची योग्य दिशेने अंमलबजावणी करण्याची प्रक्रिया आहे. उद्देशपूर्तीसाठी कार्याचे नियोजन, योग्य पर्यायाची निवड, साधन सामग्रीची जुळवा जुळव व प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या व्यक्तींना मार्गदर्शन आणि नियंत्रण या बाबींचा व्यवस्थापन या संकल्पनेत समावेश होत असतो. प्रा. मिलेट यांच्या मते, व्यवस्थापन म्हणजे, निश्चित स्वरूपाच्या उद्दिष्टाची पूर्तता करण्यासाठी, औपचारिकरित्या संघटित झालेल्या लोकांचे कार्य सुलभ होण्यासाठी व त्यासाठी मार्गदर्शन करणारी यंत्रणा म्हणजे व्यवस्थाापन होय.

व्यस्थापन या संघटनात्मक घटकाकडे एक प्रक्रिया आणि साधन या दोन्ही दृष्टीनी पहाण्यात येते. ब्रेश या ब्रिटीश व्यवस्थापन तज्ज्ञांच्या मते, व्यवस्थापन ही सामाजिक प्रक्रिया असून संघटनेच्या कार्याचे नियोजन व सूत्रसंचालन याची जबाबदारी या प्रक्रियेकडे असते. नियोजनाच्या दृष्टीने योजना निश्चित करणे व योजनेची प्रगती वस्तुस्थितीच्या संदर्भात अजमावणे हे व्यवस्थापनाचे कार्य असते. त्या सुत्रसंचालनाच्या दृष्टीने सेवक वर्गाचे मार्गदर्शन, त्यांच्या प्रयत्नांचे एकत्रीकरण, उत्तेजन व पर्यवेक्षण ही व्यवस्थापनाची जबाबदारी असते. व्यवस्थापनाकडे साधन म्हणूनही पाहण्यात येते. संघटनेतील व्यक्ती समूहाची उद्दीष्टे निर्धारण करणारे आणि त्यांची प्रत्यक्ष कार्यवाही करणारे साधन म्हणजे व्यवस्थापन. फेडरिक टेलर या अमेरिकन व्यवस्थापन शास्त्रज्ञाच्या मते, व्यवस्थापनामध्ये पंचाहत्तर टक्के वस्तुस्थितीचे विश्लेषण व पंचवीस टक्के व्यवहारबुद्धी असते. पैंकी या ब्रिटीश व्यवस्थापन तज्ज्ञांच्याही विचारसरणीनुसार संघटनेपुढील समस्येच्या विश्लेषणाशिवाय व्यवस्थापकाची विवेकशक्ती व निर्णयस्वातंत्र्य यांनाही या समस्येच्या उकलीमध्ये वाव असतोआणि काही समस्यांच्या बाबतीत विश्लेषणाचा निष्कर्षही बाजूला ठेवण्यात येतो.

संस्थेने ठरवून दिलेल्या धोरणाचे उद्दीष्ट साध्य करणे हे व्यवस्थापनाचे कार्य आहे. त्यामुळे धोरणाच्या अनुषंगाने कार्यक्रमाची रचना व नियोजन त्या अनुरूप संघटनेची बांधणी, कार्याची विभागणी करून संघटनेच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर कार्य होत असताना त्यामध्ये समन्वय आणि सहकार कार्य दिशेने चालण्यासाठी मार्गदर्शन, नियंत्रण व कार्यसिद्धी हे व्यवस्थापनाचे कार्य म्हणता येईल.

लोकप्रशासन आणि प्रशासन शास्त्राच्या विचारवंताना आपापल्या दृष्टीकोनातून व्यवस्थापनाचे विवेचन केले आहे. त्यातील काही कार्यावर अधिक भर दिला आहे. ल्युथर गुलिक यांची पोस्टकॉर्ब कार्येही व्यवस्थापनाचीच कार्ये आहेत. हेन्री फे थॉल यांच्या मते, नियोजन संघटन, समन्वय आणि नियंत्रण ही व्यवस्थापनाची कार्ये होत.

धोरणनिश्चित, निर्णयप्रक्रिया, नियोजन, समन्वय, संचरण, नियंत्रण, देखरेख आणि लोकसंपर्क ही व्यवस्थापनाची कार्ये मानता येतील. कोणत्याही संस्थेचे व्यवस्थापन ही कार्ये किती क्षमतेने पार पाडते यावर ते चांगले का वाईट हे ठरवता येते. ल्युथर गुलिकच्या मते यशस्वी प्रशासन तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण, राजकिय जबाबदारीची जाणीव असलेले, लोकमान्य, व्यावसायिक ज्ञानाने युक्त आणि सामाजिक सृजनशील असते.

## ४.२ व्यवस्थानाच्या मूलभूत तत्वांचे भोगावती सहकारी साखर कारखाना या संस्थेच्या संदर्भात विश्लेषणः

लोकप्रशासन आणि व्यवस्थापन शास्त्रातील विचारवंताना अभिप्रेत असलेल्या व्यवस्थापनाच्या मूलभूत तत्वांचे भोगावती सहकारी साखर कारखान्यांच्या संदर्भात विश्लेषण खालीलप्रमाणे करता येईल.

### (१) नेतृत्वः

संस्थेमधील व्यक्तींच्या व गटाच्या कृतीवर प्रभाव टाकणे हे नेतृत्वाचे मर्म होय. म्हणून नेतृत्व हा संस्थेच्या वर्तनामध्ये बदल घडवून आणणारा महत्वाचा घटक आहे असे मानण्यात येते. संस्थेचा विस्तार तिच्या कार्यातील विविधता, तांत्रिक विकास, विषयतज्ज्ञांची आवश्यकता आणि समाजाच्या अपेक्षा लक्षात घेता व्यवस्थापन हे कार्यक्षम आणि प्रभावी (Efficient and effective) असणे आवश्यक असते. सामूहिक उद्दिष्ट स्वखुषीने साध्य करण्यासाठी लोकांना प्रभावित करण्याची प्रक्रिया अशीही नेतृत्त्वाची व्याख्या करण्यात येते. उद्दिष्ट ठरवणे, साधनांचा योग्य उपयोग करणे, कृतीचे नियंत्रण करणे व संयोजन व्यवस्थित रीतीने पार पाडणे ही नेत्याची प्रमुख कार्येअसतात.

व्यवस्थापन शास्त्राच्या दृष्टीने संचालन (Divecting) सदस्यांना प्रतिसाद देणे (Responding) व त्याचे प्रतिनिधित्व करणे (Representation) ही नेतृत्वाची महत्त्वाची

कार्ये मानली जातात. लिओनार्ड सेलसच्या मते संचालन हा नेतृत्वाचा गाभा आहे. दोन किंवा दोनाहून अधिक व्यक्तिंचे नेतृत्व कार्यक्षम असत नाही. कनिष्ठांकडून बरोबरीने एकदम कृती ठरवून घेण्यामध्ये नेत्यांचे वर्तनात्मक कौशल्य दिसून येते. नेत्यांमध्ये ठाम निर्णय घेण्याची कृती असणे आवश्यक असते. त्याला दूरदृष्टी हवी.

परिस्थिमधील घडामोडीच्या पलीकडे जाऊन संभाव्य स्थितीचा त्याला अंदाज घेता आला पाहिजे आणि तोअधिकाधिक बरोबर किंवा कमीत कमी चूक असला पाहिजे. आपल्या सहकाऱ्यांत संघभावना व आत्मविश्वास निर्माण करून त्यांना व्यवस्थापनात सहभागी करून घेता आले पाहिजे. त्याचबरोबर जनसंपर्क ठेऊन संस्थेची प्रतिमा जनमानसात चांगली राहील यासाठी प्रयत्नशील असावयास हवे. सकारात्मक आणि आशावादी वृत्तीचे नेतृत्व संस्थेला प्रेरणादायक ठरते.

दादासाहेब कृष्णा पाटील, भोगावती सहकारी साखर कारखन्यांचे प्रवर्तक होते आणि प्रवर्तनाच्या काळात त्यांनी संस्थेच्या नेतृत्वाची धुरा वाहिली. त्यानंतरच्या अध्यक्षांनी कारखान्याच्या कार्याचा कार्यात्मक आणि प्रादेशिक विस्तार केला. यात त्यांचे नेतृत्वकौशल्य दिसून येते. संस्थेचे नेतृत्व कार्यक्षम आणि प्रभावी असल्यामुळे कारखान्याच्या उपक्रमामध्ये विविधता आली.

ग्रामीण समाजाच्या गरजा लक्षात घेऊन शेतीविकाास, पशुधन संवर्धन, सामुदायिक आरोग्य, शिक्षण, महिला विकास असे उपक्रम कारखान्याने आपल्या कार्यक्षेत्रात राबवले आहेत. कारखान्याच्या नेतृत्वाने जनसंपर्क प्रस्थापित करून संस्थेची उजळ प्रतिमा जनमानसात निर्माण केली आणि संस्थेच्या नेतृत्वाच्या गरिबाभिमुख (Pro-hour) दृष्टिकोन त्यांची सचोटी आणि व्यापक जनसंपर्कामुळे संस्थेस शासकीय पाठबळ उपलब्ध झाले. तसेच उपक्रमांना राजकीय आणि शासकीय पाठींबा व अर्थसाहाय्य प्राप्त झाले. कारखान्याचे नेतृत्व स्थापनेपासून सकारात्मक वृत्तीचे असल्यामुळे हा कारखाना चार दशकाहून अधिक काळ कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात सातत्याने कार्य करीत आहे.

**(२) धोरण आखणी :**

कोणत्याही संघटनेला किंवा संस्थेला आपला कार्यक्रम राबवायचा असेल, तर निश्चित धोरण निर्धारण करणे आवश्यक असते. त्यामुळे संस्थेचे उपक्रम परिणामकारकरित्या व योग्य दिशेने राबवले जाऊन संस्थेचा हेतू साध्य होतो. व्यवस्थापनाने संस्थेच्या कृतीच्या संदर्भात स्वीकारलेले आणि अनुसरलेले लिखित अलिखित मार्गदर्शन होय. धोरण हे संस्थेच्या मुळ उद्धेशांशी संबंधित असून त्यामुळे ते व्यापक असते. संस्थेच्या विविध कृतींना दीर्घ काळापर्यंत मार्गदर्शन ठरते, तसेच संपूर्ण समाज हे त्याचे कार्यक्षेत्र असते.

संस्थेचे धोरण निर्धारण करत असताना संस्थेची सामाजिक, राजकिय विचारप्रणाली लाभार्थिंच्या विश्वासविषयक गरजा, साधन-संपत्तीची उपलब्धता, शासकीय धोरण इत्यादी बाबीचा प्रभाव पहतो. संस्थेचे धोरण लोकाभिमुख असेल, तरच त्यास लोक स्वीकृती प्राप्त होत असते अन्यथा संस्थेचे उपक्रम निरर्थक ठरतात.

संस्थेच्या धोरणाचे बौद्धिक समर्थन करता आले पाहिजे आणि प्रत्यक्षात ते राबविता आले पाहिजे. कोणत्याही संस्थेच्या कार्यात धोरण ठरवणे हे महत्वाचे व्यवस्थापकीय कार्य असते. धोरणविरहित प्रशासन म्हणजे दिशाहीन प्रवास होय.

भोगावती साखर कारखाना या संस्थेच्या धोरणावर गांधीवादी विचारांचा प्रभाव दिसून येतो. संस्थेचे उपक्रम ग्रामीण विकासासाठीचे असल्याने, धोरण निर्धारण प्रक्रियेत स्थानिक गरजा आणि उपलब्ध साधन-सामुग्रीचा विचार करूनच संस्थेचे उपक्रम निर्धारण प्रक्रियेत स्थानिक गरजा आणि उपलब्ध साधन-सामुग्रीचा विचार करूनच संस्थेचे उपक्रम निर्धारण करण्यात आल्याचे दिसून येते.

ग्रामीण भागातील उपेक्षित समाजाला शाश्वत उपजिविकेसाठी लाभदायक स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करून देणे. सभोवतालचा दुर्लक्षित परिसर सधन करणे, ग्रामीण जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने मानवी मूल्यांची जपवणूक करणे. ही ध्येये, संशोधन, स्थानिक साधन सामुग्रीचा वापर, समुचित तंत्रज्ञानाचा विकास, कौशल्य व योग्यता आणि उत्स्फूर्त सामाजिक सहभागाने साध्य होतील.

भोगावती साखर कारखाना ग्रामीण विकासाची बांधिलकी असणारी संस्था आहे. या ध्येय धोरणाशी सुसंगत असे उपक्रम ही संस्था राबवीत आहे. म्हणजेच संस्थेच्या धोरण निर्धारणावर त्यांच्या विचारसरणीचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो.

**(३) निर्णय घेणे :**

धोरण निर्धारणाइतकेच किंबहुना त्याहून अधिक महत्वाचे तत्व निर्णय घेण्याची क्षमता हे आहे. संस्थेच्या संचालकांनी संस्थेच्या धोरणाच्या चौकटीत राहून धोरणात्मक आणि दैनंदिन निर्णय घेणे अपेक्षित असते. कारण धोरणाच्या चौकटीत निर्णय न घेतल्यास कोणतेही प्रशासन कार्य करू शकणार नाही. योग्य तो निर्णय योग्य त्यावेळी घेणे हे नेतृत्वाचे कार्य असते. संस्थेपुढील ध्येय साध्य करण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध असतात. त्यापैकी योग्य पर्याय निवडण्याची क्षमता नेतृत्वाकडे असावी लागते. दोन किंवा अधिक पर्याय उपलब्ध असताना त्यातील अचूक निवड करणे म्हणजे निर्णय घेणे होय. ही निवड विचारपूर्वक केलेली असते. त्याची घोषणा जरी कार्यकारी प्रमुख करीत असला, तरी ती सांघिक कृती असते.

निर्णयप्रक्रिया व संचरणप्रक्रिया यांचा घनिष्ठ संबंध असतो. निर्णयासाठी आवश्यक असणारी प्रारंभिक माहिती, निर्णयप्रक्रिया होत असताना आवश्यक असणारी विचारांची व प्रतिक्रयांची देवाणघेवाण व निर्णय झाल्यानंतर त्यांच्या परिणामांची पुर्ननिर्णयासाठी किंवा निर्णयातील लहानसहान बदलांसाठी घ्यावयाची नोंद या तिन्ही दृष्टिकोनातून संचरण प्रक्रियेचे कार्य चालू असते. संस्थेमधील निर्णयप्रक्रिया कार्यक्षम राहण्याच्या दृष्टीने अभिलेखारक्षण (Record Keeping) व विशेष प्रशासकीय अभ्यास यांचे केंद्रीकरण होणे आवश्यक ठरते.

कारखान्याचे संचालक मंडळाद्वारे प्रशासकीय व धोरणात्मक निर्णय घेतले जातात. स्थानिक पातळीवरील प्रकल्प राबवणाऱ्या क्षेत्रीय संस्था मुख्यालयाच्या सतत संपर्कात असतात. त्यामुळे निर्णयप्रक्रिया विनाविलंब पार पाडली जाते. संस्थेच्या सर्व कार्यक्रमासाठी संघिक कृती महत्वाची असते.

**(४) नियोजनः**

नियोजन हे सर्व क्षेत्रांमध्ये नितांत आवश्यक असते. फ्रेंच भाषेमध्ये प्रिव्हॉयन्स (Prevoyance) असा नियोजनाला प्रतिशब्द आहे. त्याचा अर्थ पुढे पाहणे असा आहे. पुढील घटना किंवा परिस्थिती लक्षात घेऊन संस्थेच्या उद्‌दिष्टांच्या दृष्टीने संस्थेची कार्ये प्रत्यक्षात आणणे, त्यात योग्य ते बदल घडवून आणणे यास नियोजन म्हणता येईल. कृती कोणी, केव्हा, कोणत्या पद्धतीने करावयाची याचा विचार नियोजन करते त्याचप्रमाणे कृतीसाठी किती खर्च करावयाचा हेही ते ठरवते. वर्तमानकाळ व भविष्यकाळ यामध्ये समन्वय साधण्याचे कार्य नियोजन करीत असते.

नियोजनात नियोजनाचा हेतू, नियोजनाची संरचना व नियोजन प्रक्रिया या बाबींचा समावेश होत असतो. नियोजन कार्यक्षम असावे. त्याने उद्‌दिष्टे कार्यवाहीत आणावीत. नियोजन अन्य व्यवस्थापन कार्याहून अधिक महत्वाचे आहे. नियोजनाच्या यशस्वितेमध्ये काही घटक मर्यादा घालणारे किंवा जोखमीचे असतात. निर्णयामधील महत्वाचा भाग अमलात आणण्याचे काही काळ लागतो. नियोजनामध्ये लवचिकपणा व परिवर्तनीयता ही तत्वे नियोजन प्रक्रियेच्या संदर्भात सांगण्यात आलेली आहेत.

कारखान्याच्या उद्‌दिष्टांची कार्यवाही करण्यासाठी सर्वपातळीवर नियोजनाचा अवलंब करण्यात येतो. स्थानिक लोकांच्या गरजा, उपलब्ध सोत विचरात घेऊन संस्था उपक्रमांचे नियोजन करते. विविध उपक्रमांमध्ये नियोजन करतात. लवचिकपणा आणि परिवर्तनीयता असल्यामुळे कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करता येते. एखादा प्रकल्प हाती घेतल्यानंतर प्रकल्प पूर्ततेनंतरही तोकसा चालू राहील यासाठी भविष्यकालीन योजना आखली जाते. यासाठी आर्थिक तरतुदही केली जाते.

**(५) सूचना :**

संस्थेचे कार्य प्रभावी होण्यासाठी कार्याचा हेतू कार्यालयीन प्रक्रिया आणि प्रत्येक पातळीवरील घटक यांची जबाबदारी माहिती असणे आवश्यक आहे ही माहिती व्यवस्थापनाद्वारे प्रभावी संसूचनाद्वारे उपलब्ध झाल्यास संस्थेचे सर्व घटक आपली जबाबदारी कार्यक्षमतेने आणि आत्मीयतेने करू शकतात. त्याचा परिणाम संस्थेच्या वाढत्या कार्यक्षमतेमध्ये दिसून येईल. म्हणजेच संस्थेमधील समन्वय, प्रेरणा, निर्णयप्रक्रिया, नेतृत्व इत्यादी क्रियांशी संसूचना (Communication) महत्वाचा संबंध असतो. माहिती, आदेश सूचना प्रक्रिया यांची देवाण-घेवाण संघटनेच्या सर्व पातळ्यांवर सुलभ झाली, तरच संस्थेमधील निर्णयप्रक्रिया सुरळीतपणे पार पडू शकते. संसूचनाचे संस्थेमधील महत्त्व लक्षात घेऊन पिफेनेर त्याचे वर्णन 'व्यवस्थापनाचे हृदय' या शब्दात करतात. तर जे. डी. मिलेट त्याचे वर्णन प्रशासन संघटनेमधील रक्तप्रवाह या शब्दात करतात.

'संस्थेमधील विविध कार्यगटांची एकमेकांना समजून घेण्याची परस्परांची कार्ये व हेतू माहिती करून घेण्याची क्षमता म्हणजे संसूचना होय' अशी संसूचनाची व्याख्या पीटर ड्रकर यांनी केलेली आहे.

भोगावती सहकारी साखर कारखान्याचा जनसंपर्क विभाग संसूचनाची जबाबदारी कार्यक्षमतेने पार पाडतो. कारखान्याच्या विविध उपक्रमांची माहिती देणाऱ्या पुस्तिका तयार केल्या जातात. संस्थेच्या कार्यक्रमांना स्थानिक वत्तपत्रांमध्ये प्रसिद्धी मिळते आणि ती कोल्हापूर जिल्ह्यातल्या ग्रामीण भागापर्यंत पोहोचते. म्हणजेच संस्थेत सूसंचनाची यंत्रणा कार्यक्षम असल्याने संस्थेचे कार्य प्रभाविपणे होत असल्याचे दिसून येते.

**(६) अधिकारप्रदान आणि प्रत्यायोजन :**

संस्थेच्या कार्याची व्याप्ती आणि क्षेत्र मर्यादित असते, तेव्हा अधिकाराचे केंद्रिकरण होणे क्रमप्राप्त असते. मात्र संस्थेच्या कार्याचा विस्तार झाल्यानंतर अधिकार खालच्या स्तरावरील यंत्रणेत प्रदान किंवा प्रत्यायोजन असे म्हणतात, वरिष्ठ स्तरावरील व्यवस्थापनाची मनोवृत्ती अधिकारप्रदानास अनुकूल असल्यास संस्थेचा कारभार कार्यक्षमरित्या होत असतो. कनिष्ठ स्तरावरील यंत्रणेस अधिकार प्रदान करताना त्यांचे विचार आणि शिफारशींचे वरिष्ठ स्तरावरील व्यवस्थापनाने स्वागत केल्यास त्यांच्या सृजनशीलतेला वाव मिळतो. वरिष्ठांचा कनिष्ठांवर विश्वास असला पाहिजे. त्यांनी चुका केल्या तर त्यात सुधारणा करण्याची तयारी असली पाहिजे. मात्र वरिष्ठांचे कनिष्ठावर नियंत्रण असले पाहिजे.

व्यवस्थापनशास्त्रामधील तज्ज्ञांनी अधिकार प्रदानाची काही तत्वे नमूद केली आहेत. ही तत्वे पाळल्यास अधिकारप्रदान यशस्वी होते, असे त्यांचे म्हणणे आहे. प्रशासनाची विविध

कार्ये निश्चित करून निरनिराळ्या विभागांकडे सपूर्द करावी लागतात. अधिकारप्रदान यशस्वी होण्यासाठी काही कृती करणे आवश्यक असते. प्रत्येक सेवकाची कामे निश्चित करावी लागतात. आणि ती पार पाडण्यासाठी असणारे अधिकार त्यांना सुपूर्द करावे लागतात.

कारखान्याने साखर उत्पादन विषयक संशोधन हाती घेतले आहे. ग्रामीण विकासाच्या विविध उपक्रमाची अंमलबजावणी करताना प्रत्येक विभागासाठी विभागप्रमुखांची नेमणूक करण्यात आली आहे. ते विषयनिहाय जबाबदारी पाहतात. कामामध्ये सुसूत्रता आणण्याचे काम कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक करतात. विभागीय पातळीवर विभागप्रमुख (Cluster Leader) समन्वय आणि नियंत्रणाचे काम करतात. विभागीय पातळीवर विकास अधिकारी (Development Officer) आणि विभागीय कार्यक्रम अधिकारी (Block Programme Officer) विषयनिहाय काम पाहतात. प्रत्येक विभागाला ठरविलेल्या लक्षांकाप्रमाणे काम पूर्ण करावे लागते. संस्थेचे सर्व कर्मचारी आपल्या विभागाचे काम कार्यक्षमतेने पार पाडण्याचा प्रयत्न करतात.

**(७) पर्यवेक्षण व नियंत्रण :**

अधिकार प्रदान करत असतानाच संस्थेमधील व्यवस्थापन साखळी - पर्यवेक्षणाचे (Supervision) कार्य सर्व पातळ्यांवर करित असते. केवळ नियंत्रण हे पर्यवेक्षकांचे कार्य नसते. तर त्याचबरोबर आपल्या हाताखालील कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामात मार्गदर्शन करणे हे सुद्धा त्यांचे कार्य असते. प्रत्यक्ष कार्यस्थळावर काम करीत असताना कार्यकर्त्यांना अडचणी येतात. त्यावेळी त्यांना मदत व मार्गदर्शनाची आवश्यकता असते. त्यामुळे आपले ज्ञान आणि कौशल्य यांचा अधिक उपयोग करून कार्यकर्ते आपली स्वतःची कार्यक्षमताही वाढवू शकतात आणि त्यातून संस्थेचे कार्यही कार्यक्षमतेने पार पाडले जाते. पर्यवेक्षकाचे कार्य हे प्रशासकीय नेतृत्वाचे कार्य आहे. ती ते संस्थेच्या कनिष्ठ स्तरावर पार पाडत असतो. कामाची तांत्रिक बाजू, संघनात्मक बाजू आणि कर्मचाऱ्यांबाबत मानवी व्यवहाराची बाजू या तीनही बाबी पर्यवेक्षकाला सांभाळाव्या लागतात.

कामाचे स्वरूप आणि कामांसदर्भात आपल्यावर पडणारी जबाबदारी याची स्वच्छ कल्पना पर्यवेक्षकास असणे आवश्यक आहे. कामाचे नियोजन, त्यांची कर्मचाऱ्यांमध्ये विभागणी करणे, त्यांना त्यांचे काम कसे करावे याबाबत प्रशिक्षण देणे. कामातील अडचणी सोडवणे, त्यांच्या कामाचे योग्य मूल्यमापन करणे हे कार्य पर्यवेक्षकाकडून अपेक्षित असते. संघटनेच्या ध्येय-धोरणाची व त्यातील बदलाची माहिती तो कर्मचाऱ्यांना देतो. त्याचबरोबर त्यांच्या सूचना व तक्रारीचे निवारण होईल ते देखील पाहतो. म्हणून कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने पर्यवेक्षक खरा मित्र, तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शकच असतो.

कारखान्याच्या विविध उपक्रमावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी व्यवस्थापकीय संचालकांकडे सोपवण्यात आली आहे. विभागीय स्तरावर विभागप्रमुख नियंत्रण ठेवण्याचे काम करतात.


विविध प्रकारचे प्रशिक्षण, चर्चासत्र आणि सभामध्ये कामाच्या संदर्भातील तपशील, समस्या, प्रभावी कार्यवाहीसाठी उपाययोजना यावर विचार मंथन केले जाते. सर्व कर्मचाऱ्यांमध्ये कर्मचारी वर्ग कारखान्यास जोडला गेलेला आहे. ही बाब उल्लेखनीय आहे.


**(८) संयोजन :**


संयोजन म्हणजे शासनाच्या विविध भागांचे किंवा अंगाचे त्याच्या मूलभूत उद्दिष्टपूर्तीसाठी एकमेकाला जुळलेले कार्य, त्यामुळे श्रम वाचतात. योग्य वेळी व वेळेमध्ये कार्य होते. प्रशासनाच्या भागांची हालचाल संयोजनामुळे अधिकतम कार्य दाखवू शकते. हे भाग किंवा अंगे यांची निष्कारण पुनरावृत्ती किंवा संघर्ष संयोजनामुळे टाळले जातात. किंवा त्यावर कार्यवाही न होता मात करणे शक्य होते. कित्येक भागांचे अंगीकृत कार्याच्या सिद्धीसाठी व्यवस्थित समष्टीमध्ये झालेले एकीकरण अशी संयोजनाची त्याच्या प्रयोजनाची व्याख्या केली आहे. या भागांचे वा अंगांचे एकमेकांशी संबंध जोडण्याचे काम संयोजन करते. प्रत्येक भागाचा अर्थ प्रत्येक भागाकडून लावला जातो. प्रत्येक भागाचा यामुळे जोलाभ होतो, तो संयोजनाचा हेतू असतो. निरनिराळ्या कार्यावर आधारलेले विभाग प्रशासनामध्ये निर्माण झाल्यानंतर त्यांच्या विभिन्न कार्यामुळे संबंध प्रशासनाचे कार्य विस्कळीत होऊ नये म्हणून संयोजनाची आवश्यकता असते.

कारखान्याच्या विविध स्तरावरील कार्यात समन्वय प्रस्थापित करण्याची जबाबदारी मुख्यालय आणि संचालक मंडळ पार पाडतात. त्या व्यतिरिक्त कार्यात्मक संयोजन केले जात असल्याचे दिसून येते. साखर उत्पादन कार्यक्षमता, फलोद्यान, शेतीविकास, आरोग्य, पशुसंवर्धन, महिलाविकास, उद्योजकता विकास हे उपक्रम हाती घेतले जातात. या सर्व कार्यक्रमाचा मूळ उद्देश दारिद्र्यनिर्मुलन असा असला तरी दारिद्र्य म्हणजे केवळ आर्थिक विकास नव्हे ही बाब लक्षात घेऊन सर्वांगीण दृष्टीने विकासाचे संयोजन करण्यात येते. आर्थिक विकासाबरोबरच सामाजिक विकास, शैक्षणिक विकास, महिला विकासालाही प्राधान्य देण्यात आले आहे. या प्रत्येक कार्यक्रमांचा एकमेकांशी असणारा सहसंबंध लक्षात घेऊन प्रत्येक विभागात समन्वय साधण्याचा विविध मार्गाने विभागप्रमुख प्रयत्न करतात. त्यामुळेच केलेल्या कार्याचा एकत्रित प्रभाव अनुभवास येतो.

# श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर.





शेअर्स सभासद
संचालक मंडळ
अध्यक्ष
कार्यकारी संचालक
५
सिव्हील विभाग
सिव्हील इंजिनिअर
सिव्हील इंजिनिअर
कारकून
शिपाई
६
टाईम ऑफिस
टाईम किपर
कारकून
शिपाई
७
शेती ऑफिस
शेती अधिकारी
ऊस विकासाधिकारी
ओव्हरसिअर
स्टाफ
८
इंजिनिअरींग विभाग
असिस्टंट इंजिनिअर्स
स्टाफ
९
मॅन्युफॅक्चरिंग विभाग
चिफ केमिस्ट
असिस्टंट केमिस्ट
कारकून
शिपाई
१०
शुगर गोडाऊन
गोडाऊन किपर
स्टाफ



शेअर्स सभासद
संचालक मंडळ
अध्यक्ष
कार्यकारी संचालक
११
स्टोअर विभाग
स्टोअर किपर
स्टाफ
१२
सुरक्षा विभाग
सुरक्षा अधिकारी
वॉचमन
कारकून
शिपाई
१३
वाहन विभाग
असिस्टंट गॅरेज इनचार्ज
स्टाफ
१४
इरिगेशन विभाग
इनचार्ज इरिगेशन इंजिनिअर
ओव्हरसिअर
सर्व्हेअर
स्टाफ
१५ डिस्टिलरी विभाग
डिस्टिलरी इनचार्ज
मॅन्युफॅक्चरिंग
केमिस्ट
वेअरहाऊस
कारकून
पंपमन
लॅबबॉय
प्लॅंट ऑपरेटर
मुकादम
मजदूर


ब) कंट्री-लिकर विभाग :



डिस्टिलरी इनचार्ज
मॅन्युफॅक्चरिंग
कारकून
मजदूर

## ४.३ श्री भोगावती साखर कारखान्याचे व्यवस्थापन :

भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते या कारखान्याची नोंदणी जरी दि. १८/१०/१९५५ रोजी झालेली असली तरी, सन १९५९ साली पहिला गळीत हंगाम यशस्वीरित्या पार पाडला गेला. कारखान्याच्या उभारणीसाठी तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यासाठी जवळ-जवळ चार ते पाच वर्षांचा कालावधी लोटला. या कारखान्यातल्या कामगारांची संख्या १५०१ असून त्यामध्ये ६२८ कामगार कायमस्वरूपी आणि ८७३ कामगार हंगामी आहेत. हा कारखाना चार दशकांहून अधिक काळ कार्यरत आहे.

कारखान्याच्या सदस्यांची 'अ' आणि 'ब' वर्ग अशी वर्गवारी करण्यात येते. त्यातील 'अ' वर्गातील सभासदांना कारखान्यामार्फत पुरविल्या जाणाऱ्या सुविधांचा लाभ घेता येतो. उदा. सबसिडी दरामध्ये पुरविली जाणारी खते, औषधे, फळझाडे, कारखान्यामार्फत प्रती टनामध्ये माफक दरामध्ये पुरविली जाणारी साखर इत्यादी. 'ब' वर्ग सभासदांनादेखील हे सर्व फायदे काही प्रमाणात मिळतात.

श्री. दिपक राजाराम पाटील हे भोगावती साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून काम पाहत आहेत.

**तक्ता क्रमांक ४.१**

**श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमनपद भूषविणाऱ्या सन्माननीय व्यक्ती**

| अ.नं. | मान्यवराचे नांव | कालावधी |
|---|---|---|
| १. | व्ही. पी. वर्दे (सरकार नियुक्त) | १९५५ - १९६० |
| २. | दादासाहेब कौलवकर | १९६१ - १९७२ |
| ३. | गोविंदराव कलिकते | १९७३ - १९७८ |
| ४. | दादासाहेब कौलवकर | १९७९ - १९८१ |
| ५. | गोपाळराव हुजरे | १९८१ - १९८३ |
| ६. | गोविंदराव तुकाराम कलिकते | १९८३ - १९८९ |
| ७. | आनंदराव दादासाहेब पाटील | १९८९ - १९९८ |
| ८. | संभाजीराव नारायण पाटील | १९९८ - २००० |
| ९. | सदाशिव स्वरूपा पाटील | २००० - २००४ |
| १०. | संजयसिंह दिनकरराव पाटील | २००४ - २००५ |

| | | |
|---|---|---|
| ११. | दिपक राजाराम पाटील | २००५ - आजतागायत |

## ४.४ कारखान्याच्या विविध विभागांचा परिचय :

भोगावती सहकारी साखर कारखान्यामध्ये जे विविध विभाग कार्यरत आहेत त्यांचा थोडक्यात परिचय याठिकाणी करून देण्यात आलेला आहे. हा परिचय करून घेत असतानां प्रामुख्याने प्रत्येक विभागातील कामगारांची संख्या, संबंधित विभागामार्फत केली जाणारी कामे या गोष्टींवर विषेश लक्ष वेधले आहे.

### (१) प्रशासन विभाग :

कार्यकारी संचालकांच्या अधिकाराखाली या विभागाचे कामकाज चालते. सचिवांच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयीन अधिक्षक (ऑफिस सुपरिटेंडेंट) खरेदी अधिकारी (परचेस ऑफिसर), जनसंपर्क अधिकारी (पी.आर.ओ.) हे अधिकारीवर्ग काम पाहतात.

### कार्यलयीन अधिक्षक :

कार्यालयीन अधिक्षकांच्यामार्फत सचिवांच्या कामांची कार्यवाही केली जाते. कारखान्यातील सर्व विभागांची माहिती मागविणे, मागविलेली माहिती बोर्ड ऑफ डायरेक्टरकडे निर्णयासाठी सादर करणे, बोर्ड ऑफ डायरेक्टरने सभेमध्ये घेतलेला निर्णय ज्या-त्या विभागाकडे ठरावान्वये पाठविणे, त्यांची कार्यवाही करून घेणे इ. कामे कार्यालयीन अधिक्षकांमार्फत करून घेतली जातात. विशिष्ट कालावधीमध्ये जी कामे करून घेण्यात आलेली आहेत त्यांचा अहवाल पुढील सभेमध्ये अधिक्षकांकडून ठेवला जातो. सर्व सभांच्या सूचना (नोटीस) काढणे, प्रोसिडींग ठेवणे ही कामे कार्यालयीन अधिक्षकांकडून केली जातात. त्याचप्रमाणे साखर कारखान्यामध्ये उत्पादित होणारी सर्व उत्पादने उदा. साखर, मोलॅसिस, बगॅस, स्क्रॅप इत्यादींची विक्री करणे, साखर निर्यात करणे, साखरेवर शासकीय अनुदान प्राप्त करणे इ. व्यवहार या विभागामार्फत सांभाळले जातात.

यांच्या नियंत्रणाखाली पुढील विभाग चालतात :

१) टेलिफोन विभाग

२) गेस्ट हाऊस

३) टंकलेखन विभाग

५) लीगल विभाग

६) आवक-जावक बारनिशी

७) मिटींग

४) शेअर्स विभाग ८) कारखान्याच्या मालमत्तेचा विमा घेणे

शेअर्स विभागामार्फत मागणीनुसार कारखाना शेअर्स सभासदत्व दिले जाते. शेअर्समधील नावांमध्ये, गावांच्या नावांमध्ये ज्यांच्या त्यांच्या मागणीनुसार आवश्यक ते बदल करून दिले जातात. शेअर्स ट्रान्सफर करण्याचे कामदेखील या विभागामार्फतच केले जाते. सभासदांना सवलतीच्या दरातील साखर वितरित केली जाते.

कारखान्याच्या कायदेशीर बाबींचा पाठपुरावा कायदेशीर सल्लागारांचा सल्ला घेऊन लिगल विभागामार्फत केला जातो. कारखान्यावर घातलेल्या केसीस तसेच कारखान्याने घातलेल्या केसीसचे कामकाज लिगल विभागामार्फत चालते.

दैनंदिन कागदपत्रांची आवक-जावक, त्यांची नोंदणी आवक-जावक बारनिशीच्या माध्यमातून केली जाते. या नोंदी स्वतंत्र विभागामार्फत ठेवल्या जातात.

**खरेदी अधिकारी :**

कारखान्याच्या वेगवेगळ्या विभागांकडून आवश्यक असणाऱ्या साहित्याच्या मालाच्या मागणीकरिता उत्पादक, पुरवठादार, अधिकृत विक्रेते यांच्याकडून निविदा मागविल्या जातात. ज्या पुरवठाधारकांकडून निविदा येतात त्या सर्वांच्या निविदा खरेदी समितीसमोर ठेवल्या जातात. मागविलेल्या निविदा सभेसमोर उघडून त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार केला जातो. हा तुलनात्मक तक्ता संचालक मंडळासमोर ठेवला जातो. संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार संबंधितांना ऑर्डर्स दिल्या जातात.

खरेदी समितीचा इतिवृत्तांत लिहिणे, मागविलेले साहित्य लवकरात लवकर मिळण्यासाठी सतत पाठपुरावा करणे ही सर्व कामे खरेदी अधिकाऱ्यामार्फत केली जातात.


**जनसंपर्क अधिकारी :**

अध्यक्ष (चेअरमन), उपाध्यक्ष आणि संचालक मंडळ यांच्या कार्यालयाशी असणारा, खाजगी स्वरूपाचा संपूर्ण पत्रव्यवहार जनसंपर्क अधिकारी सांभाळतात. जाहिरात आणि प्रसिद्धी यासंबंधात येणारी सर्व कामे जनसंपर्क अधिकाऱ्यांमार्फत पार पाडली जातात. वेगवेगळ्या विषयांशी संबंधित सभांचे नियोजन करणे, समारंभांचे आयोजन करणे,

झालेल्या कार्यक्रमांचा सविस्तर वृत्तांत लिहून ठेवणे, जरूर वाटल्यास संबंधितांना उपरोक्त सभांचे इतिवृत्त पाठविणे, सर्व खाते अधिकाऱ्यांची समन्वय सभा झाल्यानंतर त्याचे इतिवृत्त लिहून संबंधितांना पाठविणे या सर्व जबाबदाऱ्या जनसंपर्क अधिकाऱ्यांना पार पाडाव्या लागतात. कारखान्यांतर्गत झालेल्या सर्व कार्यक्रमांचे इतिवृत्त तयार करून ते प्रसिद्धीसाठी पाठविले जाते. कारखान्याला भेटी देणाऱ्या देशी-विदेशी पाहुण्यांना जरूर ती माहिती पुरविणे, शासकिय योजनांचा लाभ कारखाना पातळीवर सभासदांना अधिकाधिक कसा मिळेल? यादृष्टीने जरूर ती कार्यवाही केली जाते. प्रशासन विभागाचे महत्वाचे पत्रव्यवहार सांभाळणे, व्यवस्थापकीय मंडळींच्या आदेशानुसार त्यांची कार्यवाही करून घेणे इ. कामे जनसंपर्क अधिकाऱ्यांकडून करून घेतली जातात. वेळोवेळी कारखाना पदाधिकारी व कारखाना संचालक यांच्या मुलाखती वृत्तपत्रांना दिल्या जातात. जरूर वाटल्यास पत्रकार परिषदेचे आयोजन कारखानास्थळावर केले जाते. प्रशासन विभागाकडे २० कामगार कायमस्वरूपी तर ५ कामगार हंगामी स्वरूपात काम करीत आहेत.

**<u>प्रशासन विभाग</u>**

(व्यवस्थापन तक्ता)



**(२) ऊस विकास विभाग (शेती विभाग) :**

साखर कारखान्यातील एक महत्त्वपूर्ण विभाग म्हणून या विभागाला ओळखले जाते. यामध्ये ८५ कर्मचारी काम करतात. या विभागामार्फत ऊस उत्पादनावर अधिकाधिक भर दिला जातो. ऊस उत्पादक सभासदांना रासायनिक तसेच कंपोस्ट खते पुरविणे, जंतुनाशके व बेणे पुरविणे इ. कामे या विभागाकडून केली जातात. ऊस बेणे ऊस उत्पादक सभासदांना क्रेडिटवर पुरविण्याचे कामदेखील या विभागामार्फत केले जाते.

ऊसाच्या नवनवीन जातींचा प्रसार व्हावा म्हणून शेती विभागामार्फत बेणे प्लॉट योजना प्रत्येकवर्षी राबविण्यात येते. वीस गुंठ्याचा एक बेणे प्लॉट या पद्धतीने १०० हेक्टरपर्यंत सुधारित जातीच्या ऊसाची लागवड केली जाते. यांना 'बेणे मळे' असेदेखील म्हटले जाते. एका सभासदाला जास्तीतजास्त एक एकरपर्यंत बेणे प्लॉट म्हणून ऊसाची लागवड करता येते. शुद्ध आणि निरोगी ऊस बेण्याचा पुरवठा व्हावा, कारखाना परिसरातील सभासद बंधूंचे ऊस उत्पादन वाढावे, बाहेरच्या जिल्ह्यातून आणि राज्यातून ऊसाची आवक करावी लागू नये या हेतूने प्लॉट विकास योजना कारखान्यामार्फत राबविण्यात येते.

बेणे प्लॉटधारक ऊस उत्पादक सभासदांच्या बाबतीत काही महत्वाच्या गोष्टींचा विचार करण्यात आलेला आहे. पहिली गोष्ट म्हणजे बेणे प्लॉटधाकर शेतकरी हा कारखान्याचा शेअर्स सभासद (भागधारक) असणे अत्यावश्यक आहे. संबंधित सभासद कारखान्यात नियमितपणे ऊस पुरवठा करणारा असला पाहिजे. बेणे प्लॉटचे जमीनक्षेत्र रस्त्याच्या कडेचे असावे की जेणेकरून ऊस लागवडीच्या कालावधीत ऊस बेण्याची वाहतूक करणे इतर शेतकऱ्यांना सोयीचे ठरेल. तसेच कारखाना अधिकारी, ऊसविकास अधिकारी, तज्ज्ञ मार्गदर्शक वर्ग या सर्वांना अधूनमधून भेटी देणे सोयीचे होईल. ज्या सभासदांकडे पाणीपुरवठ्याची साधने उपलब्ध आहेत. त्यांना या योजनेसाठी अग्रक्रम देण्यात आलेला आहे.

ऊस लागवडीच्या हंगामामध्ये ज्या सभासदांना बेणे प्लॉटमध्ये तयार करण्यात आलेल्या सुधारित जातीच्या ऊसाची लागवड करावयाची असते तो शेतकरी कारखान्याकडे

सुधारित जातीच्या ऊस बेण्याची मागणी करतो. कारखान्यामार्फत संबंधितांना त्यांच्या परिसरातील ऊस बेणेधारक शेतकऱ्यांचे नांव सांगितले जाते. बेण्याची मागणी करणाऱ्या शेतकऱ्याला कांडीचा दर व बेणे पसंत असेल, तर त्याला बेणेप्लॉटधारक हवे तितके बेणे देतो. कारखान्यामार्फत बेणे-प्लॉट योजनेंतर्गत को-६७१, निरा-८६०३२, को-९२००५, को-९४०१२, को-८०१४, को-७२१९, को-७५२७ इ. नवीन वाणांची निर्मिती करण्यात आलेली आहे. सुरूवातीच्या कालावधीत बेणे प्लॉट विकासासाठी साखर कारखान्यांमार्फत खते, जंतुनाशके यांच्या वापराकरिता ५० टक्के अनुदान दिले जात असे. अलिकडच्या काही वर्षांत हे अनुदान बंद करण्यात आलेले आहे. कारखाना कार्यक्षेत्रामध्ये ठिकठिकाणी कारखाना केंद्रे उघडण्यात आलेली असून केंद्रांवरून ऊस पुरवठादार सभासदांना ऊस नोंद क्षेत्राच्या प्रमाणात खते, तणनाशके, रोग व किडनाशके क्रेडिटवर पुरविली जातात. संबंधीत सभासद केंद्राकडे मागणी करतात. केंद्रावरून खते, तणनाशके, रोग व किडनाशके घेऊन जातात. त्यांच्या वापराच्या व उपलब्धतेच्या संदर्भात कारखान्याकडून खास असे परिपत्रक काढले जाते. सभासदांच्या ऊस बिलातून, व्याज बिलातून सदरची रक्कम वसूल करून घेतली जाते.

ऊस पुरवठा विभागाच्या अधिकाराखाली कारखान्यामार्फत कारखाना कार्यक्षेत्रात एकूण ११ केंद्रे कार्यरत आहेत. ती खालीलप्रमाणे :

**कारखाना केंद्रे**

| | |
|---|---|
| १. परिते | ७. शिरगांव |
| २. कुरूकली | ८. कसबा तारळे |
| ३. हळदी | ९. गुडाळ |
| ४. सडोली खालसा | १०. घोटवडे |
| ५. हसूर | ११. आवळी बुद्रुक |
| ६. राशिवडे | |

प्रत्येक केंद्रांतर्गत विविध गावांचा समावेश आढळतो. एका केंद्राकडे निश्चित अशी गावे आढळत नाहीत. कमी अधिक गावांचा समावेश असलेली कारखाना केंद्रे आढळतात. या योजनेचा लाभ घेणारी गांवे पुढील तक्त्यात दर्शविण्यात आलेली आहेत :

## तक्ता क्रमांक ४.२

## तालुकानिहाय गावांची संख्या

| करवीर तालुका | | राधानगरी तालुका | |
|---|---|---|---|
| १. | कुरूकली | ३०. | शिरगांव |
| २. | कोथळी | ३१. | आवळी खु. |
| ३. | बेले | ३२. | पुंगाव |
| ४. | म्हाळुंगे | ३३. | राशिवडे खु. |
| ५. | हळदी | ३४. | मुसळवाडी |
| ६. | वाशी | ३५. | कांबळवाडी |
| ७. | शेळेवाडी | ३६. | तरसंबळे |
| ८. | कांडगांव | ३७. | घुडेवाडी |
| ९. | देवाळे | ३८. | चाफोडी |
| १०. | कुर्डू | ३९. | आवळी बु।। |
| ११. | सडोली खा।। (कारभारवाडीसह) | ४०. | आमजाई व्हरवडे |
| १२. | आरे (गाडे गोंडवाडी) | ४१. | आणाजे |
| १३. | बाचणी | ४२. | शिरसे |
| १४. | हसूर | ४३. | खिंडी व्हरवडे |
| १५. | भाटणवाडी | ४४. | करंजफेण |
| १६. | सोनाळी | ४५. | गुडाळ |
| १७. | पाटेकरवाडी | ४६. | कुडुत्री |
| १८. | कांचनवाडी | ४७. | सो. शिरोली |
| १९. | म्हालसवडे | ४८. | का. तारळे |
| २०. | हिरवडे खा।। | ४९. | कलंकवाडी |
| २१. | परिते (राधानगरी तालुका) | ५०. | तारळे खु. (कुंभारवाडी) |
| २२. | राशिवडे बु।। | ५१. | कुक्कुडवाडी |
| २३. | येळवडे | ५२. | कंथेवाडी |
| २४. | कोदवडे | ५३. | पिरळ |
| २५. | वाघवडे | | |
| २६. | मोहडे | | |
| २७. | कौलव (बरगेवाडी, भोपळेवाडी) | | |
| २८. | घोटवडे | | |
| २९. | ठिपकुर्ली | | |

**एकूण गांवे : २१ + ३२ = ५३**

प्रत्येक कारखाना केंद्रामार्फत ऊस लागण करार करून घेतले जातात. नमुन्यादाखल ऊसाची लागण झाली आहे किंवा नाही हे सभासदांच्या शेतावर प्रत्यक्षात जाऊन पाहिले जाते. ऊस पीकावर लोकरीमावा अथवा इतर कोणत्याही रोगांचा प्रादुर्भाव आढळला तर केंद्रामार्फत विशेष मार्गदर्शन केले जाते. लोकरीमावा प्रतिबंधाच्यादृष्टीने योग्य ती काळजी घेतली जाते. कारखान्याच्या ऊस विकासाच्या विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचविल्या जातात. अडीअडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याच्यादृष्टीने सोयीस्कर म्हणून या केंद्राकडे पाहिले जाते. शेतकऱ्यांना ऊसपीक लागवडीबाबत माहिती देणे, शेतकऱ्यांच्या सभा घेणे, त्यांना उपयुक्त अशी माहिती पुरविणे इत्यादी कामे कारखाना केंद्रामार्फत केली जातात.

कारखाना केंद्रामार्फत ज्या-त्या केंद्रांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या खेडेगावांमध्ये बेणे प्लॉट तयार करणे, नवीन जातीच्या उसाच्या वाणांचा प्रसार करणे, तणनाशके, किटकनाशके, शेतीच्या मशागतीसाठी सुधारित पद्धतीची अवजारे पुरविणे इ. कामे केली जातात. केंद्रांमध्ये खालीलप्रमाणे पदाधिकारी काम करताना आढळतात.

**शेती अधिकारी**

↓

**ऊस विकास अधिकारी**

↓

**ॲग्रीओव्हरसिअर**

↓

**शेती मदतनीस**

↓

**रिसर्चर**

↓

**कारकून**

शेती अधिकाऱ्याच्या अधिकाराखाली शेती विभागाचे कामकाज चालते. शेतकऱ्यांचे लागण करार नोंद करण्यापासून ऊस तोडणीपर्यंतीची सर्व कामे या विभागामार्फत पुढील पदाधिकारी करताना आढळतात.

**शेती अधिकारी**

↓

**ॲग्रीओव्हरसिअर**

↓

**केंद्रप्रमुख**

↓

**केंद्रलिपीक**

↓

**स्लीप बॉय**

**कारखाना मालकीचा शेती फार्म :**

कारखाना स्थळावर देखील ऊस विकास विभागाचे काम चालते. कारखान्याच्या मालकीचा असा स्वतःचा शेतीफार्म आहे. त्याची रचना खालीलप्रमाणे आहे.

**ऊसविकास अधिकारी**

↓

**ओव्हरसिअर**

↓

**हेडक्लार्क**

↓

**असिस्टंट क्लार्क**

↓

**मुकादम**

↓

**शेती मदतनीस**

↓

**माळी**

↓

**शिपाई**

कारखान्याच्या विविध केंद्रांवरून खते, औषधे, बेणे, फळझाडे वाटप करण्याचे काम या विभागामार्फत केले जाते. ऊस उत्पादक सभासदांना पुरवठा करण्यात आलेल्या वरील बाबींचा हिशेब या विभागामार्फत ठेवला जातो. ऊस बिलातून ही रक्कम वेळच्यावेळी कपात केली जाते.

शेती विभागामार्फत फलोद्यानाच्यादृष्टीने सभासदांना आंबा, पेरू, चिक्कू, नारळ, लिंबू, काजू, डाळींब, कोकम, सुपारी, फणस मोरआवळा इ. फळझाडांचे वाटप केले जाते.

कृषि विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त शासकीय रोपवाटीकेतून सभासदांच्या मागणीनुसार कारखाना स्थळावर रोपे आणली जातात. रोपे आणण्याचा वाहतूकखर्च कारखान्यामार्फत केला जातो. सभासदांना शासकीय रोपावाटीकेच्या दराप्रमाणे रोपांची किंमत द्यावी लागते. 'ना नफा ना तोटा' या तत्वावर रोपांचा पुरवठा केला जातो. ज्या शेतकरी सभासदांनी रोपांची उचल केलेली असेल, त्यांच्या बिलातून रोपांची रक्कम कपात केली जाते. आत्तापर्यंत या योजनेचा लाभ जास्तीतजास्त शेतकरी सभासदांना झालेला आहे.

कारखाना परिसरामध्ये नारळ, आंबा, चिक्कू या फळझाडांची लागवड प्रायोगिक तत्वावर करण्यात आलेली आहे. कारखाना परिसरात स्वतंत्र अशी नारळाची व आंब्याची बाग विकसित करण्यात आलेली आहे. या सर्व फळझाडांचे व्यवस्थापन शेती फार्ममार्फत केले जाते. कारखाना परिसरामध्ये घेण्यात आलेल्या फळबागांतून फळे परिपक्व झाल्यानंतर त्याचा अहवाल मॅनेजिंग डायरेक्टरला सादर केला जातो. मॅनेजिंग डायरेक्टरची परवानगी मिळाल्यानंतर फळे काढली जातात. फळे काढण्यासाठी मजूरांचा वापर केला जातो.

फळबागेतून उत्पादित झालेल्या फळांचे दर ठरविण्याचे काम संचालक मंडळाकडे सोपविले जाते. संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये फळबागेतून मिळालेल्या फळांचे दर ठरविले जातात. विक्रीची मंजूरी मिळाल्यानंतर, दर निश्चित केल्यानंतर कारखाना स्थळावर माल विक्रीसाठी ठेवला जातो. बाजारभावापेक्षा कमी दरामध्ये फळांची विक्री केली जाते. प्रत्येकवर्षी लाखो रूपयांचे उत्पन्न फळबागेपासून मिळते. कारखाना स्थळावरील फळबाग हे एक उत्पन्नाचे साधन ठरले आहे.

शेतकरी सभासदांकडून आलेल्या लागण कराराची नोंद करून घेणे, लागण करार नोंदीनुसार ऊस तोडणीचा कार्यक्रम ठरविणे, स्लीप बॉयमार्फत लागणक्षेत्राची पाहणी करणे, उसतोडणीच्या ठरवून दिलेल्या तारखांना ऊस तोडणी होते किंवा नाही इ. गोष्टींकडे या विभागामार्फत जातीने लक्ष दिले जाते.

**(३) इंजिनिअरींग विभाग :**

इंजिनिअरींग विभागाची रचना पुढीलप्रमाणे :

**चिफ इंजिनिअर**
↓
**डेप्युटी इंजिनिअर**
↓
**असिस्टंट इंजिनिअर**
↓

- इलेक्ट्रीक सुपरवायझर → वायरमन → वायरमन हेल्पर → मजदूर
- बॉयलर अटेंडंट → फायरमन → वॉटरमन → पंपमन → मजदूर
- फोरमन → फिटर → पंपमन → ऑईलमन → मजदूर

या विभागामार्फत यंत्रांची दुरूस्ती, देखभाल व काळजी घेतली जाते. यंत्रातील त्रुटी शोधण्याचे काम केले जाते. ही कामे सामान्यतः बिगर हंगामामध्ये केली जातात. कारखान्यातील सर्वच कामे यंत्रावर आधारित असल्याने या विभागाला कारखान्यातील अत्यंत महत्वाचा भाग म्हणून ओळखले जाते. या विभागामध्ये हंगामी कामगार १८० तर कायमस्वरूपी कामगार १७० याप्रमाणे एकूण ३५० कामगार काम करीत आहेत. मुख्य अभियंता हा या विभागाचा प्रमुख म्हणून काम करतो. त्याच्या अधिकाराखाली ८ असिस्टंट इंजिनिअर्स काम करतात. ज्या मशिनरी चालू स्थितीत आहेत त्यांच्या पर्यवेक्षणाचे काम २ इंजिनिअर्समार्फत केले जाते. बॉयलर, वर्कशॉप या विभागातील मशीन खोलण्याचे काम या इंजिनिअर्समार्फत केले जाते. मशिन खोलण्यापासून इतर सर्व कामे करून घेण्यासाठी इंजिनिअर मंडळींचा वापर करून घेतला जातो. कुशल, अर्धकुशल कामगार मंडळींचा समावेश या विभागामध्ये आढळतो. वेगवेगळ्या यंत्रसामुग्रीची दुरूस्ती करून घेणे, यंत्रणा

ऑईलिंग व ग्रीसींग करणे इ. कामे या विभागामार्फत केली जातात. सन १९२३ च्या कायद्यानुसार बॉयलरचे इन्स्पेक्शन या विभागामार्फत करून घेतले जाते. बॉयलर वापरण्यास योग्य आहे किंवा नाही हे इन्स्पेक्शननंतर ठरविले जाते. वेगवेगळ्या यंत्रांच्या प्राथमिक चाचण्या या विभागामार्फत घेतल्या जातात. त्यावरूनदेखील एखादे यंत्र वापरण्यास योग्य आहे की अयोग्य ते समजते.

इलेक्ट्रीक मोटर खोलणे, बेअरींग साफसफाई करून घेणे, बेअरींग शाफ्ट तपासून घेणे, मोटर वापरण्यासाठी तयार करणे, कारखाना हंगाम सुरू होण्यापूर्वी प्रत्येक युनिटच्या चाचण्या घेणे इ. महत्वपूर्ण कामे या विभागामार्फत केली जातात. प्रत्येक इंजिनिअरच्या हाताखाली असिस्टंट (सहाय्यक) इंजिनिअर्स, मुकादम, लिपीक, शिपाई इ. कर्मचारी काम करतात. या विभागाचे कामकाज तीन पाळ्यांमध्ये चालते.

हंगामामध्ये या विभागाचे कामकाज २४ तास चालते. आठ तासांची शिफ्ट ठरलेली असते. प्रत्येक शिफ्टमध्ये दोन असिस्टंट इंजिनिअर काम करतात. त्यांच्या हाताखाली ११० कामगार काम करतात.

कारखान्याचा गळीत हंगाम संपल्यानंतर सर्व यंत्रे धुवून स्वच्छ करणे, त्यांच्यातील अंतर्गत त्रुटी दूर करणे ही कामे या विभागामार्फत केली जातात. काही यंत्रे विशिष्ट (ठराविक) काळ वापरून ती निकामी केली जातात. काही अवजड यंत्रे कशी वापरावी याविषयीचे मार्गदर्शन इंजिनिअर मंडळींकडून कामगारांना केले जाते.

### (४) उत्पादन (मॅन्युफॅक्चरींग) विभाग :

साखर उत्पादनाचे काम या विभागामार्फत केले जाते. जास्तीतजास्त उत्तम दर्जाच्या साखरेचे कसे उत्पादन होऊ शकेल या गोष्टीकडे अधिक लक्ष पुरविले जाते. मिलकडून येणारा रस वजन करून घेतला जातो. त्यानंतर तो ज्युस हिटरमध्ये ६५° ते ७०° डिग्री सेंटीग्रेडपर्यंत तापविला जातो. चुन्याची निवळी व सल्फर डायऑक्साईड रसामध्ये मिसळला जातो. त्यानंतर ज्युस हिटरमध्ये १०५° ते ११०° सेंटीग्रेडपर्यंत तापविला जातो. त्यानंतर निर्भेळ ज्युस व मोलॅसिस स्वतंत्र केले जातात. सुका मोलॅसिस बाहेर पाठविला

जातो. सेंट्रीफ्युगल विभागामध्ये स्वयंचलित यंत्रामध्ये अे मेस्कीट घेऊन पांढरी साखर व मोलॅसिस बाहेर स्वतंत्र केले जातात. त्यानंतर पांढरी साखर सुकविली जाते. ग्रेडरच्या सहाय्याने एम्-३० ग्रेड व एस्-३० ग्रेड असे प्रत प्रमाणीकरण केले जाते. एम्-३० म्हणजे मध्यम आकाराची साखर आणि एस्-३० म्हणजे मध्यम प्रतीची व आकाराने मोठी साखर होय. या साखरेला अधिक मागणी आढळते. प्रतीदिनी ६ ते ६.५ हजार पोती साखर उत्पादित केली जाते. प्रत्येक दिवशी मोलॅसिसचे उत्पादन १५० टन इतके होते. मॉलॅसिस अल्कोहोल निर्मितीकरिता वापरला जातो. ऊसाच्या गुणवत्तेवर साखरेचा उतारा अवलंबून राहतो. प्रत्येक दिवशी ऊसाच्या उताऱ्याचे पृथःकरण केले जाते. दररोज तयार होणारी एम्-ग्रेड व एस्-ग्रेड ची साखरपोती स्वतंत्र ठेवली जातात. चेअरमन, कार्यकारी संचालक, साखरसंघ यांच्याकडे प्रत्येक दिवशीचा तसेच आठवड्याचा अहवाला पाठविला जातो.

या विभागाकडे १३ अधिकारी व १५ कर्मचारी कायमस्वरूपी तसेच १२० हंगामी कामगार काम करीत आहेत. चिफ केमिस्ट, असिस्टंट केमिस्ट व त्यानंतर इतर अधिकारीवर्ग तसेच कर्मचारीवर्ग काम करतात.

**<u>व्यवस्थापन तक्ता</u>**

**चिफ केमिस्ट**
↓
**असिस्टंट केमिस्ट**
↓

- **ज्युस सुपरवायझर** → **मुकादम** → **मजदूर**
- **पॅन इनचार्ज** → **पॅनमन** → **असिस्टंट पॅनमन** → **मजदूर**
- **सेंट्री मुकादम** → **ऑपरेटर्स** → **मजदूर**

**(५) संगणक विभाग :**

कारखान्याच्या अकौंट विभागाच्या अधिकाराखाली अलिकडे स्वतंत्र स्वरूपात संगणक विभागाची स्थापना करण्यात आली आहे. या विभागातील एकूण संगणकांची संख्या २५ असून कारखान्यातील विविध विभागांकडे संगणक पुरविण्यात आलेले आहेत.

**(६) अकौंट विभाग :**

कारखान्यातील विविध प्रकारचे हिशेब सुव्यवस्थितरित्या ठेवण्यामध्ये अकौंट विभागाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. विविध विभागांची खर्चाची बिले, त्याच्या पावत्या या विभागाकडे पाठविल्या जातात. सर्व प्रकारच्या देवी-घेवीची बिले शिस्तबद्धरित्या अकौंट विभागामार्फत ठेवली जातात. हिशेबपत्रके, त्यासाठी लागणारी व्हौचर्स विशिष्ट पद्धतीने ठेवली जातात. आर्थिक व्यवहारांशी संबंधित असणारी प्रत्येक बाब अकौंट विभागामार्फत पास केली जाते. कॅश विभाग हा अकौंट विभागाचाच एक भाग आहे. हा विभाग मुख्य अकौंटंटच्या नियंत्रणाखाली चालतो. या विभागात ५२ कायमस्वरूपी व १६ हंगामी अशाप्रकारे ६८ कर्मचारी काम करतात.

या विभागाचे तीन प्रकारात वर्गीकरण केलेले आढळते :

**अ) सामान्य अकौंट विभाग :**

या विभागामार्फत साखर वितरणाचे व्यवहार केले जातात. कारखान्यामध्ये विविध गोडाऊननिहाय असलेली एकूण साखर, दररोज बाहेर विक्रीसाठी पाठविली जाणारी साखर, शिल्लक साखर या सर्वांचा हिशेब सामान्य अकौंट विभागामार्फत ठेवला जातो. ॲडव्हान्स देण्याची व्यवस्था या विभागामार्फत केली जाते. बैलगाडी वाहतूकदारांना, ऊस तोडणी कामगारांना, ट्रक व ट्रॅक्टरधारकांना हंगाम सुरू होण्यापूर्वी ॲडव्हान्स दिला जातो.

**ब) स्टोअर अकौंट विभाग :**

स्टोअरसाठी जो खर्च करण्यात येतो त्याची बिले विभागामार्फत आदा केली जातात.

**क) कॅश अकौंट विभाग :**

प्रत्येक हंगामामध्ये ऊसाच्या किंमती ठरविण्याचे काम या विभागामार्फत केले जाते. कारखान्यामार्फत करावयाचे विविध आर्थिक व्यवहार या विभागामार्फत सांभाळले जातात.

**(७) साखर गोडाऊन विभाग :**

या विभागाची रचना पुढीलप्रमाणे असते :

**गोडाऊन किपर**
↓
**शुगर इन्स्पेक्टर**
↓
**कारकून**
↓
**मुकादम**
↓
**कामगार**

साखर उत्पादन विभागाच्या नजीकच साखर गोडाऊन विभाग कार्यरत आहे. गोडाऊन विभागाचे कामकाज गोडाऊनच्या समोर असलेल्या स्वतंत्र इमारतीत चालते. या इमारतीमध्ये एकूण १० अधिकारी व २० कामगार कायमस्वरूपी काम करतात. याठिकाणी गोडाऊन किपर हे प्रमुख अधिकारी म्हणून काम करतात. हंगामामध्ये १०० हंगामी कामगार काम करतात. कारखाना परिसरामध्ये एकूण १३ गोडाऊन्स आहेत. बाहेर ताडपत्रीची चार गोडाऊन्स आहेत. अकौंट ऑफिसमधून येणाऱ्या मेमोनुसार गोडाऊन कारकून इनव्हॉइस बनवून साखर वितरीत करतात. गोडाऊनमध्ये एम्-ग्रेड चा दर निश्चित केला जातो. साखर वितरीत केल्याची नोंद गोडाऊन विभागामार्फत ठेवली जाते. प्रत्येक दिवशी गोडाऊनमधून किती साखर बाहेर पाठविण्यात आली याचा अहवाल नियमितपणे मॅनेजिंग डायरेक्टरला सादर केला जातो. शिल्लक साखरेची नोंददेखील प्रत्येक दिवशी ठेवली जाते.

मागणीनुसार गोडाऊनमधून तितकीच साखर बाहेर गेली का हे पाहण्यासाठी गोडाऊनच्या दरवाजावर खास सुरक्षा अधिकाऱ्याची नेमणूक केलेली आढळते. त्यामुळे साखर पोत्यांची जितकी मागणी असेल तितक्याच पोत्यांचे वितरण केले जाते. गोडाऊनकडे जेव्हा ट्रक आणला जातो तेव्हा तो रिकामा आहे का याची खात्री करून

घेतली जाते. गोडाऊनमध्येदेखील एका रांगेत ठराविक इतकीच साखरपोती ठेवली जात असल्याने साखरपोत्यांचा हिशेब ठेवणे सोयीचे होते. संपूर्ण दिवसभरामध्ये कोणत्या ग्रेडची किती साखर बाहेर पाठविण्यात आली, याचीही नोंद ठेवली जाते.

**(८) लेबर वेल्फेअर विभाग :**

कारखान्यातील लेबर वेल्फेअर विभाग कामगार कल्याणाच्यादृष्टीने महत्वाचे कार्य करतो. या विभागामध्ये लेबर ऑफिसरच्या हाताखाली वेल्फेअर ऑफिसर, लिपीक आणि शिपाई हा स्टाफ काम करतो. यामध्ये ४ कायम व १ हंगामी असे एकूण ५ कर्मचारी काम करतात. कामगार कल्याणच्यादृष्टीने विविध कार्यक्रम या विभागामार्फत राबविले जातात. कारखान्यातील कामगारांची नव्याने भरती करणे, कामगारांना बढती देणे इ. कामे या विभागामार्फत केली जातात. काही कारणांमुळे कामगार व व्यवस्थापन यांच्यामध्ये तंटे निर्माण झाले असतील तर ते सोडविण्याच्यादृष्टीने प्रयत्न केले जातात. कामगारवर्ग आपल्या दैनंदिन कामकाजामध्ये जर कसूर करत असतील तर त्यांची कौटुंबिक चौकशी (Domestic Enquiry) करून योग्य ती कारवाई केली जाते.

कामगारवर्गाकडून होणाऱ्या चुकांबाबत त्यांना मेमो देणे, ताकीद देणे, कारणे दाखवा नोटीस बजावणे, आरोपपत्र दाखल करून कारवाई करणे इ. कामे केली जातात. शासकीय कार्यालये, लेबर कमिशनर, प्रॉव्हिडंट फंड कमिशनर, इन्स्पेक्टर, साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य साखर कारखाना संघ - मुंबई इ. कार्यालयांमध्ये कामगारांविषयी पत्रव्यवहार केला जातो. प्रत्येकवर्षी कारखाना परवाना नुतनीकरणाचे कार्यदेखील या विभागामार्फत केले जाते.

मागासवर्गीय कक्ष, सेवायोजन कार्यालय, जिल्हा सहाय्यक निबंधक, साखर आयुक्त कार्यालय इ. कार्यालयांना कामगारविषयक मासिक, त्रैमासिक, अर्धवार्षिक व वार्षिक प्रपत्रे पाठविली जातात. कामगार प्रशिक्षणवर्ग भरविणे, कामगारांच्या तांत्रिक ज्ञानामध्ये भर घालण्यासाठी त्यांना वसंतदादा साखर संस्था, पुणे येथे, खाजगी संस्थांमध्ये उदा. औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर इ. ठिकाणी पाठविले जाते.

लेबर वेल्फेअर विभागामार्फत कामगारांच्या सामान्य ज्ञानात भर पडावी म्हणून त्यांना वर्तमानपत्रे, दिवाळी अंक, बौद्धिकतेत भर पडावी म्हणून कथा-कादंबऱ्या, तांत्रिक ज्ञानामध्ये भर पडावी म्हणून ते ज्या यंत्रांचा वापर करतात अशा यंत्रांची माहिती देणारी पुस्तके उपलब्ध करून दिली जातात. या पुस्तकांचा लाभ सर्व कामगारांना मिळवा यासाठी प्रत्येक कामगाराने विशिष्ट दिवसांनी पुस्तके परत करावी अशी अट घातली जाते.

या विभागामार्फत इतर कारखान्यांशीदेखील पत्रव्यवहार करून किंवा टेलिफोनद्वारे संपर्क साधला जातो. बाहेरच्या कारखान्यांशी संबंध ठेवल्याने त्या ठिकाणच्या कामगारांविषयी माहिती मिळविता येते. तेथील कामगार कल्याणार्थ राबविलेल्या योजना आपल्या कारखान्यात राबविता येतात. जास्तीतजास्त कामगारांचे हित पाहता येते.

**कामगार प्रशिक्षण कार्यक्रम :**

कामगार प्रशिक्षण कार्यक्रम हा लेबर वेल्फेअर विभागाचा अतिशय महत्वाचा कार्यक्रम आहे. कामगारांना ते ज्या परिस्थितीत काम करतात तेथे कोणकोणते बदल घडवून आणले पाहिजेत याबाबत मार्गदर्शन केले जाते. त्यांच्या विविध समस्यांचा अभ्यास करून त्यांना त्यांची जाणीव करून दिली जाते. कारखान्याचा गळीत हंगाम बंद असताना वर्षातून एकवेळा ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यात कारखाना स्थळावर कामगार प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ जास्तीतजास्त कामगारांना कसा मिळेल? यादृष्टीने विशेष काळजी घेतली जाते. कामगार प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये कामगारांना खालील विषयांवर मार्गदर्शन केले जाते.

१. कामगारांचे हक्क आणि कर्तव्य.

२. कामगारांचे आरोग्य.

३. कामगार सुरक्षितता कायदे.

४. उत्पादन वाढविण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक बाबी.

५. कामगारांचा उत्पादनातील सहभाग.

६. कामगारांच्या दैनंदिन जीवनातील विविध समस्या व त्यावरील उपाय.

कारखान्यामध्ये दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाशिवाय डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन, पुणे यांच्या सौजन्याने कारखान्याबाहेरदेखील प्रशिक्षणवर्ग आयोजित केले जातात. या प्रशिक्षणासाठी शेती अधिकारी, चिफ इंजिनिअर, ॲग्रीओव्हरसिअर, असिस्टंट इंजिनिअर, चिफ केमिस्ट, असिस्टंट केमिस्ट इ. अधिकाऱ्यांना प्रशिक्षणासाठी पाठविले जाते.

कारखाना स्थळावर कारखान्यामार्फत परिसंवादांचे आयोजन केले जाते. परिसंवाद एक, दोन, तीन दिवस अशा वेगवेगळ्या कालावधीसाठी आयोजित केले जातात. आरोग्याच्यादृष्टीने वेज बोर्डाने ठरवून दिलेल्या महत्वाच्या व्याधींच्या संदर्भात कारखान्यामार्फत कामगारांना अर्थसहाय्य पुरविले जाते.

१. क्षय (टी.बी.)

२. महारोग (लेप्रसी)

३. कॅन्सर

४. हृदयरोग

५. अर्धांगवायू

वरील आजारांनी त्रस्त असणाऱ्या कामगारांना (कायमस्वरूपी) जास्तीतजास्त एक वर्षापर्यंत पगारी रजा दिली जाते. कारखाना स्थळावर काम करीत असताना कामगारांचा अपघात झाल्यास त्यांना औषधोपचार खर्च दिला जातो. त्यांना रजा दिल्या जातात. पहिले तीन दिवस पूर्ण पगार, पुढे अर्धपगारी रजा दिली जाते. कायद्यानुसार कामगारांना नुकसानभरपाई दिली जाते. याशिवाय कामगारांना हक्काच्या रजा, पगारी रजा, आजारपणातील रजा नियमानुसार दिल्या जातात.

कारखान्याकडे सध्या श्री. शेळके साहेब हे लेबर ऑफिसर म्हणून तर श्री. एम्. एस्. पाटील हे वेल्फेअर ऑफिसर म्हणून काम पाहत आहेत.

अलिकडे कारखान्याकडे ऊस वाहतूक करणाऱ्या बैलगाड्या व गाडीवानांचा विमा वेल्फेअर विभागामार्फत उतरविला जातो. एखाद्या गाडीवानाचा अपघात झाल्यास पंचनामा करून त्याला नुकसानभरपाई दिली जाते. गाडीचा बैल वजनकाट्यावर पाय घसरून

पडल्यास किंवा रस्त्यावर काही अपघात घडल्यास बैलगाडी धारकाला नुकसान भरपाई दिली जाते.

ऊसतोडणी कामगार अकस्मित मरण पावल्यास त्याच्या नातेवाईकांना आर्थिक मदत पुरविली जाते. किरकोळ स्वरूपात दुखापत झाल्यास कारखान्याकडून मदत केली जाते. मरण पावणाऱ्या ऊसतोडणी कामगारांच्या नातेवाईकांना मृत कामगाराच्या अंत्यसंस्कारासाठी अर्थसहाय्य पुरविले.

**(९) टाईम ऑफिस :**

कारखान्यातील सुरक्षा विभागाच्या नजीकच्या विभागाला टाईम ऑफिस (जनरल ऑफिस) म्हणून ओळखले जाते. याची रचना पुढीलप्रमाणे :

**हेड टाईम किपर**
↓
**कारकून**
↓
**शिपाई**

या ऑफिसमध्ये एकूण अकरा कर्मचारी काम करतात. याचे हेडटाईम किपर पद - १, कारकून पदे - ४, शिपाई पदे - ६ असे वर्गीकरण केले जाते. या ऑफिसचे कामकाज तीन पाळ्यांमध्ये चालते. ऑफिसमार्फत कामगारांना वेगवेगळ्या कोडनंबरची कार्डस पुरविली जातात. सर्व कामगारांच्या हजेरीचे रेकॉर्ड या ऑफिसमार्फत तयार केले जाते. पंचींग मशिनच्या सहाय्याने कामगार कारखान्यामध्ये कामावर आल्याची वेळ, कामाची वेळ संपल्यानंतर तो घरी जाण्याची वेळ कार्डवर पंच करण्याचे काम टाईम ऑफिसद्वारे केले जाते. कामगारांच्या हजेरीच्या दिवसांवरून त्यांचा मासिक पगार टाईम ऑफिसमार्फत दिला जातो.

प्रत्येक कामगाराच्या महिनाभरातील रजा, ज्यादा कामाचा हिशेब याबाबतच्या नोंदीदेखील या ऑफिसमधून ठेवल्या जातात. कारखान्यामध्ये काम करीत असलेल्या हंगामी, कायमस्वरूपी हंगामी, ॲप्रेंटीस अशा वेगवेगळ्या स्तरातील कामगारांचे स्वतंत्र रेकॉर्ड (माहिती) या विभागाकडून ठेवले जाते. प्रत्येक विभागातील कामगारांच्या दैनंदिन

हजेरीचे, गैरहजेरीचे रेकॉर्ड या विभागाकडून ठेवले जाते. विभागवार किती कामगार गैरहजर आहेत, याची माहिती प्रत्येक विभागप्रमुखांना दिली जाते. कारखान्यामध्ये काम करीत असलेल्या प्रत्येक कामगारांना या विभागाने कोडनंबर दिलेले आहेत. यावरून त्यांच्या नोंदी ठेवल्या जातात. कामगारांच्या कोडनंबरवरून त्यांच्या पगारातून जी वजावट करावयाची आहे ती केली जाते. वेगवेगळ्या विभागाच्या कामगारांची स्वतंत्र रजिस्टर ठेवली जातात. प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत कामगारांच्या पगाराचे वाटप केले जाते. संगणकाचा वापर या विभागामध्ये केला जात असल्याने प्रत्येक कामगाराच्या अचूक नोंदी या विभागामार्फत ठेवल्या जातात.

**(१०) इरिगेशन (पाणीपुरवठा) विभाग / उपसा जलसिंचन योजना :**

कारखाना परिसरातील जास्तीतजास्त ऊस कारखाना स्थळावर आणला जावा याचाच अर्थ ऊसाचे उत्पादन वाढविण्यात यावे या उद्देशातून पाणीपुरवठा विभाग कार्यरत आहे. कारखाना परिसरामध्ये कारखान्याच्या माध्यमातून पाणीपुरवठा योजना उभारणे आणि ऊसाचे उत्पादन वाढविणे यादृष्टीने या विभागामार्फत आत्तापर्यंत भरीव कामगिरी करण्यात आलेली आहे.

या विभागाची रचना पुढीलप्रमाणे आहे :

**इरिगेशन ऑफिसर**

↓

**असिस्टंट अकौंटंट**

↓

**कारकून**

↓

**मेजर सर्व्हेअर**

↓

**शिपाई**

या विभागात सद्यः १० कर्मचारी काम करतात. या विभागामार्फत सद्यः कारखाना पुरस्कृत १४ संस्था कार्यरत आहेत. ८० को-ऑपरेटीव्ह इरिगेशन पाणीपुरवठा संस्था की ज्यांना कारखान्याने अर्थसहाय्य केले आहे अशा संस्था कार्यरत आहेत.

मौजे हळदी, तळवडे, रेंदाळे, कौलव, आमजाईव्हरवडे, घुडेवाडी, कांबळवाडी, कंथेवाडी, आवळी बु.।। इ. गावांमधून उपसा जलसिंचन योजना कार्यरत आहेत. नदीपासून ३ ते ४ कि.मी. अंतरापर्यंत पाणी पोहचविले जात आहे. एकूण १५०० एकर जमिन पाण्याखाली आली आहे. रब्बी हंगामात ४०० एकर जमिनीस पाणीपुरवठा केला जातो.

या विभागाकडे तज्ज्ञ इंजिनिअर मंडळींची नेमणूक केली जाते. ही नेमणूक पूर्णतः कारखान्यामार्फत केली जाते. राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका इत्यादींकडून कर्ज मिळविण्याचे प्रयत्न केले जातात. संबंधित बँका व तज्ज्ञ इंजिनिअर्स यांच्या सहकार्यातून प्रकल्पाची उभारणी केली जाते. प्रकल्पाच्या उभारणीमध्ये कारखान्याची हमी राहते. पाणीपुरवठा प्रकल्प उभारणी योजनांच्या कालावधीत पर्यवेक्षणाची जबाबदारी पूर्णपणे कारखान्याची राहते. इतकेच काय तर प्रकल्पासाठी दिलेले कर्ज फिटेपर्यंत कारखान्याचे नियंत्रण राहते. ज्या गावच्या संस्थेला पाणीपुरवठा योजना राबवायची आहे त्या संस्थेचा मागणीअर्ज व ठराव कारखाना व्यवस्थापनाकडे सादर होणे आवश्यक असते. त्यानंतर कारखाना सर्व्हेअरकडून संबंधित योजनेचा अभ्यास करून निर्णय घेतला जातो. संस्थेच्या सभासदांकडून 'आम्ही उत्पादित केलेला ऊस भोगावती साखर कारखान्यालाच पाठवू' अशी लेखी हमी घेतली जाते. ऊसपिकातून पाणीपट्टीपोटी ठराविक रक्कम कपात करून घेऊन ती कर्जखाती जमा केली जाते.

पाणीपुरवठा विभागामार्फत कारखाना क्षेत्रातील विविध गावांमध्ये सभा घेतल्या जातात. पाणीपुरवठा योजनेचे उद्देश लोकांना समजावून सांगितले जातात. ज्या गावातील लोकांची ही योजना राबविण्याची तयारी असते त्यांची स्वतंत्र संस्था स्थापन करून संस्थेचे रजिस्ट्रेशन करण्यासाठीदेखील या विभागामार्फत खास प्रयत्न केले जातात. पाटबंधारे खात्याकडून पाणी व वीजपुरवठा परवाना मिळविण्याचे प्रयत्न केले जातात. संस्थांमार्फत राबविले जाणारे पाणीपुरवठा प्रकल्प, त्याचा आराखडा या विभागामार्फत बनविला जातो. जॅकवेल, पाईपलाईन, मोटरपंप खरेदी यासाठी अपेक्षित खर्च याविषयीचे प्रस्ताव बँकेकडे पाठविले जातात. सुरूवातील बनविलेल्या आराखड्यानुसार पाणीपुरवठा प्रकल्पांची उभारणी केली जाते.

सद्यःस्थितीमध्ये ऊसपिकासाठी तसेच रब्बी पिकांसाठी पाणीपुरवठा करणाऱ्या संस्था कारखाना क्षेत्रातील गावांगावांतून कार्यरत आहेत.


पाणीपुरवठा विभागामार्फत आत्तापर्यंत विविध संस्थांना प्रोत्साहन देण्यात आलेले असून भविष्यामध्ये जास्तीतजास्त संस्था यामध्ये कशा सहभागी होतील, यादृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. विविध संस्थांनी पुढाकार घेऊन पाणीपुरवठ्याच्या योजना राबविल्यामुळे कारखाना क्षेत्रातील काही गावांतून ऊस कारखान्यामध्ये अजिबात येत नव्हता, तो आता येऊ लागला आहे. काही गावांतून तर ऊसाचे उत्पादन पूर्वीपेक्षा दुप्पट-तिप्पट इतके वाढले आहे. परिसरातील विहिरींच्या पाण्याची पातळी सुधारली आहे. शेतजमिनींना बारमाही पाणीपुरवठा होऊ लागल्याने शेतजमिनींच्या किंमती वाढल्या आहेत. इतर रब्बी पिकेदेखील मोठ्या प्रमाणावर घेतली जाऊ लागली आहेत. संस्थात्मक प्रयत्न स्तुत्य असले तरी जे शेतकरी या योजनेचे लाभार्थी आहेत त्यांचे कर्ज परतफेडीचे प्रयत्न अपुरे आहेत. त्यामुळे अधूनमधून योजनांच्या कार्यवाहीमध्ये अडीअडचणी निर्माण होत आहेत.

**(११) सिव्हील विभाग :**

या विभागाला साखर कारखान्यातील एक महत्वपूर्ण विभाग म्हणून ओळखले जाते. कारखानाक्षेत्रामध्ये विविध प्रकारच्या इमारती या विभागामार्फत बांधलेल्या आढळतात. कारखाना कार्यक्षेत्रातील ऊसाची आवक मोठ्या प्रमाणावर व्हावी म्हणून सिव्हील विभागामार्फत नवीन रस्ते तयार करणे, जुन्या रस्त्यांची डागडुजी करणे यासारख्या अनेक बाबींवर विशेष भर दिला जातो. कारखाना स्थळावर गरजेनुसार गोडाऊन्सदेखील बांधली जातात. कारखान्यामार्फत भविष्यामध्ये करावयाच्या बांधकामांचे नियोजन या विभागामार्फत केले जाते.

सिव्हील विभागामार्फत ज्या बाबींवर खर्च करावयाचा आहे त्याचे सविस्तर अंदाजपत्रक तयार केले जाते. तयार केलेले अंदाजपत्रक संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये मंजूरीसाठी ठेवले जाते. स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये कामाचे टेंडर प्रसिद्ध केले जाते. कामाची गुणवत्ता, त्याचा कालावधी या गोष्टी टेंडरमध्ये ठळकपणे नमूद केलेल्या असतात. टेंडर


मंजूर करण्याचा अधिकार संचालक मंडळाला दिला जातो. सिव्हील विभागाची रचना पुढीलप्रमाणे आढळते.




एकदा ऑर्डर दिल्यानंतर सिव्हील विभाग सर्वच कामाकडे वैयक्तिकरित्या लक्ष पुरवितो. या विभागामार्फत वेगवेगळ्या कामांवर लक्ष ठेवण्यासाठी पर्यवेक्षकांची नेमणूक केली जाते. कामामध्ये जास्तीतजास्त गुणवत्ता कशी टिकून राहिल यादृष्टीने पर्यवेक्षक अधिकाधिक लक्ष पुरवितात. गावाच्या पातळीवरील पाणंद विकासाचे काम या विभागामार्फत केले जाते. कारखान्याच्या अंतर्गत जी किरकोळ स्वरूपाची बांधकामे असतील ती सर्व कामे या विभागामार्फत केली जातात. कारखान्यामध्ये जे विविध विभाग आहेत त्यांच्या मागणीनुसार नवीन इमारती या विभागामार्फत बांधल्या जातात. या विभागाकडे रोजंदारीवर असणाऱ्या कामगारांकडून स्वच्छतेची कामे करून घेतली जातात. फॅक्टरी इमारत, ऑफिस इमारत, रहिवासी कामगार कॉलनी, गोडाऊन, गेस्ट हाऊस, बंधारे, मोऱ्या/पूल, कारखाना स्थळावर प्राथमिक, माध्यमिक शाळा, महाविद्यालय यांच्या इमारतींचे बांधकाम आत्तापर्यंत या विभागामार्फत करण्यात आलेले आहे. या विभागामध्ये ८० कायमस्वरूपी व ११० हंगामी कामगार काम करतात.

**(१२) स्टोअर विभाग :**

स्टोअर विभागाची रचना खालीलप्रमाणे आढळते :




हा विभाग कारखान्यातील एक अतिशय महत्वाचा विभाग आहे. कारखान्याच्या कामकाजाशी प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या या विभागाचा संबंध येत असल्याने या विभागाला अनन्यसाधारण असे महत्व प्राप्त झाले आहे. या विभागातील कामगारांची संख्या १४ इतकी आहे. स्टोअरकिपर हा या विभागाचा प्रमुख असतो. असिस्टंट स्टोअर किपर, कारकून, अटेंडंट, शिपाई, कुली इ. पदे या विभागाकडे आढळतात. स्टोअर किपरच्या अधिकाराखाली सर्वजण काम करतात. ऊस पुरवठा करणाऱ्या जबाबदार व्यक्ती व्यतिरिक्त जे काही साहित्य कारखान्याचे कामकाज सुरळीतपणे चालण्यासाठी लागते ते सर्व साहित्य देण्याचे काम स्टोअर विभागामार्फत केले जाते.

कारखान्यातील वेगवेगळ्या विभागातून साहित्याची मागणी केली जाते. मागणीनुसार स्टोअर विभागामार्फत खरेदी करून आणलेले साहित्य वेगवेगळ्या विभागांना पुरविले जाते. बाहेरून खरेदी करून आणलेल्या साहित्याचा साठा स्टोअर विभागामार्फत करून ठेवला जातो. बेअरींग्ज, ऑईल, केमिकल्स्, इलेक्ट्रीक मटेरिअल, कागद, प्रिंटींग साहित्य, स्टेशनरी इ. मालाची खरेदी स्टोअर विभागामार्फत केली जाते.

विहित नमुन्यामध्ये विविध विभागांना माल मागणीपत्र भरून द्यावे लागते. माल मागणी पत्रानुसार मालाची उपलब्धता केली जाते. कोल्हापूर, पुणे, मुंबई या ठिकाणावरून कारखान्यासाठी लागणाऱ्या मालाची खरेदी केली जाते. अगदीच जे पार्ट दुर्मिळ आहेत,

जे स्थानिक पातळीवर उपलब्ध होत नाहीत त्यांची ऑर्डर बेंगलोर येथे दिली जाते. आपणाला वर्षभरात किती साहित्य लागते? किती साहित्य लागणार आहे? याची माहिती संबंधित विभागाचे इंजिनिअर देतात. स्टोअर विभागाकडे साहित्य उपलब्ध झाल्यानंतर संबंधित विभागांना कळविले जाते. त्यानुसार संबंधित विभागाचे कामगार येऊन साहित्य घेऊन जातात. आर्थिक वर्षाच्या शेवटी ३१ मार्च रोजी स्टॉक टेकिंग घेतले जाते. स्टॉक टेकिंगचे काम ऑडिटरकडून केले जाते.

**(१३) वाहन विभाग :**

कारखानास्थळावर बाहेरच्या ठिकाणाहून वेगवेगळ्या प्रकारची मशिनरी आणण्यासाठी कारखान्याचा स्वतंत्र वाहन विभाग कार्यरत आहे. कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक सभासदांना उंचवट्याच्या जमिनीचे सपाटीकरण करून ती जमीन लागवडीखाली आणावयाची असेल तर त्यासाठी बुलडोझरची व्यवस्था केली जाते. जिथे नवीन रस्ते तयार केले जातात, खडीकरण केले जाते. त्याठिकाणी रोलींगसाठी रोलर पुरविण्याचे काम वाहन विभागामार्फत केले जाते. कारखाना कार्यक्षेत्रामध्ये ज्या ठिकाणाहून ऊस आणला जातो. अशा ठिकाणच्या पाणंदी नादुरूस्त असतील, अरूंद असतील तर त्यांचे रूंदीकरण करण्यासाठी वाहन विभागाकडून बुलडोझर पुरविले जातात.

अठरा किलोमीटर अंतराच्या बाहेरील ऊस कारखाना स्थळावर आणण्यासाठी कारखान्याच्या वाहन विभागामार्फत ट्रक व ट्रॅक्टर पुरविले जातात. अडचणीत असलेला ऊस कारखाना स्थळावर आणण्यासाठी ट्रकचा वापर केला जातो. ज्या सभासदांना आकस्मितपणे ॲम्ब्युलन्सची गरज भासते त्यांना वाहन विभागामार्फत ॲम्ब्युलन्स सेवा पुरविली जाते. सभासदांच्या मागणीनुसार त्यांना पाण्यासाठी टँकर पुरविला जातो. सणवाराच्या निमित्ताने, विवाह सोहळ्यासाठी सभासदांच्या मागणीनुसार टँकर उपलब्ध करून दिला जातो. ही सेवा सभासदांना माफक दरात पुरविली जाते.

कारखाना कार्यक्षेत्रातील एखाद्या खेड्यामध्ये अचानक आग लागल्यास तशी माहिती मिळाल्याबरोबर लगेचच वाहन विभागामार्फत फायर फायटर पुरविला जातो. ही सेवा

कारखान्यामार्फत मोफत दिली जाते. कारखाना सेंटरवर जाण्यासाठी, उसाच्या सुधारित जातींचा प्रसार करण्यासाठी बी-बियाणे, जंतुनाशके इ. चा प्रसार करण्यासाठी शेती अधिकाऱ्यांना जीप पुरविण्यात आलेली आहे. कारखान्याच्या चेअरमन आणि व्हाईस चेअरमन यांना स्वतंत्र कार पुरविण्यात आलेल्या आहेत. इतर संचालकांसाठी दोन जीप व एक कार पुरविण्यात आलेली आहे. दोन ट्रक, एक ॲम्ब्युलन्स, दोन जीप, दोन बुलडोझर, एक रोलर, दोन टँकर, एक बुलडोझर-कम-ट्रॅक्टर, दोन फायर फायटर एवढी वाहनसामग्री वाहतूक विभागाकडे उपलब्ध आहे. तसेच या विभागाकडे २२ कायमस्वरूपी व ७ हंगामी कर्मचारी कार्यरत आहेत.

**(१४) सुरक्षा विभाग :**

कारखान्याच्या प्रवेशद्वाराशेजारीच सुरक्षा विभाग कार्यरत आहे. या विभागामध्ये एकूण ४३ कर्मचारी कार्यरत आहेत. हे सर्व कर्मचारी कायमस्वरूपी असून त्यामध्ये २ क्लार्क व ८ वॉचमन आहेत. सुरक्षा अधिकारी हे या विभागाचे प्रमुख म्हणून काम पाहतात. गेटवर प्रत्येकी १ याप्रमाणे तीन पाळ्यांमध्ये कामकाज चालते. कारखान्याच्या आतबाहेर जाणारी-येणारी वाहने काळजीपूर्वक तपासणे, जाणाऱ्या-येणाऱ्या मंडळींची तपासणी करणे इ. कामे या विभागामार्फत केली जातात. कारखान्यातील विविध विभागांच्या प्रवेशद्वारावर सुरक्षा विभागाच्या कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आढळते. साखर गोडाऊन विभागाकडे गोडाऊनचा पहारा करणे, कारखान्यामध्ये येणारे ट्रक त्यामधून काही बाहेरचे आक्षेपार्ह साहित्य आणले जाते का? ट्रकमध्ये किती पोती साखर भरली? ती कोणत्या ग्रेडची होती? इत्यादी गोष्टींची काळजी घेतली जाते.

सुरक्षा विभागाची रचना खालीलप्रमाणे असते :

**सिक्युरिटी ऑफिसर**

↓


**कारकून**

↓


**वॉचमन**

कारखान्यातील टेलिफोनचा गैरवापर थांबावा. कारखान्यातील कामगारांना टेलिफोन करण्यासाठी इतरत्र जावे लागू नये, फोनसाठी इतरत्र गेल्यामुळे त्याचा परिणाम त्यांच्या कामावर होऊ नये याकरिता सुरक्षा विभागामार्फत कारखाना प्रवेशद्वारावर कॉईन बॉक्स टेलिफोन सुविधा करण्यात आलेली आहे. केवळ कामगारच नव्हे. तर कारखान्याला भेटी देणारे पाहुणेसुद्धा या सुविधेचा वापर करतात. त्यामुळे सुरक्षा विभागाने प्रवेशद्वारावर बसविलेला कॉईन बॉक्स कारखान्याचे उत्पादनवाढीचे साधन ठरले आहे.

**(१५) अ) डिस्टिलरी विभाग :**




**ब) कंट्री-लिकर विभाग :**




डिस्टीलरी विभाग व कंट्री-लिकर विभाग हे दोन्ही विभाग एकमेकांशी संलग्न आहेत. डिस्टीलरी विभागामध्ये मोलॅसिसपासून डायलोशन पद्धतीने अल्कोहोल तयार केले जाते. त्यानंतर कंट्री-लिकर विभागामध्ये अल्कोहोलपासून इसेन्स व त्यापासून देशी दारू

तयार केली जाते. यामध्ये संत्रा-मधुरा, संत्रा-निलगिरी, संत्रा-धडकधार, संत्रा-धमाल, संत्रा-मधुर इ. चा समावेश आढळतो.

एका हंगामामध्ये प्रत्येकी ७५० मि.ली. चे ६६१२२ बॉक्स, ३७५ मि.ली. चे ४८१ बॉक्स, १८० मि.ली. चे १३९२६२ बॉक्स, १०० मि.ली. चे ७०७७ बॉक्स इतकी दारू उत्पादित केली जाते. दारूची विक्री घाऊक दरामध्ये केली जाते. या विभागामध्ये एकूण ६२ कायमस्वरूपी कामगार काम करीत आहेत.

**तक्ता क्र. ५.३**

**कारखान्यातील विविध विभागनिहाय कामगारांची संख्या**

| अ. क्र. | विभागाचे नांव | कायमस्वरूपी | हंगामी | एकूण कामगार |
|---|---|---|---|---|
| १. | प्रशासन विभाग | २० | ५ | २५ |
| २. | शेती विभाग (ऊस विकास) | ८५ | -- | ८५ |
| ३. | इंजिनिअरिंग विभाग | १७० | १८० | ३५० |
| ४. | उत्पादन विभाग | २८ | १२० | १४८ |
| ५. | अकान्ट विभाग | ५२ | १६ | ६८ |
| ६. | साखर गोडाऊन विभाग | ३० | १०० | १३० |
| ७. | लेबर वेल्फेअर विभाग | ४ | १ | ५ |
| ८. | टाईम ऑफिस | ११ | -- | ११ |
| ९. | इरिगेशन विभाग | १० | -- | १० |
| १०. | सिव्हील विभाग | ८० | ११० | १९० |
| ११. | स्टोअर विभाग | ११ | ३ | १४ |
| १२. | वाहन विभाग | २२ | ७ | २९ |
| १३. | डिस्टिलरी | ६२ | -- | ६२ |
| १४. | सुरक्षा विभाग | ४३ | -- | ४३ |
| १५. | डेली वेजीस | -- | ३३१ | |
| **एकूण** | | **६२८** | **८७३** | **१५०१** |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

☆☆☆

## संदर्भ सूची

### श्री भोगावती सहकारी साखर कारखाना (शाहूनगर) परिते, जि. कोल्हापूर
### वार्षिक अहवाल सन १९९५-९५ ते २००४-०५

| अ. नं. | वार्षिक अहवाल | वर्ष | प्रकाशक |
|---|---|---|---|
| १. | ४० वा | १९९५-९६ | **पी. जी. मेढे**<br>कार्यकारी संचालक |
| २. | ४१ वा | १९९६-९७ | **एस्. एस्. पाटील**<br>प्र. कार्यकारी संचालक |
| ३. | ४२ वा | १९९७-९८ | **एस्. एस्. पाटील**<br>कार्यकारी संचालक |
| ४. | ४३ वा | १९९८-९९ | **व्ही. डी. शिंदे**<br>कार्यकारी संचालक |
| ५. | ४४ वा | १९९९-२००० | **व्ही. एम्. माने**<br>कार्यकारी संचालक |
| ६. | ४५ वा | २०००-२००१ | **व्ही. एम्. माने**<br>कार्यकारी संचालक |
| ७. | ४६ वा | २००१-२००२ | **व्ही. एम्. माने**<br>कार्यकारी संचालक |
| ८. | ४७ वा | २००२-२००३ | **व्ही. एम्. माने**<br>कार्यकारी संचालक |
| ९. | ४८ वा | २००३-२००४ | **व्ही. एम्. माने**<br>कार्यकारी संचालक |
| १०. | ४९ वा | २००४-२००५ | **व्ही. एम्. माने**<br>कार्यकारी संचालक |

---

# प्रकरण ५ : श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याचे परिसर विकासाचे विविध उपक्रम

## ५.१ प्रस्तावना :

श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते या साखर कारखान्यामार्फत परिसर विकासाचे पर्यायाने कार्यक्षेत्र विकासाचे विविध उपक्रम सुरूवातीपासून आत्तापर्यंत राबविण्यात आलेले आहेत. या उपक्रमांमध्ये दिवसेंदिवस सुधारणा केल्या जात आहेत. काही उपक्रम नव्याने सुरू केले जात आहेत. या उपक्रमांसाठी दरवर्षी खर्च केली जाणारी रक्कम कारखान्याच्या भाग विकास निधीतून पुरविली जात आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील तसेच राज्यभरातील साखर कारखान्यांनी राबविलेले नाविन्यपूर्ण उपक्रम भोगावती सहकारी साखर कारखान्याने स्विकारलेले आहेत. भोगावती सहकारी साखर कारखान्याने राबविलेले काही महत्वाचे उपक्रम इतर कारखान्यांनी स्विकारलेले आहेत. त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील विविध साखर कारखान्यांमधून तांत्रिक अंगांची विविध पारितोषिके श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याने प्राप्त केलेली आहेत.

श्री भोगवती सहकारी साखर कारखान्यामार्फत राबविले जाणारे परिसर विकासाचे काही महत्वपूर्ण आर्थिक उपक्रम खालीलप्रमाणे आहेत.

## ५.२ ऊस संवर्धन / ऊस बियाणे मळा :

महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्राचा अभ्यास केला असता दक्षिण महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यांचा समावेश आढळतो. अधिक साखर उतारा देणारा विभाग (झोन) म्हणून या जिल्ह्यांना ओळखले जाते. कारखान्याचे भौगोलिक क्षेत्र २ तालुक्यांमध्ये व एकूण ५३ गावांमध्ये विखुरलेले आहे. दोन्ही तालुक्यांमध्ये ऊस पिकाला अनुकूल हवामान व जमीनक्षेत्र उपलब्ध आहे. कारखान्याच्या सततच्या प्रयत्नांतून कारखाना कार्यक्षेत्रातील काळम्मावाडी व राधानगरी या दोन प्रमुख धरण प्रकल्पांची कामे सुरू आहेत. त्यामुळे भविष्यात या दोन प्रकल्पांच्या माध्यमातून मुबलक पाणी उपलब्ध होणार असल्याने साहजिकच ऊस पिकाखालील लागवडक्षेत्र वाढणार आहे. हा दृष्टीकोन

डोळ्यासमोर ठेवून ऊस संवर्धन/ऊस बियाणे मळा या उपक्रमावर विशेष भर देण्यात आलेला आहे. कारखान्याला यापुढे गाळप क्षमतेइतका ऊस कारखाना कार्यक्षेत्रातून उपलब्ध व्हावा त्याचबरोबर अधिक साखर उतारा देणाऱ्या व एकरी जादा ऊस उत्पादन देणाऱ्या ऊस जातीची लागवड कारखाना कार्यक्षेत्रात व्हावी या प्रमुख उद्देशातून वसंतदादा साखर संस्था, पुणे व महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने आणि मार्गदर्शनाखाली कारखान्यामार्फत ''त्रिस्तरीय बियाणे वाटप योजना'' कार्यान्वित करण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून कारखान्याचे नर्सरीवर त्याचबरोबर कार्यक्षेत्रातील निवडक शेतकऱ्यांच्या शेतावर सुधारित ऊस जातीचे बेणे प्लॉट तयार करून त्यामधून शुद्ध, निरोगी व सुधारित ऊस जातींचे बियाणे शेतकऱ्यांना वाटप करण्यात येऊ लागले. पूर्वीच्या नोंद क्षेत्राचा आढावा घेता पारंपारिक जाती प्राधान्याने घेतल्या जात होत्या. उदा. ७४० ही उशीरा पक्व होणारी जात, त्याची लागवड केली जात होती. कारखान्याच्या ऊस विकास योजनेंतर्गत बेणे प्लॉट योजनेमधून लवकरात लवकर पक्व होणाऱ्या सुधारित ऊस जातीच्या बियाण्यांचा पुरवठा कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना केल्यामुळे अधिक साखर उतारा देणाऱ्या एकरी जादा उत्पन्न देणाऱ्या व लवकर पक्व होणाऱ्या जातींचा प्रसार होण्यास मदत झाली. या सुधारित व लवकर पक्त होणाऱ्या जातींचा ऊस गळीतास आल्यामुळे कारखान्याचा सरासरी साखर उतारा वाढण्यास मदत झाली.

या संदर्भात महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत मध्यवर्ती ऊस संधोधन केंद्र - पाडेगांव, प्रादेशिक ऊस आणि गूळ संशोधन केंद्र, कोल्हापूर व विभागीय कृषी संशोधन केंद्र, कोल्हापूर येथून सुधारित ऊस जातींचे मूलभूत बियाणे (Breeder Seed) आणून त्याची लागवड कारखाना नर्सरीत (Own Farm) केली जाते. त्यातील बेणे पुढीलवर्षी कार्यक्षेत्रातून निवडक प्रगतीशील शेतकऱ्यांना पायाभूत बियाणे (Foundation Seed) म्हणून वाटप करण्यात येते. हेच बियाणे पुढील वर्षी प्रमाणित बियाणे (Certified Seed) म्हणून शेतकऱ्यांना मागणीप्रमाणे क्रेडिटवर पुरविण्यात येते.

शेतकऱ्यांना ऊस लागवडीच्या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती सोप्या भाषेत उपलब्ध व्हावी त्याचबरोबर ऊसाच्या नवनवीन जाती, त्यांची वैशिष्ट्ये, पक्वतेचा कालावधी,

लागवड पद्धती याबाबतची शास्त्रीय माहिती मिळावी या प्रमुख उद्देशातून कारखान्याने स्वतंत्र ऊस विभाग सुरू केला आहे. या विभागामार्फत ऊस विकासाच्या विविध योजना राबविण्यात येऊ लागल्या आहेत. बेणे प्लॉट व ऊस बियाणे वाटप योजना हा या विभागाचा महत्वाचा उपक्रम आहे.

**ऊस बियाणे मळा :**

ऊस उत्पादन व साखर उतारा वाढीसाठी शासनाच्या त्रिस्तरीय बेणे वाटप योजनेंतर्गत शुद्ध व निरोगी बियाण्यांचा पुरवठा सभासदांना करण्यासाठी व ऊस बियाणे प्रत्येक चार ते पाच वर्षांनी बदलण्यासाठी ही योजना राबविण्याचे धोरण ठरविण्यात आलेले आहे.

श्री भोगावती सहकारी साखर कारखाना, परिते या कारखान्यामार्फत ही योजना प्रत्येकवर्षी ६० ते ७० एकर क्षेत्रावर राबविली जात असून त्यामध्ये वेगवेगळ्या ऊस जातींचे बेणे मळे घेतले जातात. या योजनेसाठी लाभार्थिंची निवड करताना खालील बाबींचा विचार केला जातो.

१) ज्यांना यापूर्वी ऊस बियाणे मळे देण्यात आलेले आहेत त्यांना पुन्हा या योजनेत समाविष्ट करून घेतले जात नाही.

२) ऊस बेणे मळा करणारा शेतकरी प्रगतीशील असावा.

३) ऊस बेणेमळा रस्त्यालगत व वाहतुकीस योग्य अशा ठिकाणी असल्याची खात्री करून घ्यावी.

४) लाभार्थी हा विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचा थकबाकीदार नसावा.

५) ऊस पिकास लागणारे पाणी व इतर अनुषंगिक बाबींची उपलब्धता आहे का हे पहावे. लाभार्थिंची जमीन स्वतःच्या मालकीची असल्याबाबत शेतजमिनीचा सात-बारा उतारा सादर करणे आवश्यक आहे.

६) कारखान्याकडून देण्यात येणाऱ्या तांत्रिक मार्गदर्शनानुसार ऊस बेणे मळा तयार करणे आवश्यक आहे.

या योजनेमध्ये एका लाभार्थीस जास्तीतजास्त ०-२० आर. कार्यक्षेत्राचे बेणे मळे देण्यात येतात. सेंटरमध्ये असणाऱ्या सर्वच गावांना समान विभागून लागणीचे प्रमाणात उशीरा पक्व होणाऱ्या ऊस जातीचे ६० टक्के उदा. को-७४०, को-८८१२१, को-७५२७ आणि को-८६०३२ तसेच लवकर पक्व होणाऱ्या ऊस जातीचे ४० टक्के उदा. को-८०१४, कोसी-६७१ आणि को-७२१९ इ. ऊस बियाणे मळे देण्यात येतात.

या योजनेंतर्गत ऊस बियाणे सभासदांना क्रेडिटवर दिले जाते. लाभार्थिंना शिफारशीनुसार रासायनिक खते २५ टक्के अनुदानावर पुरविली जातात. कारखान्याकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन न करता ऊस बेणे मळे तयार करणाऱ्या सभासदांकडून विनाअनुदान सर्व रक्कम वसूल करून घेतली जाते. या योजनेतून कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक सभासद व बिगर सभासद यांना सर्व जातीचे ऊस बियाणे उपलब्धतेनुसार क्रेडिटवर पुरविण्यात येते. प्रत्येक लाभार्थिस लागणीचे प्रमाणात जास्तीतजास्त ०-४० आर. क्षेत्रापर्यंत ऊस बियाणे पुरविण्यात येते. ऊस बियाणे पुरवठा करीत असताना प्रथम प्राधान्याने कारखान्याने जोपासलेल्या बेणेमळ्यातूनच बेणे पुरविण्यात येते. बिगर सभासदांना ऊस बियाणे पुरवठा करीत असताना दोन ऊस उत्पादक सभासद जामीन घेतले जातात. कारखान्याने तयार केलेल्या बेणेमळ्यातील बेणे सभासदांना ऊस लागणीकरिता वाटप करण्यात येते. ऊस बियाण्याचा दर को-७४० करिता रू. २००/- प्रती हजार कांडी (३ डोळ्यांची एक कांडी) इतर सर्व जातींसाठी रू. २३०/- प्रती हजार कांडी इतका आकारला जातो. हा दर वर्षनिहाय बदलत राहतो.

भारतामध्ये नवनवीन ऊस जातींचे संशोधन करून त्यामधून लागवडीयोग्य नवीन जाती शोधण्याचे व त्याचा प्रसार करण्याचे काम सेंट्रल शुगरकेन ब्रीडींग इन्स्टीट्यूट, कोईमतूर येथे चालते. या केंद्रामार्फत ज्या जाती प्रसारित केल्या जातात त्या जातींच्या पुढे ''को'' (कोईमतूर) हा शब्द वापरला जातो. नवीन संशोधित झालेल्या जाती विविध राज्यांतील कृषी विद्यापीठांना तौलनिक अभ्यासासाठी दिल्या जातात. त्यांनी केलेल्या प्रयोगातून ती जात लागवडीसाठी योग्य असेल तरच ती प्रसारित केली जाते. अन्यथा तिचा विचार केला जात नाही.

**एक एकर क्षेत्रातील गळीतलायक ऊस आणि एक एकर क्षेत्रातील ऊस बेणे यांचा तुलनात्मक अभ्यास :**

**तक्ता क्र. ५.१**

**गळीत लायक ऊस आणि ऊस बेणे यांची तुलना**

| गळीतलायक ऊस | ऊस बेणे |
|---|---|
| ऊस नग = ४०,०००<br>एक ऊस = १ किलो वजन<br>ऊस नग - ४०,००० = ४० टन ऊस<br>= रू. ४०,०००/- (प्रती एकर उत्पन्न)<br>(सन २००४-०५ चा गळीत हंगाम) | ऊस नग = ४०,०००<br>प्रती ऊस = ६ कांड्या (प्रत्येकी तीन डोळे)<br>ऊस नग - ४०,००० = २,४०,००० कांड्या<br>प्रती हजारी कांडी दर = रू. ४००/-<br>= रू. ९६,०००/- दुपटीपेक्षा अधिक उत्पन्न<br>(सन २००४-०५ चा गळीत हंगाम) |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

**बेणे वाटप योजनेचे फायदे :**

१) एकरी गळीतलायक ऊस आणि एकरी ऊस बेणे यांच्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा तुलनात्मक अभ्यास केला असता बेण्यापासून मिळणारे उत्पन्न दुपटीपेक्षा जास्त मिळते.

२) अधिक साखर उतारा देणाऱ्या व लवकर पक्व होणाऱ्या जातींची वाढ करता येते.

३) पारंपारिक जाती उशीरा पक्व होतात. त्यांच्यापासून कमी साखर उतारा मिळतो. सुधारित जाती लवकर पक्व होतात. त्यांच्यापासून जादा साखर उतारा मिळतो.

४) ७४० या पारंपारिक ऊस जातीपासून एकरी ४० टन उत्पन्न मिळते. सुधारित ऊस जातीपासून मात्र एकरी दिडपटीपेक्षा अधिक उत्पन्न मिळते.

५) हंगामामध्ये ऊस लागणीसाठी बेण्याची तोड वेळेत होते. गळीतासाठी पाठविला जाणारा ऊस विशिष्ट वेळेत तोडला जात नाही.

६) ऊस बेण्यासाठी लागणारा खर्च आणि गळीतासाठी उत्पादित केला जाणारा ऊस व त्यासाठी येणारा खर्च जवळजवळ सारखा होतो. बेणे मळ्यापासून उत्पन्न अधिक मिळते.

**तक्ता क्र. ५.२**
**ऊस बियाणे - क्षेत्र - खर्च - सबसिडी**

| अ. क्र. | वर्ष | क्षेत्र (एकर-गुंठे) | सभासद | सबसिडी |
|---|---|---|---|---|
| १. | १९९५-१९९६ | ६८.३० | ४०० | ६८७५० |
| २. | १९९६-१९९७ | ५८.१८ | २८८ | ५६४५० |
| ३. | १९९७-१९९८ | २०४२ | २५० | ५१०५० |
| ४. | १९९८-१९९९ | १८.८५ | २२८ | ४७१२५ |
| ५. | १९९९-२००० | -- | -- | ११९७१० |
| ६. | २०००-२००१ | -- | -- | १७५६६५ |
| ७. | २००१-२००२ | -- | -- | १४५००० |
| ८. | २००२-२००३ | -- | -- | २६२७८३ |
| ९. | २००३-२००४ | -- | -- | १२२३२० |
| १०. | २००४-२००५ | -- | -- | १३३९२० |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

**बेणेप्लॉटधारकांचे मनोगत :**

संशोधकाने कारखाना कार्यक्षेत्रातील काही निवडक बेणेप्लॉटधारक सभासदांच्या शेतावर प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांच्या प्रतिक्रिया जाणून मुलाखती घेतल्या. यामध्ये त्यांनी बेणेप्लॉटचे खालील फायदे सांगितले आहेत.

१) सभासदांना खात्रीलायक ऊस बियाणे पुरविता येते.

२) अधिकाधिक साखर उतारा देणाऱ्या उत्तम प्रकारे वाढणाऱ्या जाती विकसीत करता येतात.

३) बाहेरच्या ठिकाणाहून ऊस बियाण्यांची आयात करावी लागत नाही.

४) तज्ज्ञांचे वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य लाभते.

५) संशोधनवृत्तीमध्ये वाढ होते.

६) ऊसाच्या नवनवीन जातींची माहिती मिळते.

७) ऊसतोड लवकर होते त्यामुळे नवीन पिकाची चांगली आम वाढ होते.

८) कारखान्याकडून खते, जंतुनाशके, तणनाशके, औजारे इत्यादीकरिता अनुदान मिळते.

९) एक एकरातील ऊसाचे उत्पन्न आणि तेवढ्याच क्षेत्रातील ऊस बियाण्यांचे उत्पन्न यामध्ये जवळजवळ दुप्पट एवढे उत्पन्न बियाण्यापासून मिळते.

### ५.३ वृक्षारोपण आणि फळझाडांची लागवड :

श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते या कारखान्याने ''वृक्ष व फळझाडे लागवड'' ही योजना राबविली आहे. आजही ही योजना पूर्वीपेक्षा व्यापक प्रमाणावर राबविली जात आहे. ऊस उत्पादक शेतकरी सभासदबंधूंकडून या योजनेला फारच चांगले सहकार्य लाभले आहे. गेल्या दोन वर्षापासून ऊस पिकावर आढळणारा लोकरी मावा आणि त्यापासून ऊस पिकाचे होणारे अतोनात नुकसान यापासून थोडाफार आर्थिक दिलासा/आधार मिळण्याच्यादृष्टीने ही योजना निश्चितच फायदेशीर ठरली आहे.

कारखाना इमारत सोडून कारखान्याच्या परिसरामध्ये स्वतंत्र अशी फळबाग आहे. नारळ, आंबा, चिकू या फळझाडांची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात आलेली आहे. सध्या कारखान्यामार्फत वाढविण्यात आलेल्या फळबागेमध्ये १,०५० नारळाची झाडे, ३० कलमी आंब्याची झाडे, ४० चिकूची झाडे उत्पन्न देत आहेत. ऊस उत्पादक सभासदांनी सुधारित जातीच्या ऊसाची लागवड करावी याकरिता कारखाना परिसरात राबविण्यात आलेली बेणेप्लॉट योजना यशस्वी ठरली आहे. त्याचप्रमाणे या कारखान्याने वृक्ष व फळझाडे लागवडीच्या बाबतीत भरीव कामगिरी केलेली आहे. कोल्हापूर जिल्ह्यामधील एकूण बारा तालुक्यांपैकी करवीर आणि राधानगरी या दोन तालुक्यांतील ५३ गावांचा समावेश श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये होतो. अलिकडच्या काही वर्षांत या तालुक्यांमध्ये नव्याने काही साखर कारखाने स्थापन झाले असले तरी जिल्ह्यातील तसेच राज्यातील एक नामांकित सहकारी साखर कारखाना म्हणून श्री

भोगावती सहकारी साखर कारखान्याला ओळखले जाते. कोल्हापूर जिल्ह्याच्या भौगोलिक क्षेत्रफळाचा आणि हवामानाचा अभ्यास केला असता करवीर व राधानगरी तालुक्यांचा काही भूभाग डोंगरी म्हणून ओळखला जातो.

राधानगरी धरणप्रकल्पाच्या अगोदर इतर कोणताही पाणीपुरवठा प्रकल्प या तालुक्यांमध्ये नव्हता. त्यामुळे या तालुक्यातील प्रत्येक नद्यांची पात्रे उन्हाळ्यामध्ये (जानेवारी ते मे अखेर) कोरडी पडत असत. नद्यांमध्ये खड्डे/झरे खणून ऊस पिकाला पाणीपुरवठा करण्याव्यतिरिक्त इतर कोणताही पर्याय शेतकऱ्यांकडे शिल्लक नव्हता. काही शेतकऱ्यांना तर पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळे ऊस पीक काढून टाकावे लागत होते. बहुसंख्य शेतजमीन चढउताराची असल्याने ती लागवडयोग्य बनविणे शक्य नव्हते. जमिन लागवडीखाली आणलेली नव्हती. आजच्यासारख्या पाणीपुरवठा करणाऱ्या संस्थादेखील अस्तित्वात नव्हत्या. वरकस कोरडवाहू जमिनीमध्ये भात, मका, नाचणी, हरभरा, वाटाणा इत्यादी रब्बी पिके व फक्त बागायती जमिनीमध्ये ऊस पीक अशा प्रकारचे चित्र पहायाला मिळत असे. कोल्हापूर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २४,६३,८३७ आणि कारखाना कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या दोन तालुक्यांची लोकसंख्या या गोष्टींचा अभ्यास केला असता केवळ शेतजमिनीतील पिकांद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नातून दरडोई उत्पन्न वाढणार नाही या बाबींचा गांभीर्याने अभ्यास करून तत्कालिन संचालक मंडळाने आणि अधिकारीवर्गाने वृक्ष व फळझाडे लागवड ही योजना दूरदर्शीपणाने राबविण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेतला. वृक्षांमध्ये साग, सुरू, निलगिरी, काजू, पेरू, लिंबू, यासारख्या रोपांची लागवड केल्याने याठिकाणच्या जमिनीतून भरघोस उत्पन्न मिळू शकेल या प्रामाणिक हेतून ही योजना राबविण्यात आली. सन १९९० सालामध्ये जन्माला आलेली महाराष्ट्र शासनाची ''१०० टक्के अनुदानावर आधारित फलोद्यान'' ही योजना या शासकीय योजनेला प्रोत्साहन देणारी योजना म्हणून श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याच्या वृक्ष व फळझाडे लागवड या योजनेकडे पाहिले जाते.

कारखाना कार्यक्षेत्रातील दोन तालुक्यांसाठी आजच्या परिस्थितीमध्ये राधानगरी व काळम्मावाडी हे पाणीपुरवठा प्रकल्प अस्तित्वात असले तरी अजूनही सर्वच शेतजमिनीला

पाणीपुरवठा झालेला नाही. तालुकानिहाय शेकडो हेक्टर क्षेत्र पडिक आहे हे क्षेत्र लागवडीयोग्य बनविण्याच्यादृष्टीने इतर शासकीय योजनांबरोबर श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याची वृक्ष व फळझाडे लागवड ही योजना फायदेशीर ठरली आहे.

कारखाना कार्यक्षेत्रातील दोन तालुक्यांतील एकूण लागवडीयोग्य शेतीक्षेत्राचा अभ्यास केला असता शेतीमध्ये अंतर्गत मोठमोठे बांध आहेत. एक हेक्टर ऊसशेती क्षेत्रामध्ये आठ ते दहा गुंठे क्षेत्र बांधांनी व्यापलेले आढळते. अशा बांधांवर केवळ जनावरांच्या चाऱ्याशिवाय इतर कोणतेही उत्पन्न घेतले जात नाही. शेतीच्या बांधावरदेखील फळझाडांची लागवड केली जावी व इतर पीकांबरोबर फळांचे उत्पन्न मिळावे असाही दृष्टीकोन या योजनेमागे आहे.

**वृक्ष व फळझाडे लागवड योजनेचे उद्देश :**

१) ऊस उत्पादक सभासदांनी ऊसपीक लागवडीबरोबरच वृक्ष व फळझाडे लागवडीवर भर द्यावा.

२) कारखाना कार्यक्षेत्रातील जास्तीतजास्त पडिक जमिनी लागवडयोग्य बनविल्या जाव्या.

३) ऊस पीकाबरोबर इतर पीकांमधून अंतर्गत फळझाडांची लागवड केली जावी.

४) कोरडवाहू वरकस जमिनींमध्ये काजू, आंबा, सिताफळ, बोर, फुलझाडे, निलगिरी, आकेशिया, सुरू इत्यादींची लागवड करावी आणि सभासदांनी आर्थिक परिस्थिती सुधारावी.

५) शेतजमिनीमध्ये घेतल्या जाणाऱ्या पारंपारिक पिकांऐवजी सुधारित जातीच्या फळझाडांची सभासदांनी लागवड करावी व आपली आर्थिक परिस्थिती सुधारावी.

६) सभासद शेतकरीबंधूंच्या फळबागा तयार व्हाव्या. अशा फळबागांचा त्यांना भविष्यकाळामध्ये आर्थिक लाभ मिळावा.

७) ग्रामीण भागामध्ये रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी.

८) पीकांवरील रोगराई, दुष्काळजन्य परिस्थितीमध्ये ऊस उत्पादक सभासदांना आर्थिक संरक्षण लाभावे.

९) सृष्टीसौंदर्यामध्ये वाढ व्हावी.,

१०) ऊस उत्पादक सभासदांनी फळप्रक्रिया उद्योगांवर भर द्यावा. वेगेवगळ्या फळप्रक्रिया युनिटची निर्मिती करावी.

११) जमिनीची धूप थांबवावी. जमिनीतील पाण्याची पातळी सुधारावी. वृक्ष व फळझाडे लागवड याबाबतची ऊस उत्पादक सभासदांमध्ये आवड निर्माण व्हावी.

**वृक्ष व फळझाडे लागवड योजनेची कार्यवाही :**

वृक्ष व फळझाडे लागवडीच्यासंदर्भात सर्वप्रथम श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते यांच्यावतीने प्रतीवर्षी मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात कोल्हापूर जिल्ह्यामध्ये प्रकाशित होणाऱ्या विविध वर्तमानपत्रांना जाहीर निवेदन दिले जाते. या निवेदनामध्ये खालील ठळक बाबींचा समावेश आढळतो.

- कारखान्यामार्फत उपलब्धतेनुसार वाटप केली जाणारी फळझाडे.
- वाटप केल्या जाणाऱ्या फळझाडांचा तपशील.
- १५ जूनपर्यंत कारखाना सेंटरवर नावाची नोंद.

जाहीर निवेदनानुसार वृक्ष व फळझाडांची मागणी करू इच्छिणारे ऊस उत्पादक सभासद विहित नमुन्यातील मागणी अर्ज केंद्रावर घेऊन ते भरून परत केंद्रावरील शेती मदतनिसांकडे देतात. याकामी त्यांना केंद्रावरील फिल्डमनदेखील मदत करतात. प्रत्येक केंद्रावर जमा झालेले सर्व मागणी अर्ज केंद्रनिहाय कारखान्याच्या शेती अधिकाऱ्यांकडे जमा केले जातात. एकूण अकरा केंद्रांवरून किती सभासदांनी कोणकोणत्या रोपांची किती मागणी केलेली आहे, आपणाला कारखाना कार्यस्थळावर चालूवर्षी किती आणि कोणत्या रोपांची लागवड करावयाची आहे त्याची संख्या निश्चित केली जाते.

त्या वर्षामध्ये शेतकरी सभासदांना लागणारी एकूण रोपे, कारखाना कार्यस्थळावर लागवडीसाठी लागणारी एकूण रोपे यांची एकूण संख्या निश्चित झाल्यानंतर कारखान्याच्या

संचालक मंडळाचे प्रतिनिधी, शेती अधिकारी/ऊस विकास अधिकारी कारखान्यामार्फत जूनच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात मान्यताप्राप्त नर्सरींना/रोपवाटीकांना भेट देतात. आपणाला हवी असणारी रोपे, त्यांची संख्या आणि गुणवत्ता यांचा अभ्यास या प्रतिनिधींमार्फत केला जातो. यामध्ये काही शासकीय रोपवाटीकांचा समावेश आढळतो.

**रोपांची उचल केल्या जाणाऱ्या रोपवाटीका :**

**अ) मान्यताप्राप्त रोपवाटीका -**

१. ललित नर्सरी

२. सावंत नर्सरी

३. अंकुर नर्सरी

४. लोकमान्य नर्सरी

५. रत्ना नर्सरी

६. कोल्हापूर जिल्हा संघ

**ब) शासकीय रोपवाटीका -**

१. कोकण कृषी विद्यापीठ, दापोली

२. भाट्ये बंदर, रत्नागिरी

३. कासार्डे (सिंधुदुर्ग)

वरील रोपवाटीका सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांतील असून सभासदांना सुधारित जातीच्या रोपांची उपलब्धता व्हावी यादृष्टीने अधिकाधिक प्रयत्न केला जातो. दर्जेदार रोपे मिळावीत म्हणून वेगवेगळ्या रोपवाटीकांना भेटी दिल्या जातात. झाडोरा वनस्पती, इमारतींसाठी लाकूड मिळणाऱ्या झाडांची रोपे, शोभेची झाडे, मसाल्याची झाडे, फळझाडे इत्यादींची पाहणी याठिकाणी केली जाते. त्यानंतर रोपवाटीका चालकांकडून निविदा मागविल्या जातात. विशिष्ट तारखेच्या मुदतीमध्ये आलेल्या निविदा संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये सर्वांसमोर खुल्या केल्या जातात. ज्यांची निविदा कमी दराची आहे अशा रोपवाटीका चालकांची निविदा मंजूर केली जाते. संबंधित रोपवाटीकेच्या संयोजकाला

पत्रव्यवहार केला जातो. त्यामध्ये आम्ही कोणत्या तारखेला रोपांची उचल करणार आहोत ते कळविले जाते.

**तक्ता क्र. ५.३**
**निवड केली जाणारी रोपे**

| अ. क्र. | फळझाडे | मसाला झाडे | वन झाडे |
|---|---|---|---|
| १. | नारळ | लवंग | साग |
| २. | आंबा | जायफळ | आकेशिया |
| ३. | चिकू | मिरी | निलगिरी |
| ४. | काजू | वेलदोडा | ब्युरांडा |
| ५. | पेरू | दालचिनी | बॉटलपान |
| ६. | लिंबू | ऑलस्पायसेस | विविधरंगी क्रोटेन |
| ७. | सुपारी | | शोभेची झाडे |
| ८. | सिताफळ | | |
| ९. | फणस | | |
| १०. | आवळा | | |
| ११. | डाळींब | | |
| १२. | केळी | | |
| १३. | पपई | | |

वरील रोपांचे दरपत्रक तयार केले जाते. प्रत्येक जातीच्या आणि प्रत्येक प्रकारच्या रोपनिहाय हे दरपत्रक बनविले जाते. ऊस उत्पादक सभासदांच्या माहितीसाठी सदर पत्रकाच्या प्रती कारखाना सेंटरवर पाठविल्या जातात.

माहे जूनच्या मध्यापासून जुलै महिन्याच्या पहिल्या व दुसऱ्या आठवड्यापर्यंत पावसाला नियमितपणे सुरूवात झाल्यानंतर कारखान्याच्या वाहनाने (ट्रक/टेम्पो) ''ना नफा ना तोटा'' या तत्वावर रोपांची खरेदी करून रोपे कारखानास्थळावर आणली जातात.

कोणत्याही प्रकारचा वाहतुक खर्च सभासदांवर आकारला जात नाही. कारखान्यामधून प्रत्येक सेंटरवर वाहनाने रोपे पोहोचवली जातात. शेती मदतनीस मागणी केलेल्या सभासदांना पत्रव्यवहार करून उधारीवर रोपे पुरवितात. रोपांचे पैसे त्यांच्या पुढील वर्षाच्या ऊस बिलातून वसूल करून घेतले जातात.

सेंटरवरून मागणीनुसार रोपांची उचल करताना शेती मदतनीसाकडून रोपांची लागवड पद्धत सभासदांना समजून सांगितली जाते. त्यांचे संगोपन कसे करावे हे देखील समजावून दिले जाते. खरेदी केलेली सर्वच रोपे जगावीत आणि सभासदांच्या फळबागा तयार व्हाव्या हा त्यामागील शुद्ध हेतू असतो.

**तक्ता क्र. ५.४**

**वृक्ष व फळझाडे वितरण यंत्रणा (व्यवस्था)**

**संचालक मंडळ**
↓
**शेती अधिकारी**
↓
**रोपवाटीका संयोजक**
↓
**शेती मदतनीस**
↓
**ऊस उत्पादक सभासद**

आत्तापर्यंत गेली अनेक वर्षे वृक्ष व फळझाडे लागवड ही योजना सातत्याने चालू असून योजनेतून प्रत्येकवर्षी कारखाना आवारामध्ये कारखान्याच्या शेती सेंटर ऑफिसच्या परिसरामध्ये सभासदांना लागवड करण्यासाठी रोपांचे वाटप करण्यात आलेले आहे. वाटप करण्यात आलेल्या रोपांमध्ये आंबा, नारळ, चिकू, पेरू, लिंबू, सिताफळ, मसाल्याचे पदार्थ, वनझाडे, शोभेची झाडे इत्यादींचा समावेश अधिक आढळतो.

संशोधकाने सन १९९५-९६ ते २००४-०५ या दशकातील कारखान्याच्या वाटचालीचा अभ्यास केलेला असल्याने या दहा वर्षांमध्ये सभासदांना प्रत्येक वर्षनिहाय एकूण किती सभासदांना किती रोपे वाटली आहेत याचा अभ्यास केलेला आहे.

**तक्ता क्र. ५.५**

**सभासदांना वाटप करण्यात आलेल्या रोपांची संख्या**

| अ. क्र. | रोप वाटपाचे वर्ष | रोपांची संख्या |
|---|---|---|
| १. | १९९५-१९९६ | १०,९६५ |
| २. | १९९६-१९९७ | १५,८७९ |
| ३. | १९९७-१९९८ | १४,६४४ |
| ४. | १९९८-१९९९ | २०,३२७ |
| ५. | १९९९-२००० | १३,३८५ |
| ६. | २०००-२००१ | १३,३७८ |
| ७. | २००१-२००२ | १३,६७२ |
| ८. | २००२-२००३ | ९,६६६ |
| ९. | २००३-२००४ | ६०९८ |
| १०. | २००४-२००५ | - |
| | **एकूण** | **१,१८,०१४** |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

वरील सारणीतून ऊस उत्पादक सभासदांना सन १९९५-९६ ते सन २००४-०५ या दशकात वाटप केलेली एकूण रोपे दर्शविली गेली आहेत. या रोपांमध्ये वनझाडे, फळझाडे, मसाल्याची झाडे, शोभेची झाडे इत्यादींचा समावेश आढळतो. सन १९९५-९६ ते २००१-०२ पर्यंत जास्तीतजास्त रोपांचे वाटप झालेले आढळते. त्यानंतरच्या तीन वर्षांमध्ये तुलनेने कमी वाटप झालेले दिसून येते. सुरूवातीला ज्या सभासदांनी रोपांची उचल केलेली आहे. त्यांच्या वैयक्तिक फळबागा तयार झाल्याने नंतरच्या वर्षात मागणी कमी झाल्याचे दिसून येते. शासनाच्या इतर योजनेतून सबसिडी दरामध्येदेखील रोपे उपलब्ध झाल्याने नंतरच्या वर्षामध्ये सभासदांकडून रोपांची मागणी कमी झालेली दिसून येते.

कारखाना क्षेत्रावर व कारखाना सेंटर्सवर वृक्षांची लागवड पूर्वीच केली असल्यामुळे वृक्ष लागवडीसाठी आवश्यक क्षेत्र उपलब्ध नसल्याने फळझाडांची लागवड नंतर करण्यात

आलेली दिसून येत नाही. कारखाना आवारामध्ये जी फळझाडांची लागवड करण्यात आलेली आहे त्यामध्ये प्रामुख्याने नारळ, आंबा व चिकू या फळझाडांचा समावेश अधिक प्रमाणात आढळतो. कारखान्याच्या विविध सेंटर्सवरती वनवृक्षांची लागवड करण्यात आलेली असल्यामुळे कारखान्याने वृक्षलागवडीवरती भर दिलेला दिसून येतो. यामध्ये सुरू, आकेशिया, साग व इतर शोभेच्या झाडांचा समावेश आढळतो.

सुरूवातीच्या दोन वर्षामध्ये रोपांच्या संख्येच्या तुलनेत खर्च कमी झाल्याचे दिसून येते. नंतरच्या आठ वर्षांमध्ये १९९७-९८ ते सन २००४-०५ या कालावधीत रोपांवर अधिक खर्च झालेला दिसून येतो. दिवसेंदिवस वाढणारी महागाई या गोष्टीला जबाबदार असल्याचे निदर्शनास येते. ऊस उत्पादक सभासदांच्या फळबागा दिवसेंदिवस तयार होऊ लागल्याने तसेच कारखाना आवारातील वृक्ष व फळझाडे लागवडक्षेत्र लागवडीखाली आल्याने दिवसेंदिवस रोपांची मागणी कमी झालेली आहे. ऊस उत्पादक सभासदांकडून जरी त्यांच्या ऊसबिलातून रक्कम कपात करून घेतली जात असली तरी कारखान्याने सुरूवातीला लाखो रूपयांची केलेली गुंतवणूक हा एक धाडसी निर्णय आहे.

ऊस उत्पादक सभासदांना कारखान्यामार्फत पुरविण्यात आलेल्या रोपांमध्ये जास्तकरून नारळ, आंबा, चिकू आणि साग या रोपांचा समावेश आढळतो. इतर रोपांमध्ये डाळींब, काजू, पेरू, लिंबू, सिताफळ, आवळा, वनस्पती, मसाल्याची रोपे, शोभेची झाडे इ. रोपांचा समावेश आढळतो. संशोधकाने सभासदांना प्रतीवर्षानिहाय कोणकोणत्या प्रकारची किती रोपे वाटण्यात आली याचा अभ्यास या ठिकाणी केलेला आहे.

**तक्ता क्र. ५.६**

**सन १९९५-९६ ते सन २००४-०५ मध्ये सभासदांना पुरविलेली रोपे**

| अ.क्र. | रोपवाटप वर्ष | फळांचा / रोपांचा तपशील | | | | | एकूण रोपे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नारळ | आंबा | चिकू | साग | इतर | |
| १. | १९९५-९६ | ६५३४ | २२०६ | ८०० | ८०० | ६२५ | १०९६५ |
| २. | १९९६-९७ | ८५८३ | २४८२ | १०४७ | -- | ३७६७ | १५८७९ |
| ३. | १९९७-९८ | ८६३४ | २५०३ | ११०९ | ७०० | १६९८ | १४६४४ |
| ४. | १९९८-९९ | ५५१८ | ३७६७ | ११९० | १५०० | ८३५२ | २०३२७ |
| ५. | १९९९-२००० | ४५०९ | ३०३३ | ११८० | २७०० | १९६३ | १३३८५ |
| ६. | २०००-२००१ | २३३५ | ४७५० | १०८० | २२०० | ३०१३ | १३३७८ |
| ७. | २००१-२००२ | ४५९७ | ३३६७ | २१८५ | ९०० | २६२३ | १३६७२ |
| ८. | २००२-२००३ | २९४६ | २८८१ | ११०० | ९१५ | १८२४ | ९६६६ |
| ९. | २००३-२००४ | २००० | १५२६ | १०२२ | ५०० | १०५० | ६०९८ |
| १०. | २००४-२००५ | २७९७ | १७०४ | ७५० | २४३ | ४०० | ५८९४ |
| | **एकूण** | **४८४५३** | **२८२१९** | **११४६३** | **१०४५८** | **२५३१५** | **१२३९०८** |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

सन १९९५-९६ ते २००४-०५ या कालावधीमध्ये ऊस उत्पादक सभासदांना पुरविण्यात आलेल्या रोपांची वर्षनिहाय संख्या वरील सारणीमध्ये दर्शविली आहे. नारळ, आंबा, चिकू या फळझाडांच्या रोपांच्या संख्येचा तुलनात्मक अभ्यास केला असता, नारळाची रोपे सर्वात अधिक पुरविण्यात आल्याचे आढळते. त्याच्या खालोखाल आंबा व इतर रोपे पुरविण्यात आल्याचे आढळते. संशोधकाने जेव्हा सभासदांच्या शेतावर भेटी दिल्या तेव्हा नारळ, चिकू या फळझाडांची लागवड शेताच्या बांधावर उसपिकाच्या अंतर्गत केलेली आहे. आंब्याची लागवड स्वतंत्ररित्या केलेली असून आंब्याच्या बागा तयार झाल्या आहेत. सिताफळ, लिंबू, मसाल्याची झाडे ह्यांच्या संमिश्र बागा तयार झाल्या असून

त्यांच्यापासून उत्पन्न (रोख) मिळू लागले आहे. काही मंडळींनी सागाची स्वतंत्रपणे लागवड केली आहे.

ऊस उत्पादक सभासदांना कारखान्यामार्फत मागणीनुसार वृक्ष व फळझाडे पुरविण्यात आलेली आहेत. आत्तापर्यंत तालुकावार सभासदांच्या फळबागा तयार झालेल्या आहेत. काही लिंबू, पेरू, सिताफळाच्या संमिश्र बागा वैयक्तिक पातळीवर तयार केलेल्या आहेत. संशोधकाने सन १९९५-९६ ते २००४-०५ या कालावधीत या योजनेचा लाभ प्रत्यक्षात किती सभासदांना मिळाला याचा अभ्यास केला.

**तक्ता क्र. ५.७**
**वृक्ष व फळझाडे योजनेचा लाभ/फायदा मिळालेले सभासद**

| अ. क्र. | रोप वाटप वर्ष | सभासद संख्या |
|---|---|---|
| १. | १९९५-१९९६ | १३० |
| २. | १९९६-१९९७ | १४५ |
| ३. | १९९७-१९९८ | १३५ |
| ४. | १९९८-१९९९ | २३२ |
| ५. | १९९९-२००० | ३७६ |
| ६. | २०००-२००१ | ३२५ |
| ७. | २००१-२००२ | १५६ |
| ८. | २००२-२००३ | २१२ |
| ९. | २००३-२००४ | १५४ |
| १०. | २००४-२००५ | १३५ |
| | **एकूण** | **२०००** |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

वरील सारणी सन १९९५ ते सन २००५ या कालावधीत वर्षनिहाय वृक्ष व फळझाडे लागवड योजनेचा लाभ मिळालेल्या सभासदांची संख्या दर्शविते. सन १९९५-९६ ते सन २०००-२००१ या सहा वर्षांमध्ये या योजनेचा लाभ जास्तीतजास्त सभासदांनी घेतलेला

दिसून आला. सन २००० पासून पुढे ही संख्या घटलेली आढळली. ज्यांच्या पूर्वीच्या फळबागा/वृक्षलागवड आहे त्यांनी पुढे फळझाडे, वन्यझाडे घेतलेली नसल्याने ही घट झाल्याचे दिसून आले. काही सभासद असेही आढळले की ज्यांनी सातत्याने प्रत्येकवर्षी वेगवेगळ्या प्रकारच्या फळझाडांची कारखान्याकडून ऊचल केलेली आहे.

**वृक्ष व फळझाडे धारकांचे आर्थिक मूल्यमापन :**

श्री भोगावती सहकारी साखर कारखाना, परिते या कारखान्यामार्फत राबिवलेल्या वृक्ष व फळझाडे लागवड योजनेचा अभ्यास केल्यानंतर संशोधकाने तालुकानिहाय काही लाभार्थिंच्या आर्थिक परिस्थितीचे मूल्यांकन केले. संबंधितांची नांवे त्याने कारखाना शेती अधिकारी/ऊस विकासाधिकारी यांच्याकडून मिळवली.

लाभार्थिंच्या आर्थिक क्षमतेचे मूल्यमापन करताना संशोधकाने लाभार्थींना मिळणारे फळबागेपासूनचे उत्पादन आणि त्याच जमिनीतून पूर्वी भात पिकांपासून मिळणारे उत्पादन यांचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे.

**ाक्ता क्र. ५.८**

**फळबागेपासून मिळणारे वार्षिक उत्पन्न**

| सभासदाचे नांव व पत्ता | एकूण क्षेत्र | प्रत्यक्ष लागवड क्षेत्र | लागवड वर्ष | फळझाडाचे नांव | फळझाडे संख्या | फळांचे वार्षिक उत्पन्न (नग) | वार्षिक उत्पन्न (रू.) | खर्च (रू.) | निव्वळ नफा (रू.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **संजय भिकाजी चौगुले** मु. ठिपकुर्ली, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर | १२ एकर | ४ एकर | १९८५ | आंबा | २०० | १२००० | १,००,००० | २०,००० | ८०,००० |
| | | | | नारळ | ५० | ४००० | २४,००० | ४,००० | २०,००० |
| | | | | शेवगा | ९० | १३५०० | १३,५०० | १,००० | १२,५०० |
| | | | | | | **एकूण** | **१,३७,५००** | **२५,०००** | **१,१२,५००** |

**भात पिकापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न**

| सभासदाचे नांव व पत्ता | एकूण क्षेत्र | प्रत्यक्ष लागवड क्षेत्र | पिकाचे नांव | वार्षिक उत्पन्न (क्विंटल) | वार्षिक उत्पन्न (रूपये) | खर्च (रू.) | निव्वळ नफा (रू.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **संजय भिकाजी चौगुले** मु. ठिपकुर्ली, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर | १२ एकर | ४ एकर | भात | १२० | ६०,००० | १५,००० | ४५,००० |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

**तक्ता क्र. ५.९**

**फळबागेपासून मिळणारे वार्षिक उत्पन्न**

| सभासदाचे नांव व पत्ता | एकूण क्षेत्र | प्रत्यक्ष लागवड क्षेत्र | लागवड वर्ष | फळझाडाचे नांव | फळझाडे संख्या | वार्षिक उत्पन्न (नग) | वार्षिक उत्पन्न (रू.) | खर्च (रू.) | निव्वळ नफा (रू.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **शंकर विष्णू गोरंबेकर** मु. परिते, ता. करवीर, जि. कोल्हापूर | ४ एकर | ४ एकर | १९९४ | आंबा | १५० | १०,५०० | ७०,००० | १८,००० | ५२,००० |
| | | | | नारळ | २०० | ३,००० | २१,००० | ५,००० | १६,००० |
| | | | | चिकू | २० | १,००० | १,००० | -- | १,००० |
| | | | | लिंबू | ३०० | लहान | -- | -- | -- |
| | | | | **एकूण** | **६७०** | **१४,५००** | **९२,०००** | **२३,०००** | **६९,०००** |

- ६०० साग रोपांची लागवड करण्यात आलेली असून दोन वर्षात सरासरी आठ फूट उंची वाढले आहेत.
- सर्वच सर्व ७ एकराचे क्षेत्र डोंगरमाथ्याचे असल्याने सन १९९३ पूर्वी या जमिनीत कोणत्याही प्रकारचे पीक नव्हते. कोणतेही आर्थिक उत्पन्न मिळत नव्हते.

**तक्ता क्र. ५.१०**

**फळबागेपासून मिळणारे वार्षिक उत्पन्न**

| सभासदाचे नांव व पत्ता | एकूण क्षेत्र | प्रत्यक्ष लागवड क्षेत्र | लागवड वर्ष | फळझाडाचे नांव | फळझाडे संख्या | फळांचे वार्षिक उत्पन्न (नग) | वार्षिक उत्पन्न (रू.) | खर्च (रू.) | निव्वळ नफा (रू.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **शंकर दादू चौगुले**<br>मु. परिते,<br>ता. करवीर,<br>जि. कोल्हापूर | १२ एकर | ४ एकर | १९९४ | आंबा | ११० | १०,२०० | ६८,००० | ३,००० | ६५,००० |
| | | | | चिकू | १६ | ४,६०० | ९,००० | -- | ९,००० |
| | | | | | | | | **एकूण** | **७४,०००** |

**अंतर्गत पिकांपासून मिळणारे उत्पन्न**

| सभासदाचे नांव व पत्ता | पिकाचे नांव | वार्षिक उत्पन्न (क्विंटल) | निव्वळ नफा (रूपये) |
|---|---|---|---|
| **शंकर दादू चौगुले** | भात | १० | ५,००० |
| | सोयाबीन | ४ | ३,२०० |
| | **एकूण** | **१४** | **८,२००** |

**भात पिकापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न**

| सभासदाचे नांव व पत्ता | एकूण क्षेत्र | प्रत्यक्ष लागवड क्षेत्र | पिकाचे नांव | वार्षिक उत्पन्न (क्विंटल) | वार्षिक उत्पन्न (रूपये) | खर्च (रू.) | निव्वळ नफा (रू.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **दिनकर श्रीपती चौगुले** | ४ एकर | ४ एकर | भात | १४० | ७०,००० | १५,००० | ५५,००० |

**तक्ता क्र. ५.११**

**फळबागेपासून मिळणारे वार्षिक उत्पन्न**

| सभासदाचे नांव व पत्ता | एकूण क्षेत्र | प्रत्यक्ष लागवड क्षेत्र | लागवड वर्ष | फळझाडाचे नांव | फळझाडे संख्या | फळांचे वार्षिक उत्पन्न (नग) | वार्षिक उत्पन्न (रू.) | खर्च (रू.) | निव्वळ नफा (रू.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **दिनकर श्रीपती चौगुले** मु. पो. ठिपकुर्ली, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर | ५ एकर | २ एकर | १९९८ | आंबा | १०० | १५०० | १२,५०० | ३,५०० | ९,००० |
| | | | | नारळ | ७५ | ३०० | २,१०० | ५०० | १,६०० |
| | | | | सिताफळ | २५ | ४५० | ६७५ | २०० | ४७५ |
| | | | | चिकू | २० | ७०० | ७०० | १५० | ५५० |
| | | | | **एकूण** | **२२०** | **२९५०** | **१५,९७५** | **४,३५०** | **११,६२५** |

**गवतापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न**

| सभासदाचे नांव व पत्ता | एकूण क्षेत्र | पडिक क्षेत्र | पीक | वार्षिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| **दिनकर श्रीपती चौगुले** | ५ एकर | ५ एकर | गवत | ५,००० |

### ५.४ कंपोस्ट व प्रेसमड विक्री :

कारखान्यातील कायमस्वरूपी मिळणाऱ्या उत्पन्नापैकी मळीचे उत्पन्न आहे. ओली मळी आणि वाळलेली (सुकी) मळी यांचे दर वेगवेगळे आहेत. मळीचे प्रतिटनामागील दर बदलणारे आहेत. याठिकाणी सन १९९५-९६ ते २००४-०५ या दहा वर्षांतील मळी उत्पादनाचा आणि त्यापासून मिळालेल्या एकूण रक्कमेचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

सन १९९५-९६ या अहवाल सालामध्ये मागीलप्रमाणे प्रति टनास रू. २०/- ओली मळी व प्रति टनास रू. ३०/- वाळलेली मळी अशाप्रकारे एकूण २१,६८१/- मे.टन मळीची विक्री करण्यात आलेली आहे. मळीच्या विक्रीपासून मिळालेले उत्पन्न रू. ४,६१,३५५/- इतके आहे.

सन १९९६-९७ या अहवाल सालामध्ये मागणीप्रमाणे प्रतिटनास रू. २५/- ओली मळी व प्रति टनास रू. ३५/- वाळलेली मळी अशाप्रकारे एकूण १९,३०३ मे. टन मळीची विक्री करण्यात आलेली आहे. मळीपासून मिळालेले उत्पन्न रू. ५,७०,१६८/- इतके आहे.

सन १९९७-९८ या अहवालसालामध्ये मागणीप्रमाणे प्रतिटनास रू. ३०/- ओली मळी व प्रतिटनास रू. ४०/- वाळलेली मळी अशाप्रकारे एकूण २२,१२३ मे.टन मळीची विक्री करण्यात आलेली आहे. मळीच्या विक्रीपासून मिळालेले उत्पन्न रू. ७,३१,६६५/- इतके आहे.

सन १९९८-९९ या अहवालसालामध्ये २४,९८२ मे.टन मळीची विक्री करण्यात आलेली आहे. मळीच्या विक्रीपासून मिळालेले उत्पन्न रू. १२,०५,०००/- इतके आहे.

सन १९९९-२००० या अहवालसालामध्ये ३६,९६३ मे.टन मळीची विक्री करण्यात आलेली आहे. मळीच्या विक्रीपासून मिळालेले उत्पन्न रू. १३,११,०००/- इतके आहे.

सन २०००-०१ या अहवालसालामध्ये २३४४१ मे.टन मळीची विक्री करण्यात आलेली आहे. मळीच्या विक्रीपासून मिळालेले उत्पन्न रू. १०,६१,७४१/- इतके आहे.

सन २००१-०२ या अहवालसालामध्ये २३४४१.६४० मे.टन मळीची विक्री करण्यात आलेली आहे. मळीच्या विक्रीपासून मिळालेले उत्पन्न रू. १०,६१,७४१/- इतके आहे.

**गांडूळ शेती :**

शेती उत्पादनामध्ये खतांचे महत्व वाढत चालले आहे. शेतजमिनीमध्ये सतत पिके घेतली जात असल्याने शेतजमिनीचा कस कमी होऊ लागला आहे. त्याचा विपरित परिणाम शेती उत्पादनावर होऊ लागला आहे. ऊसासारखे पिक बारा महिन्यांपेक्षाही काहीवेळा अधिक काळ शेतजमिनीत राहिल्याने जमिनीचा कस कमी होत आहे. शेतीउत्पन्न वाढावे म्हणून रासायनिक खतांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. या खतांच्या किंमती दिवसेंदिवस वाढत आहेत. सर्वसामान्य शेतकऱ्यांना रासायनिक खतांचा वापर करणे आर्थिकदृष्ट्या परवडण्यासारखे नाही.

कारखाना कार्यस्थळावर तयार होणारे मळीखतसुद्धा रस्त्यांच्या गैरसोयी, वाहतुकीच्या साधनांचा अभाव या कारणांमुळे शेतामध्ये वापरणे कठीण होऊन बसले आहे. शेणखत, मळीखत, हिरवळीची खते इ. भरखतांचा वापर कमी प्रमाणात केला जात असल्याने शेतजमिनीचा कस बिघडत चालला आहे.

शेतजमिनीचा पोत (कस) सुधारावा म्हणून श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याच्यावतीने सभासदांच्या शेतावर गांडूळशेतीचे प्रयोग चालू केले आहेत. कारखाना केंद्रामार्फत शेतीमदतनिसांच्या व शेतीअधिकाऱ्यांच्या सहकार्याने सभासदांच्या मागणीनुसार गांडूळशेतीचे प्रयोग चालू केलेले आहेत. गांडूळखत निर्मितीसाठी लागणारी झोपडी, दगड अथवा विटांनी कुंड बांधण्यासाठी लागणारे सिमेंट इ. गोष्टी माफक दरात कारखान्यामार्फत पुरविल्या जात आहेत. सभासदांकडे उपलब्ध असणाऱ्या शेण व काडी कचऱ्यावर गांडूळखताची निर्मिती केली जात असल्याने भांडवलीखर्च फारच कमी लागतो. त्यामुळे या शेताला सभासदांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. सुरूवातीला लागणारी गांडूळ वसाहतदेखील कारखान्यामार्फत पुरविली जात आहे. टाकावू खाद्यपदार्थांचादेखील गांडूळखत निर्मितीसाठी वापर केला जात आहे. उत्तम प्रकारचे भरखत म्हणून हे खत शेतजमिनीत वापरले जात असल्याने जमिनीचा पोत सुधारण्यास, उत्पादन वाढण्यास या शेतीचा निश्चितच फायदा झाला आहे. कारखान्याने गांडूळशेतीचा राबविलेला हा उपक्रम

निश्चितच स्तुत्य ठरला आहे. ऊस उत्पादक सभासदांशिवाय इतर शेतकऱ्यांनादेखील हा उपक्रम मार्गदर्शक ठरला आहे.

## ५.५ उपसा जलसिंचन योजना :

सुरूवातीला कारखाना कार्यक्षेत्रातील शेतजमिनीला उन्हाळयामध्ये पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत नव्हता. उन्हाळयामध्ये पाण्याची टंचाई भासत असल्याने गळीत हंगामामध्ये लागणारा पुरेसा ऊस कार्यक्षेत्रामध्ये उपलब्ध होत नव्हता. बाहेरच्या जिल्ह्यांतून, राज्यांतून ऊसाची आयात करावी लागे. कित्येकवेळा पाणीटंचाईमुळे शेतकऱ्यांना हाती आलेले पीक गमवावे लागे. या गोष्टींचा गांभीर्याने अभ्यास करून कारखान्याने ऊपसा जलसिंचन योजना राबविली आहे.

ज्याठिकाणी नदी आहे अशाठिकाणी नदीपासून अंदाजे एक ते दीड किलोमीटर अंतरापर्यंतच्या क्षेत्रास शक्यतो वैयक्तिकरित्या पाणीपुरवठा करता येतो. त्यापुढील कमी जमीनक्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांना वैयक्तिक पातळीवर ऊपसा जलसिंचन योजना आर्थिक व तांत्रिकदृष्ट्या परवडत नाही. म्हणून कार्यक्षेत्रातील लाभधारक शेतकऱ्यांनी एकत्र येऊन शेतीसाठी पाणीपुरवठा करणाऱ्या सहकारी तत्वावर चालणाऱ्या उपसा जलसिंचन योजना कारखान्यामार्फत कार्यान्वित केलेल्या आहेत. कारखाना कार्यक्षेत्रातून जास्तीतजास्त ऊसाची आयात करावी लागू नये या उद्देशातूनदेखील ही योजना राबविली जात आहे.

कारखाना कार्यक्षेत्रातील ऊपसा जलसिंचन योजना कार्यान्वित होण्यापूर्वी बहुसंख्य जमिनक्षेत्र कोरडवाहू होते. अशा जमिनीमध्ये केवळ पावसाच्या पाण्यावर येणारी/वाढणारी खरीप पिके घेतली जात असत. सदर पिक पावसावर अवलंबून असल्याने त्यापासून मिळणारे उत्पन्न हे शाश्वत नव्हते. शाश्वत स्वरूपाचे उत्पन्न मिळावे म्हणून कारखान्यामार्फत ऊपसा जलसिंचन योजना राबविण्यात आलेली आहे.

योजना कार्यान्वित झाल्यानंतर लाभक्षेत्रास गरजेनुसार बारमाही शाश्वत पाणीपुरवठा केला जावा. ऊस, केळी व भाजीपाला ही नगदी पिके तसेच रब्बी व उन्हाळी हंगामातील इतर पिके घेतली जावी. सदर जमिनीतून जनावरांना हिरवा चारा मिळावा. दूधाचे उत्पादन

वाढावे आणि लाभधारकांची आर्थिक उन्नती व्हावी या उद्देशातून ही योजना राबविण्यात आलेली आहे.

सध्या कारखानापुरस्कृत अकरा जलसिंचन योजना कार्यरत आहेत. कारखान्याचे अर्थसहाय्य लाभलेल्या इतर पाच पाणीपुरवठा करणाऱ्या संस्था व एक दत्तक संस्था अशा एकूण सतरा संस्था आजमितीला अस्तित्वात आहेत. राधानगरी आणि करवीर या तालुक्यांमध्ये ही योजना कार्यरत आहे. याद्वारे १६३६१ एकर क्षेत्राला पाणीपुरवठा केला जातो.

**योजनेची कार्यवाही :**

या योजनेच्या कार्यवाहीसाठी तज्ज्ञ इंनिनिअर मंडळींची नेमणूक केली जाते. हे इंजिनिअर कारखान्यामार्फत नेमले जातात. या योजनेसाठी शासकीय बँका तसेच इतर बँकांकडून कर्ज मिळविले जाते. संबंधित बँका व तज्ज्ञ इंजिनिअर्स यांच्या सहकार्यातून योजनेची कार्यवाही/उभारणी केली जाते. गावोगावी पाणीपुरवठा करणाऱ्या संस्थांची निर्मिती व्हावी हा या योजनेमागे हेतू आहे. जलसिंचन योजना उभारणीच्या कालावधीमध्ये पर्यवेक्षणाीची जबाबदारी कारखान्याची राहते. योजनेसाठी बँकांमार्फत दिलेले कर्ज या कर्जाची परतफेड होईपर्यंत सदर योजनेवर कारखान्याचे नियंत्रण राहते.

एखाद्या परिसरामध्ये सहकारी उपसा जलसिंचन योजना राबविण्यापूर्वी ज्या क्षेत्राकरिता योजना कार्यान्वित करावयाची आहे त्या परिसरातील लाभधारक शेतकऱ्यांची सभा सर्वप्रथम गावपातळीवर आयोजित करून योजनेची माहिती लाभधारकांना दिली जाते. योजनेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या लाभधारकांची यादी तयार करून त्यांच्यामधून प्रवर्तक मंडळाची निवड केली जाते. योजनेच्या उभारणीकरिता आवश्यक असणाऱ्या कामकाजाची सुरूवात प्रवर्तक मंडळामार्फत केली जाते.

ज्या गावच्या संस्थेला पाणीपुरवठा योजना राबवायची आहे. त्या संस्थेचा मागणी अर्ज व ठराव कारखाना व्यवस्थापनाकडे सादर होणे आवश्यक असते. कारखाना सर्व्हेअरकडून त्याचा अभ्यास करून निर्णय घेतला जातो. संस्थेच्या सभासदांकडून ‘‘आम्ही

पिकविलेला ऊस श्री भोगावती सहकारी साखर कारखान्यालाच पाठवू'' अशी लेखी स्वरूपात हमी घेतली जाते. ऊस किंमतीतून एकरी पाणीपट्टी आकारून विशिष्ट रक्कम कर्जखाती जमा केली जाते.

कारखाना कार्यक्षेत्रामध्ये सद्यःस्थितीत खालील गावांतून उपसा जलसिंचन योजना कार्यरत आहे.

**तक्ता क्र. ५.१२**

**श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याच्या उपसा जलसिंचन योजना**

| अ. क्र. | गावाचे नांव | तालुका | अ. क्र. | गावाचे नांव | तालुका |
|---|---|---|---|---|---|
| १ | आवळी खुर्द घुडेवाडी | राधानगरी | ७ | देवाळे | करवीर |
| २ | कंथेवाडी | राधानगरी | ८ | हळदी | करवीर |
| ३ | कांबळवाडी | राधानगरी | ९ | यळवडे नं. १ | राधानगरी |
| ४ | आमजाई व्हरवडे | राधानगरी | १० | यळवडे नं. २ | राधानगरी |
| ५ | कौलव | राधानगरी | ११ | घोटवडे | राधानगरी |
| ६ | आवळी बुद्रुक | राधानगरी | | | |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

**उपसा जलसिंचन योजनांमुळे घडून आलेले परिवर्तन :**

कारखाना कार्यक्षेत्रामध्ये राबविण्यात आलेल्या उपसा जलसिंचन योजनांमुळे सभासदांच्या तसेच बिगर सभासदांच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारण घडून आलेली आहे. ऊस उत्पादक सभासदांनी तर शेती व्यवसायामध्ये कायमस्वरूपी सुधारणा घडवून आणण्याच्यादृष्टीने विशेष प्रयत्न केलेले आहेत. काही महत्वपूर्ण बदल खालीलप्रमाणे :

- पडीक जमिनी लागवडयोग्य बनविल्या जाऊ लागल्या आहेत.
- ज्या जमिनीमध्ये पावसाळ्यामध्ये केवळ भात, नाचणी, भुईमूग यासारखी पिके घेतली जात होती अशा जमिनीतून ऊसासारखी नगदी पिके घेण्यात येऊ लागली आहेत.
- ज्या जमिनीमधून रब्बी पिकांचे एकरी सरासरी उत्पन्न १० ते १५ हजार रूपये इतके मिळत होते त्या जमिनीतून एकरी ४० ते ५० हजार रूपये उत्पन्न मिळू लागले आहे.
- शेतकरीवर्ग मिश्र पिके घेण्यावर अधिक भर देऊ लागला आहे.

- योजनेच्या कार्यक्षेत्रातील शेतजमिनीची पाण्याची पातळी वाढली आहे. त्यामुळे अशा क्षेत्रातील ज्या विहिरी आणि तलाव उन्हाळ्यामध्ये कोरडे पडत होते त्यांना बारमाही मुबलक पाणी झाले आहे.
- संपूर्ण वर्षभरामध्ये शेतजमिनीतून अनेक प्रकारच्या पिकांचे उत्पादन घेतले जाऊ लागले आहे.
- परिसरातील शेतकऱ्यांना व शेतमजूरांना वर्षभर पुरेल इतके काम उपलब्ध झाले आहे.
- शेतकरीवर्ग आपल्या आवडीनुसार विविध प्रकारची पिके घेऊ लागले आहेत.
- जनावरांना हिरवा चारा मुबलक प्रमाणात उपलब्ध झाल्याने दुग्धव्यवसायात वाढ झाली आहे.
- शेतकरीवर्ग संकरित गाई, म्हैशींची मोठ्या प्रमाणावर जोपासना करू लागला आहे.
- शेतजमिनींच्या किंमती वाढल्या आहेत. जमिनी खरेदी करण्यामध्ये एक प्रकारची स्पर्धा निर्माण झालेली आहे.
- शेती व्यवसायाला पूरक असे जोड व्यवसाय करण्यावर भर देण्यात येऊ लागला आहे.
- शेती व्यवसायामध्ये सुधारित अवजारांचा व तंत्रज्ञानाचा वापर केला जाऊ लागला आहे.
- शेती व्यवसायामध्ये नवनवीन प्रयोग केले जाऊ लागले आहेत.
- आपल्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा झाल्याने सभासदबंधूंनी राहणीमानाच्या दर्जामध्ये बदल घडवून आणले आहेत.
- गावाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झालेली आहे.
- फळझाडांची लागवड, भाजीपाल्याचे उत्पादन या गोष्टींवर विशेष भर दिला जाऊ लागला आहे.
- शासनाच्या पातळीवर राबविल्या जाणाऱ्या शेतीविकासाच्या नवनवीन योजनांचा सभासद स्वीकार करू लागलेला आहे.
- शेतीमालावर प्रक्रिया घडविणाऱ्या उद्योगांची निर्मिती केली जाऊ लागली आहे.
- सभासदांच्या संशोधनवृत्तीध्ये वाढ झालेली आहे.

- ❖ शेतीव्यवसायात ते काही प्रात्यक्षिकांचा अवलंब करू लागले आहेत.
- ❖ ऊस पिकातून इतर अंतर्गत पीके घेतली जाऊ लागली आहेत.
- ❖ अनुषंगिक सेवांमध्ये वाढ झालेली आहे.
- ❖ रब्बी पिकांचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर घेतले जाऊ लागले आहे.

## ५.६ कारखान्यातील पाणीपुरवठा योजना :

सुरूवातीच्या कालावधीत पाण्याचे फार मोठे दुर्भिक्ष्य होते, कोणतीही व्यवस्था नव्हती. त्यानंतर कारखान्यामार्फत भोगावती परिसरामध्ये जागा घेऊन स्वतंत्र जॅकवेल खोदण्यात आली. जॅकवेलवर पंपहाऊस बांधून पाणी आणले. कारखाना परिसरातील गावांनासुद्धा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा या योजनेमार्फत केला जात असे. पिण्यासाठी पाणीपुरवठा केल्याच्या कोणत्याही प्रकारच्या बिलांची आकारणी केली जात नव्हती.

परंतु आता भोगावती नदीला ५० अश्वशक्तीचे दोन मोटारपंप जोडून पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे. कारखान्याच्या परिसरामध्ये लागवड करण्यात आलेल्या फळझाडांना या योजनेमार्फत पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच या योजनेतून कारखाना कॉलनीला व शेतीसाठीदेखील पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे. त्यामुळे उन्हाळी भुईमूग, सूर्यफूल, भात इत्यादी प्रकारचे उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढलेली आहे. ऊसाचे उत्पन्नदेखील पूर्वीपेक्षा अनेकपटींनी वाढलेले आहे.

## कारखाना कार्यक्षेत्रातील पाटबंधारे प्रकल्प :

कारखाना कार्यक्षेत्रामध्ये वेगवेगळे प्रकल्प राबविण्यात आलेले आहेत. त्यामुळे पाण्याचे दुर्भिक्ष कमी झालेले आहे. ऊसाचे उत्पादन वाढविण्याच्यादृष्टीने मदत झालेली आहे. या प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे :

### अ) काळम्मावाडी प्रकल्प :

काळम्मावाडी धारणाचे काम पूर्ण झालेले असून सदर प्रकल्पांतर्गत २४ मेगावॅट क्षमतेचा वीजनिर्मिती प्रकल्प कार्यान्वित झालेला आहे. कालव्यांच्या माध्यमातून

दूधगंगा, वेदगंगा नद्यांना पाणी सोडण्यात आलेले आहे. दूधगंगा नदीच्या परिसरातील जास्तीतजास्त शेतकरीवर्गाला या प्रकल्पाचा फायदा झालेला आहे.

**ब) राधानगर (लक्ष्मी धरण) :**

**समारंभांसाठी पाणीपुरवठा :**

कारखान्यामार्फत ''ना नफा ना तोटा'' या तत्वावर आधारित सणसमारंभासाठी तसेच इतर घरगुती कार्यक्रमांसाठीदेखील पाणीपुरवठा योजना गेली अनेक वर्षे कार्यरत आहे. समाजसेवेच्या उद्देशातून या योजनेचे कार्य चाललेले असून कारखाना कार्यक्षेत्रातील खेडेगावांना ग्रामस्थांच्या मागणीनुसार कारखान्यामार्फत पाणीपुरवठा केला जातो. कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद, बिगर सभासद या योजनेचा फायदा घेण्यास पात्र आहेत. सामान्यतः कारखाना कार्यक्षेत्रातील ग्रामस्थ खालील कार्यक्रमांसाठी पाण्याची मागणी करताना आढळतात.

- विवाह समारंभ
- साखरपुडा
- मुंज
- गृहप्रवेश समारंभ
- ग्रामदेवतांचे उत्सव
- वर्षश्राद्ध कार्यक्रम
- दशपिंड विधी कार्यक्रम

वरील कार्यक्रमांसाठी पाण्याचे दुर्भिक्ष्य असणाऱ्या खेडेगावांसाठी कारखान्यामार्फत स्वच्छ पाणीपुरवठा केला जातो. ज्यांना पाणीपुरवठ्याची आवश्यकत आहे अशा मंडळींना वाहतूक अधिकाऱ्यांकडे अर्ज दाखल करावा लागतो. टेलिफोनच्या माध्यमातून संपर्क साधून अथवा प्रत्यक्ष भेटून तोंडी स्वरूपातदेखील आपल्या नावाची नोंद करता येते. एकाच दिवशी अनेक गावातील ग्रामस्थांना त्यांच्या नोंदणीक्रमानुसार पाणीपुरवठा केला जातो. कार्यक्षेत्रातील ज्या गावांना पाणीपुरवठा केला जातो त्यांच्याकडून एका बाजूने प्रतिमैल भाडे

दोन रूपये इतके आकारले जाते. या योजनेचा फायदा जास्तीतजास्त सभासदांना, बिगर सभासदांना होत आहे. या योजनेतून सर्वसाधरणपणे वार्षिक वीस हजार रूपये इतके उत्पन्न कारखान्याला मिळत आहे. मात्र कारखान्याचे यासाठी अंदाजे दीड ते पावणेदोन लाख रूपये खर्ची पडतात.

कारखाना कार्यक्षेत्रामध्ये कोठे आग लागल्यास अग्निशमन बंबसेवा कारखान्यामार्फत पुरविली जाते.

## ५.७ शेती उपयुक्त औजारे व साधने वाटप योजना :

श्री भोगावती सहकारी साखर कारखाना या कारखान्याने सन १९८७-८८ पासून ''शेतीउपयुक्त अवजारे व साधने वाटप'' ही योजना राबविली आहे. कारखाना कार्यक्षेत्रातील शेतजमिनीची ऊस उत्पादक सभासदांकडून उत्तमप्रकारे मशागत व्हावी आणि ऊस तसेच इतर पिकांचे उत्पादन वाढावे. पर्यायाने गळीत हंगामामध्ये कारखाना कार्यक्षेत्रातील पुरेसा ऊस उपलब्ध व्हावा हा प्रमुख उद्देश या योजनेमागील आहे.

यापूर्वी पारंपारिक अवजारांचा वापर शेतीच्या मशागतीसाठी केला जात असल्याने शेतजमिनीची मशागत अपेक्षेप्रमाणे केली जात नव्हती. उदा. लाकडी नांगरांचा वापर केला जात असल्याने शेतजमीन खोलवर नांगरली जात नव्हती. आजच्यासारखे तणनियंत्रणसाठी कोळपे उपलब्ध नव्हते. ऊस मशागतीसाठी बहुगुणी औजारे उपलब्ध नव्हती. त्यामुळे शेतजमिनीमध्ये तण वाढणे, जमीन घट्ट बनणे, पिकांची नीट वाढ न होणे इत्यादी प्रश्न सतत भेडसावत असत. शेतजमिनीच्या मशागतीच्या बाबतीत जसे प्रश्न भेडसावत होते तसेच प्रश्न पिकांवर पडणाऱ्या रोगराईच्या बाबतीत आढळून येत असत. स्प्रे पंपासारखी साधने सर्वत्र उपलब्ध नव्हती. रोगांबाबतचे ज्ञान, किडीवरींल औषधे आणि त्यांचा वापर याविषयी पुरेसी माहिती सभासदांना नव्हती. त्यामुळे कित्येकवेळा हाती आलेले पीक त्यांना गमवावे लागत असे. या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून कारखान्याने सन १९८७-८८ या वर्षापासून ही योजना राबविली आहे.

दुसरे असे की, आज वैयक्तिकरित्यादेखील शेतीउपयुक्त अवजारे किंवा साधने खरेदी करावयाची म्हटले तरी, ही बाब सर्वसामान्य सभासदाला शक्य होत नाही. कारखान्याच्या माध्यमातून सामूहिकरित्या औजारे व साधने खरेदी केल्याने सभासदांना ती वाजवी दरामध्ये उपलब्ध होतात. सभासदांना काहीवेळा २५ टक्के तर काहीवेळा ५० टक्के अनुदान देता येते. अनुदान दिल्यामुळे मूळ किंमतीपेक्षा अल्प किंमतीमध्ये अवजारे अगर साधने खरेदी करता येतात. पर्यायाने ऊस उत्पादक सभासदांच्या खर्चामध्ये बचत होते. या उद्देशातूनदेखील ही योजना राबविण्यात आलेली आहे.

**योजनेची कार्यवाही :**

ज्या सभासदांना औजारे अथवा साधने हवी आहेत त्यांच्याकडून मागणी अर्ज मागविले जातात. कारखाना सेंटरवरील शेतीमदतनीसांकडून हे अर्ज जमा केले जातात. कारखान्याने त्या वर्षामध्ये एकूण किती नांगर घ्यावयाचे, किती स्प्रे पंप, कोळपे, ऊस मशागत बहुगुणी अवजारे घ्यावयाची ही संख्या निश्चित केलेली असते. त्यानुसार कारखान्याच्या ११ सेंटर्स (केंद्र) मधील सभासदांच्या संख्येच्या प्रमाणात केंद्रनिहाय अवजारांची व साधनांची संख्या निश्चित केली जाते. संबंधित अवजारांच्या अथवा साधनांच्या अनुदानाची रक्कम वजावट करून बाकी रक्कम शेतीमदतनीसाकडे रोखीने भरून घेतली जाते. आठवडाभरामध्ये जमा झालेली रक्कम शेतीमदतनीसाकडून ऊस विकास अधिकाऱ्याकडे जमा केली जाते. एक सभासद एका वर्षात नांगर, स्प्रे पंप, कोळपा इत्यादींची मागणी करू शकतो. उपलब्धतेनुसार त्यांचे वाटप केले जाते. एखाद्या सेंटरकडे लोखंडी नांगराची किंवा कोळप्यांची उचल होऊ शकली नाही तर दुसऱ्या सेंटरवर विक्रीसाठी पाठवली जातात.

अवजारांची आणि साधनांची यादी निश्चित झाल्यानंतर अवजारे व साधने उत्पादक उद्योगसमूहाकडून संबंधित कारागिरांकडून निविदा मागविल्या जातात. कारखान्याकडे आलेल्या निविदांपैकी ज्यांचे दर कमी आहेत ती निविदा निवडली जाते. संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये आलेल्या सर्व निविदा ठेवून त्या खुल्या केल्या जातात. ज्यांची

निविदा निवडली जाते त्यांना कारखान्यामार्फत पत्रव्यवहार करून किती अवजारे व साधने उपलब्ध व्हायला हवीत, ती कोणत्या तारखेपर्यंत घ्यावयाची आहेत याबाबत कळविले जाते. पहिल्यांदा ही अवजारे व साधने कारखानास्थळावर आणली जातात. त्यानंतर मागणीनुसार कारखना सेंटर्सवर पाठवून त्यांचे वाटप केले जाते. हे वाटप करताना जे सभासद अवजारे व साधने खरेदी करतात त्यांन्या त्यांच्या वापराबाबत माहिती देतात. अवजारांचा व साधनांचा सुयोग्य वापर व्हावा या उद्देशातून ही माहिती दिली जाते.

**तक्ता क्र. ५.१२**
**शेतीउपयुक्त अवजारे व साधने वाटप व्यवस्था (यंत्रणा)**

**संचालक मंडळ**
↓
**शेती अधिकारी / ऊस विकास अधिकारी**
↓
**कारखानदार / कारागिर**
↓
**शेतीमदतनीस**
↓
**ऊस उत्पादक सभासद**

### ५.८ ऊस वाहतूक रस्ते दुरूस्ती :

गळीत हंगामामध्ये कारखाना कार्यक्षेत्रातील ऊसाची वाहतूक सुरळीतपणे व्हावी, ऊस उत्पादक सभासदांना बेणे प्लॉटवर जाणे-येणेस सुलभ व्हावे, ऊस बेणे लावणीसाठी इतर ठिकाणी सहजपणे नेता यावे, पायवाटांचे रूंदीकरण व्हावे या उद्देशातून श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याने सुरूवातीपासूनच ऊस वाहतूक व रस्ते दुरूस्ती या उपक्रमावर/योजनेवर विशेष भर दिला आहे. रस्त्यांवर पडलेल्या चाकोऱ्यांमुळे रस्ते खराब झालेले असतात. त्यामुळे गळीत हंगामामध्ये ऊस वाहतूक सुलभरितीने करता येत नाही. काही ठिकाणी तर रस्त्यालगतच्या शेतकऱ्यांनी रस्त्यावर कुंपण घालून अतिक्रमण केलेले दिसून येते. रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या वनस्पतींची झावळे/फांद्या रस्त्यावर आलेल्या आढळतात. या गोष्टींचा गांभीर्याने अभ्यास करून कारखान्याने प्रत्येकवर्षी रस्त्यांची विविध

कामे हाती घेतलेली दिसून येतात. आत्तापर्यंत कारखान्याने आपल्या कार्यक्षेत्रामध्ये खडीचे व मुरूमाचे रस्ते तयार केलेले आहेत. काही नवीन पाणंदी रस्ते केले असून ऊस वाहतूक काळामध्ये किरकोळ दुरूस्त्यादेखील केल्या आहेत. ओढ्याचे ठिकाणी ड्रेनेज बांधलेले असून काही ठिकाणी ओढ्याच्या व नदीच्या पाण्याने रस्ता तुटून जाऊ नये म्हणून संरक्षक भिंतीदेखील बांधल्या आहेत. कारखान्याच्या सिव्हील विभागामार्फत कार्यक्षेत्रातील ऊस वाहतूक केल्या जाणाऱ्या रस्त्यांची गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वी पाहणी केली जाते. जुने आणि नवीन रस्ते यांची पाहणी करून झाल्यानंतर अंदाजे खर्चाचे बजेट, नियोजन केले जाते. कारखान्याच्या संचालक मंडळाकडून आपापले विभागामध्ये रस्त्यांची करावयाची कामे सुचविली जातात. या रस्त्यांवर एकूण किती रक्कम खर्च करावी लागणार आहे त्याचेही बजेट मांडले जाते. एखाद्या रस्त्याच्या बाबतीत अतिक्रमण असेल तर ते देखील नेतेमंडळींकडून दूर केले जाते. बांधकाम समिती व संचालक मंडळाची सभा घेऊन रस्त्यावर खर्च करावयाचे आर्थिक बजेट (अंदाजपत्रक) मंजूर केले जाते. संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये बजेट मंजूर केल्यानंतर स्थानिक वर्तमानपत्रांतून जाहिरात देऊन निविदा मागविल्या जातात. विशिष्ट कालावधीमध्ये आलेल्या निविदा एकत्र करून त्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये खुल्या केल्या जातात. ज्यांची निविदा कमी रक्कमेची राहते अशा व्यक्तीला (ठेकेदाराला) रस्त्याचे काम दिले जाते. वर्षभरामध्ये प्रत्येक रस्त्याचे काम वेगवेगळ्या ठेकेदाराला दिले जाते.

ज्या ठेकदारांच्या निविदा मंजूर झालेल्या आहेत अशा ठेकेदारांनी प्रत्यक्ष रस्त्याच्या कामाला सुरूवात केल्यानंतर त्यांच्या कामांवर कारखान्याच्या सिव्हील विभागाचे सुपरव्हिजन (पर्यवेक्षण) राहते. ठेकेदारांनी केलेल्या कामाची बिले सिव्हील विभागामार्फत अकौंट विभागाकडे सादर केली जातात. अकौंट विभागामार्फत ठेकेदारांना त्यांची बिले अदा केली जातात.

**कारखाना फंडातून केली जाणारी रस्त्याची कामे :**

कारखाना फंडातून रस्त्यांच्या संदर्भात अनेक प्रकारची कामे केली जातात. यापैकी जास्तीतजास्त कामे कारखाना कार्यक्षेत्रातील गावांमध्ये केली जातात. तर काही कामे कारखाना स्थळावर केली जातात. कारखाना फंडातून केल्या जाणाऱ्या कामांमध्ये खालील बाबींना/रस्त्यांना प्राधान्य देण्यात आलेले आहे.

- पाणंद दुरूस्ती
- नवीन पाणंद तयार करणे
- रस्त्यांवर हार्ड मुरूम टाकणे
- कारखाना सेंटर्सच्या परिसरातील दुरूस्तीची कामे
- खडीकरण करून रस्ते कायमस्वरूपी दळणवळणसाठी खुले करणे

**खडीकरणासाठी शासकीय अनुदान :**

कारखाना फंडातून कारखाना कार्यक्षेत्रातील रस्त्यांचा खडीकरण कार्यक्रम हाती घेतला जात असला तरी कित्येकवेळा या गोष्टीला आर्थिक मर्यादा पडतात. प्रत्येकवर्षी अगदीच मर्यादित रस्त्यांचे खडीकरण केले जाते. या गोष्टींची वेळीच दखल घेऊन कारखाना कार्यक्षेत्रामध्ये रस्त्यांच्या खडीकरणासाठी कारखान्याने शासकीय अनुदान प्राप्त केले आहे. कारखान्याला आतापर्यंत मिळालेल्या शासकीय अनुदानातून कित्येक ठिकाणी रस्त्यांचे खडीकरण करण्यात आलेले आहे.

खडीकरणाकरिता शासकीय अनुदान मिळविण्यासाठी कारखाना शासनाकडे गाळप केलेल्या ऊसाच्या प्रत्येक टनामागे रू. १६/- प्रमाणे परचेस टॅक्स भरतो. शासनाकडे जमा झालेल्या टॅक्सपैकी प्रतीटन रू. ४/- प्रमाणे कारखाना कार्यक्षेत्रातील रसते दुरूस्तीसाठी शासकीय अनुदान मिळते. ही रक्कम खडीकरण, डांबरीकरण, ड्रेनेज, पाण्याची विल्हेवाट, रिटेनिंग वॉल इत्यादी कामांकरिता खर्च केली जाते. आतापर्यंत या अनुदानातून कारखाना परिसरामध्ये काही रस्त्यांचे डांबरीकरणसुद्धा करण्यात आलेले आहे. परिसर विकासाच्या पर्यायाने ग्रामीण विकासाच्यादृष्टीने हा उपक्रम निश्चितच स्तुत्य आहे.

कारखान्यामार्फत प्रतिवर्षी कारखाना कार्यक्षेत्रातून विविध गावांमध्ये नवीन रस्ते तयार केले जातात. या नवीन रस्त्यांसाठी अंदाजे रक्कम ठरविली जाते. या रक्कमेची मंजूरी घेतल्यानंतर प्रत्यक्षामध्ये रस्त्याच्या कामावर खर्च केला जातो. रस्तेदुरूस्तीसाठी देखील प्रत्येकवर्षी केंद्रनिहाय विशिष्ट रक्कम मंजूर केली जाते. या रक्कमेमध्ये रस्त्यावरील खड्डे बुजविणे, रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या झाडांच्या फांद्या/झावळे तोडणे, दोन्ही बाजूची गटारे दुरूस्त करणे, रस्त्यांवर मुरूम पसरविणे, रस्ता पावसाळ्यात खचला असेल तर दगड व मातीची भर टाकून तो भरून घेणे इ. कामे करून घेतली जातात.

सन १९९५-९६ ते २००४-०५ या कालावधीमध्ये कारखाना फंडातून पाणंद दुरूस्ती, मुरूम पसरविणे, नवीन रस्ते तयार करणे याकरिता प्रत्येक वर्षनिहाय किती रक्कम खर्च केली आहे, त्यामधून किती रस्त्यांचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे या बाबींचा अभ्यास संशोधकाने केला आहे.

प्रत्येकवर्षी तयार करण्यात आलेले रस्ते किंवा मुरूमाचे रस्ते पावसाच्या पाण्याने धुऊन जाऊ नयेत, पाणंद रस्ते खराब होऊ नयेत म्हणून कारखान्याने स्वतःच्या फंडातून तसेच शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानातून काही रस्ते खडीचे बनविले आहेत. कारखाना स्थळावरील जवळजवळ सर्व रस्ते डांबरी बनविले आहेत. स्त्यांच्या बाजूला संरक्षक भिंती बांधण्यावर तसेच क्रॉस ड्रेनवर खर्च करण्यात आलेला आहे. सुरूवातीच्यावर्षी बनविण्यात आलेल्या मातीच्या रस्त्यांवर नंतरच्यावर्षी कच्चा मुरूम हार्ड मुरूम पसरवलेले आहे.

## ५.९ गोबरगॅस सयंत्र योजना :

कारखान्याच्या विविध उपक्रमाबरोबरच कारखान्याच्या सभासदांना गोबरगॅस सयंत्र योजनेचा लाभ मिळावा या उद्देशातून श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याने सन १९८५-८६ पासून सन २०००-०१ पर्यंत सातत्याने ही योजना राबविली आहे. या योजनेचे फायदे ऊस उत्पादक सभासद तसेच बिगर सभासदांनादेखील मिळालेले आहेत. या योजनेबरोबरच सभासदांनी कंपोस्ट खताचे खड्डे खणावे आणि कंपोस्ट खताची निर्मिती करावी या उद्देशातून या योजनेवर भर दिलेला आहे. परिसराची स्वच्छता

राखण्याच्यादृष्टीने, हागंदारीमुक्त गांव बनविण्याच्यादृष्टीने, सरपणाची समस्या सोडविण्यासाठी ही योजना निश्चितच फायदेशीर ठरली आहे.

गोबरगॅस सयंत्रातून बाहेर पडणाऱ्या शेणराड्यापासून (स्लरी) अनेक प्रकारचे फायदे सभासदांना मिळालेले आहेत. सभासद रासायनिक खताऐवजी कंपोस्ट खताचा आणि स्लरीचा वापर मोठ्या प्रमाणात करू लागले आहेत. त्यामुळे त्यांच्या खर्चाची बचत होऊन शेतीचे उत्पादन वाढण्यास मदत झालेली आहे. याशिवाय काही महत्वाचे इतर फायदेदेखील झालेले आहेत ते पुढीलप्रमाणे :

- शेतजमिनीची उत्पादनक्षमता वाढली आहे.
- शेतजमिनीत असलेल्या सूक्ष्म जीवाणूंची शक्ती वाढली आहे.
- शेतजमिनीची पाणी टिकवून ठेवण्याची क्षमता वाढली आहे.
- जमिनीतील मातीच्या कणांची रचना सुधारली आहे.
- जमिनीची धूप कमी होण्यास मदत झालेली आहे.
- शेतजमिनीतल नत्राचा साठा वाढला आहे.
- शेतजमिनीचा पोत सुधारण्यास मदत झालेली आहे.

कारखाना कार्यक्षेत्रातील जास्तीतजास्त सभासदांना या योजनेचा लाभ मिळालेला आहे. तीन घनमीटरपासून तीस घनमीटर आकारचे गोबरगॅस प्लॅन्ट बांधण्यास कारखान्याने अनुदान उपलब्ध करून दिलेले आहे. तक्ता क्र. ५.१३ मध्ये सन १९९५-९६ ते २००४-०५ या कालावधीमध्ये वर्षनिहाय गोबरगॅस सयंत्र संख्या व त्यावर्षी दिलेले अनुदान दर्शविलेले आहे.

**योजनेची कार्यवाही :**

गोबरगॅस सयंत्राच्या उभारणीसाठी सभासदांना, बिगर सभासदांना, जिल्हापरिषद, पंचायत समिती, खादी ग्रामोद्योग विकास महामंडळ, राष्ट्रीयकृत बँका किंवा कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँक यांच्यापैकी एखाद्या संस्थेकडून कर्जपुरवठा केला जातो. दिलेल्या कर्ज

रक्कमेतून गोबरगॅस सयंत्राची उभारणी केल्यानंतर शासकीय अधिकाऱ्यांमार्फत पाहणी करून त्यांचे पुर्तता प्रमाणपत्र प्राप्त केले जाते.

गोबरगॅस प्लॅन्ट पुर्तता प्रमाणपत्र उपलब्ध झाल्यानंतर सभासदाकडून अनुदान मागणी अर्ज कारखान्याने तयार केलेल्या विहित नमुन्यामध्ये शेती मदतनीसांकडे सादर केले जातात. शेतीमदतनीसांकडे आलेले सर्व अर्ज विचारात घेऊन शेतीमदतनीस गोबरगॅस प्लॅन्टधारकांच्या घरी भेटी देतात. त्यांच्याकडून प्रत्यक्षात गोबरगॅस प्लॅन्टची पाहणी केली जाते. गोबरगॅस प्लॅन्ट बांधल्याची आणि तो पूर्ण झाल्याची खात्री झाल्यानंतर सदर अर्जावर शेती मदतनीस आपली शिफारस करतो.

गोबरगॅस प्लॅन्ट जर सभासद नसलेल्या व्यक्तीच्या नांवे असेल परंतु त्याच्या कुटुंबातील इतर सदस्य सभासद असतील तर त्यांची विहित नमुन्यातील अर्जाद्वारे संमत्ती घेतली जाते. अशा सर्व बाजू पूर्ण केलेले अर्ज ऊस विकासाधिकारी यांच्याकडे कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व केंद्रांच्या शेतीमदतनीसांकडून पाठविले जातात. कारखान्याचे ऊसविकास अधिकारी सर्व केंद्रातून आलेल्या अर्जांची, त्यांच्यासोबत जोडलेल्या शिफारशींची खात्री करून व सोबत जोडलेल्या शिफारशींचा अभ्यास करून अनुदानपात्र लाभार्थींना अनुदान रक्कमेचे वाटप करण्यासाठी कार्यकारी संचालक (एम्.डी.) यांच्याकडे लेखी अहवाल सादर करतात. त्यानुसार संबंधित शेतकऱ्यांच्या/सभासदांच्या बचतखात्यावर अनुदान रक्कम जमा केली जाते.

कंपोस्ट खताच्या खड्डयांच्या बाबतीतदेखील हिच कार्यपद्धती अवलंबिली जाते. सभासदांनी खणलेले खड्डे, त्या खड्डयांतून तयार केलेले खत याची पाहणी शेतीमदतनीसांकडून केली जाते. त्याचा अहवाल शेती अधिकाऱ्यांकडे पाठविला जाते. शेती अधिकाऱ्यांच्या शिफारशी नंतर कार्यकारी संचालकांच्या मान्यतेनुसार सभासदांच्या बचतखात्यावर अनुदान रक्कम जमा केली जाते.

संशोधकाने सन १९९५-९६ ते २००४-०५ या कालावधीमध्ये प्रतिवर्षनिहाय किती गोबरगॅस प्लॅन्टसना कारखान्याने अनुदान पुरविले या गोष्टींचा अभ्यास केल्यानंतर खालील परिस्थिती दिसून आली.

**तक्ता क्र. ५.१३**

**सन १९९५-९६ ते २००४-०५ मधील अनुदानपात्र गोबरगॅस सयंत्रे**

| अ. क्र. | वर्ष | गोबरगॅस सयंत्र संख्या | अनुदान |
|---|---|---|---|
| १. | १९९५-१९९६ | ३६ | ७००८० |
| २. | १९९६-१९९७ | ८० | १७६७०० |
| ३. | १९९७-१९९८ | ८३ | १५७७०० |
| ४. | १९९८-१९९९ | २२० | ४१८२४० |
| ५. | १९९९-२००० | १५५ | २९८३०० |
| ६. | २०००-२००१ | ३२६ | ७४४८०० |
| ७. | २००१-२००२ | -- | -- |
| ८. | २००२-२००३ | -- | -- |
| ९. | २००३-२००४ | -- | -- |
| १०. | २००४-२००५ | -- | -- |
| | **एकूण** | **९१३** | **१८,६५,८२०** |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

वरील सारणी प्रत्येक वर्षामध्ये किती गोबरगॅस सयंत्राना कारखान्यामार्फत अनुदान पुरविण्यात आलेले आहे हे दर्शविते. नंतरच्या काळात गोबरगॅस सयंत्रामध्ये अनेक बदल घडून आले. कुजणाऱ्या कोणत्याही पदार्थापासून मिथेन वायू तयार करणाऱ्या बायोगॅस सयंत्राचा शोध लागला. बायोगॅस सयंत्राच्या उभारणीसाठी शासनामार्फत जास्तीतजास्त अनुदान मिळू लागल्याने कारखान्याकडे अनुदानासाठी होणारी मागणीदेखील कमी झाली.

☆☆☆

**प्रकरण - ५**

## संदर्भ सूची

- ❖ **ऊस विकास योजना मार्गदर्शिका**
- ❖ **वार्षिक अहवाल १९९५-९५ ते २००४-०५**

| अ. क्र. | वार्षिक अहवाल | वर्ष | प्रकाशक |
|---|---|---|---|
| १. | ४० वा | १९९५-९६ | **पी. जी. मेढे** कार्यकारी संचालक |
| २. | ४१ वा | १९९६-९७ | **एस्. एस्. पाटील** प्र. कार्यकारी संचालक |
| ३. | ४२ वा | १९९७-९८ | **एस्. एस्. पाटील** कार्यकारी संचालक |
| ४. | ४३ वा | १९९८-९९ | **व्ही. डी. शिंदे** कार्यकारी संचालक |
| ५. | ४४ वा | १९९९-२००० | **व्ही. एम्. माने** कार्यकारी संचालक |
| ६. | ४५ वा | २०००-२००१ | **व्ही. एम्. माने** कार्यकारी संचालक |
| ७. | ४६ वा | २००१-२००२ | **व्ही. एम्. माने** कार्यकारी संचालक |
| ८. | ४७ वा | २००२-२००३ | **व्ही. एम्. माने** कार्यकारी संचालक |
| ९. | ४८ वा | २००३-२००४ | **व्ही. एम्. माने** कार्यकारी संचालक |
| १०. | ४९ वा | २००४-२००५ | **व्ही. एम्. माने** कार्यकारी संचालक |

# प्रकरण ६ श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याच्या अर्थक्षमतेचे व परिसर विकासातील योगदानाचे मूल्यमापन

## ६.१ प्रास्ताविक :

श्री भोगावती सहकारी साखर कारखाना, परिते या संस्थेच्या/कारखान्याच्या कार्यक्षमतेचे व परिसर विकासाचे विविध उपक्रमांचे आर्थिक मूल्यमापन करताना संशोधकाने कारखान्याच्या विविध विभागांना (उदा. जनरल ऑफिस, लेबर वेल्फेअर विभाग, अकाऊंट विभाग, सिव्हिल विभाग, शेती विभाग इत्यादी) भेटी देऊन संबंधित अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्षात मुलाखती घेतल्या. या अधिकारी वर्गाकडून कागदोपत्री माहिती उपलब्ध करून घेतली. परिसर विकासातील विविध उपक्रमांचा लाभार्थिवर झालेला परिणाम शोधण्यासाठी कारखाना कार्यक्षेत्रातील नमुन्यादाखल काही मंडळींच्या गावी प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांचे अभिप्राय मिळविले. यासाठी देखील निरीक्षण आणि मुलाखत तंत्राचा वापर केला. सदर प्रकरणामध्ये दोन्ही बाजू स्वतंत्ररित्या मांडल्या आहेत.

## ६.२ अर्थक्षमतेचे मूल्यमापन :

कारखान्याच्या अर्थक्षमतेचे मूल्यमापन करताना संशोधकाने कारखान्याच्या भागभांडवलापासून साखरेच्या विक्रीपर्यंतच्या अनेक गोष्टींचा अभ्यास केलेला आहे. विशेषकरून त्यांनी खालील ठळक बाबींवर लक्ष वेधले आहे.

- एकूण भाग भांडवल
- कारखाना सभासद संख्या
- ऊस गळीत टन
- साखर पोत्यांचे उत्पादन
- साखर उतारा
- ऊस गळीत हंगाम-दिवस (कालावधी)
- सभासदांना दिलेली ऊस रक्कम

- ऊस उत्पादक सभासदांना माफक दरात पुरविण्यात आलेली प्रती टनामागील साखर (प्रती टन एक किलो प्रमाणे)
- ऊस उत्पादक सभासदांना प्रती महिना पाच किलोप्रमाणे माफक दरामध्ये पुरविण्यात आलेली साखर
- मोलॅसिस विक्रीतून मिळालेले उत्पन्न

याशिवाय स्थूल आर्थिक मूल्यमापनामध्ये स्वतंत्ररित्या काही महत्वाच्या गोष्टींचा अभ्यास केलेला आहे. तो पुढीलप्रमाणे :

- साखर व इतर उत्पादन विक्री
- ऊस/कच्चा माल व अनुषंगिक खर्च
- प्रत्यक्षात उत्पादन प्रक्रियेतील कामगारांचा पगार व मजूरी
- मॅन्युफॅक्चरींग आणि मॅकॅनिक खर्च
- साखर विक्री खर्च
- इतर उत्पादन खर्च
- प्रशासकीय खर्च
- जनरल डिपार्टमेंट (सामान्य प्रशासन विभाग)
- पगार व मजूरी
- बोनस, भत्ते व उत्तेजनार्थ पेमेंट
- कामगार कल्याण / प्रशिक्षण खर्च
- प्रशासकीय खर्च
- निव्वळ नफा
- लेखापरिक्षकांचा अहवाल

सन १९९५-९६ ते २००४-०५ या दशकातील अर्थक्षमतेचे मूल्यमापन संशोधकाने केलेले अ

## तक्ता क्र.६.१
## श्री भोगावती सहकारी साखर कारखाना, परिते या कारखान्याच्या उत्पादक क्षमतेचे मूल्यमापन

| अ. क्र. | तपशील | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | ९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | भागभांडवल | ३९८५२०८ | ४०११४८९९ | ४३३२२०२४ | ७९७८३१७० | ८६८२६६७६ | ९२४०६६०५ | १३५६९२४४४ | १४४३५८७०६ | १४७५४९९४३ | १४९१३८५५९ |
| २. | सभासद संख्या | १८५३९ | १८५२४ | १८५२६ | २८३७३ | २८३०८ | २८३८७ | २८५३४ | २९०७१ | २९१३१ | २८९३५ |
| ३. | ऊस गळीत टन | ५८१४४८ | ५५८१७९ | ५५५०७८ | ६२२२६३ | ६४०८६७ | ५८६१८४ | ५१७९५३ | ५८४१७० | २७३३३७ | २७९५३९ |
| ४. | साखरपोती उत्पादन | ७०७५३५ | ६८५७९० | ६६१०९५ | ७१७६१० | ७९२५२५ | ७२९३१५ | ६८३३०० | ७४०८५० | २९८४०० | ३३७५२० |
| ५. | सभासदांना दिलेली ऊस रक्कम रू. | ४१९३७०४७६ | ५९६८५०४२८ | ४७९९९९३५७ | ५१२६७३४६३ | ५३९१९५६०१ | ४५४१६७४१३ | ४३१५६६४६६ | ५३६००६०१३ | २४७९२३८४८ | ३०७४९३३४४ |
| ६. | सभासदांना माफक दरात पुरविलेली साखर (प्रती टन एक किलो प्रमाणे) | ५८१४४८ | ५५८१७९ | ५५५०७८ | ६२२२६३ | ६४०८६७ | ५८६१८४ | ५१७९५३ | ५८४१७० | २७३३३७ | २७९५३९ |
| ७. | ऊस उत्पादक सभासदांना वर्षभर साखर (प्रति सभासद महिना पाच किलोप्रमाणे) | १११२३४० | १११४४० | ११११५६० | १७०२३८० | १६९८४८० | १७०३२२० | १७१२०४० | १७०४२६० | १७४५८६० | १७३६१०० |
| ८. | मोलॅसिस विक्री | १२०४१४३६ | ९९२४३९० | २९०९६५३० | २७३०५५७७ | १५९८९०१३ | २७०१३६३० | २३३४३४४२ | ३५९२७१२९ | २४४७३७१७ | ३९४४६९६१ |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

**तक्ता क्र. ६.२**

**श्री भोगावती सहकारी साखर कारखाना, परिते या कारखान्याच्या उत्पादक क्षमतेचे मूल्यमापन**

**आधारभूत वर्ष - सन १९९५-९६**

| अ. क्र. | तपशील | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | ९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | भागभांडवल | १०० | १०१ | १११ | २०० | २१८ | २३२ | ३४० | ३६२ | ३७० | ३७७ |
| २. | सभासद संख्या | १०० | ९९.९१ | ९९.९२ | १५३ | १५३ | १५३ | १५४ | १५७ | १५७ | १५६ |
| ३. | ऊस गळीत टन | १०० | ९५ | ९५ | १०७ | ११० | १०१ | ८९ | १०० | ४७ | ४८ |
| ४. | साखरपोती उत्पादन | १०० | ९५ | ९३ | १०१ | ११२ | १०३ | ९७ | १०५ | ४२ | ४८ |
| ५. | सभासदांना दिलेली ऊस रक्कम रू. | १०० | १४२ | १४ | १२२ | १२९ | १०८ | १०३ | १२८ | ५९ | ७३ |
| ६. | सभासदांना माफक दरात पुरविलेली साखर (प्रती टन एक किलो प्रमाणे) | १०० | ९५ | ९५ | १०७ | ११० | १०१ | ८९ | १०० | ४७ | ४८ |
| ७. | ऊस उत्पादक सभासदांना वर्षभर साखर (प्रति सभासद महिना पाच किलोप्रमाणे) | १०० | १०० | १०० | १५३ | १५३ | १५३ | १५४ | १५७ | १५७ | १५६ |
| ८. | मोलॅसिस विक्री | १०० | ८२ | २४२ | २२७ | १३३ | २२४ | १९४ | १९८ | २०३ | ३२८ |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

**तक्ता क्र. ६.३**

**भागभांडवल**

| अ. क्र. | आर्थिक वर्ष | भागभांडवल (रूपये) |
|---|---|---|
| १. | १९९५-१९९६ | ३,९८,९५,२७८.०० |
| २. | १९९६-१९९७ | ४,०१,१४,८९९.०० |
| ३. | १९९७-१९९८ | ४,३३,२२,०२४.७५ |
| ४. | १९९८-१९९९ | ७,९७,८३,१७०.७५ |
| ५. | १९९९-२००० | ८,६८,२६,६७६.७५ |
| ६. | २०००-२००१ | ९,२४,०६,६०५.७५ |
| ७. | २००१-२००२ | १३,५६,९२,४४४.०० |
| ८. | २००२-२००३ | १४,४३,५६,७०६.०० |
| ९. | २००३-२००४ | १४,७५,४९,९४३.०० |
| १०. | २००४-२००५ | १५,०३,८८,५२८.०० |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

कारखाना कार्यक्षेत्रातील सभासदांना कारखान्याचे शेअर्स विकून मिळालेली रक्कम प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये कारखान्याकडे जमा केली जाते. ही रक्कम म्हणजेच कारखान्याकडे जमा होणारे भागभांडवल होय. वरील सारणी सन १९९५-९६ ते सन २००४-०५ या कालावधीतील प्रतिवर्षानिहाय एकूण भागभांडवल दर्शविते. सुरूवातीच्या तीन वर्षातील भागभांडवल कमी असले तरी नंतरच्या सात वर्षांमध्ये हे भागभांडवल क्रमशः वाढत गेल्याचे आढळते. पूर्वी एका कुटुंबातून केवळ एक शेअर्स देणे हा कारखान्याचा धोरणात्मक निर्णय होता. नंतरच्या कालावधीमध्ये मात्र हा निर्णय बदलण्यात आला. एका कुटुंबातून अनेक शेअर्स खरेदी करण्यास मुभा देण्यात आली. त्यामुळे भागभांडवलामध्ये आपोआपच वाढ होत गेली. सन १९९५-९६ च्या तुलनेत सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील भागभांडवल सरासरी पाच पटींनी वाढले आहे. कारखान्याच्यादृष्टीने ही बाब निश्चितच उल्लेखनीय आहे.

**तक्ता क्र.६.४**
**कारखाना सभासद संख्या**

| अ. क्र. | वर्ष | सभासद संख्या |
|---|---|---|
| १. | १९९५-१९९६ | १८,५३५ |
| २. | १९९६-१९९७ | १८,५२४ |
| ३. | १९९७-१९९८ | १८,५२६ |
| ४. | १९९८-१९९९ | २८,३७३ |
| ५. | १९९९-२००० | २८,३०८ |
| ६. | २०००-२००१ | २८,३८७ |
| ७. | २००१-२००२ | २८,५३४ |
| ८. | २००२-२००३ | २९,०७१ |
| ९. | २००३-२००४ | २९,१३१ |
| १०. | २००४-२००५ | २८,९३५ |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

वरील सारणी सन १९९५-९६ ते २००४-०५ या कालावधीतील ऊस उत्पादक सभासदांची संख्या दर्शविते. सन १९९५-९६ या वर्षामध्ये सभासदांची संख्या १८,५३५ होती. त्यानंतर ही संख्या वाढत गेली असून ती सन २००४-०५ मध्ये २८,९३५ इतकी झाली आहे. याचाच अर्थ ती दीडपटींनी वाढलेली आहे. कारखाना कार्यक्षेत्रातील जास्तीतजास्त शेतकरी ऊसाचे उत्पादन घेऊ लागल्याने आपणदेखील कारखान्याचे सभासद बनावे हा दृष्टीकोन दिवसेंदिवस वाढू लागल्याने प्रतिवर्षी सभासदांच्या संख्येमध्ये वाढ होत गेलेली आहे.

**तक्ता क्र. ६.५**

**ऊस गळीत टन**

| अ.क्र. | वर्ष | गळीत टन (मेट्रीक) |
|---|---|---|
| १. | १९९५-१९९६ | ५,८१,४४८ |
| २. | १९९६-१९९७ | ५,५८,१७९ |
| ३. | १९९७-१९९८ | ५,५५,०७८ |
| ४. | १९९८-१९९९ | ६,२२,२६३ |
| ५. | १९९९-२००० | ६,४०,८६७ |
| ६. | २०००-२००१ | ५,८६,१८४ |
| ७. | २००१-२००२ | ५,१७,९५३ |
| ८. | २००२-२००३ | ५,८४,१७० |
| ९. | २००३-२००४ | २,७३,३३७ |
| १०. | २००४-२००५ | २,७९,५३९ |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

सन १९९५-९६ ते सन २००४-०५ या कालावधीमध्ये प्रत्येक गळीत हंगामामध्ये गळीत केलेला ऊस उपरोक्त सारणी दर्शविते. सुरूवातीच्या दोन वर्षांपेक्षा नंतरच्या आठ वर्षातील ऊस गळीत अधिक आढळले. तथापि सन २००३-०४ व २००४-०५ या दोन वर्षांत ऊसावर पडलेला लोकरी मावा व दुष्काळजन्य परिस्थिती यामुळे ऊस उत्पादन व गळीतामध्ये घट झालेली आहे. कारखाना कार्यक्षेत्रामध्ये ''सुधारित जातीचे ऊस बेणेमळे (बेणे प्लॉट)'' वाढल्याने ऊस उत्पादक सभासद को-७१२५, को-७२१९, को-८०११, को-७४० ऐवजी कोसी-६७१, को-८०१४, को-९४०१२, को-९२००५ या जातीच्या ऊसाची लागवड मोठ्या प्रमाणावर करू लागले आहेत. कारखाना कार्यक्षेत्रातील ऊसाचे प्रमाण वाढल्याने बाहेरच्या जिल्ह्यातून/राज्यातून करावी लागणारी ऊसाची आयात कमी झालेली आहे.

**तक्ता क्र. ६.६**

**साखर उत्पादन**

| **अ. क्र.** | **ऊस गळीत वर्ष** | **साखर पोती** |
|---|---|---|
| १. | १९९५-१९९६ | ७,०७,५३५ |
| २. | १९९६-१९९७ | ६,८५,७९० |
| ३. | १९९७-१९९८ | ६,६१,०९५ |
| ४. | १९९८-१९९९ | ७,१७,६१० |
| ५. | १९९९-२००० | ७,९२,५२५ |
| ६. | २०००-२००१ | ७,२९,११५ |
| ७. | २००१-२००२ | ६,८३,३०० |
| ८. | २००२-२००३ | ७,४०,८५० |
| ९. | २००३-२००४ | २,९८,४०० |
| १०. | २००४-२००५ | ३,३७,५२० |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

सन १९९५-९६ ते सन २००४-०५ या कालावधीतील प्रतिवर्षनिहाय साखर पोत्यांचे उत्पादन सदर सारणी दर्शविते. प्रत्येक वर्षी साखर पोत्यांचे उत्पादनदेखील वाढलेले आढळते. प्रत्येकवर्षी सुधारित ऊसाच्या वाणची (जातीची) लागवड केल्याने साखर उताऱ्यामध्ये व उत्पादनामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. ६.७**
**साखर उतारा**

| अ.क्र. | ऊस गळीत वर्ष | साखर उतारा |
|---|---|---|
| १. | १९९५-१९९६ | १२.२७ |
| २. | १९९६-१९९७ | १२.३६ |
| ३. | १९९७-१९९८ | १२.१४ |
| ४. | १९९८-१९९९ | ११.६३ |
| ५. | १९९९-२००० | १२.३५ |
| ६. | २०००-२००१ | १२.४२ |
| ७. | २००१-२००२ | १३.१६ |
| ८. | २००२-२००३ | १२.६८ |
| ९. | २००३-२००४ | १०.८५ |
| १०. | २००४-२००५ | ११.७३ |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

सन १९९५-९६ ते सन २००४-०५ या गळीत हंगामामध्ये प्रत्येकवर्षी साखर उतारा किती मिळाला याचे चित्र उपलब्ध सारणीवरून स्पष्ट होते. सुरूवातीपासूनच श्री भोगावती सहकारी साखर कारखाना साखर उताऱ्याच्या बाबतीत अग्रेसर आहे. सन २००१-०२ मध्ये वसंतदादा शुगर इन्स्टिटय़ूट, मांजरी बु।।, जि. पुणे यांनी श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याला महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक ‘‘रिड्युसड् ओव्हरऑल रिकव्हरी’’ मिळाल्याबद्धल उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमतेचे दुसऱ्या क्रमांकाचे बक्षिस दिले आहे.

प्रत्येकवर्षी ऊस गळीत हंगामामध्ये साखर, उतारा वाढत गेल्याचे आढळते. महाराष्ट्रातील इतर साखर उताऱ्याच्या तुलनेत भोगावाती सहकारी साखर कारखाना प्रमाणित उताऱ्याच्या दुसऱ्या क्रमावर आहे.

**तक्ता क्र. ६.८**

**महाराष्ट्रातील साखर कारखान्यांचा साखर उतारा**

| अ.क्र. | साखर उतारा टक्के | कारखान्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | २००२-२००३ | २००३-२००४ |
| १. | १३ किंवा पेक्षा जास्त | ०२ | -- |
| २. | १३ किंवा पेक्षा कमी १२.५ च्या वर | ०७ | ०१ |
| ३. | १२.५ पेक्षा कमी १२ च्या वर | १९ | २ |
| ४. | १२ पेक्षा कमी ११.५ च्या वर | ४२ | १४ |
| ५. | ११.५ पेक्षा कमी ११ च्या वर | २९ | २५ |
| ६. | ११ पेक्षा कमी | ६१ | ९३ |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

**तक्ता क्र. ६.९**

**ऊस गळीत हंगाम कालावधी**

| अ.क्र. | ऊस गळीत वर्ष | गळीत दिवस |
|---|---|---|
| १. | १९९५-१९९६ | १५२ |
| २. | १९९६-१९९७ | १४७ |
| ३. | १९९७-१९९८ | १३८ |
| ४. | १९९८-१९९९ | १४८ |
| ५. | १९९९-२००० | १५८ |
| ६. | २०००-२००१ | १५४ |
| ७. | २००१-२००२ | ११८ |
| ८. | २००२-२००३ | १४७ |
| ९. | २००३-२००४ | ७८ |
| १०. | २००४-२००५ | ८७ |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

वरील सारणी कारखान्याच्या गळीत हंगामाचे दिवस दर्शविते. सन १९९५-९६ ते सन २००४-०५ या कालावधीमध्ये भोगावती सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम

कमीतकमी ७८ दिवस व जास्तीतजास्त १५८ दिवस चालला आहे. सन २००३-०४ व २००४-०५ या दोन वर्षांमध्ये अनुक्रमे ७८ व ८७ दिवस गळीत हंगाम चालला आहे. याचे कारण असे की, या कालावधीत लोकरी मावा व दुष्काळ यामुळे ऊस उत्पादन घटलेले आहे.

**तक्ता क्र. ६.१०**
**सभासदांना दिलेली ऊस रक्कम**

| अ.क्र. | ऊस गळीत वर्ष | ऊस गळीत टन | ऊस दर प्रती टन (रू.) | एकूण रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|
| १. | १९९५-१९९६ | ५,८१,४४८ | ६८६.०० | ४१,९३,७०,४७६ |
| २. | १९९६-१९९७ | ५,५८,१७९ | ८४०.०० | ५९,६८,५०,४२८ |
| ३. | १९९७-१९९८ | ५,५५,०७८ | ८७५.०० | ४७,९९,९९,३५७ |
| ४. | १९९८-१९९९ | ६,२२,२६३ | ७१५.०० | ५१,२६,७३,४६३ |
| ५. | १९९९-२००० | ६,४०,८६७ | ७८५.०० | ५३,९१,९५,६०१ |
| ६. | २०००-२००१ | ५,८६,१८४ | ८००.०० | ४५,४१,६७,४१३ |
| ७. | २००१-२००२ | १,१७,९५३ | ८०२.०० | ४३,१५,६६,४६६ |
| ८. | २००२-२००३ | ५,८४,१७० | ९१७.५५ | ५३,६०,०६,०१३ |
| ९. | २००३-२००४ | २,७३,३३७ | ९०७.०० | २४,७९,२३,८४८ |
| १०. | २००४-२००५ | २,७९,५३९ | ७७८.१० | ३०,७४,९३,३४४ |
| | **एकूण** | **४७,९९,०१८** | | **४५,२५,२४,६४,०९** |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

ऊस गळीत हंगामनिहाय ऊस गळीत टन व तत्कालिन ऊस दरानुसार सभासदांना कारखान्याकडून दिलेली रक्कम वरील सारणी दर्शविते. सन १९९५-९६ व सन २००४-०५ मध्ये सभासदांना देण्यात आलेली रक्कम जवळपास सारखी असली तरी सन २००३-०४ व २००४-०५ या दोन वर्षात ही रक्कम अनुक्रमे २४ व ३० कोटी रूपये आहे. ज्यावर्षी ऊसाचा प्रतीटन दर अधिक आणि एकूण ऊस गळीत टन अधिक त्यावर्षी अधिक रक्कमेचे वाटप केलेले आढळले. सभासदांना दहा वर्षामध्ये अब्जावधी रूपये दिल्याचे आढळले.

**तक्ता क्र. ६.११**

**सभासदांना माफक दरामध्ये पुरविलेली साखर**

(प्रतीटन १ किलो प्रमाणे)

| अ.क्र. | वर्ष | पुरविण्यात आलेली साखर (किलोमध्ये) | प्रती किलो दर (रू.) | एकूण रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|
| १. | १९९५-१९९६ | ५८१४४८ | ३.५० | २०३५०६८ |
| २. | १९९६-१९९७ | ५५८१७९ | ३.५० | १९५५०२६५ |
| ३. | १९९७-१९९८ | ५५५०७८ | ३.५० | १९४२७७३ |
| ४. | १९९८-१९९९ | ६२२२६३ | ३.५० | २१७७९२० |
| ५. | १९९९-२००० | ६४०८६७ | ३.५० | २२४३०३४५ |
| ६. | २०००-२००१ | ५८६१८४ | ३.५० | २०५१६४४ |
| ७. | २००१-२००२ | ५१८०९५३ | ३.५० | १८१२८३५५ |
| ८. | २००२-२००३ | ५८४१७० | ३.५० | २०४४५९५ |
| ९. | २००३-२००४ | २७३३३७ | ३.५० | ९५६६७९ |
| १०. | २००४-२००५ | २७९५३९ | ३.५० | ९७८३८६५ |
| | **एकूण** | **९८६२०१८** | | **८११०१५०९** |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

वरील सारणी सभासदांना माफक दरामध्ये पुरविण्यात आलेली साखर व त्यापासून कारखान्याला मिळालेली एकूण रक्कम दर्शविते. प्रतीटनामागे एक किलो याप्रमाणे कारखान्याने सभासदांना दहा वर्षामध्ये ९८,६२,०१८ किलो म्हणजेच १८,६२,०१८ क्विंटल इतकी साखर पुरविली आहे. रू. ३.५० प्रती किलोप्रमाणे कारखान्याला रूपये ३४,५१,७०,६३/- इतके उत्पन्न मिळालेले आहे. सभासदांना कामगारांप्रमाणे दिवाळी बोनस मिळत नसल्यामुळे एवढ्या कमी दरामध्ये त्यांना पुरविली जाणारी साखर त्यांच्यादृष्टीने बोनसच आहे. हिच साखर सरासरी बाजारभाव प्रतिकिलोमागे रू. १८ प्रमाणे सभासदांनी खरेदी करावयाचे म्हटले तर ही किंमत रू. १७७५१६३२४/- इतकी होते. याचाच अर्थ चौपटीने अधिक पैसे द्यावे लागले असते. या व्यवहारामध्ये जी जादा रक्कम

रू. १४२७९९२६१/- सभासदांना द्यावी लागली असती ती त्यांची प्रत्यक्षात बचत ठरली आहे.

### कामगारांना दिवाळीसाठी पुरविली जाणारी मोफत व बोनस स्वरूपातील माफक दरातील साखर :

कारखान्यामध्ये काम करणाऱ्या कायमस्वरूपी आणि हंगामी कामगारांना प्रतिवर्षी दिवाळीच्या निमित्ताने प्रत्येकी ५ किलो मोफत साखर पुरविली जाते. त्याचबरोबर बोनस स्वरूपातील साखर प्रती किलो रू. ३.५० या दराने पुरविली जाते. सद्यःस्थितीमध्ये कारखान्याच्या विविध विभागामध्ये काम करणाऱ्या कामगारांची कायमस्वरूपी ३५० व हंगामी ८३१ अशी मिळून ११८१ इतकी संख्या आहे. त्यांना मोफत साखर ५ किलो व बोनस स्वरूपातील माफक दरातील साखर ५ किलो इतकी दिली जाते.

**तक्ता क्र. ६.१२**

**ऊस उत्पादक सभासदांना वर्षभर माफक दरात पुरविली जाणारी साखर**

| अ. क्र. | वर्ष | प्रती महिना ५ किलो प्रमाणे साखर | सभासद संख्या | एकूण साखर (किलो) |
|---|---|---|---|---|
| १. | १९९५-१९९६ | ६० | १८५३५ | १११२१०० |
| २. | १९९६-१९९७ | ६० | १८५२४ | १११९४४० |
| ३. | १९९७-१९९८ | ६० | १८५२६ | १११९५६० |
| ४. | १९९८-१९९९ | ६० | २८३७३ | १७०२३८० |
| ५. | १९९९-२००० | ६० | २८३०८ | १६,९८,४८० |
| ६. | २०००-२००१ | ६० | २८३८७ | १७०३२२० |
| ७. | २००१-२००२ | ६० | २८५३४ | १७१२०४० |
| ८. | २००२-२००३ | ६० | २९०७१ | १७४४२६० |
| ९. | २००३-२००४ | ६० | २९१३१ | १७४७८६० |
| १०. | २००४-२००५ | ६० | २८९३५ | १७३६१०० |
| | | **एकूण** | **२५६३२४** | **१५,३७,९४,४** |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

वरील सारणी कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक सभासदांना माफक दरामध्ये पुरविलेली एकूण साखर दर्शविते. सन १९९५-९६ ते सन २००४-०५ या कालावधीत ऊस उत्पादक सभासदांना प्रती किलो रू. ३.५० प्रमाणे १५,३७,९४,४० किलो इतकी साखर माफक दरामध्ये पुरविण्यात आलेली आहे. ऊस उत्पादक सभासदांच्यादृष्टीने हा देखील एक प्रकारचा बोनस आहे.

**तक्ता क्र. ६.१३**

**मोलॅसिस व इतर उपपदार्थ**

| अ. क्र. | वर्ष | उत्पन्न रूपये |
|---|---|---|
| १. | १९९५-१९९६ | १३६६३३४० |
| २. | १९९६-१९९७ | ११४६१०५९ |
| ३. | १९९७-१९९८ | २५२६४५१९ |
| ४. | १९९८-१९९९ | २७०१६७९१ |
| ५. | १९९९-२००० | २३४८५८७७ |
| ६. | २०००-२००१ | ३७५८७२२७ |
| ७. | २००१-२००२ | ४६७७८८७६ |
| ८. | २००२-२००३ | ४१५०१५१३ |
| ९. | २००३-२००४ | २७९६६२१० |
| १०. | २००४-२००५ | ५२४७१४७५ |
| | **एकूण** | **३०७१९६८८७** |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

सन १९९५-९६ ते सन २००४-०५ या कालावधीत कारखाना कार्यक्षेत्रातील मोलॅसिस व इतर पदार्थांचे उत्पन्न प्रतिवर्षी वाढत गेले असून ते दहा वर्षाच्या कालावधीत सुमारे चार पटींनी वाढले आहे.

## तक्ता क्र. ६.१४

## श्री भोगावती सहकारी साखर कारखाना, परिते या कारखान्याचे स्थूल अर्थिक मूल्यमापन

| अ. क्र. | तपशील | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | ९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | साखर व इतर उत्पादक खर्च रू. | ७३५८१२७२ | ९३५४७६६४ | ११५१५२१८८ | १३१६४८८६४ | १६६१२७४५९ | ११५८५५४९९ | ११०२३५३१० | ११८५६७३८४ | ७२९६०२९० | ५५३५८७१७ |
| २. | ऊस/कच्च्या माल व अनुषंगिक खर्च रू. | ५२५०५३६४० | ७३२११३८७० | ४७९९९३५७ | ५१२६७३४६३ | ५३९११९५६०१ | ४५४१६७३१४ | ४३१५६६४६६ | ५३६००६०१३ | २४७९२३८४८ | ३०७४९३३४४ |
| ३. | पगार व मजूरी रू. | १५९३४५६६ | १७२६१७८७ | ७६५२१५६१ | ९४७२८९१२ | ११२२४४७०७ | ११२४९८३३९ | १०६०५३००९ | ८७३६००५० | ८५३८१४६७ | ९४५०६३९८ |
| ४. | मॅन्युफॅक्चरींग आणि मेकॅनिक खर्च रू. | १०५१४७५ | ११६०७८४ | ५१७४५२५६ | ६२३९०६२० | ७०४३५५९७ | ६६१०१८४३ | ६२७१५५७१ | ५५१६६३०५ | १३१५१५०८ | २६५८४५१३ |
| ५. | साखर विक्री खर्च व इतर उत्पादक खर्च रू. | ४८७४५७५७ | ६२८९६४०० | १५३७१९८९ | १६०६३८९५ | ८९५२३३८ | १७३१२५२९ | १७३७०६२५ | १४२६०९९२ | १२४१५६०० | १३४१३५६९ |
| ६. | मोलॅसिस व इतर उपपदार्थ | १३६६३३४० | ११४६१०५९ | २५२६४५१९ | २७०१६७९१ | २३४८५८७७ | ३७५८७२२७ | ४६७७८८७६ | ४१५०१५१३ | २७३६६२१० | ५२४७१४७५ |
| ७. | प्रशासकीय खर्च रू. | ३९४०६५७ | २७१६११९० | १३११५३९८ | १५५५५६३४ | १७९००५५४ | १४७००२५६ | १४५१२१९० | १३०७५००० | १५०१३७१३ | १५६१००१९ |
| ८. | निव्वळ नफा/तोटा रू. | +३९६२८६६ | +३९९९९२० | -१७०२४३७१ | +४५१४३७१ | +८१६०००० | +८१६०२८९ | -४७६७४७३२ | -८५८३४०२६ | -१५९२६२४४४ | -१३८१३९८१ |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

**तक्ता क्र. ६.१५**
**श्री भोगावती सहकारी साखर कारखाना, परिते या कारखान्याचे स्थूल अर्थिक मूल्यमापन**
**आधारभूत वर्ष : १९९५-९६**

| अ. क्र. | तपशील | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | ९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | साखर व इतर उत्पादक खर्च रू. | १०० | १२७ | १५६ | १७८ | २२५ | १५६ | १५० | १६१ | ८६ | ७५ |
| २. | ऊस/कच्चा माल व अनुषंगिक खर्च रू. | १०० | १३९ | ९२ | ९८ | १०३ | ८७ | ८२ | १०२ | ४७ | ५९ |
| ३. | पगार व मजूरी रू. | १०० | १०८ | ४०० | ५९४ | ७०४ | ७०६ | ६६७ | ५४८ | ५३६ | ५९३ |
| ४. | मॅन्युफॅक्चरींग आणि मेकॅनिक खर्च रू. | १०० | ११० | ४९२१ | ५३३४ | ६६९९ | ६२८७ | ५९६५ | ५२४७ | १२५१ | २५२८ |
| ५. | साखर विक्री खर्च व इतर उत्पादक खर्च रू. | १०० | १२९ | ३२ | ३३ | ३९ | ३६ | ३६ | २९ | २६ | २८ |
| ६. | मोलॅसिस व इतर उपपदार्थ | १०० | ८५ | १८५ | १९८ | १७५ | २७५ | ३४२ | ३०३ | २०५ | ३८४ |
| ७. | प्रशासकीय खर्च रू. | १०० | १८९ | ३३३ | ३९५ | ४५४ | ३७१ | ३६८ | ३३२ | ३८१ | ३९६ |
| ८. | निव्वळ नफा/तोटा | १०० | +१०१ | -४३० | +११४ | +२०६ | +२०६ | -१२०३ | -२१६६ | -४०१९ | -३४९ |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

## ६.३ स्थूल आर्थिक मूल्यमापनातील महत्वाच्या बाबी :

स्थूल आर्थिक मूल्यमापनामध्ये संशोधकाने साखर व इतर उत्पादने, कच्चा माल, उत्पादनाशी संबंधित कामगारांचा पगार व मजूरी, साखर विक्री खर्च, इतर उत्पादन खर्च, सामान्य प्रशासन विभाग, पगार व मजूरी, कामगारांना दिलेला बोनस, भत्ते, कामगार कल्याण/प्रशिक्षण खर्च, प्रशासकीय खर्च आणि निव्वळ नफा इत्यादी गोष्टींचा अभ्यास केलेला आहे. या प्रत्येक गोष्टीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**साखर व इतर उत्पादन विक्री :**

साखर विक्री बरोबरच इतर अनुषंगिक उत्पादने (बायप्रॉडक्टस्) यांच्या विक्रीतून मिळालेले उत्पन्न याठिकाणी विचारात घेतलेले आहे. साखरेमध्ये नियंत्रित, खुली आणि निर्यात केली जाणारी साखर इत्यादींचा समावेश करण्यात आलेला आहे. याशिवाय मोलॅसिस, बगॅस आणि कंपोष्ट खत यांच्या विक्रीतून मिळालेली एकूण रक्कम साखरेच्या विक्रीमध्ये मिळविण्यात आलेली आहे.

**ऊस / कच्चा माल व अनुषंगिक खर्च :**

यामध्ये ऊस खरेदी, ऊस खरेदी कर, ऊस तोडणी व ओढणी खर्च, ऊस पुरवठा ठेकेदार कमिशन, ऊस वाहतूक, रस्ते दुरुस्ती, गाडी अड्डा दुरूस्ती खर्च इत्यादींचा समावेश आढळतो.

**पगार व मजूरी :**

कारखान्यामधील काम करणाऱ्या कामगारांपैकी जे कामगार प्रत्यक्षात उत्पादनाशी संबंधित आहेत त्यांना सबंध वर्षामध्ये दिलेला पगार, हंगामी तसेच रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांची एकूण मजूरी या बाबींचा विचार याठिकाणी केला जातो.

**मॅन्युफॅक्चरींग आणि मेकॅनिक खर्च :**

साखर उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामुग्री, वेगवेगळ्या यंत्राचे बाहेरून मागविण्यात आलेले पार्टस् (सुटे भाग), यंत्र दुरुस्ती, यंत्रांचे स्टोअरेज, विविध प्रकारची रसायने इत्यादींवर केला जाणारा खर्च.

**साखर विक्री खर्च :**

साखर गोडाऊन खर्च, साखरेसाठी वापरली जाणारी पोती (बारदान खर्च), साखर नमुने पाठविण्याचा खर्च, गोडाऊन किपर, कारकून व हमाली खर्च, वाहतुकीसाठी वापरली जाणारी वाहने, त्यांच्यावरील खर्च, गोडाऊन विमा थोडक्यात कारखाना ते संबंधित ग्राहक यांच्यापर्यंत साखर पोहोचविणे या सर्व गोष्टींचा विक्री खर्चात समावेश होतो.

**इतर उत्पादन खर्च :**

व्यवस्थापकीय खर्च, पाणीपुरवठा, पाणीपट्टी व वीजपट्टी, बगॅस वाहतूक खर्च, कंपोष्ट खत निर्मिती खर्च, मोलॅसिस वाहतूक, कारखाना इमारत दुरूस्ती खर्च, कारखाना स्थळावरील फळबागायतीवरील खर्च इत्यादींचा समावेश यामध्ये होतो.

**सामान्य प्रशासन विभाग - पगार व मजूरी :**

या विभागांतर्गत कार्यालयीन अधीक्षक, खरेदी अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, त्यांचा इतर कार्यालयीन वर्ग या सर्वांचा पगार व मजूरीवरील खर्च, लेखाधिकारी खर्च इत्यादींचा समावेश यामध्ये केला जातो.

**बोनस, भत्ते व उत्तेजनार्थ पेमेंट :**

कामगार व अधिकारी वर्ग यांचा वाहन भत्ता, घर भाडे भत्ता, नियमानुसार दिवाळी बोनस, दिवाळीसाठी खास भेटवस्तू, कामगार कॉलनीकरिता केला जाणारा खर्च इत्यादी बाबींवरील खर्च यामध्ये अंतर्भूत करण्यात आलेला आहे.

**कामगार कल्याण / प्रशिक्षण खर्च :**

कामगारांसाठी पुरविल्या जाणाऱ्या वैद्यकिय सुविधा, वैद्यकिय भत्ते, अपघाताच्या प्रसंगी दिली जाणारी तात्काळ आर्थिक मदत, कामगारांसाठी अधूनमधून चालविले जाणारे प्रशिक्षण वर्ग इत्यादींवर वर्षभरात केला जाणारा खर्च.

**प्रशासकीय खर्च :**

यामध्ये तार, टपाल व टेलिफोन यांच्यावर केला जाणारा खर्च, संगणक खर्च, प्रिंटींग व स्टेशनरी खर्च, वार्षिक अहवाल तयार करण्यावरील खर्च, कारखाना कामासाठी इतर ठिकाणी भेटी देण्याचा प्रवास खर्च, कारखान्याला भेटी देणाऱ्या मान्यवरांचा निवास, भोजन व चहापान खर्च इत्यादी बाबींचा समावेश आढळतो.

**निव्वळ नफा :**

कारखान्यामध्ये उत्पादित केल्या जाणाऱ्या साखर विक्रीतून उत्पादन आणि प्रशासकिय खर्चाबरोबरच इतर विविध कर, बँक कमिशन, कर्जावरील व्याज, परतीच्या ठेवीवरील व्याज, प्रवास व मिटींग भत्ते, वाहन विभागावरील खर्च, कारखाना कार्यक्षेत्राच्या विकासाच्यादृष्टीने राबविण्यात आलेले विविध उपक्रम यांच्यावर झालेला सबंध वर्षातील खर्च. हे सर्व खर्च वजावट करून शिल्लक राहणारी रक्कम निव्वळ नफा म्हणून गृहित धरली जाते.

स्थूल आर्थिक मूल्यमापन ही सारणी साखर व इतर उत्पादन विक्री व त्यातून मिळालेली प्रतिवर्षनिहाय रक्कम दर्शविते. त्याचबरोबर उत्पादनखर्च व प्रशासकीय खर्चदेखील दर्शविते. संशोधकाने संशोधनासाठी सन १९९५-९६ ते सन २००४-०५ या दहा वर्षांचा कालावधी निवडला असून या कालावधीत साखर व इतर अनुषंगिक उत्पादन विक्रीतून किती रक्कम मिळाली याचा अभ्यास केलेला आहे. उत्पादनखर्च व प्रशासकीय खर्चाची वजावट करून प्रत्येकवर्षी निव्वळ नफा किती मिळाला याचाही अभ्यास केलेला आहे.

या सारणीला पूरक दुसरी सारणी मांडली असून तिच्यामध्ये सन १९९५-९६ हे आधारभूत वर्ष मानून या वर्षासाठी उत्पन्न तसेच खर्च १०० टक्के गृहित धरून इतर वर्षाच्या उत्पन्नाची व खर्चाची टक्केवारी प्रत्येक वर्षामध्ये नोंद करण्यात आलेली आहे.

प्राप्त सारणीनुसार साखर व इतर उत्पादन विक्रीतून मिळालेली रक्कम सुरूवातीच्या वर्षात (सन १९९५-९६) मध्ये कमी असली तरी नंतरच्या वर्षामध्ये ही रक्कम वाढत गेलेली आहे. त्याचे कारण असे की, साखरेचे एकूण उत्पादन वाढलेले आहे. तसेच साखरेच्या किंमतीसुद्धा दिवसेंदिवस वाढलेल्या आहेत. दुसरे असे की, साखरेच्या उत्पादनाबरोबरच इतर अनुषंगिक उत्पादने वाढत गेलेली आहेत. एकूण दहा वर्षांमध्ये सन २००२-०३ या वर्षात हे उत्पादन १०२ टक्क्यापर्यंत पोहोचलेले आहे.

उत्पादक खर्चामध्ये पहिल्यांदा ऊस/कच्चा माल व अनुषंगिक खर्चाचा अभ्यास केलेला आहे. हा खर्च देखील दिवसेंदिवस/वर्षानुवर्षे वाढत गेलेला आहे. ऊस उत्पादक सभासदांना प्रतिटनामागे वाढीव दर दिल्यामुळे वाढत्या महागाईनुसार प्रतिटनामागे तोडणी-ओढणी खर्च अधिक दिल्यामुळे ही रक्कम वाढत गेलेली आहे. नवीन रस्ते तयार करणे, जुन्या रस्त्यांची दुरूस्ती करणे या बाबींवर कारखान्याने मोठ्या प्रमाणावर खर्च केलेला आहे.

प्रत्यक्ष उत्पादनाशी सबंधित असणाऱ्या कामगारांचा पगार व मजूरी यांचा अभ्यास केल्यानंतर हाही खर्च वाढलेला आढळला. सहकारी साखर कारखान्यांचे स्वतंत्र वेजबोर्ड असून ठराविक वर्षांच्या अंतराने कामगारांच्या पगारामध्ये वाढ केली जाते. श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याने आत्तापर्यंत ताबडतोब पगारवाढी दिल्यामुळे हा खर्च क्रमशः वाढत गेलेला आहे. सुरूवातीला हा खर्च १०८ टक्के इतका मर्यादित होता. नंतरच्या वर्षामध्ये मात्र तो ४००, ५९४, ७०४ टक्क्यांपर्यंत पाहोचला आहे. उत्पादनाशी सबंधित कामगारांना वेळच्यावेळी पगारवाढ देऊन साखर उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न कारखान्याने केल्याचे चित्र यावरून स्पष्ट होते. मॅन्युफॅक्चरींग आणि मेकॅनिक खर्चामध्ये वाढ झाल्याचे आढळते. विशिष्ट कालावधीनंतर ब्रॉयलर बदलणे, काही यंत्रांचे पार्ट बाहेरच्या ठिकाणाहून मागविणे, विविध प्रकारची रसायने, मिश्रणे इतर ठिकाणाहून आणणे याकरिता कारखान्याने

फार मोठा खर्च केलेला आहे. बदलत्या परिस्थितीनुसार यंत्रसामुग्रीमध्ये वाढदेखील केलेली आहे. हा खर्चदेखील टप्प्याटप्प्याने वाढत गेलेला असून तो सन १९९९-२००० पर्यंत ६६९९ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे.

कारखाना ते पार्टी/ग्राहक यांच्यापर्यंत साखर पोहोचविण्याचा खर्च याकरिता साखर विक्री खर्चाचा संशोधकाने स्वतंत्र अभ्यास केलेला आहे. या खर्चामध्येदेखील कमी अधिक प्रमाणात वाढ झालेली आहे. स्थानिक वर्तमानपत्रांना जाहिराती देऊन निविदा मागविणे, साखर पोत्यांवर (रिकाम्या) खर्च करणे, वाहतूक खर्च, हमाली खर्च इत्यादी खर्चांमध्ये वाढ होत गेल्याने हा खर्चसुद्धा अधिक झालेला दिसून आला. साखर विक्रीवरील सर्वात अधिक खर्च सन १९९६-९७ या वर्षातील असून तो १२९ टक्के इतका आहे. हा खर्च कमीअधिक होण्यास शासकीय धोरणदेखील जबाबदार आहे.

इतर उत्पादन खर्चामध्येदेखील क्रमशः वाढ होत गेलेली आढळली. दिवसेंदिवस पेट्रोल, डिझेल दरामध्ये होणारी वाढ, विजेचे वाढीव दर, कंपोस्टखत निर्मितीवरील वाढीव खर्च इत्यादीमुळे हा खर्च वाढला आहे. सन १९९६-९७ च्या तुलनेत हा खर्च दीडपटीने वाढला आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या पगार व मजूरीचा अभ्यास केला असून वेजबोर्डाने अधूनमधून जाहिर केलेल्या वाढीनुसार कारखान्याने तात्काळ कामगारांना या वाढी दिल्याने या खर्चामध्ये वाढ झालेली आहे. गरजेनुसार कामगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेल्यानेसुद्धा या खर्चामध्ये वाढ झालेली आहे. सन १९९६-९७ पासून हा खर्च वाढत गेलेला असून ही वाढ सन २००० ते २००१ पर्यंत ७०६ टक्क्यापर्यंत पोहोचली आहे.

बोनस, भत्ते व उत्तेजनार्थ पेमेंट या बाबींचा स्वतंत्ररित्या अभ्यास केलेला असून हा खर्च कमीअधिक प्रमाणात वाढलेला आहे. कारखाना नियमानुसार ८.३३ टक्के या व्यतिरिक्त कामगारांना सानुग्रह अनुदान म्हणून विशिष्ट रक्कम दिली जात असल्याने हा खर्च वाढलेला आहे. सन १९९६-९७ या आर्थिक वर्षामध्ये ६८९ टक्के इतकी रक्कम बोनस, भत्ते व उत्तेजनार्थ पेमेंट म्हणून वाटण्यात आलेली असून ती आर्थिक वर्षाच्या

तुलनेने सर्वाधिक आहे. कामगार कल्याण प्रशिक्षण या बाबींवर कारखान्याने समाधानकारक खर्च केलेला आहे.

बदलत्या परिस्थितीनुसार कामगारांसाठी विविध विषयांचे प्रशिक्षणवर्ग चालविले आहेत. त्यांच्यासाठी जास्तीतजास्त सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

प्रशासकीय खर्चामध्ये प्रत्येकवर्षी वाढ होत गेल्याचे आढळले. तार, टपाल, टेलिफोन या नेहमीच्या खर्चाशिवाय अलिकडे संगणकखर्च वाढलेला आहे. वाढत्या महागाईनुसार स्टेशनरी व प्रिंटींग खर्चामध्येही वाढ झालेली आहे. सर्वाधिक वाढ सन १९९९-२००० मध्ये झालेली असून ती वाढ ४५४ टक्के इतकी आहे.

निव्वळ नफा हा प्रत्येक वर्षानिहाय अभ्यासला असून सन १९९६-९७, १९९८-९९ व १९९९-२००० या तीन वर्षामध्ये अनुक्रमे १०१, ११४ व २०६ टक्के इतका नफा झालेला आहे. त्यानंतरच्या सात वर्षामध्ये नफ्याचे प्रमाण कमी कमी होत गेले आहे. उत्पादक खर्च व प्रशासकीय खर्च वर्षानुवर्षे वाढत गेल्याने काही काळ कारखाना तोट्यात चालला. त्यामुळे नफ्याचे प्रमाण घटलेले आहे. याशिवाय समाजाभिमुख प्रकल्पांवर कारखान्याने अधिकाधिक खर्च केल्याने जास्तीतजास्त नफा हा सेवा देण्यासाठी वापरला आहे. सहकाराचे ''ना नफा ना तोटा'' हे तत्व या कारखान्याने अवलंबिले आहे. तसेच सहकारामध्ये आर्थिक फायद्यापेक्षा सामाजिक हित महत्वाचे आहे हे श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याने दाखवून दिलेले आहे.

## ६.४ लेखापरिक्षकाचा अहवाल :

(महाराष्ट्र सहकारी संस्थेचा कायदा कलम ८१ (५-ब) व महाराष्ट्र सहकारी संस्थांचा नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

**तक्ता क्र. ६.१६**
**लेखापरिक्षण वर्ग**

| अ.नं. | आर्थिक वर्ष | लेखापरिक्षण वर्ग |
|---|---|---|
| १. | १९९५-१९९६ | अ |
| २. | १९९६-१९९७ | अ |
| ३. | १९९७-१९९८ | अ |
| ४. | १९९८-१९९९ | अ |
| ५. | १९९९-२००० | अ |
| ६. | २०००-२००१ | अ |
| ७. | २००१-२००२ | अ |
| ८. | २००२-२००३ | अ |
| ९. | २००३-२००४ | ब |
| १०. | २००४-२००५ | ब |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

सन १९९५-९६ ते सन २००४-०५ या दहा वर्षातील ताळेबंद व नफा-तोटा पत्रकांचा अभ्यास संशोधकाने केल्यानंतर त्याला तृतीय विशेष लेखापरिक्षक वर्ग १, सहकारी संस्था (साखर), कोल्हापूर यांचेकडून सन २००२-०३ पर्यंत ''अ'' वर्ग दिल्याचे आढळले आणि सन २००३-०४ ते २००४-०५ या दोन वर्षांत कारखाना आर्थिकदृष्ट्या तोट्यात चालल्याने ''ब'' वर्ग दिला आहे. यावरून हे स्पष्ट होते की, संस्थेचे आर्थिक व्यवहार पारदर्शक आहेत.

**६.५ परिसर विकासातील विविध उपक्रमांचे मूल्यमापन :**

कारखान्याच्या अर्थक्षमतेच्या मूल्यमापनाबरोबरच संशोधकाने भोगावती सहकारी साखर कारखान्याने राबविलेल्या परिसर विकासातील विविध उपक्रमांचे मूल्यमापन केले आहे. हे उपक्रम सामाजिक दृष्टीकोनातून कसे उपयुक्त ठरले आहेत व त्यामधून परिसरामध्ये कोणकोणत्या बाबतीत परिवर्तन घडून आलेले आहे. करण्यात आलेला आहे.

परिसर विकासातील विविध उपक्रमांच्या मूल्यमापनाच्या संदर्भात संशोधकाने सन १९९५-९६ ते सन २००४-०५ या कालावधीत प्रत्येक उपक्रमावर किती खर्च झाला आहे याची तुलनात्मक सारणी मांडलेली आहे. या सारणीला त्याने समाजाभिमुख प्रकल्पांचे स्थूल आर्थिक मूल्यमापन असे शीर्षक दिलेले आहे.

श्री भोगावती सहकारी साखर कारखाना, परिते कारखान्यामार्फत राबविले जाणारे महत्वाचे उपक्रम खालीलप्रमाणे :

१. सामुदायिक विवाह समारंभ
२. वृक्ष व फळझाडे लागवड.
३. शेती उपयुक्त अवजारे व साधने अनुदान वाटप.
४. प्राथमिक शाळांन अर्थसहाय्य.
५. उपसा जलसिंचन योजनांचा अभ्यास.
६. गोबरगॅस सयंत्र योजना.
७. ऊस संवर्धन / ऊस बियाणे मळा.
८. ऊस वाहतूक रस्ते दुरूस्ती.
९. ऊस वाहतूक साधनांची उपलब्धता.
१०. औद्योगिक प्रशिक्षण संस्था.
११. भोगावती कुस्ती स्पर्धांचे आयोजन.

## तक्ता क्र. ६.१७

## श्री भोगावती सहकारी साखर कारखाना, परिते
## या कारखान्याच्या समाजाभिमुख प्रकल्पांचे स्थूल आर्थिक मूल्यमापन

| अ. क्र. | तपशील | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | ९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शेती उपयुक्त अवजारे, खते, किटकनाशके अनुदान वाटप रू. | ७९७९४६ | १४१४४२४ | १३६२१५२ | १३६१८९७ | २४२८८६६ | ८९९५४७ | १२८००० | १०६११४ | ४७६३८७ | ५१५३७८ |
| २. | शैक्षणिक संस्था अर्थसहाय्य रू. | ५०००० | १००००० | ५०००० | -- | १६८५३० | १२९८२६ | ८९०४३ | ४९३१३ | ११६०९ | ४९३१४ |
| ३. | गोबरगॅस सयंत्र योजना अनुदान वाटप रू. | ७००८० | १७६७०० | १५७७०० | ४१८२४० | २९८३०० | ७४४८०० | -- | -- | -- | -- |
| ४. | ऊस बियाणे प्लॉट सबसिडी रू. | ६८७५० | ५६४५० | ५१०५० | ४७१२५ | ११९७१० | १७५६६५ | १४५००० | २६२७८३ | १२२३२० | १३३९२० |
| ५. | रस्ते दुरूस्ती व नवीन रस्ते यासाठी अर्थसहाय्य रू. | १२६९३२० | १९३५९१५ | ४७९५६३१ | ११९४१५७ | २५१९३८७ | २६६८२८२ | १५५६०१९ | २७८५३१८ | १५५४०१९ | ११८५०३७ |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

## तक्ता क्र. ६.१८

## श्री भोगावती सहकारी साखर कारखाना, परिते
## या कारखान्याच्या समाजाभिमुख प्रकल्पांचे स्थूल आर्थिक मूल्यमापन

(आर्थिक वर्ष १९९५-९६)

| अ. क्र. | तपशील | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | ९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शेती उपयुक्त अवजारे, खते, किटकनाशके अनुदान वाटप रू. | १०० | १७७ | १७० | १७१ | ३०४ | १०१ | १६ | १३ | ६० | ६५ |
| २. | शैक्षणिक संस्था अर्थसहाय्य रू. | १०० | २०० | १०० | -- | ३७० | २६० | १७८ | ९९ | २३ | ९९ |
| ३. | गोबरगॅस सयंत्र योजना अनुदान वाटप रू. | १०० | २५२ | २२५ | ४९७ | ४२५ | १०७० | -- | -- | -- | -- |
| ४. | ऊस बियाणे प्लॉट सबसिडी रू. | १०० | ८२ | ७४ | ६९ | १७४ | २५६ | २११ | ३८२ | १७८ | १९५ |
| ५. | रस्ते दुरूस्ती व नवीन रस्ते यासाठी अर्थसहाय्य रू. | १०० | १५३ | ३७८ | ९४ | १९८ | २१० | १२३ | २१९ | १२२ | ९३ |

संदर्भ : कारखाना वार्षिक अहवाल.

समाजाभिमुख प्रकल्पांचे आर्थिक मूल्यमापन ही सारणी विविध विकास प्रकल्प, त्यांची नांवे व या प्रकल्पांवर सन १९९५-९६ ते सन २००४-०५ या दशकामध्ये झालेला खर्च दर्शविते. या सारणीला संलग्न दुसरी सारणी मांडली असून तिच्यामध्ये सन १९९५-९६ हे आधारभूत वर्ष मानून या वर्षातील खर्च १०० टक्के गृहित धरून खर्चाची व काही प्रकल्पांवरील उत्पन्नाची टक्केवारी प्रत्येक वर्षनिहाय तिच्यामध्ये नोंद करण्यात आलेली आहे.

सन १९९५-९६ मध्ये कारखाना कार्यस्थळावर ४२ सामुदायिक विवाह संपन्न झालेले आहेत. सन १९९६-९७ या वर्षामध्ये एकूण २७ सामुदायिक विवाह व १९९८-९९ मध्ये ४४ सामुदायिक विवाह संपन्न झाले आहेत.

कारखाना आवार, सेंटर्स आणि सभासद यांना पुरविण्यात आलेल्या रोपांची संख्या आणि कारखान्याने त्यासाठी केलेल्या खर्चाचा अभ्यास केल्यानंतर हाही खर्च प्रत्येक वर्षी वाढत गेल्याचे आढळले. सन १९९५-९६ ते २००४-०५ या कालावधीमध्ये सभासदांना १,१८,०१४ रोपे पुरविल्याचे आढळले.

६.५.१ शेती उपयुक्त अवजारे व साधने वाटप योजनेतून ऊस उत्पादक सभासदांना प्रतीवर्षी दिलेल्या अनुदानाचा अभ्यास केलेला आहे. ही योजना पूर्वीपासून कारखान्याने राबविली असून आधारभूत वर्ष सन १९९५-९६ ठरविण्यात आलेले आहे. यावर्षी ७,९७,९४६ रू. सबसिडी मिळाली आहे. सन १९९६-९७ मध्ये १४,१४,४२४ रूपये इतकी सबसिडी मिळाली आहे. सन १९९९-२००० साली २४,२८,८६६ रू. इतकी सबसिडी मिळाली आहे. यावरून हे सिद्ध होते की, सुधारित अवजारांचा वापर शेतकरीवर्ग अधिकाधिक करू लागला आहे. त्यांना मशागतीचे महत्व समजू लागले आहे.

६.५.२ कारखान्यामार्फत कारखाना कार्यक्षेत्रामध्ये नव्याने सुरू होणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना ग्रामस्थांच्या व शाळासमितीच्या मागणी अर्जानुसार प्रत्येक रोख रक्कम पुरविण्यात आलेली आहे. सन १९९७-९८ पासून संस्थापक चेअरमन कै. दादासो कृष्णराव पाटील-कौलवकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ कारखाना कार्यक्षेत्रातील

राधानगरी व करवीर तालुक्यातील प्रत्येकी एका गावामध्ये दरवर्षी शाळेसाठी एक खोली भोगावती शिक्षण प्रसारक मंडळ व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस कारखान्यामार्फत प्रतीवर्षी अर्थसहाय्य केले जाते.

६.५.३ भोगावती सहकारी साखर कारखान्याच्या एकूण ११ उपसा जलसिंचन योजना असून त्या सर्वांचा अभ्यास संशोधकाने केलेला आहे. उपसा जलसिंचन योजना कारखाना कार्यक्षेत्रामध्ये राबविल्याने जास्तीतजास्त पडीक जमिनी लागवडयोग्य बनल्या आहेत. जिथे भात, नाचणीसारखी पिके नीट वाढत नव्हती, अशा जमिनीतून ऊसाचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात घेतले जाऊ लागले आहे. ऊस उत्पादक सभासदांना माफक दरामध्ये पाणी मिळू लागले आहे. भाजीपाल्याची पिके, जनावरांचा हिरवा चारा इ. चे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. सर्वच्या सर्व अकरा गावांच्या उपसा जलसिंचन संस्थांचा अभ्यास केल्यानंतर प्रत्येक गावच्या सरासरी २० विहिरींच्या पाण्याची पातळी उन्हाळ्यामध्ये वाढलेली आढळली. जमिनींचे दर देखील प्रती एकर पाचपटीने वाढल्याचे आढळले.

**६.५.४ गोबरगॅस सयंत्र योजना** :

भोगावती सहकारी साखर कारखान्याने पूर्वीपासून ही योजना राबविली आहे. सन १९९५-९६ या आर्थिक वर्षामध्ये ३६ गोबरगॅस प्लॅन्टसाठी ७०,०८० इतके अनुदान दिले आहे. तर सन १९९७-९८ मध्ये ८० गोबरगॅस प्लॅन्टसाठी १,७६,७०० रूपये अनुदान दिले आहे. ते सुमारे २५७ टक्के इतके होते. सन १९९७-९८ मध्ये ८३ प्लॅन्टसाठी रू. १५७७०० म्हणजेच २२५ टक्के इतके अनुदान दिले आहे. तर सन ११९८-९९ मध्ये २२० प्लॅन्टसाठी ४,१८,२४० रूपये म्हणजे ५९६ टक्के अनुदान दिले आहे. सन १९९९-२००० मध्ये २,९८,३०० रूपये तर २०००-२००१ मध्ये ७,४४,८०० रूपये म्हणजेच १०६३ टक्के इतके वाढीव अनुदान देण्यात आले आहे. नंतर मात्र ही योजना बंद करण्यात आली आहे.

**६.५.५सुधारित जातीच्या ऊस बेणे :**

६.५.५ सुधारित जातीच्या ऊस बेण्यामध्ये आणि बेणे प्लॉटच्या संख्येमध्ये वाढ झाल्यामुळे कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस लागवड क्षेत्रामध्ये वाढ होत गेली. सन १९९५-९६ या आर्थिक वर्षामध्ये शेतकरी सभासदांना ६८,७५० रू. इतकी सबसिडी मिळाली आहे. सन २०००-२००१ मध्ये १,७५,६६५ इतकी सबसिडी तर सन २००२-२००३ या वर्षामध्ये २,६२,७८३ इतकी सबसिडी मिळाली आहे.

६.५.६ कारखाना कार्यक्षेत्रामध्ये नवीन रस्ते तयार करण्यावर भोगावती सहकारी साखर कारखान्याने सुरूवातीपासूनच भर दिलेला आहे. सन १९९५-९६ मध्ये रू. १२,६९,३२०/- तर सन १९९९-२००० मध्ये रू. २५,१९,३८७/- आणि सन २००२-०३ मध्ये रू. २७,८५,३१८/- इतका खर्च करण्यात आलेला आहे.

**६.५.७भोगावती कुस्ती स्पर्धांचे आयोजन** :

भोगावती सहकारी साखर कारखान्यामार्फत भोगावती कुस्ती स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. सन १९९७ सालासाठी ९ पैलवानांची नऊ गटामधून मानधनासाठी निवड करण्यात आली. सन १९९७-९८ साठी १० पैलवानांची निवड करण्यात आली. त्यांना रू. ५०० ते रू. १००० पर्यंत मानधन देण्यात आले. सन १९९७-९८ मध्ये १० मल्ल मानधनासाठी पात्र ठरले. दरवर्षी भरविल्या जाणाऱ्या कुस्ती स्पर्धेचा उपक्रम सभासदांच्या मुलांच्या दृष्टीने, कुस्ती कला जिवंत ठेवण्याच्यादृष्टीने निश्चितच प्रेरणादायी ठरला आहे. या उपक्रमामुळे तरूण पिढीतील व्यसनाधिनता कमी होण्यास निश्चितच मदत झालेली आहे.

**६.६ इतर बाबींचे मूल्यमापन :**

भोगावती सहकारी साखर कारखान्याच्या स्थूल आर्थिक मूल्यमापन व समाजाभिमुख प्रकल्पांचे स्थूल आर्थिक मूल्यमापन याशिवाय इतर काही महत्वाच्या बाबींचेदेखील संशोधकाने मूल्यमापन केलेले आहे. या बाबी खालीलप्रमाणे आहेत :

संशोधकाने स्वतः सभासदांच्या घरी भेटी देऊन मुलाखतीच्या माध्यमातून त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या.

**सभासदांच्या कारखान्याविषयी प्रतिक्रिया :**

- कोल्हापूर जिल्ह्यामध्ये वारणा, बिद्री, भोगावती सहकारी साखर कारखाने उत्तमप्रकारे चालले आहेत असे त्यांनी सांगितले.
- भोगावती सहकारी साखर कारखान्याकडून आम्हाला प्रती ऊस टनामागे आकर्षक दर वेळच्यावेळी मिळाल्याचे सांगितले.
- भोगावती सहकारी साखर कारखान्याचा वजनकाटा अचूक असल्याने ऊस वजनाच्या बाबतीत पारदर्शकता आढळते व योग्य तो न्याय मिळतो.
- भोगावती सहकारी साखर कारखान्याचे जास्तीतजास्त सेवक हे कारखान्याचे सभासद असल्यामुळे त्यांच्यामध्ये कारखान्याविषयी आपलेपणाची भावना आढळते. इतर सभासदांना या गोष्टीचा फायदा उठविता येतो.
- नैसर्गिक आपत्तीच्या वेळेला कारखान्याकडून सभासदांना वेळेत मदत होते. अलिकडे ऊस पिकावर पडणारा लोकरी मावा त्याच्या नियंत्रणासाठी २० टक्के सबसिडी दरामध्ये सभासदांना तात्काळ औषधे पुरविली जातात.
- भोगावती सहकारी साखर कारखान्याने सुरूवातीपासूनच समाजाभिमुख विकास कार्यक्रमावर भर दिल्याने उदा. रस्तेविकास, सामुदायिक विवाह समारंभ, वृक्ष व फळझाडे लागवड, माध्यमिक शाळांना अर्थसहाय्य, शेती उपयुक्त अवजारे व साधने अनुदान वाटप इत्यादी कारखाना कार्यक्षेत्राचा सामाजिक, आर्थिकदृष्ट्या विकास होण्यास मदत झालेली आहे.
- कारखान्यामार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळा, महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, इंग्रजी माध्यमाच्या शाळा, यामुळे परिसरातील मुलांना लाभ झाला आहे.

## ६.७ कामगार निवड :

कामगार निवडीच्या बाबतीत जी पदे तांत्रिक स्वरूपाची आहेत. त्यांच्या व अधिकारीपदांच्या जाहिराती स्थानिक वर्तमानपत्रातून दिल्या जातात. पर्यवेक्षक, फिटर, बॉयलर अटेंडंट ही पदे एकाचवेळी विशिष्ट प्रमाणात भरली जातात. हंगामी व रोजंदारीवरील पदे देखील स्थानिक पातळीवर भरली जातात. कामगारांची पदे भरतांना सभासदांच्या मुलांना प्राधान्य दिले जाते.

## ६.८ कारखान्याविषयी तक्रारी :

संशोधकाने ऊस उत्पादक सभासदांच्या मुलाखती घेऊन कारखान्याविषयी काही तक्रारी आहेत का ते जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

- ऊसाचे पहिले बिल ताबडतोब मिळते. मात्र नंतरच्या बिलांना थोडा विलंब होतो.
- साखर विक्री शासनाच्या नियमानुसार होत असल्याने साखर दिर्घकाळ गोडाऊनला पडून राहते. सभासदांना त्यामुळे काही बिलांना विलंब होतो.

## ६.९ कर्मचाऱ्यांचे समाधान :

कारखान्याच्या विविध विभागाच्या कामगारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी जाऊन त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. विशेषकरून आपण कारखान्याच्या कार्यपद्धतीवर व व्यवस्थापनावर समाधानी आहाता का? या सदंर्भात काही प्रश्न विचारले त्यांची उत्तरे खालीलप्रमाणे मिळाली.

- कर्मचारी कारखान्याकडून मिळणाऱ्या वेतन व बोनसच्या बाबतीत समाधानी आहेत. साखर कारखान्यांचे स्वतंत्र वेजबोर्ड असल्याने वेतन आयोगाने दिलेल्या पगारवाढी आम्हाला ताबडतोब मिळतात असे त्यांनी सांगितले.
- प्रत्येक महिन्याचा पगार ज्या त्या महिन्याला मिळतो असेही सांगितले.

- ❖ दिवाळीसाठी बोनस स्वरूपात दिली जाणारी माफक दरातील साखर व प्रत्येकी पाच किलो दिली जाणारी मोफत साखर आम्हाला वेळच्यावेळी मिळते असेही सांगितले.
- ❖ विशिष्ट सेवेनंतर दिली जाणारी बढती ताबडतोब दिली जाते. त्या-त्या पदानुसार वेतनदेखील विनाविलंब दिले जाते.
- ❖ दिपावलीच्या सणासाठी बोनसची रक्कम दिली जाते.
- ❖ कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर रिक्त पदे तातडीने भरली जातात. वरिष्ठ पदांसाठी बाहेरून अर्ज मागविले जातात. इतर पदे भरतांना सभासदांच्या मुलांचा, कारखाना कार्यक्षेत्रातील उमेदवारांचा विचार प्राधान्याने केला जातो.

## ६.१० सन १९९५-९६ ते सन २००४-०५ मधील संप :

संपाच्या बाबतीत कामगारांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. सन १९९५-९६ ते सन २००४-०५ एवढेच काय तर त्यापूर्वीदेखील कोणत्याही प्रकारचे संप झालेले नाहीत. कोणतेही निर्णय सामोपचाराने घेतले जात असल्याने कामगार आणि व्यवस्थापन यांच्यामध्ये कोणताही पेचप्रसंग निर्माण झालेला दिसत नाही.

## ६.११ ऊसाची तोड :

अलिकडे ऊस लागणीचे जणू कही वेळापत्रकच ठरलेले आहे. नोव्हेंबरमध्ये ७० टक्के ऊसाची लागण केली जाते. तर डिसेंबरमध्ये ३० टक्के ऊसाची लागण केली जाते. त्यामुळे नोव्हेंबरपासून गळीत हंगाम सुरू झाल्याने ऊसाची तोड वेळेत होते. काही वेळेला या दोन महिन्यांतील जास्तीतजास्त लागणी असल्याने ऊसाची तोड थोड्या वेळाने देखील होते.

### ऊस वाहतूकदारांच्या व तोडणी कामगारांच्या प्रतिक्रिया :

ऊस वाहतूकीसाठी ट्रक, ट्रॅक्टर, बैलगाड्या या साधनांचा वापर केला जातो. पावसाळ्यामध्ये या मंडळींना ॲडव्हान्स म्हणून काही रक्कम दिली जाते. ट्रक, ट्रॅक्टर मालकांना टोळ्या ठरविण्यासाठी ॲडव्हान्स रक्कम दिली जाते. त्यामुळे त्यांचे कोणतेही प्रश्न नाहीत. बाहेरच्या ठिकाणाहून आणल्या जाणाऱ्या कामगारांची मोफत आरोग्य तपासणी

केली जाते. त्यांना तंबू उभारण्यासाठी साहित्य पुरविले जाते. लहान मोठे अपघात घडले, तर आर्थिक मदत पुरविली जाते. त्यामुळे त्यांच्याही समस्या नाहीत.

### ६.१२ कारखाना कार्यक्षेत्रामध्ये घडून आलेले परिवर्तन :

श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते या कारखान्याच्या निर्मितीमुळे कारखाना कार्यक्षेत्रामध्ये खालीलप्रमाणे परिवर्तन घडून आलेले आहे.

- कारखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये ११ उपसा जलसिंचन योजना व १०५ पाणीपुरवठा योजना यांची निर्मिती करण्यात आलेली आहे.
- पाटगांव व राधानगरी या प्रकल्पांमुळे कार्यक्षेत्रातील नद्यांना बारमाही पाणी उपलब्ध झालेले आहे. कालव्यांचे जाळे सर्वत्र पसरल्यामुळे उन्हाळ्यातील पाण्याचे दुर्भिक्ष कमी झालेले आहे.
- कारखान्यामार्फत एकूण ११ उपसा जलसिंचन योजनांची निर्मिती करण्यात आलेली असल्याने लिफ्ट इरिगेशनने पाणी दूर अंतरापर्यंत नेण्यात आलेले आहे. डोंगर उताराच्या व खडकाळ जमिनीदेखील लागवडयोग्य बनविण्यात आलेल्या आहेत.
- उन्हाळ्यामध्ये भात, भाजीपाला, सूर्यफूल, भुईमूग, सोयाबीन, फुलशेती इ. पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जाऊ लागली आहेत.
- जनावरांना हिरवा चारा मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्याने दुधाचे उत्पादन वाढले आहे. गावागावातून दूध डेअरींची संख्या वाढली असून दुधावर प्रक्रिया घडविणारी चिलींग सेंटर्स कारखान्याच्या परिसरामध्ये कार्यरत आहेत.
- सामुदायिक विवाह सोहळ्यामुळे लोकांची आर्थिक बचत मोठ्या प्रमाणावर झालेली आहे.
- आर्थिकदृष्ट्या कमकुवत तसेच मागासवर्गीय मंडळींना कर्जाविना विवाह सोहळ्याचा आनंद लुटणे शक्य झाले आहे.
- वृक्ष व फळझाडे लागवड योजनेमुळे अन्नधान्य उत्पादनापेक्षा फलोद्यानावर भर दिला जाऊ लागला आहे.

- ❖ कित्येक सभासदांनी आपल्या स्वतंत्र फळबागा तयार केल्या आहेत.
- ❖ फळबागांच्या अंतर्गत अन्नधान्याची पिके घेतली जात आहेत.
- ❖ माळरानाच्या जमिनीवर फळबागायतीची मोठ्या प्रमाणात लागवड केल्याने सभासदांना आर्थिक हातभार लागला आहे.
- ❖ साग, बांबू यासारख्या वनश्रींची स्वतंत्ररित्या लागवड करून परिसर सुशोभित बनविला जाऊ लागला आहे.
- ❖ साग, बांबू यासारख्या वनश्रींची स्वतंत्ररित्या लागवड करून परिसर सुशोभित बनविला जाऊ लागला आहे.
- ❖ शेती उपयुक्त अवजारांचे आणि साधनांचे वाटप केल्याने सभासद अशा साधनांचा अधिकाधिक वापर शेतीच्या मशागतीसाठी करत आहेत. मशागत व्यवस्थित केली जात असल्याने शेती उत्पादनामध्ये वाढ झालेली आहे.
- ❖ गोबरगॅस सयंत्र योजनेला अनुदान दिल्याने ज्वलनाचा प्रश्न काही अंशी का असेना सुटला आहे. हागंदारीमुक्त गांव या शासनाच्या योजनेला प्रतिसाद देण्यात आलेला आहे.
- ❖ कंपोस्ट खताची निर्मिती कारखानास्थळावर मोठ्या प्रमाणात केली गेल्याने सभासद त्याचा वापर शेतीसाठी करू लागले आहेत. शेतीमध्ये रासायनिक खतांचा वापर कमी प्रमाणात केला जाऊ लागला आहे.
- ❖ पायवाटांचे रूंदीकरण करण्यात येऊन हे रस्ते वाहतुकीसाठी खुले झाले आहेत. अडचणींच्या ठिकाणी रस्त्यांची सोय उपलब्ध झाल्याने ऊसाचे उत्पन्न अशा ठिकाणीदेखील घेण्यात येऊ लागले आहे.
- ❖ रस्त्यांच्या बाजूला संरक्षक भिंती बांधल्यने सर्व हंगामासाठी रस्ते वाहतुकीस खुले झाले आहेत.
- ❖ केवळ ऊसाचीच वाहतूक नव्हे, तर इतर सर्व प्रकारची वाहतूक करण्यात येऊ लागली आहे. शाळा, कॉलेजमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीसुद्धा हे रस्ते उपयुक्त ठरले आहेत.

- ऊस बेणेमळ्यांच्या प्रसारामध्ये सुधारित जातीच्या ऊसांची लागण मोठ्या प्रमाणात करण्यात येऊ लागली आहे. परिणामी उसाचे उत्पन्न वाढले आहे.
- पारंपारिक ऊसाच्या जाती कालबाह्य ठरल्या आहेत. त्यामुळे साखरेचा उतारा वाढला आहे.
- अनुषंगिक सेवा आणि सुविधांमध्ये वाढ झालेली आहे.
- कारखान्याच्या आसपासच्या भागातील जमिनींचे दर वाढले आहेत. वेगवेगळ्या प्रकारचे उद्योग व अन्य पूरक व्यवसाय मोठ्या प्रमाणात आढळून येऊ लागले आहेत.
- कारखाना कार्यक्षेत्रामध्ये अर्थ पुरवठा करणाऱ्या संस्थांची निर्मिती मोठ्या प्रमाणात झालेली आहे.
- संकरित जनावरांच्या जोपासणेवर भर देण्यात येऊ लागल्याने दुधाचे उत्पादन वाढले आहे.
- विविध शैक्षणिक संस्था निर्माण केल्याने व शैक्षणिक संस्थांना अर्थसहाय्य केल्यामुळे कारखाना कार्यक्षेत्रातील खेड्यांचा शैक्षणिक विकास होण्यास मदत झालेली आहे.
- परदेश दौऱ्यासाठी अर्थसहाय्य पुरविले जात असल्याने हुशार व होतकरू मंडळींना आपल्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करता येणे शक्य झाले आहे.
- खेळाडूंना अर्थसहाय्य पुरविल्याने त्यांची उन्नती झाली आहे.
- पिकांवर पडणाऱ्या किडींचा नाश करण्यासाठी कारखान्याकडून औषधे, किटकनाशके, पंप उपलब्ध करून दिली जात असल्याने रोगांना पायबंद बसला आहे.
- शेतकरीवर्ग आपापल्या शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करू लागले आहेत.
- वाहनांच्या संख्येमध्ये भर पडली आहे.
- यांत्रिक शेतीवर भर दिला जाऊ लागला आहे.
- ऊस उत्पादक सभासदांची मुले उच्च शिक्षण घेऊ लागली आहेत.
- सभासदांमध्ये राजकीय जागृती निर्माण झालेली आहे.

- घरगुती उद्योगांना चालना दिली जाऊ लागली आहे.
- व्यावसायिक शिक्षणाचे वर्ग सुरू केल्याने कुशल कारागिरांचे प्रमाण वाढले आहे.
- कारखाना कार्यक्षेत्रातील बाजारपेठांचा विकास झाला आहे.
- कारखाना कार्यक्षेत्रामध्ये आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

☆☆☆

## प्रकरण - ६
## संदर्भ सूची

### श्री भोगावती सहकारी साखर कारखाना (शाहूनगर) परिते, जि. कोल्हापूर

### वार्षिक अहवाल सन १९९५-९५ ते २००४-०५

| अ. क्र. | वार्षिक अहवाल | वर्ष | प्रकाशक |
|---|---|---|---|
| १. | ४० वा | १९९५-९६ | **पी. जी. मेढे** कार्यकारी संचालक |
| २. | ४१ वा | १९९६-९७ | **एस्. एस्. पाटील** प्र. कार्यकारी संचालक |
| ३. | ४२ वा | १९९७-९८ | **एस्. एस्. पाटील** कार्यकारी संचालक |
| ४. | ४३ वा | १९९८-९९ | **व्ही. डी. शिंदे** कार्यकारी संचालक |
| ५. | ४४ वा | १९९९-२००० | **व्ही. एम्. माने** कार्यकारी संचालक |
| ६. | ४५ वा | २०००-२००१ | **व्ही. एम्. माने** कार्यकारी संचालक |
| ७. | ४६ वा | २००१-२००२ | **व्ही. एम्. माने** कार्यकारी संचालक |
| ८. | ४७ वा | २००२-२००३ | **व्ही. एम्. माने** कार्यकारी संचालक |
| ९. | ४८ वा | २००३-२००४ | **व्ही. एम्. माने** कार्यकारी संचालक |
| १०. | ४९ वा | २००४-२००५ | **व्ही. एम्. माने** कार्यकारी संचालक |

# प्रकरण ७ : महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाचे मूल्यमापन, निष्कर्ष आणि शिफारशी

## ७.१ प्रस्तावना :

१९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी महराष्ट्राच्या कृषि औद्योगिक विकासाचा कार्यक्रम राबवायला सुरुवात केली. शेती, सहकार, वीज,पाटबांधारे यांचा विकास करून ग्रामीण भागात शेतमालावर प्रक्रिया करणारे कारखाने उभे करावेत असे त्यांचे मत होते. राज्य व केंद्र सरकारना ग्रामीण भागामध्ये विकास सस्थांचे जाळे निर्माण करायचे होते. त्यासाठी त्यांना लोकांचा पाठिंबा हवा होता. ग्रामीण भागातील लोकांची व कार्यकर्त्यांची कर्तृत्वशक्ती जागृत करून विकास प्रक्रिया त्यांना गतिमान करावयाच्या होत्या.

सहकारी चळवळीला यशवंतराव चव्हाणांनी महत्त्वाचे स्थान दिलेले होते. शेती क्षेत्रासाठी उपयुक्त अशा सहकारी पतसंस्था व सेवा सहकारी संस्था स्थापन करून ग्रामीण भागात प्रवेश करण्याचाही त्यांचा प्रयत्न होता. त्यातून ग्रामीण भागात आपले प्रभाव क्षेत्र निर्माण होतील, कर्तृत्ववान कार्यकर्ते निर्माण होतील आणि ग्रामीण भागाचा कायापालट होईल, असे त्यांचे मत होते. या सहकारी चळवळीचा पायभूत घटक म्हणून गावागावातील सेवा सहकारी सोसायट्या काम करतील असे त्यांचे मत होते. महाराष्ट्र सरकारने राज्यात सहकारी चळवळीच्या विकासाला मोठा हातभार लावला. कारण विकासाच्या प्रेरणा राज्यस्तरावरून व केंद्रस्तरावरून प्रवत्ता कराव्या लागणार होत्या. यशवंतरावांना असे वाटले की, सहकारी संस्थांच्या साहाय्याने लोकांच्या मनात विकास पक्रियेबाबत जागृती निर्माण करता येईल आणि विकास कार्यासाठी ग्रामीण भागातील लोकांचा पाठिंबाही मिळविता येईल. त्याचप्रमाणे या संस्थांना लोकशाही स्वरून देऊन ग्रामीण भागात मजबूत राजकीय पाया तयार करणेही शक्य होईल. त्यामुळे त्यांनी अनेक काँग्रेस पुढाऱ्यांना सहकारी क्षेत्रात सामील व्हावयास प्रवृत्त केले. सहकारी क्षेत्रातील लोकांना त्यांनी काँग्रेस पक्षात सामावून घेतले. विरोधी पक्षातून काँग्रेसमध्ये आलेल्या अनेक पुढाऱ्यांना त्यांनी

सहकारी संस्थांत अधिकारपदे दिली. अनेकांना त्यांनी सहकारी साखर कारखाने काढावयास प्रवृत्त केले. थोडक्यात १९६० नंतर यशवंतरावांनी ग्रामीण विकासाचे उद्‌दिष्ट साध्य करत असतानाच राजकीय सत्ता आणि प्रभाव संपादन करण्याचा एक नवा मार्ग या पुढाऱ्यांच्या पुढे खुला केला.

**७.२ महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीचे समग्र स्तरीय मूल्यमापन :**

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली तेव्हा महाराष्ट्र राज्यात सहकारी क्षेत्रात १३ आणि खाजगी क्षेत्रात १३ असे एकूण २६ कारखाने कार्यरत होते. विसाव्या शतकाच्या अखेर म्हणजेच १९९९-२००० साली राज्यात १२३ सहकारी आणि १० खाजगी असे एकूण १३३ साखर कारखाने कार्यरत होते. याचाच अर्थ १९६० ते २००० या चार दशकात राज्यात ११० सहकारी साखर कारखान्यांची भर पडली. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात, म्हणजेच २००९-'१० अखेर राज्यात १६६ सहकारी आणि ३२ खाजगी साखर कारखान्यांची उभारणी पूर्ण झाली. म्हणजेच या कालखंडात ५५ साखर कारखान्यांची भर पडली. ही संख्यात्मक प्रगती कौतुकास्पद असली, तरी त्याच बरोबर राज्यात जवळजवळ ५६ कारखाने आजारी, १४ कारखाने आर्थिक अडचणींत आहेत, तर १० कारखाने अवसायनात आहेत. राज्य शासनाने २२ कारखान्यांची नोंदणी रद्‌द केलेली आहे. उभारणीतील नव्या कारखान्यांना आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. या चिंताजनक बाबी आहेत.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील लोकांचे जीवन शेती व्यवसायावर अवलंबून आहे. शेती व्यवसायासाठी महाराष्ट्रातील एकूण लागवडीखाली असणारे क्षेत्र २०२.५२ लाख हेक्टर्स आहे. त्यापैकी सिंचनाखाली येणारे क्षेत्र फक्त ८१ लाख हेक्टर्स आहे. याशिवाय महाराष्ट्रातील शेतकऱ्यांजवळ असणारे जमिनीचे क्षेत्रफळ अत्यंत अल्प आहे. म्हणजेच एकूण लागवडीच्या क्षेत्रापैकी ४५ लाख ९१ हजार हेक्टर क्षेत्र अल्पभूधारकांचे म्हणजे दोन हेक्टरपेक्षा कमी क्षेत्र असणाऱ्यांचे आहे. दोन ते दहा हेक्टर धारण करणाऱ्या शेतकयांचे एकूण क्षेत्र ३२ लाख ७४ हजार हेक्टर आहे, तर दहा हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र धारण

करणाऱ्या शेतकऱ्यांचे एकूण क्षेत्र २ लाख ३६ हजार हेक्टर आहे. ग्रामीण भागातील लोकसंख्या प्रामुख्याने शेती व्यवसायावर अवलंबून आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील सहकारी कारखानदारी महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेला आर्थिकदृष्ट्या सबल करणारी ठरली आहे.

महाराष्ट्रातील उसाच्या लागवडीखालील क्षेत्रात सातत्याने वृद्धी होत गेली. सन १९९९-२००० मध्ये सर्वाधिक ९.९८ लक्ष हेक्टर क्षेत्रात उसाची लागवड झाली. प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळे २००२-'०३, २००३-'०४ आणि २००४-'०५ साली ऊस लागवडीखालील क्षेत्रात घट झाली. सन २००५-'०६ मध्ये त्यात उल्लेखनीय सुधारणा झाली.

सामूहिक विकास या अमेरिकेतील फोर्ड फांउडेशनद्वारा पुरस्कृत दृष्टिकोनात शासनाने ग्रामीण विकासात पुढाकार घेणे अपेक्षित होते. कै. धनंजयराव गाडगीळ व अन्य भारतीय अर्थशास्त्रज्ञांनी कृषी मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची सहकारी क्षेत्रात स्थापना करणे आणि त्याद्वारे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना संघटित करून ग्रामीण विकास साद्य करणे हा दृष्टिकोन मांडला होता. कै. गाडगीळांच्या मार्गदर्शनाखाली भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना महाराष्ट्र (तत्कालीन मुंबई) राज्यात स्थापन करण्यात आला. प्रवरा सहकारी साखर कारखान्याने महाराष्ट्रातील एक दुष्काळी म्हणून प्रसिद्ध असलेल्या भागातील लहानात लहान ऊस उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यास साखर कारखानदार बनविले. सहकारी साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या ऊसाचा मोबदला जास्तीत जास्त मिळवून देण्यासाठी तर प्रयत्न केलेच, त्याचबरोबर या कारखान्याच्या परिसरातील शेती विकासास व ग्रामीण विकासास अनेक प्रकारे हातभार लावला आहे.

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने हा ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक, धार्मिक इ. क्षेत्रामध्ये शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावणारा विकासाचा केंद्रबिंदू आहे. इतकेच नव्हे तर सहकारी साखर कारखाने हा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा, कष्टकऱ्यांचा, मोलमजुरी करणाऱ्या गरीब जनतेचा एकमेव आशाकिरण आहे.

सहकारी साखर कारखान्यांच्या परिसरातील सिंचन क्षेत्र वाढविण्याच्या कामी अनेक कारखान्यांनी कार्यक्रम हाती घेतलेले आहेत. काही सहकारी साखर कारखान्यांनी तर त्यांच्या स्वतःच्या पैशातून लाखो रुपये सिंचनक्षमता वाढविण्यासाठी पाझर तलाव बांधण्यासाठी, उपसा जलसिंचन योजना पूर्ण करण्यासाठी वा बंधारे बांधण्यासाठी खर्च केलेले आहेत. या योजनेद्वारे हजारो एकर शेतीस पाण्याचा पुरवठा होऊ शकल्यामुळे उत्पादन वाढण्यास चांगलीच मदत झाली आहे.

शेती विकासाबरोबरच सहकारी साखर कारखान्यांनी औद्योगिक विकास साधण्यासाठी पुष्कळ प्रमाणात यशस्वी प्रयत्न केलेले आहेत आणि अनेक ठिकाणी त्या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत. साखर कारखान्यांच्या सौजन्याने इतर उद्योग, तसेच मद्यार्क उद्योग सुरू केलेले आहेत. काही ठिकाणी कागद कारखाने निर्माण करण्याचे प्रयत्न चालू आहेत. ऊसाच्या प्रेसमडपासून वॅक्स तसेच मद्यार्काच्या कारखान्यातून निघालेल्या स्प्रेंटवॉशपासून पोटॅश बनविण्याबाबत तज्ज्ञ आणि सहकारी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याच्या नेतृत्वाखाली आपल्या देशातील सहकारी साखर कारखान्यांनी नॅशनल हेवी इंजिनिअरींग को-ऑप. लि. या नावाची सहकारी संस्था स्थापन करून पुण्याजवळ सहकारी साखर कारखान्याची एक मोठी संस्था निर्माण केलेली आहे. या संस्थेमार्फत साखर कारखाने आणि इतर काही उद्योगांसाठी लागणारी यंत्रसामुग्री बनविण्याचा प्रकल्प पुण्याजवळील तळेगाव या ठिकाणी स्थापन करण्यात आलेला आहे. सहकारी साखर कारखान्यांनी त्यांच्या उत्पादनावर आधारित बायप्रॉडक्ट निर्माण करण्याचे कारखाने काढण्याकडे लक्ष दिलेले आहे. महाराष्ट्रातील साखर उद्योगाने कार्यक्षेत्रातील रस्ते तयार करणे, कार्यक्षेत्रातील शाळा हायस्कूलना इमारत व शैक्षणिक कार्यासाठी मदत देणे, वाचनालयांना मदत करणे, हरिजन समाजमंदिरांचा जिर्णोद्धार करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सामुदायिक विवाह आयोजित करणे, मोफत आरोग्य शिबिर आयोजित करणे इ. सार्वजनिक कामेही मोठ्या प्रमाणावर हाती घेतली आहेत. शिवाय युद्धप्रसंगी तसेच दुष्काळ व नैसर्गिक आपत्तींच्या प्रसंगी राष्ट्रीय कर्तव्य म्हणून निधी गोळा करून आपला वाटा उचललेला आहे.

साखर उद्योगाशी संलग्न असलेल्या इतर संस्थांतून हजारो लोकांना काम मिळाले आहे. अशा प्रकारे महाराष्ट्रातील साखर उद्योगामुळे ग्रामीण महाराष्ट्रात फार मोठी क्रांती घडून आली आहे.सहकारी साखर कारखान्यांनी त्यांच्या परिसरात शाळा, महाविद्यालये इ. काढून शिक्षणाचा प्रसार केलेला आहे. तसेच अनेक ठिकाणी रुग्णालये काढून कर्मचाऱ्यांच्या, कामगारांच्या, शेतकऱ्यांच्या व त्या परिसरातील इतर लोकांच्या आरोग्याची काळजी हे कारखाने घेत आहेत. सहकारी साखर कारखानदारीने ग्रामीण विकासात क्रांती घडविली आहे. गरीब शेतकरी मजुरांचे ते एक आशास्थान ठरले आहे. ऊसाच्या रानांनी कार्बनडाय ऑक्साईड वायू शुद्ध करण्यास मदत झालेली आहे. ऊसाच्या मुळामुळे पाणी मातीत मुरविले जाते. मेलेल्या मुळांमुळे जमिनीत जैविक खतांच्या जंतुंची निर्मिती केली जाते. सहकारी साखर कारखाना उद्योगात ६ लाख शेतकरी आहेत. एकूण २३०० ते २४०० सोसायट्या आहेत. ७ लाख जनावरे आहेत.

साखर कारखाना उत्पादनात शेतकऱ्याने स्वतःच्या पैशातून स्वतःच्या विहिरी काढल्या आहेत. ही त्या शेतकऱ्यांची शेती विकासातील स्वतःची गुंतवणूक आहे. यामध्ये सरकारची कोणतीही गुंतवणूक नाही. हे चित्र इतर कोणत्याही उद्योगात पहायला मिळत नाही. इतर उद्योगसमूहांमध्ये उद्योग बंद केला म्हणून ५० टक्के लोकांना कामावरून काढून टाकले आहे. परंतु ऊस उत्पादक शेतकऱ्याने घरचा गडी कामावरून काढून टाकलेला नाही. ऊस उत्पादन शेतीतून जास्तीत जास्त भांडवल निर्मिती होते. हा व्यवसाय प्रदूषणविरहित आहे. आज भारतामध्ये जवळजवळ १२ कोटी शेतकरी कुटुंबे आहेत. त्यातील महाराष्ट्रातीलच एक कोटी कुटुंबे आहेत. या १२ कोटी लोकांची मालकी होऊ शकेल असा कोणताही उद्योग ऊस उद्योगाशिवाय भारतात नाही. याचाच अर्थ सहकाराशिवाय पर्याय नाही.

राज्यातील रोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांनी मोठा हातभार लावला असून मध्यम आकाराचा एक सहकारी साखर कारखाना सुमारे पाच-सहा हजार व्यक्तींना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रोजगार मिळून देतो. शासनाच्या वीस कलमी

कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतील व पर्यायाने राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासातील सहकारी साखर कारखान्यांचा सहभाग उल्लेखनीय आहे.

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांमार्फत विविध पाटबंधारे योजना, लिफ्ट इरिगेशनसारख्या विकासाच्या योजना राबविल्या जात असून शाळा. महाविद्यालये, दवाखाने, इस्पितळे यासारख्या कल्याणकारी व विकासाभिमुख संस्थाही स्थापन केल्या जात आहेत. इतकेच नव्हे तर काही साखर कारखान्यांनी वैद्यकिय व आभियांत्रिकी महाविद्यालये सुरू केली आहेत. राज्यातील सहकारी साखर कारखान्यांनी साखर उत्पादनाबरोबरच मद्यार्क, रसायने, कागद यासारख्या उत्पादनावरही लक्ष केंद्रित केले आहे. राज्यातील सहा साखर कारखान्यांनी ऊसाच्या चिपाडापासून, तर दोन कारखान्यांनी जैविक वायूवर आधारित विजेची सहनिर्मिती सुरू केली आहे. बायोगॅस सयंत्रे बांधणे, विहिरी खोदणे, सुलभ शौचालये बांधणे, पशुखाद्य तयार करणे, वराह व कुक्कुटपालन, फळझाडांची लागवड, सामुदायिक विविह सोहळे, मूल दत्तक योजना इत्यादींना उत्तेजन देऊन ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासास हातभार लावला आहे. राज्यातील सहकारी साखर चळवळीने खरेदी-विक्री संस्था, सहकारी शेती, सहकारी दूध योजना, सहकारी पतसंस्था, सहकारी पशुपालन संस्था इत्यादींच्या वाढीला चालना दिली आहे.

**७.२ ग्रामीण विकासातील सहकारी साखर कारखान्यांचे योगदान :**

सामाजिक बांधिलकी आणि सहकार क्षेत्र यामधील परस्पर संबंधाविषयी नेहमीच चर्चा होत असते. सहकारी साखर कारखान्यांनी नेहमीच केवळ नफा हे उद्‌दिष्ट न ठेवता ग्रामीण महाराष्ट्राचा विकास आणि दुर्बल घटकांना विशेष मदत हे ध्येय बाळगले पाहिजे. साखर कारखान्यामुळे कोट्यावधी रुपयांची उलाढाल होते. त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतो. साखर कारखान्यावर अवलंबून असणाऱ्या इतर असंख्य व्यवसायांनी ग्रामीण महाराष्ट्राचे आर्थिक व सामाजिक चित्र बदलून टाकले आहे. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी ग्रामीण क्षेत्राच्या विकासाला एक नवी दिशा दिली आहे. साखर कारखाने विकासाची केंद्रे बनली आहेत. पुढील महत्वाच्या मुद्‌द्यांवरून ग्रामीण विकासातील सहकारी साखर कारखान्यांची भूमिका व महत्व लक्षात येईल.

**१. व्यवस्थापनातील कौशल्य :**

महाराष्ट्राच्या काही भागातील अर्थकारणात सहकारी साखर कारखानदारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. सहकारी साखर कारखाना क्षेत्रातील अनेक सुधारणा जनतेच्या प्रगतीसाठी झालेल्या आहेत. ग्रामीण भागातील माणसे मोठमोठ्या कारखान्याचे व्यवस्थापन कौशल्याने करू शकतात, हे सिद्‌ध झाले आहे. विठ्ठलराव विखे, पाटील वसंतदादा पाटील अशा व्यक्तीचे शिक्षण फारसे झालेले नसताना त्यांनी साखर कारखाने कार्यक्षमरित्या चालविले. या व्यवसायातील बारकावे उद्योग व्यवसायातील उच्च पदवी घेणाऱ्या लोकांनाही समजत नव्हते. अलीकडील ५-१० वर्षातच सहकारी साखर कारखान्यांच्या व्यवस्थापन मंडळात विविध विषयांतील पदवीधर आढळून येतात. तथापि अद्‌यापही बहुसंख्य संचालक फारसे शिक्षित नसतात. पण कारखाना चालविण्यातील त्यांची कार्यक्षमता निश्चितच उच्च असते. सारांश, ग्रामीण क्षेत्रातील लोकांच्या व्यवस्थापन कौशल्याने सह्कारी साखर कारखानदारीला वाव मिळाला आहे हे निश्चित. त्यामुळे ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक विकासास चालना मिळाली.

**२. अभूतपूर्व शैक्षणिक प्रगती :-**

महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे. अनेक कारखान्यांनी महाविद्यालये चालविली आहेत. त्यामुळे गरीब शेतकऱ्यांच्या मुलांना उच्च शिक्षण घेणे शक्य झाले आहे. त्याचप्रमाणे काही सहकारी साखर कारखान्यांनी तंत्रविद्या निकेतन, वैद्यकिय व दंत महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये चालविली आहेत. बहुसंख्य साखर कारखान्यांनी इंग्रजी माध्यमाच्या शाळा चालविल्या आहेत. लहान-मोठ्या गावांतून हायस्कूल आहेत. त्यासाठी साखर कारखाने कार्यक्षेत्रातील शैक्षणिक संस्थाना अनुदान देत आहेत. आपल्या कार्यक्षेत्रातील शेतकरी सभासदांच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक विकासाच्या दृष्टीने कारखान्यानी अनेक योजना आखल्या आहेत. अशिक्षित आई-बापांची मुले पदवीधर होऊ लागली आहेत. थोडी आर्थिक सुबत्ता व गावाजवळ शैक्षणिक सोयी निर्माण झाल्याने हे घडले. अर्थात यासाठी सहकारी साखर कारखाने कारणीभूत ठरले. वारणानगरच्या बालवृंद कलाकारांनी जागतिक पातळीवर

सन्मान मिळविला. ग्रामीण क्षेत्रात शेतकऱ्यांच्या मुलांनी हे अभूतपूर्व कार्य करून दाखविले कृष्णा सहकारी साखर कारखाना कराड व प्रवरा सहकारी साखर कारखाना, प्रवरानगर यांनी मेडिकल कॉलेजीस् सुरू करून पुण्या-मुंबईच्या तोडीच्या औषधोपचाराच्या सोयी गरीब शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत.

**३. लहान शेतकऱ्यांची पत वाढली :-**

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी खऱ्या अर्थाने लघु व सीमांत शेतकऱ्यांची उन्नती घडवून आणली आहे. सहकारी साखर कारखान्यांचे ९० पेक्षा अधिक शेतकरी हे लहान शेतकरी आहेत. या लहान शेतकऱ्यांकडे साखर कारखान्यांचे ७० ते ८० शेअर्स असतात. सातपुडा-तापी परिसरात आदिवासीनाही सभासदत्व देण्यात आले आहे. हा लहान व आदिवासी शेतकरी कारखानदार बनला आहे. अशा लहान शेतकऱ्यांना फारशी पत नव्हती. बँका, पतसंस्था त्यांना फारशी कर्जे देत नसत. पण त्यांचा ऊस साखर कारखान्यांना जाऊ लागल्याने त्यांची पत आपोआप वाढली. त्यांना कर्जे मिळू लागली. कारखान्यांकडून ॲडव्हान्स प्राप्त होऊ लागला याचा अर्थ सहकारी साखर कारखान्याने ग्रामीण भागातील लहान व आदिवासी शेतकऱ्यांना समाजात मानाचे स्थान प्राप्त झाले. त्यांना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली. ही गोष्ट केवळ साखर कारखान्यामुळे घडून आली हे विसरता येत नाही. ग्रामीण क्षेत्राच्या विकासातील त्यांची भूमिका भूषणावह आहे यात शंका नाही.

**४. पिकाखालील जमीन वाढली :-**

सहकारी साखर कारखान्यामुळे प्रत्यक्षात पिकाखालील जमीन वाढल्याचे दिसून येते. हेक्टरी ऊस उत्पादन वाढले. ही बाब कोल्हापूर जिल्ह्यातील परिते येथील भोगावती सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात प्रकर्षाने आढळते. ज्या माळरानावर काहिही पीक येत नव्हते. तेथे शेतकऱ्यांनी स्वखर्चाने अगर कारखान्याच्या मदतीने सहकारी पाणीपुरवठा संस्थामार्फत पाणी नेले. बुलडोझरने जमिनी तयार केल्या. अशी माळरानाची नवीन जमीन तयार करण्यासाठी कारखान्याने सवलतीच्या दरात सभासद शेतकऱ्यांना बुलडोझर दिले, तर काही शेतकऱ्यांनीच बुलडोझर घेऊन ते इतरांना भाड्याने दिले. कोल्हापूर जिल्ह्यातील

अनेक शेतकऱ्यांचे बुलडोझर, आंध्रप्रदेश इत्यादी राज्यात काम करण्यास गेलेले दिसून येतात. अशा नवीन जमिनीतील ऊस कारखान्यांना जातो. शेतकऱ्यांनी अशी पडीक जमीन लागवडीखाली आणल्याने त्यांचे उत्पन्न वाढले. शासनाच्या योजनेने जी कामे झाली नसती, ती या सहकारी साखर कारखान्यांनी करून दाखविली. सन १९९६-९७ मध्ये भारतात दर हेक्टरी ऊस उत्पादन ६६.९ मे. टन होते, तेव्हा महाराष्ट्रात ते हेक्टरी ८५ मे. टन होते.

**५. शेतीला पाणीपुरवठा :-**

ऊसाला चांगला दर मिळून पैसे मिळतातच याची खात्री पटल्याने गावागावांतील शेतकरी तट-भेद विसरून एकत्र आले. त्यांनी सहकारी पाणीपुरवठा योजना आखल्या. नदीपासून १० किलोमीटर अंतरापेक्षा अधिक अंतरावर पाणी नेऊन ऊस शेती फुलविली. सामान्य व गरीब शेतकऱ्यांच्या ठायी ही धडाडी सहकारी साखर कारखान्यांनी निर्माण केली. कारखान्यांचा परिसर वर्षभर हिरवागार दिसू लागला. या क्षेत्रातील शेतकरी पाण्याच्या वर्षभर व मुबलक सोयीने ऊसासह इतर पिके घेऊ लागला. भात, भुईमूग, सुर्यफुल इत्यादी पिके वर्षातून २/३ वेळा घेणे शक्य झाले. शेतीचे नवे तंत्र, नवे बियाणे घेऊन तो शेती उत्पादन वाढवू लागला. वर्षभर तो कामात गुंतुन राहिला. त्याची आर्थिक परिस्थिती वेगाने सुधारली. या सर्व गोष्टी साखर कारखान्यांमुळे घडल्या व भविष्यात घडत राहणार आहेत. खेड्यातील शेतकऱ्यांच्या जीवनमानात बदल झाला आहे.

**६. खेड्यात सुबत्ता निर्माण झाली :-**

पूर्वी निव्वळ शेती उत्पन्नावर कुटुंबाचा उदरनिर्वाह चांगल्या प्रकारे करणे शक्य होत नसे. पण सहकारी साखर कारखान्यांमुळे कारखान्यांत अनेक नवीन नोकऱ्या उपलब्ध झाल्या. शेती विभागाचे काम पाहण्यास अधिक लोकांची गरज भासू लागली. शेतकरी ट्रॅक्टर घेऊन तो भाड्याने नांगरणीसाठी देऊन व हंगामात ऊस वाहतूकीस देऊन चांगले पैसे मिळवू लागले. कारखान्याच्या हंगामाच्या काळात अधिक नोकरांची गरज असते. हा सर्व नोकरवर्ग कारखाना परिसरातील सभासदांच्या कुटुंबातील असतो, त्यामुळे त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारली. या नोकरीने व ऊसाच्या पैशाने खेड्यात सुबत्ता निर्माण झाली. शेतीमालाला खात्रीचे बाजारपेठ मिळाल्याने शेतकरी कुटुंब कसे सुधारते हे

सहकारी साखर कारखान्यांनी सप्रमाण दाखवून दिले आहे. कारण पूर्वी ऊसापासून तयार केलेला गूळ दलालाकडे देण्यात येई. तो देईल तो दर व देईल तेव्हा पैसे आणावयाचे. पण सहकारी साखर कारखान्यांमुळे ऊसाला योग्य दर मिळून दलालाप्रमाणे पिळवणूक न होता शेतकऱ्यांना ठराविक हप्त्यांत पैसे मिळण्याची खात्री झाली. त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली.

**७. ऊसाखालील क्षेत्र वाढले :-**

सहकारी साखर कारखान्यामुळे ऊसाला योग्य व निश्चित दर मिळतो. याचा अनुभव शेतकऱ्यांना आला. त्यामुळे अनेक शेतकरी ऊस पिकाकडे वळू लागले. ऊसाखालील क्षेत्र वाढले उदा. सांगली येथील सहकारी साखर कारखाना सुरू झाला. तेव्हा कारखान्याच्या कार्यक्षेत्रात फक्त १९४२ एकर ऊसाचे क्षेत्र होते. सध्या या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ऊसाखालील क्षेत्र २५,००० एकरापेक्षा अधिक झाले आहे. साहजिकच कारखान्यांमुळे ऊस क्षेत्राखालील जमीन वाढली. लहान शेतकऱ्यांनाही चांगला पैसा मिळू लागला. मुलांना तो चांगले शिकवू लागला. त्याची आर्थिक उन्नती घडून आली. ऊसाखालील क्षेत्र सन १९५२-५३ मध्ये २.०२ लक्ष एकरावरून १९९७-९८ मध्ये ४. ६० लक्ष एकर झाले.

**८. महाराष्ट्रातील रोजगार वाढला :-**

सहकारी साखर कारखानदारी प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रातच केंद्रीत झाली आहे. त्यामुळे या ठिकाणी रोजगार वाढलाच. पण कारखान्याच्या गळीत हंगामात ऊस तोडणीसाठी, ऊस वाहतुकीसाठी अनेक कामगार लागतात. वाहतुकीसाठी बैलगाड्या व अन्य साधने लागतात. हे सर्व कामगार मोठ्या प्रमाणात मराठवाड्यातून पश्चिम महाराष्ट्रात हंगामाच्या काळात ५ ते ६ महिने येतात. इतकेच नव्हे तर कर्नाटक मधूनही पुष्कळ कामगार येतात. हंगामाच्या काळात काम करून हे लोक आपल्या वर्षभराच्या उदरनिर्वाहाची सोय करतात. इतकेच नव्हे तर अनेक कारखाने या कामगार टोळ्यांना आगावू उचलीच्या रूपाने पैसे देतात. त्यामुळे सहकारी साखर कारखाने त्या भागातील

लोकांना रोजगार देत नाहीत, तर महाराष्ट्राच्या इतर भागातील लोकानांही रोजगार उपलब्ध करून देतात.

**९. वाहतुकीच्या मार्गात व साधनात वाढ :-**

सहकारी साखर कारखान्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात ऊस वाहतूक करता यावी यासाठी गावांतील अनेक रस्ते दुरूस्त केले. प्रत्येक गाव मुख्य रस्त्याशी जोडण्यात आले. त्यामुळे प्रत्येक गावात बारमाही वाहतूक सुरू ठेवणे शक्य झाले. अनेक शेतकऱ्यांनी ट्रॉली-ट्रॅक्टर विकत घेतले. हंगामाच्या काळात त्यांचा ऊस वाहतुकीसाठी वापर करून उत्पन्न मिळविता येऊ लागले. अनेक खेड्यात आज मोटर सायकली, स्कूटर दिसून येतात. याशिवाय टॅक्टर, जीप, कार, ट्रॅक्स दिसून येतात. लांबचे प्रवास वा तीर्थयात्रेसाठी आज ग्रामीण शेतकरी ट्रॅक्स वा टाटा सुमोचा वापर करीत असल्याचे आढळते. अनेक शेतकऱ्यांनी सिमेंट कॉक्रींटच्या इमारती उभारल्या. या सर्वांचे प्रमुख कारण म्हणजे त्या भागातील सहकारी साखर कारखाने आहेत हे मान्य केले पाहिजे.

**१०. इतर उद्योगांचा विकास :-**

सहकारी साखर कारखान्यांनी मोठ्या प्रमाणात उत्पादनाचे व कामाचे विविधिकरण केले आहे. साखर उत्पादनाबरोबर कृषि औद्योगिक प्रकल्प, मद्य व मद्यार्क, रसायन व आम्ले, ॲसेटिक, अनहायड्राईड, पोटॅश, ॲसिटोन, ऑक्सलिक ॲसिड, कागद निर्मिती, घरबांधणी इत्यादी अनेक उद्योगांचा विकास केला आहे. टॅक्टर, बुलडोझरची दुरुस्ती गॅरेज, विजेवर चालणाऱ्या मोटार दुरुस्ती व रिवायडिंग इत्यादी गोष्टी कारखाना क्षेत्रावर घडून आल्याने अनेकांना रोजगार उपलब्ध झाला. दुरुस्तीसाठी लोकांना शहरात जावे लागत नाही. गोबर गॅस सयंत्र उभारणे, दुग्ध-व्यवसाय, कोंबडींचे खाद्य तयार करणे. कुक्कुट व वराह पालन, पशु पैदास, सोयाबिन लागवड, वस्तू भांडार चालविणे उदा. वारणा बझार या सर्वांमुळे सहकारी साखर कारखाना क्षेत्रातील जनतेला विविध वस्तू योग्य किंमतीत मिळू लागल्या त्यांच्या राहणीमानाचा स्तर उंचावला.

**११. इतर महत्त्वाच्या भूमिका :**

जळगाव व नाशिक जिल्ह्यातील ४ सहकारी साखर कारखान्यांनी प्रत्येकी १२ कोटी रूपये खर्च करून नद्यांचे पाणी अडवून डोंगरात बोगदा काढून गिरणा नदीत सोडण्याचा प्रकल्प राबवित आहेत. त्यामुळे ऊसाच्या क्षेत्रात वाढ झाली. सहकारी संस्थांनी एकत्र येऊन संयुक्त रीतीने नव्या संस्था निर्माण करण्याची संकल्पना रूढ होत आहे. उदा. मराठवाड्यात नांदेडजवळ ८ ते १० कारखाने एकत्रित येऊन सिकॉमच्या मदतीने कागद कारखाना उभारीत आहे. लोकांच्या गुंड प्रवत्तीत बदल होत आहे. कारखान्यांनी विकासाची गंगा खेड्यात नेल्याने माणसामध्ये बदल होत आहे. माणूस बदलण्याचे मोठे काम कारखान्यांनी केले आहे.

वरील महत्वाच्या मुद्यांवरून ग्रामीण विकासातील साखर कारखान्यांची भूमिका लक्षात येईल. ग्रामीण अर्थकारणात सहकारी क्षेत्राचा सहभाग महत्वाचा असतो. सहकारी साखर कारखानदारीच्या क्षेत्रात अनेक सुधारणा जनहिताच्या उन्नतीसाठी झाल्या आहेत, यात शंका नाही.

अलिकडेच राज्य शासनाने महात्मा फुले शिक्षण हमी योजना घोषित करून आधी शिक्षण, सर्वांसाठी अशी घोषणा करून शिक्षणाचा मुलभूत हक्क मिळवा म्हणून साखरशाळा सुरू केल्या आहेत. काही कारखान्यांनी प्रतिसाद देऊन ऊस तोडणी कामगारांच्या मुलांसाठी निवासी शाळा सुरू केल्या आहेत. काही ठिकाणी तात्पुरत्या हंगामी शाळा सुरू झाल्या आहेत. राज्यातील सर्व साखर कारखान्यांमध्ये एकंदर ऊस तोडणी कामगारांची संख्या सुमारे ५ लक्ष इतकी आहे. ही संख्या विचारात घेऊन प्रत्येक जोडप्याच्या किमान एका बालकास शिक्षणाची संधी द्यावयाची झाल्यास सुमारे १ लक्ष बालकांसाठी २००० शाळा सुरू होणे आवश्यक असतानाही राज्यातील १६० साखर कारखान्यापैकी आजपर्यंत केवळ ५० साखर कारखान्यांनी या गोष्टीला प्रतिसाद देऊन सुमारे १०० साखरशाळा सुरू केल्या आहेत. या शाळांमध्ये दरवर्षी हजेरीच्या बाबतीत प्रगती राहण्याऐवजी विद्यार्थी संख्या गळती मुळे कमी होत असल्याचे दिसते. याचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने शिक्षण हमीचा निर्णय घेऊन वस्ती शाळेप्रमाणेच साखर शाळांना

सुद्धा अनुदान उपलब्ध केले आहे.याचा लाभ घेऊन प्रत्येक साखर कारखान्याने किमान १ ते ५ साखर शाळा सुरू केल्यास नजिकच्या काळात अपेक्षित प्रगती होऊ शकेल आणि ऊस तोडणी कामगारांचे भविरतव्य उज्ज्वल करणारा, त्यांचा स्वतःचा नेता मिळाल्यास पिढ्यानपिढ्या ऊस तोडणी वाहतुकीसाठी जाणारे भटक्या विमुक्तांचे तांडे मानवी प्रगतीच्या मार्गाने जाऊ शकतील आणि खऱ्या अर्थाने सहकारातून समृद्धीकडे यशस्वी वाटचाल होऊ शकेल.

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी पुढाकार घेऊन निरनिराळ्या शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था स्थापन केल्या असून त्या संस्थांच्या वतीने कारखाना परिसरात बहुसंख्य साखर कारखान्यांनी प्राथमिक शाळा व विद्यालये स्थापन केली आहेत. सुमारे ५० कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालये, ५ तंत्रशाळा, १२ औद्योगिक प्रशिक्षण संस्था, २० अभियांत्रिकी महाविद्यालये, ५ पब्लिक स्कूल्स, २ रेसिडेंशियल इंग्लिश मिडीयम स्कूल, २ वैद्यकीय महाविद्यालये इ.ची निर्मिती करण्यात आलेली आहे.

### ७.४ सहकारी साखर उद्योगाच्या मर्यादा :

अभ्यासकाची अशी धारणा आहे. सहकारी साखर उद्योग ज्यावेळी सुस्थितीत होते त्यावेळी ग्रामीण विकासास फार मोठा हातभार लाभला होता. ग्रामीण भागातील दुरावस्थेस सहकारी साखर कारखानदारीची अवनती जबाबदार कारणीभूत ठरली आहे.

सहकारी साखर कारखान्यांची वाटचाल महाराष्ट्रातील ग्रामीण भागाच्या विकासाला पोषक ठरली असली, तरी ते परिपूर्ण आहे असे त्याचे निष्ठावंत समर्थकही म्हणणार नाहीत. पाच दशकांच्या वाटचालीत सहकारी साखर उद्योगात अनेक गंभीर स्वरूपाचे दोष निर्माण झाले असून, त्याचे निराकरण झाले नाही, तर उदारीकरण, जागतिकीकरण आणि विधियंत्रणाच्या या दशकात, ही ग्रामीण विकासाला पोषक चळवळ नष्ट होण्याचा धोका उद्भवला आहे. आज जवळपास १०० साखर कारखाने आजारी अवस्थेत आहेत. ऊस उत्पादक शेतकऱ्यांची देणी थकली असल्याने त्यांच्या मनात असंतोष खदखदत आहे. ऊस तोडणी कामगार आणि कारखान्यातील कर्मचारी देखील असमाधानी आहेत. कर्जाच्या ओझ्याखाली बहुसंख्य कारखाने असून, त्यांचा संचित तोटा हजारो कोटी रूपयांचा आहे.

भ्रष्टाचार आणि उद्योगाच्या साधनसंपत्तीचा संचालकांकडून मनमानी वापर सर्वज्ञात आहे. अल्पभूधारकांच्या मालकीचे हे कारखाने, प्रत्यक्षात श्रीमंत बागायतदारांच्या म्हणजेच साखर सम्राटांच्या नात्यात असल्याचे सर्वज्ञात आहेत.

व्यावसायिक व्यवस्थापनाचा अभाव हा आणखी एक महत्वाचा दोष या उद्योगात सार्वत्रिकीक आढळून येतो. सर्वात महत्वाचे म्हणजे हे उद्योग ग्रामीण राजकीय व आर्थिक सत्तेचे प्रभावी केंद्र बनले असल्याने, कारखाना काबीज करणे किंवा कारखाना आपल्या ताब्यात राहावा यासाठी विविध गट प्रयत्नशील आहेत. गटबाजीच्या या राजकारणाने या उद्योगाची अवनती घडवून आणली आहे. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. या बिकट अवस्थेला साखर सम्राटांचा भ्रष्टाचार, अनावश्यक जादा कारखाने आणि अकार्यक्षम व्यवस्थापन हेही जबाबदार आहेत.

१९९० नंतरच्या कालखंडात सहकारी साखर उद्योगाचा आर्थिक, सामाजिक, नैतिक आणि या सर्वांशी संबंधित असलेल्या राजकीय अशा सर्वच पातळ्यांवर विलक्षण वेगाने ऱ्हास होत चालला आहे. त्याची कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहे :

**१. साखरेचा दर व वितरण :** भारतातील केंद्र सरकार हे साखरेचे दर व वितरण निश्चित करीत असते. संपूर्ण देशाला हे धोरण लागू असताना उत्तर प्रदेश व बिहार या राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्रावर नेहमीच अन्याय झालेला आढळतो. उत्पादन खर्च मोजण्याची महाराष्ट्रातील आणि इतर राज्यातील पद्धत यामध्ये फरक आहे. त्यामुळे महाराष्ट्राचा नेहमी तोटा होतो. उत्तर प्रदेश व बिहार येथील शर्करांश सरासरी सुमारे ८ टक्के आहे व त्यांना अनुकूल धोरणे ठरविली जातात. महाराष्ट्रातील शर्करांश सरासरी सुमारे ११ टक्के आहे. त्यामुळे महाराष्ट्रावर अन्याय होतो.

**२. आजारी साखर कारखाने :** हजारो लोकांना रोजगार देणारा व कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक असणारा हा उद्योग धोक्यात येत आहे. १९८३ मधील नेमलेल्या गुलाबराव पाटील समितीच्या मते या उद्योगास आजारपणाने ग्रासले आहे. सन १९८३ साली १९ कारखाने आजारी होते. ही संख्या १९९५ मध्ये ६० वर पोहचली. एकट्या अहमदनगर जिल्ह्यात १७ पैकी १४ कारखाने आजारी होते. १९९६ मध्ये ९१ साखर

कारखाने तोट्यात होते. ऊसाचा अपुरा पुरवठा, ऊस लावणी कार्यक्रमाचा अभाव, अपुरे खेळते भांडवल, कर्जावरील असंख्य व्याजाचा बोजा, इ. कारणाने कारखाने आजारी पडतात असे पाटील समितीने नमूद केले आहे.

**३. दीर्घकालीन योजनांचा अभाव :** महाराष्ट्रात कधी साखरेचे उत्पादन अधिक तर कधी कमी होते. यामुळे ऊस उत्पादक शेतकरी नेहमीच संकटात सापडतो. या सर्व गोष्टी दीर्घकालीन योजनांच्या अभावामुळे घडतात. तशा प्रकारची दूरदृष्टी कोणाकडेही नाही. साखरेच्या साठवणुकीसाठी कराव्या लागणाऱ्या वाढत्या खर्चाने अनेक साखर कारखान्यांना अडचणींना तोंड द्यावे लागते. सरकारनेही ऊस पिकाकडे निव्वळ साखर देणारे पीक म्हणून न बघता शासनास भरघोस उत्पन्न देणारे साधन म्हणून पाहिले पाहिजे. यासाठी कारखान्यांचा विकास व्हावा म्हणून दीर्घकालीन योजना आखल्या पाहिजेत. परकीय चलन मिळविण्याची क्षमता, देशाची साखरेची वाढती गरज, खुल्या अर्थव्यवस्थेत निर्यातीसाठी लागणारी साखर इ. गोष्टींचा विचार करावा लागेल.

**४. ऊस विकास निधीचा अपुरा उपयोग :** कार्यक्षेत्रात कारखान्यासाठी लागणारा ऊस उत्पादन करणे, आजारी कारखान्यांचे प्रश्न सोडविणे, खुल्या अर्थव्यवस्थेतील स्पर्धेला तोंड देता यावे इ. कारणांसाठी  भारतात ऊस विकास निधी स्थापन केला आहे. आजपर्यंत यामध्ये १५०० ते १६०० कोटी रुपये जमा आहेत. पण उद्दिष्टे साध्य करण्यासाठी निधीचा वापर केला गेला नाही. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांकडून या निधीत ५५० कोटी रुपये जमा झालेले आहेत. त्यापैकी केवळ रक्कमच महाराष्ट्राच्या कारखानदारीला उपलब्ध करून देण्यात आलेली आहे याचा अर्थ या निधीचा उपयोग केला जात नाही.

**५. अर्थकारण आणि राजकारण :** राजकारण करणे आणि सहकारी उद्योग कार्यक्षमतेने चालविणे या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत हे लक्षात न घेता राजकारणातील नेतेमंडळी हे साखर उद्योग चालविण्यासाठी कार्यक्षम आहेत असे मानले गेले. कार्यक्षमपणा व कार्यक्षमता ही त्यांच्या गावीही नाही व नव्हती. त्यामुळे काही मर्यादित अपवाद वगळता कुठल्याही पातळीवर सहकारी साखर उद्योग कार्यक्षमतेने चालविला गेला नाही. त्यांनी ना शेतकऱ्यांचा विकास केला, ना शेतकऱ्यांच्या उसाला योग्य भाव दिला, शेतकऱ्यांचा

विकास हा विचार बाजूला सारून संचालकांना व राजकारण्यांना अधिक श्रीमंत करणे एवढाच कार्यक्रम राबविला. राजकारणासाठी शेती आणि शेतकरी यांचा फक्त वापर होत आहे. शेती आणि शेतकरी हे निवडणुकीतील चक्र राजकीय नेते दोन्ही बाजूंनी त्यांना पाहिजे तसे फिरवत असतात.

शेतकऱ्यांशिवाय राजकारणच होत नाही. शेतीतून सहकार, सहकारातून पैसा आणि पैशातून राजकारण. शेतकऱ्यांकडून थेट पैसा मिळत नाही; पण त्यांच्याकडून मते मिळतात. मतांतून साखर कारखाना, साखर कारखान्यातून पैसा आणि पैशामुळे राजकारण. सहकारात शेतकऱ्यांचा वापर फक्त राजकारणासाठीच झाला आहे.

सहकारी साखर कारखाने ही सभास्थाने असल्याने १९९० पूर्वीही त्यांचा उपयोग राजकारणासाठी केला जात असे. त्या काळात सहकार क्षेत्राचे धुरीणत्व करणाऱ्या वसंतदादा पाटलांसारख्या स्वातंत्र्यसेनानीत तत्वनिष्ठा आणि शेतकऱ्यांच्या हिताविषयी आस्था होती. नैतिक मूल्येही बऱ्याच प्रमाणात जोपासली जात होती. १९९० नंतरच्या कालखंडात अर्थकारण मागे पडले आणि सहकारी साखर उद्योगाचा केवळ राजकारणासाठी उपयोग करण्याचा चुकीचा पायंडा पडला. त्यामुळे ज्याला राजकीय डावपेच लढविता येतात, पैशाचे पाठबळ आहे अशीच माणसे सहकारी साखर उद्योगाच्या उभारणीसाठी प्रयत्न करू लागली. त्यांना राज्यसरकारने व राज्यकर्त्यांनीही स्वतःच्या वैयक्तिक स्वार्थासाठी व राजकारणासाठी भरीव मदत केली.साखर कारखान्यांचे वाटप सभोवतालच्या परिस्थितीचा अभ्यास न करता, कारखाना चालेल का? याचा सारासार विचार न करता खिरापतीसारखे केले. अशा एकंदर परिस्थितीमुळे सध्या सहकारी साखर उद्योगाचे दिवस अतिशय बिकट आहेत व दिवसेंदिवस ते अधिकच बिघडत चालले आहेत.

**६. ऊस-उत्पादक शेतकऱ्यांचा भ्रमनिरास :** आज सहकारी साखर कारखानदारीस ५० वर्षांपेक्षा अधिक काळ झाला असताना, इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या उसाला सर्वांत कमी भाव मिळाल्याचे दिसून येते. केंद्र सरकार प्रत्येक शेतीमालाचे किमान वैधानिक किंतम/दर ठरविते. उत्तर प्रदेशातील खाजगी साखर कारखाने ही किमान वैधानिक किंमत देण्यास आनंदाने तयार होतात. या उलट

महाराष्ट्रतील बरेच सहकारी साखर कारखाने किमान वैधानिक किंमत देण्यासही तयार नाहीत. बऱ्याच कालावधीतील दरांची तुलना करता, महाराष्ट्रात तोडणी वाहतूक खर्च साखर कारखाने करतात, तर अन्य राज्यात शेतकरी करतात. तसेच महाराष्ट्रात एक ते अडीच टक्के साखर उतारा अन्य राज्यापेक्षा जादा मिळतो हा ही फरक लक्षात घ्यावा लागेल, तरी सुध्दा महाराष्ट्रातील अनेक सहकारी साखर कारखाने ऊस दर किमान वैधानिक किंमतीपेक्षा कमी देतात हेच दिसून येते. इतर राज्यातील राज्य सरकार व लोक प्रतिनिधी उसाची किंमत वाढविण्यासाठी खाजगी कारखानदारीवर तसेच राज्यसरकारवर दबाव आणतात. या उलट महाराष्ट्रात उसाची किंमत कमी करण्यासाठी राज्यशासन व लोकप्रतिनिधी प्रयत्न करत असतात. शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरू झालेल्या सहकारी चळवळीस ही गोष्ट निश्चितच शोभादायक नाही.

शेतकऱ्याला उसाचे बिल मिळावे यासाठी व किमान भावासाठी रस्त्यावर येऊन आंदोलने करावी लागत आहेत हेच सहकारी चळवळीचे मोठे दुर्भाग्य आहे. अनेक सहकारी साखर कारखाने शेतकऱ्यांच्या उसाचे किमान पेमेंटसुध्दा करत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्याच्या मनात साखर कारखान्याविषयी दुरावा निर्माण झाला आहे. शेतकऱ्याच्या मनात कारखान्याचे संचालक मंडळ व पदाधिकारी यांच्याबद्दल तीव्र असंतोषाची भावना तयार झाली आहे. सहकारी क्षेत्राची उपयुक्तताच संपुष्टात आली आहे असे जनमत शेतकऱ्यांमध्ये तयार होत आहे.

किमान भाव मिळावा, उसाचे बिल मिळावे यासाठी शेतकरी आंदोलने करून कारखाने बंद पाडत आहेत. साखर आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढत आहे. राज्यनिहाय ऊस दराचा बऱ्याच वर्षांपासूनचा अभ्यास केल्यास महाराष्ट्रातील शेतकऱ्याच्या उसाला किती कमी भाव मिळतो हे लक्षात येईल. पूर्वीच्या नेत्यांनी दूरदृष्टी ठेवून राज्याच्या ग्रामीण भागाच्या विकासासाठी सहकारी साखर कारखानदारी म्हणजे केवळ एक अर्थकारण हा दृष्टिकोन ठेवला होता. काही कालावधीसाठी ते एक वरदानच ठरले होते. मात्र आजची स्थिती पाहिली, तर त्यावेळी ठरलेले अर्थकारण हे आज विनाकारण आणि दुर्दैवाने ग्रामीण भागाला लागलेले व्यसन म्हणजेच राजकारण झाले आहे.

**७. अतिरिक्त साखर कारखाने आणि त्यासाठी लागणाऱ्या उसाची उपलब्धता :** १९९८ साली साखर उद्योगाचे विनियंत्रिकरण झाल्यानंतर, मोठ्या प्रमाणात नवीन सहकारी साखर कारखाने उभारले गेले, तसेच जुन्या कारखान्यांना त्यांची गाळपक्षमता वाढवण्यास परवानगी दिली गेली. पूर्वी १२५० मे. टन गाळप क्षमतेचे साखर कारखाने उभे राहत होते, परंतु १९८६ नंतर केंद्र सरकारने साखर कारखान्यांचा सर्वांगीण अभ्यास करून १२५० मे. टनाऐवजी २५०० मे. टन क्षमतेचे नवीन साखर कारखाने उभे राहिल्यास सर्व दृष्टिने फायदेशीर ठरतील व किफायतशीरही पडतील असा निष्कर्ष काढला. परंतु २५०० मे. टन क्षमतेचे नवीन साखर कारखाने उभे करताना जिथे ऊस उपलब्ध आहे तेथेच त्यांची उभारणी आवश्यक होती. परंतु वरील बाबींचा सखोल अभ्यास न करता १९९८ नंतर महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात नवीन साखर कारखानदारी उभी राहिली.

सध्या महाराष्ट्रात जे सहकारी साखर कारखाने चालू आहेत त्यांची दैनिक गाळप क्षमता ४. ४० लाख मे. टन इतकी आहे. तांत्रिक क्षमतेचा वापर अंदाजे १२० टक्के धरल्यास व गाळप दिवस अंदाजे १७० इतके धरल्यास, कारखाने आर्थिक किफायतशीर चालण्यास, आपल्याकडे अंदाजे ९०० लाख मे. टन ऊस आवश्यक आहे. त्याचप्रमाणे १५ ते २० टक्के ऊस पुढील वर्षाच्या बियाणांसाठी, गुऱ्हाळाला व इतर कारणांसाठी लागतो. त्यामुळे ९०० अधिक १३५ म्हणजेच सर्व कारखाने किफायतशीरपणे चालण्यास कमीत कमी १०३५ लाख मे. टन ऊस लागतो.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने नोंदणी केलेले सर्व साखर कारखाने उभे राहिल्यास त्यांची प्रतिदिन गाळप क्षमता ४.८० लाख मे. टन इतकी होते. वरील हिशेबाने कारखाने चांगले चालण्यास अंदाजे ११८० लाख मे. टन ऊस लागेल.

आतापर्यंत महाराष्ट्रात कमीत कमी २५० लाख टन उसाचे व जास्तीत जास्त ५७० लाख टन उसाचे गाळप झाले आहे. खाजगी कारखानदारीला लागणारा ऊस गृहित धरला, तर महाराष्ट्रातील सर्व साखर कारखाने कार्यक्षम चालण्यास अंदाजे १००० लाख ते १२०० लाख टन ऊस लागेल. यातील तफावत पाहता महाराष्ट्रातील साखर उद्योगाचे भवितव्य अनिश्चित असेच आहे.

उसाचे उत्पादन हे निर्सगाच्या लहरीवर अवलंबून असते व आहे. दुष्काळ पडल्यास ऊस उत्पादन कमालीचे कमी होते. कारखाने पुरेशा क्षमतेने व पुरेशा कालावधीसाठी चालू शकत नाहीत. त्यामुळे प्रचंड नुकसान होते. त्याउलट ज्यादा व पुरेसा पाऊस झाला, तर उसाचे क्षेत्र वाढते. त्यामुळे क्षमतेपेक्षा जास्त ऊस उत्पादन होते व कारखाने जास्त क्षमतेने व जास्त दिवस चालतात. त्यामुळे साखर उतारा कमी होऊन सुद्‌धा तोटा होण्याचा संभव असतो. त्यामुळे या दोन्हींही परिस्थितीत निसर्गावर अवलंबून असणाऱ्या दुष्टचक्रात साखर कारखाने सापडू शकतात. ते या दुष्टचक्रात सापडू नयेत म्हणून साखर कारखाने उभे करताना व त्यास परवानगी देताना निसर्ग डोळ्यासमोर ठेवून, पूर्वानुभव डोळ्यासमोर ठेवून, अतिशय अभ्यासपूर्वक, पूर्ण विचार करून उभे केले पाहिजे होते. परंतु गेल्या अनेक वर्षांचा अनुभव पाहता दुष्काळामुळेच कारखाने बंद पडत असून सुध्दा त्याचा सारासार विचार केला नाही. त्यामुळे नवीन साखर कारखानदारी उभी करताना पूर्वानुभव व निसर्ग यांचा जरासुध्दा विचार झाला नाही. त्यामुळे साखर कारखान्यांची आजची अवस्था बिकट झाली आहे.

**८. गाळप क्षमतेचा न झालेला वापर :** महाराष्ट्रातील मोठमोठ्या राजकारणी पुढाऱ्यांनी ५० ते ६० कोटी रुपये खर्च करून बरेच नवीन साखर कारखाने उभे केले आहेत. गेल्या पाच-सहा वर्षांतील ह्या कारखान्यांचा ऊस गळीत हंगामाचा तपशील पाहिला असता त्यांनी प्रत्येक सिझनमध्ये फक्त २५ हजारापासून ५० ते ६० हजारापर्यंत क्रशिंग करून आपले साखर कारखाने बंद केले आहेत. ऊस उपलब्ध नसताना सुध्दा वैयक्तिक, राजकीय व आर्थिक स्वार्थासाठी साखर कारखाने उभे केले आहेत.

**९. स्वावलंबनाचा अभाव :** सहकारी चळवळींच्या अनेक उद्‌दिष्टांपैकी एक महत्वाचे उद्‌दिष्ट्य म्हणजे ‘‘सभासदांमध्ये काटकसर व बचत करण्याच्या सवयीला उत्तेजन देणे’’परंतु सहकारी चळवळ हे उद्‌दिष्ट साध्य करू शकलेली नाही.

सहकारी चळवळ ही जनतेची चळवळ आहे. त्यामुळे ती जनतेतून निर्माण होणे आवश्यक आहे. परंतु आज सहकारी चळवळीस जवळजवळ १०० वर्षे पूर्ण होऊनही ती जनतेतून अधिक प्रमाणावर पैसा गोळा करू शकलेली नाही. त्यामुळे तिला सरकारच्या

मदतीवर अवलंबून राहावे लागत आहे. सद्यःच्या परिस्थितीत जरी सहकारी चळवळीला आर्थिक मदतीची आवश्यकता असली तरी, केव्हा ना केव्हा तरी या सहकारी चळवळीने उत्स्फूर्त स्वरूप धारण करावे, स्वतःच्या पायावर उभे राहावे, असे मत मांडले गेले होते.

**१०. हितसंबंधी गटांचे वर्चस्व :** भारतातील सहकारी चळवळीचे नेतृत्व फार मोठ्या प्रमाणावर राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या प्रभावी गटांतील लोकांकडे आहे. तसेच सहकारी चळवळीतील` नेतृत्व श्रीमंत शेतकरी आणि राजकीय अभिजन यांच्याकडे आहे. या मंडळीना सहकारी चळवळीचे शिक्षण नाही. सहकारी चळवळीबद्दल त्यांच्यात तळमळ, निष्ठा नाही. सहकाराचा विकास घडवून आणावा असे त्यांना कधी वाटत नाही. आपली सत्ता, आपले नेतृत्व कायम राहावे यासाठी हे पुढारी लोक सहकारी संस्था आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करतात.

**११. अकार्यक्षम व्यवस्थापन :** सहकारी साखर उद्योगाचे व्यवस्थापन व्यावसायिक पद्धतीने करण्यात आले नाही. प्रशासकीय जबाबदाऱ्या बहुतांशी अकार्यक्षम व अयोग्य व्यक्तींच्या हाती सोपविल्या गेल्या. प्रशिक्षित व अनुभवी व्यवस्थापनाच्या अभावामुळे व्यवस्थापनात बरेच दोष निर्माण झाल्याने सहकारी कारखानदारी ही यशस्वी झालेली नाही. प्रशिक्षणाच्या अभावामुळे सभासदांकडून योग्य सहकार्य मिळत नाही. या सर्वांचा परिणाम प्रतिकुल सहकारी साखर उद्योगावर झाला आहे.

**१२. घाईघाईने झालेला संख्यात्मक विकास :** सहकाराचा अधिकाधिक विकास घडून आणण्यासाठी प्रयत्न केले गेले. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत ठरविली गेलेली उद्दिष्ट्ये पार पाडण्यासाठी प्रयत्न केले गेले, परंतु ती उद्दिष्टे पार पाडीत असताना सहकाराचा विकास हा घाईघाईने झालेला दिसून येतो. सहकारी साखर उद्योगाची प्रगती संख्यांत्मक स्वरूपाची दिसून येते, गुणात्मकदृष्ट्या आढळत नाही. हितसंबंधी गटांकडून अधिकाधिक प्रमाणात सहकारी साखर कारखाने स्थापण्याकडे लक्ष दिले गेले, परंतु त्यातील अनेक कारखाने निष्क्रिय असल्याचे आढळून आले आहे.

**१३. निष्ठावंत नेतृत्वाचा अभाव :**

सहकारी चळवळीचा विकास घडवून आणण्यासाठी निष्ठावंत नेतृत्वाची आवश्यकता असते. नेतृत्वाकडे सहकाराचे ज्ञान आणि सहकारी चळवळीविषयी आस्था असेल, तरच सहकारी चळवळीचा विकास घडवता येतो याची प्रचिती १९५० ते १९९० या कालखंडात आली मात्र त्यानंतरच्या कालखंडात राजकीय नेत्यांनी  स्वतःच्या व्यक्तिगत फायद्यासाठी आणि राजकीय कारणास्तव संस्थेचा उपयोग करून घेतला. सहकारी साखर उद्योग ग्रामीण विकासाचे माध्यम बनण्याऐवजी ग्रामीण राजकारणातील सत्ताकेंद्र बनले.

**१४. सहकारी संस्थांच्या स्थापनेमागील प्रेरणा :** सहकारी चळवळ ही जनतेसाठी राबविली जाते. त्यामुळे तिचा उगम जनतेतून होणे आवश्यक आहे. प्रथम सुरवातीस जरी सहकारी चळवळीने सरकारची मदत घेतली असली, तरी आजसुद्‌धा; सहकारी चळवळ सरकारवर अवलंबून आहे. सहकारी चळवळीस १०० वर्षे होऊनही तिला जनतेकडून उत्स्फुर्त चालना मिळालेली नाही. म्हणून सहकारी संस्थेला प्रशिक्षित कर्मचाऱ्यांपासून ते भांडवल उभारणीपर्यंत सर्व बाबतीत सरकारचे सहकार्य घ्यावे लागते. म्हणून सहकारी चळवळ ही सरकारची चळवळ असे म्हटले जाते. ज्या गोष्टी आपल्या कल्याणाच्या आहेत, त्या आपण करणे आवश्यक आहेत हे ओळखूनसुद्‌धा सहकारी संस्थेचे सभासद आर्थिक मदतीसाठी आजही सरकारवर अवलंबून आहेत.

**१५. पर्यावरणात्मक समस्या :** साखर कारखान्यांमुळे वातावरण प्रदूषित झाले आहे. साखर कारखान्यांतून साखर उत्पादनाबरोबर निर्माण होणारी मळी व इतर पदार्थ यांची विल्हेवाट योग्य प्रकारे करण्याची सोय नाही. मळी व इतर पदार्थ नदी-नाले याच्यांत सोडल्याने त्या भागात प्रदूषणाचे साम्राज्य पसरले आहे. सतत उसाचे उत्पादन घेतल्याने जमिनीचा कस कमी होत आहे. प्रमाणाबाहेर जलसिंचन आणि रासायनिक खतांचा वापर यामुळे जमीन क्षारयुक्त आणि अंतिमतः नापीक होण्याचा धोका उद्‌भवतो. तसेच जमीन क्षारयुक्त झाल्याने उसातील शर्करेचे प्रमाण म्हणजेच साखरेचा उतारा कमी होत चालला आहे.

**१६. सहकाराचे राजकीयीकरण :** सहकारी साखर कारखाने राजकीय सत्तासंपादनाचे माध्यम बनल्याने ग्रामीण भागात तीव्र स्वरूपाची सत्तासंपादन स्पर्धा आणि त्यातून गटबाजी निर्माण झाली आहे. या राजकीय सत्तेच्या चढाओढीत काळ्या बाजाराचे व्यवहार, व्यवस्थापनाच्या किमान निकषाकडे दुर्लक्ष, गळेकापू स्पर्धा इ. कारणाने आजारी कारखान्यांची संख्या वाढत आहे. सहकार व सेवा ही तत्वे लुप्त होऊन नफेखोरी व सत्ताा यामध्ये धावणारा दबाव गट बनला आहे. सहकारी साखर कारखाने राजकारणाचे अड्डे बनल्याने सर्वसामान्य ऊस उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे.

**१७. सहकाराच्या तत्वाशी विसंगत :** सहकार हे मूलतः आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांना संघटित करण्याचे आणि त्यांचा विकास साध्य करण्याचे माध्यम आहे. सहकारी साखर उद्यागातील ९६ टक्के सभासद जरी ऊस-उत्पादक शेतकरी असले, तरी त्यांचे प्रर्वतक आणि नंतरच्या काळात संचालक हे सधन शेतकरी वर्गातील असल्याचे दिसून येते. त्यातून ‘आश्रयदाता ’आणि ‘आश्रित अशा प्रकारचे संबंध ऊस-उत्पादक शेतकरी सभासदर आणि सहकारी साखर कारखानदार यांच्यात निर्माण झाली आहे. सधन शेतकरी वर्ग सर्वसामान्य शेतकयांवर निर्विवाद हुकूमत गाजवतात.

सहकार अन्याय व शोषन निर्मूलनाचे माध्यम समजले जाते. प्रत्यक्षात अनेक साखर कारखान्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या ऊस-उत्पादक शेतकऱ्यांचे शोषण होत असल्याने, आपल्या रास्त मागण्यांसाठी त्यांना प्रस्थापितांच्या विरोधात आंदोलन करण्याची वेळ आली आहे.

**७.५. सहकारी साखर उद्योगाच्या समस्या :**

२१ व्या शतकाच्या पहिल्या दशकात सहकारी साखर उद्योग कडेलोटच्या जवळपास आला आहे. सहकारी साखर उद्योगाचा कडेलोट होणे म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्था उध्वस्त होणे. कै. धनंजयराव गाडगीळ यांनी सहकार क्षेत्राविषयी काढलेले उद्‌गार सहकारी साखर कारखानदारीस तंतोतंत लागू पडतात. त्यांनी असे म्हटले होते की, “सहकार अयशस्वी ठरला आहे परंतु सहकार यशस्वी होणे गरजेचे आहे.” सहकारी साखर कारखानदारीतील मूलभूत दोषांचे विवरण केल्यानंतर त्यांच्यासमोर असलेल्या

समस्यांचे विवरण करणे गरजेचे ठरते; कारण रोगनिदान झाल्यानंतरच त्यावरील उपायोजनांचा विचार करता येतो.

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीच्या काही जीवघेण्या समस्यांचे संक्षिप्त विवरण खालीलप्रमाणे आहे :

**(१) विनियंत्रण आणि त्यातून निर्माण होणारी स्पर्धा :** ३१ ऑगस्ट १९९८ रोजी साखर उद्योग परवानामुक्त झाला. नवा कारखाना जुन्या कारखान्यापासून किमान १५ कि.मी. दूर असावा एवढीच अट शिल्लक राहिली. आता नव्या ४०० कारखान्यांचे अर्ज सरकारकडे दाखल झाले आहेत. त्यातील बहुतांश अर्ज खाजगी क्षेत्रातील आहेत. परवाना मुक्तीनंतरच्या खाजगी क्षेत्रातील पहिल्या साखर कारखान्याने रांजणी (ता. कळंब., जि उस्मानाबाद) येथे १९९९ २००० या वर्षी गाळप हंगाम सुरू केला. वास्तविक यासाठी नेमलेल्या महाजन समितीने हा उद्योग अंशतः परवानामुक्त करावा असे सुचवले होते. तथापि शासनाने दुसऱ्या टोकाची भूमिका घेतली. समितीने सूचविलेले २५ कि.मी. चे अंतरही शासनाने १५ कि.मी. वर आणले आहे.

२००६ अखेर राज्यात खाजगी क्षेत्रातील २३ कारखान्यांची उभारणी झाली असून, त्यांची संख्या उत्तरोत्तर वाढणार आहे. रिलायन्स उद्योग समूहाने देशातील सर्वाधिक क्षमता असलेला साखर कारखाना स्थापन करण्याचा मानस व्यक्त केला आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यादेखील या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. 'राज्याश्रया'त वाढलेली सहकारी साखर कारखानदारी, त्याच्या कालबाह्य यंत्रसामग्री, संपुष्टात आलेली विश्वासार्हता आणि कर्जबाजारीपणाचे ओझे यांच्यासह या स्पर्धेत कसे सामोरे जाऊ शकेल हा आमची सर्वांत मोठी आणि जटील समस्या आहे.

**(२) साखर कारखान्यासाठी राखीव कार्यक्षेत्र :** राज्य शासनाने महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण व गाळप आणि ऊस वितरण नियमन) १९८४ च्या आदेशात दि. ३० एप्रिल, १९९७ रोजी नवीन आदेश काढून झोनबंदी उठविली. साखर संघाने त्या आदेशाविरुद्ध मा. उच्च न्यायालयात व त्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयात रिटपिटीशन दाखल केले होते. परंतु दोन्ही मा. न्यायालयांनी राज्य शासनाने केलेली दुरुस्ती योग्य

ठरविली. राज्य शासनाने झोनिंग आदेशात केलेले बदल हे साखर उद्योगाच्या दृष्टीने हितकारक नाहीत. साखर उद्योगाच्या विकासाकरिता उसावरील झोनबंदी कायम ठेवण्यासाठी संघाने विशेष प्रयत्न केले. राज्य शासनाने या नियमाचा पुनर्विचार करण्यासाठी ४ फेब्रुवारी २००० समितीचे गठन केले. या समितीने सामाईक क्षेत्राची उपायोजना सुचविली होती. सहकारी साखर कारखानासंघाने असे प्रतिपादन केले होते की, केंद्र शासनाने अंगीकारलेल्या शिथिलीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण याचे परिणाम व त्या परिणामाचा एक भाग म्हणून नव्याने होऊ घातलेले खाजगी साखर कारखाने तसेच साखर कारखान्याच्या संख्येचा व ऊस उपलब्धतेचा विचार करणे आवश्यक होते. तसेच यापूर्वीच्या आदेशामध्ये सामाईक क्षेत्र यांची जी योजना सुचविण्यात आली होती. सामाईक क्षेत्राच्या निर्मितीतून काही प्रश्नही निर्माण झाले आहेत. ३०/४/१९९७ च्या ठराव मर्जीनुसार विल्हेवाटीच्या संकल्पनेमुळे आरक्षित क्षेत्र व विशेषतः सामाईक क्षेत्र यांची संकल्पना बऱ्याच प्रमाणात मोडीत निघाली असली तरी साखर कारखान्याकरिता त्यांचा ऊस उपलब्ध करून घेण्यासाठी किमान काही क्षेत्राचे निर्धारण आवश्यक आहे. तसेच या राज्यामध्ये साखर कारखानदारी बहुतेक सहकारी संस्थेकडे असल्याकारणाने त्यांचे पोटनियमातील कार्यक्षेत्रांचा क्षेत्रा निर्धारणासाठी विचार करण्यात आला. याशिवाय मूळ आदेशातील अन्य तरतुदीदेखील विचार करून आवश्यक असेल तेथे पुनर्मांडनी व नवीन तरतुदी सुचवून सर्व समावेशक असा पुनर्विलोकित क्षेत्र आरक्षण आदेश जारी करण्यासाठीचा मसुदा तयार करण्यात आलेला आहे.

साखर उद्योगासाठी उसाची उपलब्धता आवश्यक आहे. महाराष्ट्रात आज अस्तित्वात असलेल्या कारखानदारीची गरज भागविण्यासाठी किमान १२०० दशलक्ष मेट्रिक टन उसाचे उत्पादन आवश्यक आहे. प्रत्यक्षात ते त्याच्या निम्म्याहूनही कमी आहे. नवीन खाजगी कारखाने आणि त्यांनी देऊ केलेले अधिक दर यांचा विचार केल्यास सहकारी साखर कारखान्यांना गाळपासाठी लागणारा ऊस उपलब्ध होण्यात येणाऱ्या अडचणी आणि ऊस उपलब्ध न झाल्यास लवकर संपुष्टात येणारा गाळीप हंगाम आणि त्यातून उद्‌भवणारा तोटा हे दुष्टचक्र कायम राहण्याचा धोका उद्‌भवतो.

**(३) सदोष परवाना पद्धती :** सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेला मुख्यतः राजकीय दृष्टिकोणातून परवाना दिला जातो. त्या भागातील ऊस उत्पादन, पाणीपुरवठा व्यवस्था, नैसर्गिक अनुकूलता, दळणवळणाच्या सोई यांसारखे आवश्यक घटक विचारात घेतले जात नाहीत. त्याचा परिणाम कारखाना पूर्ण शक्तीने गाळप करण्यासाठी लागणारा ऊस बाहेरून आणावा लागतो.

**(४) अकार्यक्षम ऊस वाहतूक :** उसातील साखरेचा उतारा जास्तीत जास्त मिळविण्यासाठी उसाची तोड झाल्यावर तोआठ तासांच्या आत उत्पादन प्रक्रियेत घ्यावा लागतो. असे केल्यामुळे साखरेचे उत्पादन व कारखान्याची कार्यक्षमता वाढते. ऊस वाहतुकीची व्यवस्था अकार्यक्षम असल्याने उसाच्या वजनात व उताऱ्यात घट होत असल्याचे दिसून आले आहे.

**(५) गाळपक्षमतेचा वापर :** साखर कारखाना कार्यक्षमपणे चालण्याकरिता किमान १६० दिवस (वर्षातून) सतत ऊस पुरवठा होणे आवश्यक आहे. अजूनही उसाची शेती निसर्गतः पावसाची अनुकूलता यावर अवलंबून आहे. त्यामुळे उसाचा पुरवठा अनियमितपणे होतो. साखर कारखान्यांवर त्याचा परिणाम अनिष्ट होतो. उदा., १९८३ ते १९८९ पर्यंत ऊस पुरवठा समाधानकारकपणे नव्हता त्यामुळे कित्येक साखर कारखाने आजारी पडले. १९८३ मध्ये महाराष्ट्रातील ८५ साखर कारखान्यांपैकी १९ साखर कारखाने आजारी होते तर सध्या जवळजवळ ६० साखर कारखाने आजारी आहेत.

**(६) आयकराचा प्रश्न :**आयकर खात्याने कारखान्यांनी दिलेला अंतिम ऊस भाव अमान्य करून किमान ऊस भावापेक्षा जास्त दिलेली ऊस किंमत करपात्र करून आयकराची आकारणी केलेली आहे. त्यामुळे अनेक साखर कारखान्यांनी कोर्टात अपील दाखल केलेले आहे. हा प्रश्न सर्व कारखान्यांच्या बाबतीत आल्याने स्पेशल बेंचच्या नियुक्तीची मागणी करण्यात आली आहे. पण याबाबत ट्रब्यूनलने निर्णय घेतलेला नाही.

**(७) जुनी यंत्रसामग्री :** बऱ्याचशा साखर कारखान्यांतील यंत्रासामग्री जुनी झालेली आहे. पुरेशा पैशाची उपलब्धता सवलतीच्या दरात सरकारकडून किंवा

अर्थसंस्थांकडून न झाल्याने त्याचा परिणाम कारखान्याच्या उत्पादनावर, नफ्यावर होत आहे. त्यासाठी कारखान्याचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे.

**(८) अतिरिक्त कामगार :** अनेक कारखान्यांतून आवश्यकतेपेक्षा २० ते २५ टक्के कामगार जास्त नेमले गेले आहेत. त्यामुळे उत्पादन खर्चात वाढ होऊन नफा कमी झाला आहे.

**(९) अवास्तव खर्च :** अनेक साखर कारखान्यांतून अवास्तवपणे खरेदी केली जात आहे. उदा., यंत्राचे सुटे भाग, पोती (बारदान) तसेच अतिथी गृहावरील अवास्तव खर्च, सभासमारंभावर होणारा खर्च अनुत्पादक असल्याने कारखान्यांचे नुकसान वाढत आहे.

**(१०) सरकारी धोरणामुळे होणारे नुकसान :** साधारणपणे नोव्हेंबरपासून मार्चपर्यंत उसातील साखरेचे प्रमाण जास्त असते. एप्रिल ते जूनपर्यंत उसातील साखरेचे प्रमाण कमी असल्याने उत्पादन कमी पण ऊस व इतर उत्पादन खर्च कायम राहिल्याने कारखान्यांना तोटा होतो. अनेक वेळा सरकारी धोरणाप्रमाणे कारखाने चालू ठेवले जातात.

**(११) केंद्र शासनाचे साखर उद्योग विनापरवाना धोरण :** केंद्र शासनाचे ३१.८.९८ रोजी साखर उद्योग परवानामुक्त केल्याचे जाहीर केले. या धोरणात केवळ दोन कारखान्यांमधील अंतर १५ किलोमीटर असले पाहिजे, एवढेच बंधन ठेवण्यात आले. बाकी सर्व अटी काढून टाकण्यात आल्या. ज्या उद्योजकांना साखर कारखाना उभारावयाचा आहे, त्यांना उद्योग मंत्रालयात इंडस्ट्रिअल एन्टरप्रेनर मेमोरंडा सादर करून कारखाना काढता येऊ शकेल. याचा परिणाम नवीन कारखाना स्थापन झाल्यामुळे अस्तित्वात असलेले साखर कारखाने अडचणीत येण्याची शक्यता आहे.

**(१२) दर एकरी उसाची अल्प उत्पादकता :** महाराष्ट्रात उसाचे दर एकरी सरासरी उत्पादन ३० टन आहे. पण खर्च मात्र १५ हजार आहे. त्यामुळे आम उत्पादनात ऊस शेती परवडत नाही. पाण्याच्या घटत्या प्रमाणामुळे शेतकऱ्यांनी पीक पद्धतीत बदल केला आहे. परिणामी ऊस लागवडक्षेत्रात घट होत आहे. काही ठिकाणी उसाची कमतरता, काही ठिकाणी ऊस जास्त अशी परिस्थिती असल्यामुळे काही कारखाने बंद झाले आहेत म्हणजे ऊस नियोजनाबाबत दुर्लक्ष दिसून येते.

राज्यातील साखर उत्पादनाने बागायती शेतीला उर्जितावस्था आणली. परंतु वाढत्या ऊस उत्पादनाने राज्यातील शेती उत्पादनातील समतोल बिघडत चालला आहे. राज्य आजही अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण नाही. ऊस वगळता सर्व अन्नपिकांची महाराष्ट्राची उत्पादकता राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. तरीही राज्याची ७० सिंचनक्षमता ऊस उत्पादनावर खर्च होत आहे. अडीच टक्के लागवडीखालचे क्षेत्र वापरणाऱ्या ऊसाला सुमारे ७० टक्के पाणी खर्च होते. राज्यातील सिंचनक्षमता आठमाही तत्वावर वापरावी या राज्यशासनाच्या निर्णयामुळे राज्याच्या या अव्वल उद्योगात निरनिराळे वाद निर्माण झाले आहेत. राज्यात नव्या २२५ साखर कारखान्यांचे साधारणपणे १२,००० हेक्टर ऊसक्षेत्र अपेक्षित असते. आता इतक्या सर्व कारखान्यांसाठी ऊसाचे क्षेत्र आपल्याकडे नाही.

मुळा, गंगापूर, प्रवरा, गिरणा या नद्यांच्या पाटावर किंवा त्या भागातील विहिरींवर पश्चिम महाराष्ट्रात ऊसशेती व साखर कारखाने वाढले. पण तेथील पाणी कमी झाल्याने आता तेथील ऊसशेतीतील उत्पादकता कमी झाली आहे. सरकारच्या नव्या धोरणाने आता विना-साखर कारखाना जिल्ह्यातच नवे कारखाने दिले जात आहेत. त्यामुळे विदर्भातील भंडारा, नागपूर, वर्धा या जिल्ह्यांना नवे साखर कारखाने मिळाले आहेत.

**(१३) ऊस तोडणी मजुरांच्या समस्या :** साखर कारखान्यांत वाढ होत असताना ऊस तोडणी मजुरांमध्ये वाढ होत नाही, त्यामुळे असे मजूर मिळविण्याबाबत साखर कारखानदारांत स्पर्धा सुरू होते. तोडणी मजूरांवर त्यांच्यावर बळजबरी होते, त्यांना पुरेशी मजुरी दिली जात नाही व तेथे वेठबिगारी चालते अशा तक्रारी आहेत. असे प्रकार दूर व्हावेत व विशेष करून अनुसूचित जाती व जमातीतील लोकांना संरक्षण मिळावे यासाठी कडक कायदाही केला आहे. साखर कारखान्यांनी स्वतःच्या परिसरातील अशा गैरप्रकाराबद्दल अधिक जागरूकता व आस्था दाखवली तरच असे प्रकार थांबतील, पण दुर्दैवाने तसे घडत नाही.

**(१४) अन्य समस्या :** महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघाने शासनाच्या निदर्शनास खालील समस्या आणल्या आहेतः

(१) खुल्या साखर विक्रीपासून मिळणाया उत्पन्नात घट.

१९९८ मधील प्रतिक्विंटल दर रु. १३०५ ( ३४०)

२००३ मधील प्रतिक्विंटल दर रु. ९६५

(२) लेव्ही साखरेची शासनाचे नॉमिनीजकडून न होणारी उचल. आजमितीला ४.४६ लाख टन (रु. ५६५ कोटी) शिल्लक.

(३) लोकरी मावा किडीमुळे ऊस उत्पादनात हेक्टरी ३० टनापर्यंत घट व साखर उताऱ्यात २ टक्के घट.

(४) किमान वैधानिक दर देण्यात कारखान्यांना येणाऱ्या अडचणी. ऊस उत्पादकांचे व कारखान्यांचे दोघांचे आर्थिक नुकसान.

(५) पूर्व हंगामीखेळते भांडवल कर्जाबाबत शासन थकहमीची अट व थकहमी मिळूनही प्रत्यक्ष रकमा मिळण्यातील अडचणी.

(६) जागतिक बाजारपेठेमधील दर लक्षात घेता साखर निर्यातीचे अपुरे अनुदान.

(७) केंद्र शासनाने योग्य बफर स्टॉक न करणे. त्यावरील व्याज, साठवणूक खर्च व निर्यात अनुदानाच्या रकमा मिळणेस होणारा दीर्घ विलंब.

(८) वित्तीय संस्था, बँका यांचेकडून वेळेवर कर्जाची उपलब्धता न होणे.

(९) आजारी कारखान्यांच्या पुनर्वसन कार्यक्रमाबाबत राज्यकेंद्र शासनाची उदासिनता व निरनिराळ्या कमिट्यांनी सुचविलेल्या शिफारशीच्या अंमलबजावणीस होणारी दिरंगाई.

(१०) नवीन कारखान्यांना अपुरे भागभांडवल शिवाय वेळेवर भागभांडवलाची उपलब्धता नाही.

(११) नवीन कारखान्यांना केंद्र शासनाकडून इन्सेंटीव्ह योजनांचे फायदे मिळण्याबाबत अडचणी.

सहकारी साखर उद्योगाचे पुर्नवसन झाले नाही, तर त्यातून खालील समस्या उद्‌भवतील:

(१) एकूण साखर कारखानदारीवर अवलंबीत असलेल्या २.५ कोटी लोकसंख्येवर थेट परिणाम.

(२) ८ लाख ऊस तोडणी मजुरांच्या रोजगारावर गंडांतर (वर्षागणिक सुमारे रु.२००० कोटी)

(३) ग्रामीण भागातील कारखाना पुरस्कृत शैक्षणिक व वैद्यकीय संस्था बंद पडल्यामुळे शैक्षणिक तसेच आरोग्यविषयक सोयींवर विपरित परिणाम.

(४) वित्तीय संस्थांच्याबँकांच्या कर्जाच्या परतफेडीवर, वसुलीवर विपरीत परिणाम व एकूणच ग्रामीण अर्थव्यवस्था उध्वस्त होण्याची भीती.

(५) साखर निर्यातीपासून देशाला उपलब्ध होणाऱ्या सुमारे रु. १००० कोटी इतक्या परकीय चलनाची हमी.

(६) साखर उद्योगावर आधारीत इतर पूरक उद्योगावर बंदीची दाट छाया.

(७) ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा योजनांवर गंभीर आपत्ती.

(८) शासनास मिळणाऱ्या महसुली उत्पन्नात घट.

(९) बेरोजगारीचे प्रमाणात वाढ व ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर व त्यामुळे होणारे विभागीय असंतुलन परिणामस्वरूप भूकबळी, आत्महत्या यांची शक्यता व त्यामुळे कायदा सुव्यवस्थेवर होणारा परिणाम.

(१०) ग्रामीण भागातून विकसित होत असलेल्या तरुण नेतृत्ववाढीवर मर्यादा.

**७.६.शिफारसी :**

महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष श्री. विक्रमसिंह घाटगे यांनी ५० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सहकारी साखर उद्योगाचे पुर्नवसन आणि त्यास उर्जितावस्था प्राप्त होण्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्याकडे केलेल्या मागण्यांशी सदर अभ्यासक सहमत आहे. त्या मागण्या खालीलप्रमाणे आहेतः

**७.६.१. राज्य शासनाकडे करण्यात आलेल्या मागण्या :**

(१) साखर निर्यातीसाठी अनुदान.

(२) महाराष्ट्रा बाहेरील राज्यात साखर विक्रीसाठी उत्तर प्रदेश व बिहार प्रमाणे वाहतूक अनुदान.

(३) उपपदार्थ उत्पादनास प्रोत्साहन देण्यासाठी शासकीय मदत.

(४) नाबार्ड पॅकेजच्या अटी शिथील करण्याबाबत राज्य शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

(५) बँकांच्या व्याज दरामध्ये एकसुत्रता आणणे गरजेचे आहे.

(६) पूर्व हंगामी कर्जाच्या मर्यादेत वाढ करणे.

(७) पुढील पाच वर्षासाठी ऊसावरील खरेदी कर माफ करणे.

(८) साखर कारखान्यांच्या लेखा परिक्षणाची फी ५० पैसे प्रति क्विंटल प्रमाणे करणे.

(९) साखर उतारा घट भरपाई देणे.

(१०) दोन साखर कारखान्यांमधील किमान अंतर १५ किलोमीटर वरून २५ कीलोमीटर पर्यंत वाढविणे.

(११) ऊस पिकासाठी पाण्याची अग्रक्रमाने उपलब्धता करून देणे.

(१२) ऊस वाहतूकीवरील टोल चार्जेस रद्द करणे.

(१३) पाण्याचे व वीजेचे दर कमी करणे.

(१४) ऊसतोडणी व वाहतूक करणाऱ्यांना, गुजरात राज्याप्रमाणे शेतमजूर म्हणून जाहीर करण्यासाठी आदेश काढणे.

(१५) ऊस तोडणी व वाहतूक करणाऱ्या मजूरांची ट्रकमधून वाहतूक करण्यास परवानगी देणे.

(१६) अर्कशाळेमधील अबकारी खात्याचे कर्मचारी कमी करणे.

(१७) साखरेचा वॅटमध्ये समावेश न करणे.

(१८) वीज बिलाबाबत कृषि संजीवनी योजनेचे पुनर्जीवन करणे.

(१९) शेतकऱ्यांना वीज दराच्या आकारणीबाबत हॉर्सपॉवर किंवा मीटरप्रमाणे वीज बिलांची आकारणी करण्याचे स्वातंत्र देणे.

(२०) किमान ऊस दरापेक्षा जादा देण्यात येणारे ऊस दर आदेश सहकारी सोसायट्यांचा कायदा कलम ७९ अ खाली काढण्याचे आदेश देणे.

**७.६.२. केंद्र शासनाकडे करण्यात आलेल्या मागण्या :**

(१) २००७-०८ पर्यंत साखर विनियंत्रित करू नये.

(२) लेव्ही साखर रद्द करावी.

(३) उत्पादित साखर ५० किलोच्या कोणत्या पोत्यात भरावयाची याचे स्वातंत्र्य कारखान्यांना द्यावे.

(४) साखर निर्यातीसाठी केंद्र शासनाकडून अनुदान मिळावे.

(५) इसेन्शियल कमोडिटीज् ॲक्टमधून साखर वगळावी.

(६) नियंत्रित साखरेचे तसेच त्या साखरेच्या वाहतूकीच्या दराची फेर आकारणी करणे.

(७) साखरेवरील व मळीवरील अबकारी करामध्ये कपात करणे.

(८) सहकारी साखर उद्योग आयकरामधून वगळणे.

(९) सहकारी साखर कारखान्यांसाठी बी.आय.एफ.आर. प्रमाणे व्यासपीठ (प्लॅटफॉर्म) उपलब्ध करून देणे.

(१०) सातव्या, आठव्या व नवव्या पंचवार्षिक योजने अंतर्गत उभारलेल्या किंवा विस्तारित केलेल्या कारखान्यांना संपत कमिटीचे फायदे देणे.

(११) साखर विकास निधीच्या थकीत कर्जावर दंडात्मक व्याज आकारणी करू नये.

(१२) २००४-०५ व २००५-०६ साठी बफर स्टॉक तयार करणे.

(१३) साखर उद्योगाला प्रायॉरिटी स्टेटस् देणे.

(१४) नॅशनल शुगर बोर्डची स्थापना करणे.

(१५) घाऊक किंमत निर्देशांकामध्ये साखरेला योग्य ते वेटेज देणे.

(१६) इथेनॉलची उत्पादनाशी निगडित किंमत पुढील पाच वर्षांसाठी जाहीर करणे.

(१७) साखर व तद्अनुषंगिक उत्पादनांचा विशेष आर्थिक झोनमध्ये समावेश न करणे.

**७.६.३ अन्य शिफारशी :**

सहकारी साखर उद्योगाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी खालील उपायोजना उपयुक्त ठरू शकतील:

(१) केंद्र शासनाने साखर निर्यात अनुदान प्रती क्विंटल रु. २०० करणे.

(२) राज्य शासनाने ऊस खरेदी करात तीन हंगामाकरिता पूर्ण माफी.

(३) राज्य शासनाकडून कारखान्यांना देय असलेल्या रक्कमांचे वितरण लवकर करणे.

(४) राज्य शासनाने थकीत हमी फी २ टक्के कमी करून अर्धा टक्का करणे.

(५) केंद्र शासनाकडे प्रलंबित उदा., बफर स्टॉक, निर्यात अनुदान, एस.डी.एफ. इ. विषयांबाबत दिल्ली येथे खास अधिकारी नेमून राज्य शासनाने त्याचा पाठपुरावा करणे.

(६) उपलब्ध सिंचनाच्या योग्य वापरासाठी, ठिबक सिंचनाचे अनुदान सरसकट उपलब्ध व्हावे.

(७) शासकीय कर्ज, भांडवल परतफेड व मुदत कर्जावरील व्याज यावर सवलत व मुदतवाढ देणे.

(८) राज्य शासनाने आजारी कारखान्यांच्या पुनर्वसनाचा कार्यक्रम तयार करणे व तो राबविणे.

(९) राज्य शासनाने आजारी कारखान्यांना खेळते भांडवल त्वरित देणे.

(१०) ऊस उत्पादन वाढीच्या तसेच ऊस विकासाबाबत योजना आखून त्यांची त्वरित अंमलबजावणी होणे.

(११) सहवीज निर्मिती व इथेनॉल हे उपपदार्थ प्रकल्प राबविण्यासाठी राज्य व केंद्र शासनाने उद्योगास आर्थिक सहाय्य द्यावे.

(१२) केंद्र शासनाकडे किमान ऊस दर देण्याबाबतच्या कर्जाची त्वरित उपलब्धता करून देणे.

(१३) बँकांचे व्याजदर १० टक्क्यांपर्यंत आणणे.

(१४) सहकारी साखर कारखानदारांनी आणि परिक्षण करावे आणि आपल्या अखत्यारीतील कारखान्यातील त्रुटी दूर करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे. साखरेचे राजकारण करत असताना १९९० पूर्वीप्रमाणेच अर्थकारणाचा ग्रामीण विकासाचा विसर पडू नये. ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केल्यास खाजगी क्षेत्र आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या स्पर्धेस सामोरे जाताना कोणत्याही अडचणी उद्भवणार नाहीत. समस्यांचे निराकरण करण्यासाठी सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे 'राजकीय इच्छाशक्ती' आहे. मागील दोन वर्षातील परिस्थिती आशादायक होती, सर्वांच्या प्रयत्नाने महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया असलेल्या सहकारी साखर उद्योगास उर्जितावस्था प्राप्त होऊ शकेल.

**७.७ महाराष्ट्रातील साखर कारखानदारीचे सुक्ष्मस्तरीय मूल्यमापनः**

सुक्ष्मस्तरीय विश्लेषणासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याचे यष्ठी अध्ययन करण्यात आले आहे. या कारखान्याच्या कामगिरीचे मूल्यमापन खालीलप्रमाणे आहेः

१. श्री भोगावती सहकारी कारखान्याच्या ऊस उत्पादपक आणि बिगर सभासदांचा अभ्यास केल्यानंतर हे सभासद विविध जाती, धर्म, आणि पंथांचे असल्याचे आढळले. ग्रामीण समाजामध्ये राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावण्याच्या दृष्टीने कारखान्याने हातभार लावलेला आहे हे यावरून स्पष्ट होते.

२. श्री भोगवती सहकारी साखर कारखान्याने आपल्या व्यवस्थापन मंडळामध्ये सर्व स्तरातील मंडळींचा समावेश करून घेऊन सहकाराच्या समतेच्या तत्वाचे पालन केल्याचे दिसून येते.

३. श्री भोगावती सहकारी कारखान्याचे जास्तीत जास्त पदाधिकारी व सेवक हे कारखान्याचे सभासद आहेत.

४. सहकाराच्या माध्यमातून कारखाना, कार्यक्षेत्रातील सभासद, ऊस ऊत्पादक, सामान्य जनता यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहेत.

५. कारखाना कार्यस्थळावर बालवाडीपासून कला आणि विज्ञान शाखांच्या पदवीपर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे. तसेच इंग्रजी माध्यमाची निवासी शाळा, आय. टी. आय. इत्यादी शैक्षणिक संस्थांची स्थापना केलेली आहे. प्रतिवर्षी करवीर आणि राधानगरी तालुक्यातील प्रत्येकी एका गावात एका प्राथमिक शाळेसाठी वर्गखोली बांधून देण्याची योजना राबवण्यात आलेली आहे. या उपक्रमाचा लाभ कारखाना कार्यक्षेत्रातील बहुसंख्य सभासदांच्या मुलांना मिळालेला आहे.

६. तांत्रिक स्वरूपाची काही पदे वगळता इतर पदे स्थानिक पातळीवर भरली जात असल्याने पदांच्या निवडीमध्ये सभासदांच्या मुलांना प्राधान्य देण्यात येते. त्यामुळे कारखाना कार्यक्षेत्रातील बेरोजगारीची समस्या कमी होण्यास मदत झालेली आहे.

७. शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांच्या आयोजनाबरोबरच कारखान्यामार्फत राष्ट्रीय सण, थोर व्यक्तींच्या जयंत्या, गणेशोत्सव इत्यादी कार्यक्रम पार पाडले जात असल्याने कारखान्याने एक प्रकारचा सांस्कृतिक वारसा जोपासलेला आहे.

८. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये साखर, गूळ, सुतउद्योग, मधुमक्षिकर पालन, खरेदी-विक्री करणाऱ्या संस्था, अर्थपुरवठा करणाऱ्या संस्था इत्यादीमध्ये सहकाराने शिरकाव केल्यामुळे ग्रामीण जनतेमध्ये आर्थिक सुबत्ता निर्माण होण्यास मदत झालेली आहे.

९. कारखान्यामध्ये कुशल-अकुशल कामगारांबरोबरच काही रोजंदारी कामगारांची ऊस तोडणी-ओढणी कामगारांची नियुक्ती करण्यात आल्यामुळे अशा कामगारांमध्ये असणारी बेरोजगारीची समस्या दूर होण्यास मदत झालेली आहे. गळीत हंगामामध्ये प्रत्येक वर्षी २००० ते २५०० ऊस तोडणी-ओढणी व रोजंदारी कामगारांना कारखान्यामार्फत काम उपलब्ध करून दिले जात आहे.

१०. कुटुंब नियोजनासारख्या राष्ट्रीय कार्यक्रमामध्ये कारखान्याने उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

११. ऊसाची लागवड शास्त्रीय पद्धतीने करण्यासाठी माती परिक्षण करणे, सुधारित बी-बियाण्यांचा वापर व पुरवठा, खतांचा योग्य वापर, जंतुनाशकांचा योग्य वेळी वापर करणे, त्यासाठी सबसिडी देणे, ऊसाची लागवड करण्याच्या शास्त्रीय पद्धती अवलंबणे, नियमितपणे पाणीपुरवठा करणे, ऊस तोडणीचे वेळापत्रक बनवणे आणि त्यानुसार तोडणी करून घेणे इ. कामे कारखान्यामार्फत नियोजनबद्ध पद्धतीने केली जात असल्याने कार्यक्षेत्रातील जनतेच्या प्राप्तीच्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

१२. कारखाना कार्यक्षेत्रामध्ये भोगावती नदीवर लक्ष्मीधरण (राधानगर डॅम) प्रकल्प व अन्य पाणीपुरवठा प्रकल्पांची निर्मिती झाल्याने कार्यक्षेत्रातील नद्या बारमाही भरून वाहू लागल्या आहेत. ऊसाच्या उत्पादनात वाढ झालेली असून उन्हाळी पिके मोठ्या प्रमाणात घेतली जाऊ लागली आहे.

१३. श्री भोगावती सहकारी कारखाना सेवकांची पतसंस्था कारखाना स्थळावर कार्यरत असून ''ना नफा ना तोटा'' या तत्वावर सभासदांना वस्तूंचा पुरवठा केला जातो. आकस्मिक कर्जाची सोय तसेच क्रेडिटवर मालाची उचल करण्याची सोय असल्याने सावकारी कर्ज वा अन्य संस्थांचे कर्ज उचल करण्याची गरज भासत नाही.

१४. श्री भोगावती सहकारी कारखान्याचा साखर उतारा प्रतिवर्षी वाढलेला असून सन २००१-०२ मध्ये १३.१६ टक्के इतका उतारा मिळाल्याने त्या वर्षाचे वसंतदादा शुगर इन्स्टिट्युटचे तांत्रिक कार्यक्षमतेचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक कारखान्यास प्राप्त झाले आहे.

१५. कारखान्यामार्फत आयोजित केल्या जात असलेल्या सामुदायिक विवाह सभारंभामुळे विवाहधारकांच्या खर्चामध्ये फार मोठी बचत झालेली आहे. बचत झालेल्या रक्कमेतून त्यांनी आपले व्यवसाय उभारले आहेत. मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या कमकुवत मंडळींच्या दृष्टीने हा उपक्रम अधिक फायदेशीर ठरला आहे.

१६. सन १९९५-९६ ते सन २००४-०५ या दशकामध्ये कारखान्यामार्फत पुरवण्यात आलेल्या वृक्ष व फळझाडे वाटप योजनेतून पुरवण्यात आलेल्या रोपांची लागवड करून सभासदांनी स्वतंत्र फळबागा तयार केलेल्या आहेत. हे सभासद पारंपारिक पिकांच्या तुलनेने दुप्पट उत्पन्न घेऊ लागले आहेत. काही सभासद तर फळबागेतून अंतर्गत पिके घेऊन आपले उत्पादन वाढवू लागले आहेत. भविष्यामध्ये अशा प्रकारच्या फळबागांची निर्मिती व्हावी असे बहुसंख्य सभासदांचे मत आहे.

१७. कारखान्याच्या उपसा जलसिंचन योजनांमुळे कारखाना कार्यक्षेत्रातील पाण्याची पातळी वाढली आहे. विहिरी आणि तलाव यांची पाण्याची पातळी सुधारली आहे. उन्हाळी पिके तसेच जनावरांचे हिरवे चारे मोठ्या प्रमाणात घेतले जाऊ लागले आहेत. अन्यधान्य, दूध आणि ऊसाचे पीक यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक प्राप्ती होऊ लागली आहे.

१८. सन १९९५-९६ ते सन २००४-०५ या कालावधीमध्ये ९१३ सभासदांना बायोगॅस सयंत्र निर्मितीसाठी अनुदान पुरवण्यात आले. स्लरीपासून (शेणराड्यापासून) मिळणाऱ्या खताचा वापर पिकांसाठी केला जात असल्याने भरघोस उत्पन्न मिळू लागले आहे. रासायनिक खतांचा वापर कमी झाल्याने आर्थिक बचत झाली आहे. इंधनाच्या खर्चात बचत झालेली आहे. हागंदारीमुक्त गावे बनण्यास मदत झालेली असून सार्वजनिक आरोग्य सुधारण्यास मदत झालेली आहे.

१९. ऊस बियाणे मळा या प्रकल्पांतर्गत ऊसाच्या सुधारित जातींची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाऊ लागली आहे. को. ७५२७, को. ७४०, को. ८११ यासारख्या जाती मागे पडल्या असून कोसी ६७१, को. ८६०३२ या सुधारित जातींची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात येऊ लागली आहे. ऊस क्षेत्रामध्ये वाढ झाल्याने उत्पादनात वाढ झालेली आहे. ग्रामीण भागाचा आर्थिक विकास होण्यास मदत झालेली आहे. गळीतलायक ऊस उत्पादनापेक्षा ऊस बेणे तयार करण्यावर सभासद अधिक भर देऊ लागले आहेत. एक एकर क्षेत्रातून गळीतलायक ऊसाचे ऊत्पादन - ४०,००० इतके मिळत असून तेवढ्यात क्षेत्रातून रु. ९६,००० किंमतीचे ऊस बेणे उपलब्ध होते. हे उत्पन्न दुप्पटीहून अधिक असल्याने सभासदवर्ग ऊस बेणे तयार करून उत्पन्न वाढवू लागले आहेत.

२०. श्री भोगवती सहकारी साखर कारखान्याचे सन १९९५-९६ ते सन २००४-०५ या कालावधीत नवीन रस्ते कारखाना कार्यक्षेत्रामध्ये तयार केलेले असून त्यांच्यावर कोट्यावधी रुपये खर्च करण्यात आलेला आहे. शासकीय अनुदानातून काही रस्ते तयार करण्यात आलेले आहेत. रस्त्यांमुळे कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस कारखान्यावर आणणे सोयीचे झाले आहे.

२१. ऊस वाहतूक साधनांची उपलब्धता करून दिल्यामुळे कारखाना कार्यक्षेत्रातील सुशिक्षित बेरोजगार मंडळींना रोजगाराची संधी प्राप्त झालेली आहे. बाहेरच्या ठिकाणाहून ऊस वाहतुक साधने मागवणे जवळजवळ बंद झालेले आहे.

२२. भोगवती येथे कुस्ती स्पर्धांचे आयोजन हा श्री भोगवती सहकारी साखर कारखान्याचा अलिकडचा उपक्रम असला तरी त्याला उदंड प्रतिसाद लाभलेला आहे.

२३. उत्पादक क्षमतेच्या मूल्यमापनामध्ये ऊस गळीत हंगाम कमी-अधिक दिवस चालल्याचे आढळले. ज्यावर्षी ऊस पिकावर रोगराई अधिक (लोकरी मावा, इतर किडींचा प्रादुर्भाव) त्यावर्षी गळीत हंगाम कमी दिवस चालल्याचे आढळले. याऊलट ऊस पिकावर रोगराई कमी आणि कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस पिकाखालील लागवडक्षेत्र अधिक त्या वर्षामध्ये गळीत हंगामाचे दिवस वाढलेले आढळले.

२४. स्थूल आर्थिक मूल्यमापनाचा अभ्यास केल्यानंतर सन १९९९-२००० या आर्थिक वर्षामध्ये साखर व इतर उत्पादनांची विक्री वाढल्यामुळे निव्वळ नफा ११४ टक्क्यांवरून २०६ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे आढळले. याच वर्षामध्ये समाजाभिमुख प्रकल्पांवर अधिकाधिक खर्च झालेला आहे. यावरून हे स्पष्ट होते की, कारखान्याला झालेला नफा हा समाजाभिमुख प्रकल्पांसाठी वापरला गेला आहे.

२५. सन २००१-२००२ या आर्थिक वर्षानंतर कारखान्याचा निव्वळ नफा घसरला आहे. कारखान्याच्या आर्थिक क्षमतेच्यादृष्टीने ही बाब चिंतनीय असली तरी या वर्षामध्ये समाजाभिमुख प्रकल्पांवर झालेल्या खर्चाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कारण विविध उपक्रमांवर अधिकाधिक खर्च कारखान्याने केलेला आहे. यावरून हे स्पष्ट होते की,

नफ्यापेक्षा सभासदांचे हित साधण्याचा प्रयत्न कारखान्याने केलेला आहे. केवळ नफा कमवणे हे उद्‌दिष्ट कारखान्याने ठरवलेले नाही.

२६. सन १९९५-९६ ते २००४-०५ या दशकातील साखर व इतर उत्पादन विक्री खर्च २२५ टक्क्यांपर्यंत वाढलेला आहे. याच वर्षामध्ये कामगार कल्याण व प्रशिक्षण खर्च व प्रशासकीय खर्च ४५४ टक्के, पगार व मजूरी खर्च ७०४ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. यावरून हे स्पष्ट होते. की, वाढत्या महागाईनुसार उत्पादनखर्च व प्रशासकीय खर्च यामध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. परिणामी कारखान्याचा निव्वळ नफा घटलेला आहे.

२७. कारखान्याने प्रतिवर्षी कारखान्याला मिळणारा एकूण नफा सभासदांना तसेच कारखाना कार्यक्षेत्रातील जनतेला विविध प्रकल्पांच्या माध्यमातून सेवा देण्यासाठी वापरलेला आहे. यावरून सहकाराच्या 'ना नफा ना तोटा' या तत्वाचे कारखान्याने पालन केल्याचे दिसून येते.

२८. कारखाना कार्यक्षेत्रातील जास्तीतजास्त सभासद प्रयोगशील बनले आहेत. ते आपल्या शेतजमिनीत अनेक प्रकारचे प्रयोग करून उत्पादन वाढवत आहेत.

**७.८ शिफारसी :**

श्री भोगवती सहकारी साखर कारखाना अधिकाधिक समाजाभिमुख बनवावा, त्याची उत्तरोत्तर प्रगती व्हावी म्हणून खालील शिफारसी केल्या आहेतः

१. श्री भोगवती सहकारी साखर कारखान्याचे जे सभासद आहेत त्यांची शेतकरी सहकारी बँक स्वतंत्रपणे स्थापन करणे जरूरीचे आहे. अशा प्रकारची बँक स्थापन केल्यामुळे सभासद आपल्या ठेवी या बँकेमध्ये ठेवू लागतील. शेतकऱ्यांच्या गरजेनिहाय त्यांना कर्ज उपलब्ध होऊ शकेल. त्याचबरोबर ठेवीवर आकर्षक लाभांश मिळेल.

२. कारखाना स्थळावर कला आणि विज्ञान शाखेचे स्वतंत्र महाविद्यालय सध्या कार्यरत आहे. याच्याबरोबरच मेडीकल व इंजिनिअरींग कॉलेजची सोय होणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतकरी सभासदांच्या मुलांची उच्च शिक्षणाची सोय होईल.

३. वारणा सहकारी साखर कारखान्याप्रमाणे सहकारी तत्वावर आधारित विविध उद्योग श्री भोगवती सहकारी साखर कारखान्याने सुरू केले पाहिजेत. त्यामुळे कारखाना

कार्यक्षेत्रातील युवायुवतींना, स्त्रीवर्गाला रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. ग्रामीण भागातील बेरोजगाराचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

४. कारखाना परिसरात स्वच्छतेचा उपक्रम कारखान्यातील कामगारांच्या सहकार्याने हाती घेणे गरजेचे आहे. परिसराच्या स्वच्छतेबरोबर कामगारांमध्ये ऐक्याची भावना निर्माण होण्यास मदत होणार आहे. परिसर स्वच्छतेची सवय लागल्यामुळे राहत्या घराच्या परिसरातील स्वच्छतेकडेदेखील कामगारवर्ग जातीने लक्ष घालणार आहे. त्यामुळे आरोग्य व समृद्धी लाभण्यासदेखील मदत होणार आहे.

५. श्री भोगवती सहकारी साखर कारखान्याची जी सेंटरर्स आहेत त्या त्या ठिकाणी सभासदांसाठी ग्राहक वस्तू भांडारे उघडणे जरूरीचे आहे. शेतीच्या कामाच्या निमित्ताने कारखाना सेंटरवर आलेले सभासद अशा ग्राहक वस्तू भांडारातून रास्त भावामध्ये शेती उपयुक्त अवजारे व साधने खरेदी करू शकतील.

६. ऊस उत्पादक सभासदांची आर्थिक पत विचारात घेऊन कारखान्याने सभासदांना घरबांधणीसाठी गृहकर्ज उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यामुळे सभासदांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारण्यास मदत होणार आहे.

७. कारखान्यामार्फत विविध प्रकारचे प्रक्रिया उद्योग सुरू करणे आवश्यक आहे. त्यामुळे विविध प्रकारची उत्पादने तयाार केली जाऊन त्यांची विक्री होईल. त्यामुळे सहकाराची वृद्धि होण्यास मदत होणार आहे. उदा., बगॅसपासून कागदनिर्मिती, फळप्रक्रिया उद्योग इत्यादी.

८. कामगारांप्रमाणेच सभासदांसाठी देखील गरजेनिहाय काही उद्‌बोधनवर्गाचे आयोजन करण्यात आले पाहिजे. या वर्गामध्ये कारखान्याच्या नवीन उपक्रमांची माहिती, ऊसावर पडणारे रोगांचे प्रतिबंधात्मक उपाय, कंपोस्ट खताची निर्मिती आणि त्याचा वापर, सुधारित ऊसाच्या जाती इत्यादी विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली पाहिजेत. यामुळेदेखील सभासदांच्या मनामध्ये कारखान्याविषयी आपुलकी निर्माण होणार आहे. त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे.

९. वर्षातून एक-दोन वेळा कामगारांसाठी सहली आयोजित केल्या पाहिजेत. त्यामुळे अन्य ठिकाणाच्या कामाच्या पद्धती, त्या ठिकाणचे उत्पादन या विषयीची माहिती कामगारांना मिळेल. त्यानुसार ते आपल्या कारखान्याचे उत्पादन वाढवू शकतील.

१०. ऊस उत्पादक सभासदांसाठी ऊस पिकांच्या स्पर्धा ठेवण्यात आल्या पाहिजेत. प्रती हेक्टरमधून मिळणाऱ्या ऊसाचे उत्पन्न यामध्ये क्रमवारी ठरवून पहिल्या तीन क्रमांकाच्या सभासदांना आकर्षक बक्षिसे देण्यात यावीत. जेणेकरून कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल. कारखाना कार्यक्षेत्रातील विविध बचतगटांना लघुद्योग उभारण्यासाठी कारखान्यामार्फत अर्थसहाय्य करण्यात यावे.

☆☆☆

# संदर्भ ग्रंथसूची


१. डॉ. कामत, गो. स. सरकार : तत्व व्यवहार आणि व्यवस्थापन, प्रकाशक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती, श्री. दामोदर दिनकर कुलकर्णी, प्रथम आवृत्तीःजानेवारी १९७६

२. डॉ. कोपार्डेकर शरदचंद्र : सहकार परिचय, हिमालय प. हाऊस, मुंबई-४ प्रथम आवृत्ती : १९९४

३. कुलकर्णी पी. आर. : सहकार, तत्व आणि व्यवहार प्रकाशक मनोहर पिंपळापुरे, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी, पब्लिशर्स, नागपूर. प्रथम आवृत्ती : जून १९९०

४. श्री. कुलकर्णी भालचंद्र : बायोगॅस सयंत्राची उत्पादने, जानेवारी १९९३.

५. श्री. कुंभीजकर जी. व्ही. : सामाजिक संशोधन पद्धती. प्रकाशक भाग्यश्री मोरेश्वर फडके, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रकाशन वर्ष : १९८९-९०

६. प्रा. घाटोळे रा. ना. : समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती, प्रकाशक श्री. मंगेश प्रकाशन, शांतादुर्गा निवास २३, नवी सदाशीव पेठ, नागपूर१०.

७. प्रा. चौगुले व्ही. टी. : सहकाराची मुलतत्वे, प्रकाशक अनिरुद्ध अनंत कुलकर्णी, कॉन्टिनेंटल प्रकाशन, विजयनगर, पुणे३०. प्रथम आवृत्ती : १९७९.

८. प्रा. डॉ. जैन अशोक व्ही. : महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण शेठ पब्लिशर्स लि. प्रथम आवृत्ताी : ऑक्टोबर १९९८

९. प्रा. डॉ. जैन अशोक व्ही. : ग्रामीण विकास, शेठ पब्लिशर्स लि. प्रथम आवृत्ती : २००३

१०. डॉ. जोशी सी जे. : सहकाराचा विकास, प्रकाशक सौ. भाग्यश्री मोरेश्वर फडके, फडके प्रकाशन दुधाळी, कोल्हापूर आवृत्ती : २०००

११. जोशी भा. पं., : कुलकर्णी र. अ. फळप्रक्रिया, कॉन्स्टिनेंटल प्रकाशन, विजयनगर पुणे-४११ ०३०.

१२. डॉ. झेंडे गो. का. : ऊस विज्ञान भाग १ ला, प्रकाशक म. ना. जोशी, सन पब्लिकेशन्स ३१७, नारायण पेठ, पुणे-३०. प्रकाशन वर्ष १५ ऑगस्ट २०००

१३. प्रा. ठोंबरे शिवाजीराव, : फळबागांसाठी अल्पखर्ची तंत्रव्यवस्थापन, प्रकाशक
जोशी म. ना. सन पब्लिकेशन्स ३१७, नारायण पेठ, पुणे-३०.

१४. दास्ताने संतोष : महाराष्ट्र २००४ प्रकाशक दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, ८३० सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.

१५. नाडगोंडे गुरुनाथ द. : ग्रामीण समाजशास्त्र प्रकाशक अ. अं. कुलकर्णी कॉन्टिनेंटल प्रकाशन, विजयनगर कॉलनी, पुणे-३०.

१६. पाटील अ. व्य. : फळबाग तत्वे आणि पद्धती, प्रकाशक र. अ. कुलकर्णी कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे-३०. प्रथम आवृत्ती.

१७. पाटील एस. आर. : सहकार सुगंध, प्रकाशक एस. आर. पाटील मु. पो. पाडळी खुर्द, ता. करवीर, जि. कोल्हापूर. प्रथम आवृत्ती : १९८८.

१८. प्रा. बर्वे प. म. : साखर, प्रकाशक सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मंत्रालय, मुंबई-४०० ०३४.

१९. भांडारकर पु. ल. : सामाजिक संशोधन पद्धती, प्रकाशक महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती मंडळाकरिता, श्री. विनोद नांगीया. दत्तसन प्रकाशन, नागपूर.

२०. भोसलेकाटे : सहकाराचा विकास, प्रकाशक सौ. भाग्यश्री मोरेश्वर फडके, फडके प्रकाशन, कोल्हापूर. प्रथम आवृत्ती : जुलै २००२.

२१. भोसले के. एम., : सहकार सौ. भाग्यश्री मोरेश्वर फडके, फडके प्रकाशन, कोल्हापूर,
महाजन एस. डी. द्वितीय आवृत्ती : ऑगस्ट १९९४.

२२. प्रा. डॉ. सौ. मोहिते : कोल्हापुरातील सहकारी पतपेढी व्यवहार १९१३ ते १९४९ एक
पी. एम. ऐतिहासिक अभ्यास, प्रकाशक श्रीहरी प्रकाशन, १३९३ बी, मंगळवार पेठ कोल्हापूर. प्रथम आवृत्ती : २५ नोव्हेंबर १९९५.

२३. प्रा. रायखेलकर अे. आर. : सहकार : तत्वे आणि व्यवहार, प्रकाशक अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०. द्वितीय आवृत्ती : १९८९.

२४. प्रा. डॉ. वाघमारे : ग्रामीण विकास, प्राची प्रकाशन, मुंबई.
रघुनाथ प्रा. वझे अरविंद प्रकाशिका प्रा. सौ. संध्या मणेरीकर ३०३ 'सदाचार' रैयाणीग्राम, शिंपोली रस्ता, बोरिवली. प्रथम आवृत्ती : १९९६.

२५. प्रा. सराफ मोहन, : प्रा. आचार्य ना. मा — ग्रामीण अर्थव्यवस्था व सहकार, प्रकाशक श्रीपाद मुंजे विद्या प्रकाशन, रुईकर पथ, नागपूर-४४० ००२ प्रथम आवृत्ती : जून १९९१

२६. प्रा. सराफ मोहन, : प्रा. डॉ. शहा रूपा — सहकाराचा विकास, प्रकाशक सौ. भाग्यश्री फडके, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती : सप्टेंबर १९९९

२७. सौ. क्षिरसागर शोभा : सामान्य अध्यन पेपर दुसरा, 'असा हा महाराष्ट्र', प्रकाशक सौ. क्षिरसागर शोभा, पुणे-३०.

२८. मराठी विश्वकोश खंड ५ : महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई यंग, एडवर्ड ते रेयून्योंबेटे : संपादक तर्कतीर्थ श्री. लक्ष्मीशास्त्री जोशी प्रकाशन वर्ष १९८९

२९. डॉ. पाटील, जे एफ., : डॉ. कुलकर्णी पी. बी. — सहकारातील आरिष्ट करणे व उपाय समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, १९८९.

३०. डॉ. जुगळे वसंतराव, : सौ. जुगळे — साखर उद्योगाची परवाना आणि नियंत्रण, योजना सेंटर फॉर सोशल स्टडीज ॲन्ड रिसर्च, सांगली, २००२

३१. डॉ. जुगळे वसंतराव, : सौ. जुगळे — महाराष्ट्रातील सहकारी चळवळ दिशा आणि दशा, योजना, प्रबोधन प्रकाशनमाला, समाजवादी प्रबोधनी, इचलकरंजी, १०९६.

३२. डॉ. पाटील, जे. एफ., : डॉ. काकडे, व्ही. बी. प्रा. खाणाऊ, व्ही. आर., डॉ. जुगळे वसंतराव — सहकारी क्षेत्राचे संरक्षण व संवर्धन, प्रबोधन प्रकाशनमाला, समाजवादी प्रबोधनी, इचलकरंजी, १९९६.

३३. प्रा. धनंजयराव गाडगीळ : जन्मशताब्दी विशेषांक प्रबोधन प्रकाशन ज्योती, २००० समाजवादी प्रबोधनी, इचलकरंजी, २०००

३४. प्रा. डॉ. बाबीसकर, : बी. एस. — महाराष्ट्रातील साठोत्तर सहकार चळवळ, बदलता महाराष्ट्र (साठोत्तर परिवर्तनाचा मागोवा) डॉ. एन. डी. पाटील

३५. गौरव ग्रंथ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा, २००३ केशवराज जेधे, डॉ. फडके य. दी., श्री. विद्या, पुणे-१९८२.

# लेख-पुरवणी


१. कामत गो. स., वारणा एक सहकार तीर्थ, दैनिक केसरी-पत्रकार पुरवणी. जून १९८७

२. डॉ. कोळी पी. ओ. सहकारी महाराष्ट्र महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात रेशीम पैदास सहकारी संस्थाचे स्थान जून १९८९, वारणा माहितीपत्रिका सन २००४

३. नरदे अजित साखर डायरी २००१ ते २०१०

४. महाराष्ट्र शासन महाराष्ट्रातील साखर उद्योग उपयुक्त माहिती व आकडेवारी, संख्याशास्त्रीय विभाग, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि. साखर भवन, नरिमन पॉईंट, मुंबई४०० ०२१.

५. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित सहकारी महाराष्ट्र मासिके मे २००२, ऑगस्ट २००२

६. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित सहकारी महाराष्ट्र सहकारी सप्ताह विशेषांक जून २००२, नोव्हेंबर-डिसेंबर २००२

७. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित ४९ वा अखिल भारतीय सप्ताह दिनांक १४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर २००२ बी. जे. रोड, पुणे-४११ ००१.

८. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित ५० वा सुवर्ण महोत्सवी अखिल भारतीय सहकारी सप्ताह दिनांक १४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर २००३


९. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित ५१ वा अखिल भारतीय सहकारी सप्ताह शताब्दी वर्ष २००४ दिनांक १४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर २००२


१०. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित भारतीय सहकारी चळवळ शताब्दी महोत्सवी वर्ष २००४

११. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित सहकारी महाराष्ट्र परिषद विशेषांक नोव्हेंबर-डिसेंबर २००१ (सहकारी साखर कारखाने एक सिंहावलोकन)


१२. श्री. राजेंद्र दर्डा, सहकारी साखर उद्योगाची चार दशके प्रकाशक जयदत्त प्रकाशन प्रमिला निवास, ज्ञानदेव हौसिंग सोसायटी, ताराबाई पार्क, कोल्हापूर. प्रथम आवृत्तीःजानेवारी १९९६ किंमत रु. १५०

१३. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई वार्षिक अहवाल १९९९-२००० मे २००५-२००६



भारतातील साखर उत्पादन (लाख टना मध्ये)
२००
१८०
१६०
१४०
१२०
१००
८०
६०
४०
२०
०
११
३०.२१
३७.४
५१.५८
१२०.४७
१८५.१९
१९५०-५१
१९६०-६१
१९७०-७१
१९८०-८१
१९९०-९१
२०००-०१


महाराष्ट्रातील साखर कारखानदारीची वाढ
२००
१८०
१६०
१४०
१२०
१००
८०
६०
४०
२०
०
१३
२६
४२
७०
१०१
१२१
१२८
१३३
१४३
१६०
१७८
१८४
१८५
१९५१-५२
१९५९-६०
१९६९-७०
१९७९-८०
१९८९-९०
१९९७-९८
१९९८-९९
१९९९-२०००
२०००-२००१
२००१-२००२
२००२-२००३
२००३-२००४
२००४-२००५


# महाराष्ट्रातील जिल्हानिहाय साखर कारखाने




## महाराष्ट्र राज्य ऊस क्षेत्र (लक्ष एकर)




## महाराष्ट्र राज्य ऊस उत्पादन (लक्ष मे.टन)




# महाराष्ट्र राज्य गळीत हंगामाचे दिवस




## महाराष्ट्र राज्य ऊस क्षेत्र (लक्ष एकर)




## महाराष्ट्र राज्य ऊस उत्पादन (लक्ष मे.टन)



## महाराष्ट्रातील साखर कारखान्यांची सद्यस्थिती




# श्री भोगावती साखर कारखान्यातील कामगारांची संख्या




**श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते**

**ऊस बियाणे सबसिडी (रूपये)**




श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते

**सभासदांना वाटप केलेली रोपे**
**(१९९५-९६ ते २००३-०४)**




श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते

## सभासदांना पुरविलेली रोपे (१९९५-९६)




श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते

## सभासदांना पुरविलेली रोपे (२००२-०३)




श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते

## वृक्ष व फळझाड योजनेचा लाभ मिळालेले सभासद




### श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते

## अनुदानपात्र गोबरगॅस सयंत्रे




## श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते

### भागभांडवल रूपये




## श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते

### एकूण गाळप (मे.टन)




## श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते

# साखर उतारा




## महाराष्ट्र साखर उतारा (२००२-०३)




## श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते

# ऊस गळीत हंगाम कालावधी




श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते

## सभासदांना दिलेली ऊस रक्कम



## श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते


### सभासद संख्या



## श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते


# सभासदांना माफक दरामध्ये पुरविलेली साखर (किलोमध्ये)

(प्रती टन १ किलोप्रमाणे)




## श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते

### साखर उत्पादन (पोती)



## श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., परिते

# मोलॅसिस व इतर उपपदार्थ उत्पन्न



# चर्चात्मक अभ्यास




भोगावती सहकारी साखर कारखाना प्रवेशद्वार



कारखान्याच्या कार्यकारी संचालकांबरोबर कार्यालयीन चर्चा



कार्यकारी संचालक कारखाना परिसराची माहिती देताना

# कारखान्याचे सामाजिक उपक्रम



कामगार वसाहत




कामगार विकास सोसायटी कार्यालय



कारखाना कार्यालयात साजरी केली जाणारी शिवजयंती

# कारखान्याचे सामाजिक उपक्रम



कारखान्यामार्फत भरविल्या जाणाऱ्या कुस्ती स्पर्धा



कारखान्याने दत्तक घेतलेले मल्ल



कारखान्यामार्फत संपन्न होणारे सामुदायिक विवाह

# कारखान्याचे सांस्कृतिक उपक्रम



डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती



छ. शाहू महाराज जयंती



महात्मा गांधी जयंती

# कारखान्याचे शैक्षणिक उपक्रम




कारखान्यामार्फत चालविले जाणारे माध्यमिक विद्यालय (शाहूनगर)



कारखान्यामार्फत चालविले जाणारे इंग्रजी माध्यमाचे पब्लिक स्कूल व वसतिगृह (शाहूनगर)




कारखान्यामार्फत चालविले जाणारे पदवी महाविद्यालय (कुरूकली)

# कारखान्याचे फलोद्यान उपक्रम



कारखाना परिसरातील वृक्षारोपण कार्यक्रम



कारखाना परिसरातील फळझाडे



कारखाना पंचक्रोशीमधील पाणंद रस्ते

# कारखान्याचे उपक्रम व कृषी विकास



सुधारित ऊस बेणे प्लॉट (जात नं. ९५०५)



लागवडीसाठी सुधारित बेणे निवडताना



पडिक/माळरान जमीन लागवडीखालील क्षेत्र

# कारखान्याच्या पंचक्रोशीमधील योजना व ग्रामीण विकास



कारखान्यामार्फत चालविल्या जाणाऱ्या उपसा जलसिंचन योजनेचा पंपहाऊस



नदीपात्रातील पाणी उपसा पंप



उपसा जलसिंचनाद्वारे घेतले जाणारे उन्हाळी भातपीक

# कारखाना अंतर्गत परिसर



ट्रॅक्टर ट्रॉलीमधून क्रेनच्या सहाय्याने गव्हाणीमध्ये टाकला जाणारा ऊस



बैलगाडीमधून क्रेनच्या सहाय्याने गव्हाणीमध्ये टाकला जाणारा ऊस




भोगावती कारखान्याची वचनपूर्तीकडे वाटचाल

# कारखाना बहिर्गत परिसर



ऊस वाहतूक करणाऱ्या बैलगाड्या व गाडीअड्डा




ऊस तोडणी कामगारांशी चर्चा करताना संशोधक




कारखान्यामधील बगॅस वाहून नेणारे ट्रक


# महाराष्ट्र राज्यातील साखर कारखाने




# पश्चिम महाराष्ट्र साखर उद्योग



# कोल्हापूर जिल्ह्याचे महाराष्ट्र राज्यातील स्थान



# कोल्हापूर जिल्हा व जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे स्थान




**कोल्हापूर जिल्हा - साखर कारखाने**

१) आजरा
२) भोगावती, परिते
३) छत्रपती राजाराम
४) छत्रपती शाहू
५) दत्त, आसुर्ले-पोर्ले
६) दत्त, शिरोळ
७) दौलत
८) दुधगंगा वेदगंगा
९) गडहिंग्लज
१०) जवाहर
११) स. मंडलिक कागल
१२) कुंभी - कासारी
१३) दे.भ.र.कुंभार पंचगंगा
१४) शरद
१५) तात्यासाहेब कोरे वारणा
१६) उदयसिंह गायकवाड
१७) इंदिरा गांधी महिला
१८) डी.वाय. पाटील
१९) गुरूदत्त

# श्री भोगावती सहकारी साखर कारखाना मर्यादित
## शाहूनगर (परिते), जि. कोल्हापूर

## कारखाना कार्यक्षेत्रातील गांवे

